इतिहास
939

~~A~~ 50.51

a/cs Bills for Badges etc.

sent to A/cs. Br. for

payment.

इतिहास
939

हरिवंशाची बखर

अथवा

पटवर्धन सरदारांच्या हकीकती.

कै० बाळकृष्णराव हरिहर पटवर्धन आंबेकर यांनीं लिंहिलिली

ही बखर

अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या विपुल टीपा देऊन

वासुदेव वामनशास्त्री खरे

सिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक

यांनीं संपादिली.

यांस

स्वामिभक्तिपूर्वक

अर्पण केलें असे.

संपादक.

पुणें येथें

शांत हरि नारायण गोखले यांनीं छापिलें व वासुदेव वामनशास्त्री खरे
संस्कृत शिक्षक मिरज हायस्कूल यांनीं प्रसिद्ध केलें.



अर्पणपत्रिका.

हें पुस्तक

श्रीमंत राजश्री सर गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन

के. सी. आय्. ई.

मिरज संस्थानचे अधिपति

यांस

स्वामिभक्तिपूर्वक


अर्पण केलें असे.

संपादक.

शुद्धिपत्र*.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
८	३०	तलब	तकूब
१५	३२	एप्रिलमध्यें	जूनमध्यें
२१	२९	१० आगस्ट	१० आगस्ट स. १७६३
६२	९	शिस्तँ	शिस्त
६९	३२	तेव्हां	तेव्हांपासून
७०	३१	फुररदगी	फुरसदगी
७३	७	पांचीं	पांची
७४	२०	नान	नाना
७९	१९	पत्र	पत्रें
८०	२१	बोलते	बोलत
८५	६	घेता	घेतां
९०	३०	१५२	१५३
९३	३५	शुद्धपक्षांत	आषाढशुद्धपक्षांत
९४	१	हिपरगीरकर	हिपरगीकर

* पृष्ठाच्या ओळींच्या मोजदादींत टिपेच्याही ओळी घेतात.



नं. ३-२५
प्रतिष्ठित ग्रंथ संग्रहालय, मिरज
क्र. ५३१
सांगली (स्थळ प्रत)

हरिवंशाची बखर

अथवा

पटवर्धन सरदारांच्या हकीकती.

१. श्रीगणेशाय नमः श्रीकरंजेश्वर्यै नमः कोतवडेकर पटवर्धन यांचे कुळांत पुण्यवान् व कीर्तिवान् पुरुष जे जाहले त्यांचे वंशाचा विस्तार लिहितों. मूळपुरुष हरभट. त्यांस वडील पुत्र बाळंभट. त्यांस तीन पुत्र जाहले. वडील हरिभट. दुसरे पुत्र केशवभट. तिसरे विठ्ठलभट. त्यांत वडील हरिभट यांनीं पुळ्याच्या श्रीगणपतीजवळ अनुष्ठान द्वादश वर्षें दूर्वारस प्राशन करून केलें. त्यांस सहा पुत्र जाहले. वडील कृष्णंभट बापाजी. दुसरे बाळंभट. तिसरे त्रिंबकपंत. चौथे गोविंदपंत नाना. पांचवे महादेव ह्मणून होते, त्यांस संतति नाहीं; ते मुंज होऊन वारले. सहावे रामचंद्रपंत आप्पा. सातवे भास्करपंत आप्पा. आठवी ताराबाई कन्या, वैशंपायन यांचे घरीं दिली.

२. त्यांत वडील कृष्णंभट बापाजी यांचे वंशाचा व कीर्तीचा विस्तार लिहितों. त्यांस प्रथम दोन कन्या जाहल्या. वडील वेणूबाई जोशी. दुसरी भिमाबाई काळी. व पुत्र सहा जाहले. त्यांचीं नांवें— वडील पुत्र नारायणराव नाना. दुसरे पुरुषोत्तमराव दाजी. तिसरे मेघःश्यामराव बापू. चवथे जनार्दन ह्मणून होते त्यांस संतति नाहीं; ते मुंज होतांच वारले. पांचवे महादेवराव अण्णा. सहावे लक्ष्मणराव, त्यांस बळवंतराव दादा ह्मणत होते. असे पांच पुत्र. त्याणीं श्रीमंत पेशवे यांची सेवा एकनिष्ठपणें करून तैनाता व जहागिरी संपादन केल्या. त्या कसकशा केल्या, पेशवे याची सेवा कशी केली, व पराक्रम कसे केले, तें वर्णन करितों.

३. प्रथम सारी मंडळी कुरुंदवाडास होती. नंतर श्रीमंतांची सेवा करून सरंजाम गोविंद हरि याणीं संपादन केला. ते मिरजेस जाऊन राहिले[6]. तेथें बाळंभट अण्णा व भास्कर हरि हेही मिरज मुक्कामीं राहिले. रामचंद्र हरि हे पुण्यास श्रीमंतांसन्निध होते. त्रिंबक हरि याणीं कुरुंदवाड, घोरपडे यांजकडून रदकर्जास घेतलें ते कुरुंदवाडासच राहिले. कृष्णंभट बापाजी तेथें कुरुंदवाडास संसार प्रपंच पहात होते. नंतर घरांत पटेनासें जाहलें,

---

१. पटवर्धनांचें उपास्य दैवत गणपति व कुलस्वामिनी देवता करंजेश्वरी हीं आहेत. करंजेश्वरीचें देवस्थान चिपळूणनजीक गोवळकोट येथें आहे. २. कोतवडें गांव रत्नागिरी तालुक्यांत आहे. ३ हरिभट यांसच हरभट ह्मणतात. हरिहरांत भेद नाहीं ! ४. एकंदर सात. पैकीं अल्पवयांत वारलेला वजा. ५. इ. स. १७६२च्या प्रारंभीं. ६. त्यांचे चिरंजीव परशुरामभाऊ हे पुढें तासगांवास राहूं लागले. ७. इ. स. १७३६ सालीं.

सबब गोविंदपंत नाना याणीं मंगळवेढेची मामलत सरकारांतून मेघःश्यामराव कृष्ण यांचे नांवें करून घेतली. तेथें कृष्णंभट बापाजी येऊन राहिले. नाना हे बापाजींची मर्जी बहुत रक्षण करीत.

४. बापाजींचे वडील पुत्र नारायणराव हे गोपाळराव दादा यांजजवळ जाऊन राहिले. त्या उभयतांचा बहुत लोभ. दरोबस्त दौलतीचा कारभार नारायणराव नाना करीत. गोपाळराव यांची सरदारी व नारायणराव हे कारभारी याप्रमाणें चाललें. नारायणराव नाना याणीं प्रपंचाचा बंदोबस्त बहुत केला. प्रथम कुरुंदवाडाहून मंगळवेढ्यास आले ते समयीं त्रिंबकपंत आपा याणीं नऊ घोडीं मात्र दिलीं. वाटखर्चास तांदूळ देखील दिले नाहींत व यांजवळही खर्चास अगदीं नाहीं. ही कथा विष्णुपंत भाऊ यादवाडकर याणीं सांगितली. नारायणराव नाना नऊ घोडीं घेऊन बाहेर पेठेंत येऊन राहिले. नंतर हरभटबावा यांचा स्नेही कोणी शूद्र होता त्याची गांठ पडली. तो बोलला जे, नारायणा, तूं असा दिलगीर कां जाहलास ? याणीं सांगितलें जे, खर्चास अगदीं नाहीं. घोड्यांस दाणावैरणीची वाट काय ? मग त्या शूद्रानें रागें भरून यांचे दाणावैरणीचा बंदोबस्त करून खर्चास मंगळवेढेपावेतों त्यानें दिलें. याप्रमाणें विष्णुपंत भाऊ यादवाडकर यांचे मुखें वर्तमान ऐकिलें तें लिहिलें.

५. असें असतां नारायणराव नाना याणीं प्रपंच बहुत थाटला. घरांत कोणे गोष्टीची न्यूनता नाहीं. श्रीमंतांकडून तैनात चार हजार रुपये व पालखी जाहली. खेरीज मंगळवेढेस दीडशें रुपयेची जमीन सन सब्बा खमसैनांत इनाम जाहली. नारायणराव नाना याणीं सरकारांत कामकाजही केलें. घोडनदीचे लढाईंत मानेवर तलवारीची जखम लागली. बाळंभट अण्णा यांस एक पुत्र मोरो बल्लाळ जाहले. ते भावाबंदांचा बहुत द्वेष करीत. त्यांस कारभार सांगावा ह्मणून सत्यभाँमाबाई ताई यांचें ह्मणणें होतें, परंतु गोपाळराव दादा यांचा लोभ नारायणराव नाना यांजवर फार; याजमुळें चाललें नाहीं. नाना हेच मिरजकर यांचे घरीं कारभार करीत होते. याप्रमाणें नारायणराव नाना पराक्रमी जाहले.

६. त्यांचे दुसरे बंधु पुरुषोत्तमराव दाजी. याणीं बहुत पराक्रम केले. हे सहा वर्षांचे होते ते समयीं केशवभट यांचे पुत्र शिवाजी केशव, —त्यांस शिऊबा आप्पा ह्मणत,— त्याणीं

---

१. मंगळवेढें, करकंब, पंढरपूर, विजापूर हा सर्व मुलूख पूर्वी शाहूमहाराजांनीं प्रतिनिधीस जहागीर दिला होता. तो १७५० त पेशव्यांनीं घेतला. त्या किंवा त्या पुढच्या सालीं पेशव्यांनीं ही मंगळवेढ्याची मामलत पटवर्धनांकडे दिली असावी. २. पूर्वी हुजरातींत इंद्राजी कदम ह्मणून सरदार होते ते दिल्लीच्या एका स्वारींत पडले. त्यानंतर गोविंद हरि पटवर्धन हे कदमाच्या पथकाचे फडणीस होते त्यांसच बाजीराव बल्लाळ पेशव्यांनीं त्या पथकाची सरदारी दिली. पुढें गोविंद हरि वृद्ध झाल्यामुळें गोपाळराव गोविंद सरदारी करूं लागले. ३. नव्हतें. ४. मिळाली. ५. इ. स. १७५६।५७ सालीं. ६. ऐतिहासिक-लेखसंग्रह नंबर ११६ पहा. ७. हें गोपाळरावाच्या आईचें नांव.

यांस घेऊन साताऱ्यास गेले. नंतर माहुलीस श्रीकृष्णातीरीं स्नानास उतरले. तेथें वाळवंटींत दाजी खेळत होते. शिऊबा आप्पा यांचीं धोतरें वाळत घातलीं होतीं तेथेंच खेळत होते. तों अकस्मात् त्या मार्गानें छत्रपति शाहूमहाराज यांची स्वारी आली. ते एकटे, पायांत विजार व हातांत छडी याप्रमाणें आले. मस्तकासही अगदीं नाहीं. तों दाजी बोलले जे, अरे गोसाव्या, आमचे धोतरांस शिवशील. याप्रमाणें म्हणतांच महाराज म्हणाले जे, अरे मुला, तुझ्या धोतरांस आम्ही कांहीं शिवत नाहीं ! असें म्हणून तेथून जाऊन अंबराईंत आंब्याचे वृक्षाखालीं बसले. तों मागून फौज व हत्ती, घोडीं, पालखी, चोपदार, भालदार, हुजरे, जासूद, व लोक, लोकपाळ, वगैरे सरंजाम आला. ते महाराज जेथें बसले होते तेथें जमा जाहले. नंतर महाराज यांणीं शोधास जासूद पाठविला. त्यांणीं शोध घेऊन सांगितलें जे, शिऊबा आप्पा पटवर्धन आहेत. असें समजलेवर महाराज यांणीं बोलावणें पाठविलें. शिऊबा आप्पा यांस दाजी यांणीं हें वर्तमान सांगितलें जे, मीं महाराजांस 'गोसावी' असें म्हटलें, म्हणोन सांगितलेवर त्यांस कांहीं महाराजांचे दर्शनास घेऊन गेले नाहींत. आपण एकटेच गेले. जाऊन खुरनिसी करून बसले. तों महाराज यांणीं आज्ञा केली जे, तुमचे मुलास कां आणिलें नाहीं ? यांणीं विनंति केली जे, 'महाराज, तो मूल लहान आहे !' नंतर आज्ञा जाहली जे, 'त्यास आणिवणें.' मग यास घेऊन गेलेवर 'पायांवर डोई ठेव' ह्मणोन आप्पांनीं सांगितलेवर दाजींनीं महाराजांच्या पायांवर मस्तक ठेविलें. महाराज बोलले जे, 'अहो शिऊबा, हा मूल मोठा धीट आहे ! आह्मांस 'गोसाव्या, धोतरांस शिवशील,' असें बोलला !' यांणीं उत्तर केलें, 'महाराज, तो अज्ञान आहे.' महाराज बोलले जे, हा मोठा पराक्रमी होईल. असें बोलून शेला व पागोटें आणोन वस्त्रें दिलीं. यांणीं चरणीं मस्तक ठेविलें. महाराज यांणीं मस्तकीं हात ठेविला. याप्रमाणें सहा वर्षांचे वयांत महाराज यांची कृ[illegible]न त्यांणीं वरदहस्त यांच्या मस्तकीं ठेविला. हे पुढें महापराक्रमी जाहले.

७. पुढें रामचंद्र हरि यांस पुत्र नव्हता, सबब त्यांनीं यांस बापाजी यांजपासोन मागून घेऊन आपले समागमें लष्करांत हिंडवीत होते. हे दहा अकरा वर्षांचे वयांत आले.

---

१. एका वेळीं शाहूमहाराजांच्या मनास किंचित् भ्रम उत्पन्न झाला होता. त्या भ्रमांत ते एकदां शिकारीस गेले असतां त्यांस वाघानें गांठलें. त्या वेळीं बरोबर एक आवडता शिकारी कुत्रा होता त्यानें वाघास मारून महाराजांचा जीव वांचविला. तेव्हां महाराज प्रसन्न होऊन त्याणीं कुत्र्यास पांच हजारांची जहागीर व पालखी दिली ! इतकेंच नव्हे तर भरदरबारांत आपल्या डोक्याचें पागोटें काढून महाराजांनीं कुत्र्याच्या डोक्यास घातलें. पुढें मनाचा भ्रम नाहींसा झाल्यावर महाराजांस स्वतःचें पागोटें कुत्र्याच्या डोईस घातल्याबद्दल फार खंती वाटून त्यांनीं डोक्यास कांहींच न घालण्याचा निश्चय केला व तो आमरणात् चालविला. शिवाय पोटीं पुत्रसंतान नसल्यामुळें त्यांची वागणूक कांहींशी विदेही, उदासीन अशा प्रकारची झाली होती.

२. मुजरा. ३. हा राजदर्शनाचा प्रसंग सन १७३५।३६ सालीं घडला असावा.

मुंज रामचंद्रपंत आप्पा याणींच केली, लग्नही केलें. पुढें आप्पांस पुत्र परशुरामपंतभाऊ जाहले. ते साक्षात् परशुराम अवतार जाहला.

८. रामचंद्रपंतआप्पा याणीं स्वाऱ्या शिकाऱ्या वगैरे बहुत केल्या. ते श्रीमंत चिमाजी-आप्पासाहेब पेशवे यांजपाशीं जाऊन राहिले ते एक्या घोडयानिशीं जाऊन राहिले. त्यांचा किंचित् पराक्रम वर्णन करितों. त्यांस श्रीमंत चिमाजीआप्पा खडी ताजीम देत होते. श्रीमंत बाजीरावसाहेब याणीं कोणे एके समयीं रामचंद्रपंतआप्पास ताजीम दिली नाहीं; तों हे कचेरींतून उठून गेले. श्रीमंतांनीं चिमाजीआप्पा यांस विचारिलें जे, रामचंद्र हरि पटवर्धन मोठा रागीट आहे, कचेरींतून उठून गेला. असें ह्मणतांच श्रीमंत चिमाजीआप्पा बोलले जे, 'तो शिपाई आहे. आपण ताजीम दिली नाहीं ह्मणोन उठून गेला.' तें मनांत धरून पुढें हिंदुस्थानचे स्वारीस सवाई जयसिंग[1] यांचे लढाईंत त्याणीं सांगितलें जे, 'आह्माकडील एक भालेकरी व तुह्माकडील एक भालेकरी अशी लढाई व्हावी. तुह्मांकडील भालेकरी यानें आमचे भालेकरी यास मारल्यास आह्मी चवथाई राज्य तुह्मास देतों.' असें ठरून त्याणीं एक रजपूत भालेकरी तिकडून पाठवून दिला. नंतर श्रीमंत बाजीरावसाहेब अंबारींत होते तेथून रामचंद्र हरि यांस बोलावून सांगितलें जे, 'तुह्मीं पुढें व्हावें.' नंतर श्रीगजाननाचें व हरभटजीबावांचें स्मरण करून आप्पांनीं घोडा पुढें ढकलला. नंतर तिकडून भालेकरी आला, त्यानें विचारलें जे, तुह्मी कोण आहां? आप्पांनीं उत्तर केलें जे, आह्मी शिपाई आहोंत. याप्रमाणें बोलले. तों श्रीमंत चिमाजीआप्पासाहेब श्रीमंत बाजीराव-साहेब यांस बोलले जे, 'आपण ही गोष्ट नीट केली नाहीं. आमची ब्राह्मणांची शिपाईगिरी मुसलमान रजपूत यांजपुढें नाहीं! आतां तो अब्रूचा ब्राह्मण फुकट मरून जाईल!' याप्रमाणें बोलले; नंतर उभयतांची भाल्याची लढाई लागली. दैवयोग व श्रीगजाननाची कृपा व श्रीमंतांचा[2] होता काळ, त्यामुळें अकस्मात्[3] भाला रजपूत याचे भ्रूमध्यभागीं लागून ठार जाहला. तों श्रीमंतांकडील शहाजानें[4] नौबती वाजून श्रीमंतांनीं आपले लष्करांत रामचंद्र हरि यांस बहुत सरंजामानें आणिलें, आणि अडीच हजार रावतांचा[5] सरंजाम देऊन वस्त्रें दिलीं. पुढें वसईस श्रीमंत चिमाजीआप्पासाहेब यांजसमागमें हल्लचाचे वेळेस निशाण आप्पांनीं चढाविलें. नंतर तेथील फडणिसी त्यांस सांगितली ती अद्याप चालत आहे. पुढें शिवराजपुरास भागीरथीतीरीं आप्पांचा काळ जाहला. याप्रमाणें त्यांनीं सरकारसेवा एकनिष्ठपणें केली.

९. जे समयीं शिवराजपुरास आप्पांचे प्राणोत्क्रमणाचे वेळेस प्राण घोटाळूं लागले,

---

१. राजे सवाई जयसिंग, माळव्याचे सुभेदार, यांनीं बाजीराव बल्लाळ पेशव्यांस माळव्याची चौथ व सरदेशमुखी देण्याचें कबूल केलें तें स० १७३५ या वर्षीं. २. उद्योन्मुख. ३. जयवार्ये. ४. सरंजामाचा मुलूख त्या वेळीं दिला नाहीं. पुढें पुष्कळ वर्षांनीं दिला. ५. सन १७३९ त. ६. स. १७४३ त.

तेव्हां पुरुषोत्तमराव दाजी यांचें वय बारा वर्षांचें. त्याणीं विचारलें जे, आप्पा, आपले मनांत काय आहे ? आप्पा बोलले जे, भाऊस मीं शल्य करून ठेविलें ! तूं भाऊबरोबर भांडून वांटणी घेशील. नंतर दाजी याणीं उत्तर केलें कीं, माझे तळहातास केंस कांहीं आले नाहींत ! वांटणी मागणें हें काम निर्बळाचें ! मी कांहीं वांटणी मागणार नाहीं, असें बोलले. नंतर आप्पांनीं आज्ञा केली कीं, बोलल्याप्रमाणें माझे गळ्यावर हात ठेवणें. असें म्हणतांच दाजी याणीं गळ्यावर हात ठेविला. मग आप्पांनीं आज्ञा केली कीं, भाऊ लहान आहे तोंपर्यंत ही पागा संभाळून लौकिक रक्षण करून माझें नांव रक्षण करावें, याप्रमाणें मला वचन देणें. असें म्हणतांच पुनः शपथ केली. पुढें आप्पांचा काळ जाहला व शेवटील कार्य सर्व दाजी यांनींच केलें. ते समयीं अंताजीपंत तात्या यादवाडकर हे तेथेंच होते. परशुरामभाऊ यांची मुंज मात्र जाहली होती किंवा नाहीं हा मजकूर पक्का माहीत नाहीं[2]. परंतु वय फार लहान. कशावरून म्हणाल, तर रामचंद्रपंत आप्पा श्रीमंत नानासाहेब यांचे कारकीर्दीत वारले. पुढें श्रीमंत नानासाहेब यांचें पत्र पुरुषोत्तमराव दाजीस आलें. त्यांत लिहिलें आहे कीं, " गोपाळराव यांचा बहुमान जाहल्यास गोविंदपंतांचा जाहला; तुमचा जाहल्यास रामचंद्रपंतांचे लेंकाचा जाहला. " त्याजवरून पाहतां मुंज कांहीं जाहली नाहीं असें वाटतें[3].

१०. पुढें श्रीमंत नानासाहेब यांचे कारकीर्दीत साताऱ्यास दमाजी गाईकवाड याचें खूळ उभें राहिलें[4] ते समयीं त्यांच्या बंदोबस्ताकरितां रास्ते यांस जरीपटका देऊन रवाना केलें[5]. बरोबर पटवर्धन यांसही रवाना केलें. ते समयीं पुण्यांत कोणी सरदारमंडळीपैकीं बोलला जे, रामचंद्र हरि यांचे पथक बाळपरवेशी. रांडरोटी चालवावयाची; गोपाळरावामुळें[6] चालवावें, असें कोणी बोलला. ते समयीं पुण्यांत परशुरामभाऊ यांची मातुश्री होती. त्यांनीं ऐकिलेवरून पुरुषोत्तमराव दाजीस बोलावून नेऊन मातुश्री फार श्रमी जाहली आणि बोलली जे, वडील गेले, मूल लहान, आपलें कोणी कर्ते नाहीं, याजमुळें अशीं उणीं उत्तरें ऐकणें प्राप्त जाहलीं ! तुझेंही वय लहान. तुला वडिलांनीं सांगितलें तो कांहीं अभिमान धरून कामकाज करून दाखीव ! असें म्हणून बहुत श्रमी होऊं लागली. नंतर दाजी बोलले जे, बाई, तुला एक ठाऊक असों दे. या स्वारींत निराळी

---

१. अंताजी विठ्ठल यादवाडकर हे रामचंद्रपंत आप्पांचे चुलत बंधु होत. २. रामचंद्रपंत आप्पांचे मरणसमयीं परशुरामभाऊस चवथें वर्ष लागलें होतें. ३. परशुरामभाऊची मुंज झालेली असती तर दुखवट्याचें पत्र पुरुषोत्तमराव यास न येतां भाऊसच आलें असतें असा लिहिणाराचा अभिप्राय. ४. स. १७५१ त. ५. ही माहिती चुकली आहे. रास्त्यांच्या जागीं नाना पुरंदऱ्यांचें नांव पाहिजे. पुरंदरे पेशव्यांकडून साताऱ्यास ताराबाईच्या बंदोबस्ताकरितां होते. तिनें दमाजी गायकवाड यांस गुजराथेंतून साताऱ्यास बोलावून आणिलें. मग प्रथम गायकवाडांनीं पुरंदऱ्यांचा व मागून पुरंदऱ्यांनीं गायकवाडांचा पराजय केला. ६. गोपाळरावाच्या थोर सरदारीवर लक्ष्य देऊन हें त्याच्या चुलत्याचें पथक सांभाळून घ्यावें लागतें.

चाकरी करून दाखवीन तरच तुला तोंड दाखवीन. नाहींपेक्षां पांढरे कावळे असतील तिकडे जाईन[1] ! असें ह्मणून आपले पागेंतील मानकरी शिपाई बोलावून आणून सर्वांस ही गोष्ट सांगून त्यांस विचारिलें कीं, निराळी चाकरी करून दाखवितां, किंवा रांडरोटी खातां? असें विचारिलें तेव्हां सर्वांनीं सांगितलें कीं, आह्मांस अभिमान नाहीं कीं काय ? प्रसंग मात्र पडावा ! दाजी बोलले कीं याप्रमाणें बाईच्या पायांवर हात ठेवावा कीं प्रसंगास आह्मी माघारे सरणार नाहीं. असें सांगून सर्वांनीं बाईचे पायांवर हात ठेविला. मग स्वारीस निघाले ते साताऱ्यास गेले. नंतर लढाईचा मोकदमा सुरू जाहला. रास्ते जरीपटका घेऊन आले सबब पटवर्धन गोपाळराव दादा निराळे फुटून एकीकडे उभे राहिले. पुरुषोत्तमराव दाजी आपलें पथक घेऊन निराळेच उभे राहिले. रास्ते यांसीं व गाईकवाड यांसींच तोंड लागलें. तों रास्ते यांच्या फौजेचा मोड जाहला. गाईकवाड यांची फौज पाठीस लागली ते माहुलीपर्यंत मारीत गेले. तों मध्येंच रामचंद्र हरि यांचें पथक घेऊन पुरुषोत्तमराव दाजी उठले. तों खासा दमाजी गायकवाड यांचीच गांठ पडून लढाई मातबर जाहली. दमाजी गायकवाड यांची फौज मोडून किल्ल्याचे माचीपर्यंत मारीत गेले. याप्रमाणें बिघडलेली लढाई सुधरली. ते समयीं पुण्यास अकबार गेली जे, आज रामचंद्र हरि यांचे पथकांत पुरुषोत्तमराव दाजी याणीं कामकाज चांगलें केलें. त्या वेळेपासोन श्रीमंत नानासाहेब यांची पूर्ण कृपा जाहली.

११. पुढें साताऱ्याचा बंदोबस्त करून दमाजी गाईकवाड यांचे तहाचें बोलणें ठरोन गाईकवाड याणीं आपले देशास जावें असें ठरलें. त्यांस भेटीस बोलाविलें. भेटीस येण्याचें ठरलें. तिसरे प्रहरीं भेटीस यावें असें सांगून पाठविलें तों ते अकस्मात् दोन प्रहरींच भेटीस आले. तों बिचोऱ्यांत[2] श्रीमंत नानासाहेब बसले होते, जवळ पुरुषोत्तमराव दाजी बसले होते, तों गाईकवाड आले ह्मणोन समजलें. त्यांस सामोरे जावें लागतें अशी चाल आहे. तों गडबडीनें श्रीमंत उठले. खिजमतगार वगैरे येतात तों इतक्यांत दाजी याणीं जोडा श्रीमंतांपुढें ठेविला ! श्रीमंत ह्मणाले अरे पुरुषोत्तमराव, हें काय करितोस ? यांनीं उत्तर केलें कीं, 'महाराज, आह्मी आपले चाकर, जें काम पडेल तें आह्मीं करावयाचें. प्रसंगास आह्मी जोडाही उचलणार व लढाईंत मरोनही जाणार ! त्यांत ते बाडानजीक आले आणि आतां खिजमतगारास हांक मारिली असतां त्यांस बेतरॅतूद अशी समजेल.' असें ह्मणतां श्रीमंतांस ती गोष्ट बहुत लीनतेची वाटली. मग दाजी यांचा हात धरून बाडापर्यंत सामोरे गेले. नंतर गाईकवाड यांची भेट घेतली. अगोदर बोलले जे, दमाजी-

---

१. ह्मणजे देशांतर करीन ! २. या लढाईंत गोपाळराव होते कीं नव्हते ही वानवा आहे. पुढें लवकरच पेशव्यांनीं साताऱ्यास येऊन दमाजीस कैद केलें त्या वेळीं मात्र गोपाळरावांनीं कामकाज चांगलें केलें. ३. लहान राहुटींत. ४. पेशव्यांच्या खास व्यवस्थेची ही दशा असें वाटेल.

बावा, पुरुषोत्तमराव यांस भेटावें. नंतर त्याणीं भेट घेऊन विचारलें कीं, नाना, हे कोण ? मग श्रीमंत बोलले जे, दमाजीबावा, पुरुषोत्तमराव आपणास माहीत नाहींत कीं काय ? जे समयीं साताऱ्यास आपले फौजेची व आमचे फौजेची लढाई जाहली, ते समयीं आमचे फौजेचा मोड जाहला, ते वेळेस रामचंद्र हरीचे पथकांत पुरुषोत्तमराव याणीं उठोन लढाई करून कामकाज केलें, ते हे पुरुषोत्तमराव. असें म्हणतांच दमाजी गाईकवाड यांस ती गोष्ट लागली आणि उगाच राहिले. नंतर डेऱ्यास येऊन पानसुपारी गुलाब अत्तर होऊन गाईकवाड यांस व त्यांचे मानकरी वगैरे सर्वांस वस्त्रें दिल्हीं. नंतर गाईकवाड बोलले जे, नाना, उदईक आमचे डेऱ्यास यावें. श्रीमंतांनीं बरें ह्मणून सांगितलें. मग गाईकवाड यांस निरोप दिला.

१२. नंतर पुरुषोत्तमराव दाजी बोलले कीं, माझे पराक्रमाची गोष्ट त्यांजपाशीं कशास सांगितली ? सर्व प्रताप स्वामींचा. श्रीमंत बोलले कीं, तुह्मीं पराक्रम केला ह्मणून सांगितलें ! आतां उदईक त्यानें आह्मांस बोलाविलें त्यास तुह्मांस घेऊन जाऊन अगोदर वस्त्रें तुह्मांस देववून नंतर आह्मी घेऊं असें बोलले. दुसरे दिवशीं श्रीमंतांकडे पुरुषोत्तमराव दाजी गेले नाहींत. तों गाईकवाड यांची सूचना आली. तों त्यांचे डेऱ्यास जाण्याची श्रीमंतांची तयारी झाली आणि यांस बोलावणें पाठविलें. याणीं दाटून निराळे एक्या पालांत जाऊन निजले. तों श्रीमंतांचीं दोन चार बोलावणीं आलीं. तों गोपाळराव दादा याणीं लष्करांत शोध करून बोलावून आणिलें आणि बोलले कीं, 'अरे दाजी, तूं कोठें होतास ? श्रीमंतांचीं दोन चार बोलावणीं आलीं. ' मग हे तयार होऊन गेले. श्रीमंतांची सारी तयारी होऊन यांची वाट पहात बसले. तों जातांच बोलले कीं, अहो पुरुषोत्तमराव, तुह्मी कोठें होतां ? काल तुह्मांस सांगितलें होतें. असें ह्मणून बरोबर घेऊन त्यांचे डेऱ्यास गेले. गाईकवाड यांची भेट जाहली. गाईकवाड न सांगतां यांस भेटले. ओळख पक्की जाहली ! नंतर गुलाब अत्तर, पानसुपारी होऊन वस्त्रें सांडेतीन आणिलीं. तीं वस्त्रें गाईकवाड आपले हातांत घेऊन श्रीमंतांस जों देतात तों गाईकवाड यांचा हात धरून श्रीमंत बोलले जे, दमाजीबावा, पुरुषोत्तमराव यांस वस्त्रें द्यावीं, असें ह्मणून आपणास जीं वस्त्रें द्यावयास आणिलीं तींच यांस देवविलीं. नंतर आपण दुसरीं घेतलीं आणि निरोप घेऊन आपले डेऱ्यास आले. एकांतीं यांस विचारिलें कीं 'अरे पुरुषोत्तमराव, तुला समजलें कीं नाहीं ! मला जीं वस्त्रें द्यावयास आणिलीं तींच तुला दिलीं. मी घेऊन तुला दुसरीं देवविलीं असतीं तर उणाख देता, याजमुळें असें केलें !'

---

१. विजार, झगा, शिरपाव व अर्धे किनखाबाचें ठाण मिळून वस्त्रें साडेतीन. २. उणा + आंख = उणाख. उणे आंखाचीं, कमी किंमतीचीं. पेशवाईत हिशेबाच्या सोईकरितां कापडाची मोडणी आंखावरच करीत. अमुक इसमास पंधरा आंख कापड द्यावें म्हणजे पंधरा आंख बेरजेचें (अर्थात् रिवाज असेल त्याप्रमाणें पांच, दहा किंवा बारा रुपये किंमतीचें) कापड द्यावें असा अर्थ. पेशव्यांच्या म्हणण्याचा अभिप्राय असा कीं, आज तुम्हाला उणाख वस्त्रें घेऊं दिलीं असतीं तर गाईकवाडाच्या दरबारीं तोच दाखला पडून पुढें कोणा काळीं प्रसंग येईल तेव्हां तुम्हांस उणाख वस्त्रेंच मिळावयाचीं. आतां आमच्या युक्तीमुळें त्या दरबारांत तुमचा दर्जा पहिल्या प्रतीचा झाला त्यामुळें त्याच दर्जाचीं वस्त्रें मिळत जातील !

यांनीं हात जोडून विनंति केली कीं, सर्व अभिमान स्वामीस. आह्मास वाढवावें असें स्वामीचे मनांत आहे त्यापेक्षां आह्मास काय कमी ! याप्रमाणें श्रीमंतांचा पूर्ण लोभ संपादन केला.

१३. नंतर सावनूरचे स्वारीस श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब निघाले.[1] बरोबर दरोबस्त पागेपथके[2] निघाले. ते समयीं पुरुषोत्तमराव दाजी यांची प्रकृति नीट नव्हती, सबब मंगळवेढ्यास घरीं होते. तों श्रीमंत सावनुरास गेलेवर गोपाळराव दादा यांस विचारलें जे, पुरुषोत्तमराव कां आले नाहींत ? त्यांस लौकर आणवणें. त्याजवरून गोपाळराव दादा याणीं पत्र पाठविलें त्यांत लिहिलें जे, ' श्रीमंतांनीं चिरंजीव भाऊजवळ तुमचें स्मरण पांचसात वेळ केलें जे, बरे जाहले असलिया आणवावें; त्यावरून लिहिलें आहे, तर तुह्मी लौकर येणें.' असें पत्र देऊन दोन असामी स्वार तेथून पाठविले. ते मंगळवेढ्यास आले. त्यांनीं पत्र देतांच दिनशुद्धि पाहून नंतर पुरुषोत्तमराव दाजी निघाले ते टाकोटाक सावनुरास आले. गोपाळराव दादा याणीं स्वारांस सांगितलें होतें कीं दाजीस अगोदर आह्मांकडे घेऊन येणें. परभारां श्रीमंतांकडे जाऊं देऊं नये. तो हे गेले ते दिवशीं श्रीमंतांजवळच कचेरीस गोपाळराव दादा होते, तेथेंच गेले. श्रीमंतांस नमस्कार करून सर्वांस नमस्कार जाहला आणि कचेरीस बसले. श्रीमंतांनीं प्रकृतीचें वगैरे विचारिलेनंतर आणखी किल्ल्याप्रकरणीं गोष्टी श्रीमंतांनीं काढिल्या जे, आमचे मोर्चे बसून आठ पंधरा दिवस जाहले, अद्याप बातमी आंतील लागत नाहीं. काय करावें ? असें श्रीमंत भाऊसाहेब यांस विचारिलें, तों पुरुषोत्तमराव दाजी बोलले कीं, मला आज्ञा जाहलियास मी बातमी

---

१. सावनूरची स्वारी स. १७५५।५६ सालीं. २. पागेंतलीं घोडीं सरकारचे मालकीचीं असून त्यांवर बसण्यास सरकारांतून दरमहा देऊन शिपाई ठेवलेले असत त्यांस बारगीर म्हणत. बारगिरास पगार चार पांच रुपयांपासून आठ दहापर्यंत माणूस पाहून असे. अशा पागेवरच्या सरदारास पाग्या म्हणत. दहा घोड्यांपासून पांचशें सातशें हजारपर्यंत सुद्धां घोड्यांच्या पागा असत. पागेकडे नौबत, निशाण, पालख्या, फडणीस, पोतनीस वगैरे दरकदार, मशालजी, शिग्ये, पखाली, खासदार, नालबंद, दाणेकरी, जासूद, गारदी, फरास, डेरे, राहुट्या, कारखाने, ओझ्यांचीं व वैरण आणण्याचीं तट्टें, बैल, उंटें, हत्ती इत्यादि सरंजाम असे. त्यांचा सर्व कच्चा खर्च सरकारांतून चाले. एक पागा म्हणजे हजारों लोकांचें पोट भरण्याचें साधन ! घरचीं घोडीं घेऊन सैन्यांत चाकरी करणारे ते शिलेदार. त्यांच्या समुदायास नांव पथक. त्यावरचे सरदार ते पथके. पथकाचे सर्व खर्च पागेचे खर्च वर सांगितले आहेत त्याचप्रमाणें असत. पथकाच्या खर्चास सरकारांतून नक्त पैका मिळत असेल तर त्यास इतलाखी पथक म्हणत. सरंजाम म्हणजे खर्चाकरितां मुलूख तोडून दिला असेल तर त्यास सरंजामी पथक म्हणत. शिलेदारांचा पगार घोडें माणूस हत्यार पाहून दरमहा वीस रुपयांपासून तीस पस्तीसपर्यंत असे. हें स्थूलमान सांगितलें आहे. पगाराच्या बटवड्याचीं सदरें नालबंदी, रोजमुरा, तलब वगैरे आहेत तो तपशील येथें देत नाहीं. सर्व पथक्यांच्या खासगी पागाही लहान मोठ्या असत. हुजूर म्हणजे मुख्य धनी, त्याबरोबर स्वारीस निघणारी फौज ती हुजरात. महाराजांबरोबर असणारी ती राजहुजरात. अर्थात् पथक्यांमध्येंही पथकी व राजपथकी असे दोन भेद होते. पथक्यांत वरिष्ठ शिंदे होळकर. राजपथक्यांत वरिष्ठ पेशवे, भोंसले व गाईकवाड. राजपथकी दहा स्वारांचा धनी असला तरी त्याचे हक्क, मानपान इतर पंथक्यांपेक्षां जास्त होते. ३. परशुरामभाऊजवळ.

आणीन. श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, बातमी आणावी. असें ह्मणून गोपाळराव यांस आज्ञा केली जे, पुरुषोत्तमराव यांजसमागमें स्वार देवविणें. नंतर दाजी दोनशें स्वार घेऊन किल्ल्याचे भोंवतें तलाव्यास गेले. तो आंतील कहींसें तट्टें पांच पन्नास किल्ल्याचे लगत कुरण होतें त्यांत गवत कापावयास आलीं होतीं. त्यांत कांहीं स्वारही होते. त्यांची यांची लढाई थोडीसी जाहली. तीं सारीं तट्टें व माणसें धरून दरोबस्त एक्या चार घटकेंत घेऊन आले. तों श्रीमंत कचेरीसच बसले होते. येऊन श्रीमंतांस नमस्कार करून विनंति केली कीं, स्वामीची आज्ञा जाहली त्यावरून तलाव्यास गेलों होतों, तों गवत कापावयास तट्टें आलीं होतीं त्यांची गांठ पडली. तीं तट्टें व माणसें धरून आणिलीं. तीं तट्टें पागेसं लावावयाची आज्ञा व्हावी, व माणसें आणिलीं आहेत त्यांस बातमी विचारावी. असें म्हणतांच श्रीमंतांस बहुत संतोष वाटून श्रीमंत भाऊसाहेब यांस बोलले कीं, अरे भाऊ, पुरुषोत्तमराव नुकते आले, अद्यापि कंबर देखील सोडिली नाहीं, तों आह्मांस आठ पंधरा दिवस जाहले, किल्ल्यांतील बातमी अगदीं नव्हती, ती बातमीही आह्मास लागली व घोडींही पागेस लागलीं! गोपाळराव याणीं असले मनुष्य घरीं ठेविले होते ! असें किंचित् रागानें बोलले.

१४. पुढें दुसरे दिवशीं श्रीमंतांनीं स्नानसंध्या आटपून लढाईस सिद्ध जाहले. स्वारींत उभयतां बंधु अंबारींत बसले. सर्व फौज तयार होऊन आपलाले विल्हेवार उभी राहिली. तोफेची वगैरे मारगिरी आंतून बाहेरून चालली. सावनूरकर नबाब यांजकडील पठाण किल्ल्याचे रेवणींवर सतरंज्या हांतरून वर बसून तिरंदाजी करीत. याप्रमाणें तिराचा मार व बंदुकीचा मार चालला. तों श्रीमंतांनीं गोपाळराव दादांस हांक मारिली. तों भालदार बोलवावयास आले. तों गोपाळराव दादा खांद्यावर भालाँ घेऊन तसाच घोडा पुढें ढकलला आणि अंबारीचे हत्ती जवळ आले. श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, पुढें जावें. असें ह्मणतांच तसेच पुढें जाहले. तों जेथें तिरांचा व गोळ्यांचा पाऊस पडत होता त्या जाग्यावर जाऊन उभे राहिले. आणि आपले जागां ह्मणाले जे, आज माझे पंगतीस भाऊबंद मंडळीचीं ताटें पंचवीस जेवितात; परंतु आज मरावयास मी मात्र एकटा! याप्रमाणें बोलले. तो शब्द पुरुषोत्तमराव दाजी यांनीं ऐकिला. ते लगतच पाठीमागें होते. त्याणीं घोडा आपला पुढें ढकलला आणि बोलले कीं, अरे दादा, तुला कळलें का ? जे तुझ्या पंगतीस

---

१ टेहाळणीस. २ दाणावैरण आणावयास. ३ सरकारी पागेस जमा करावयाची. ४ नानासाहेब व भाऊसाहेब. ५ तटाखालीं खंदकाचे पुढें मोकळी जागा थोडीशी असते तिला रेवणी म्हणतात. किल्ल्याच्या रक्षणार्थ बाहेरच्या चौक्या असतात त्या येथेंच राहतात. ६ येथेंच मरूं, पण जागा कधीं सोडणार नाहीं; असा आपला निश्चय शत्रूस कळावा म्हणून. ७ गोपाळरावांचा भाला अद्यापि मिरजेच्या वाड्यांत आहे. बुडी व शेवटचें फळ सुद्धां त्याची लांबी सुमारें आठ हात असून काठी जाड, भक्कम व भरीव आहे. तो ताठ माणसास सुद्धां दोनी हात लाविल्यावांचून उचलत नाहीं. तसबिरीवरून पाहिलें तर गोपाळराव हा मध्यम उंचीचा सडपातळ मनुष्य असावा असें वाटतें आणि असला मनुष्य हा भाला सहज लीलेनें एका हातांत वागवून पंचवीस पंचवीस कोसांची दौड कशी करीत असेल हें मनांत येऊन फार अचंबा वाटतो !

जेवतील ते मरतील, पण मागें सरणार नाहींत. असें ह्मणून खंदकाचे रेवणीपर्यंत जाऊन एक पठाण ठार मारिला. नारायणराव नाना हेही पुढें जाहले, तों दाजीस तिराची जखम लागतांच जिनावर डोचकें ठेविलें, तों श्रीमंतांनीं अंबारींतून पाहिलें आणि बोलले कीं, अरे भाऊ, पुरुषोत्तमराव यांस जखम लागली, त्यांस पालखी पाठवावी. नंतर श्रीमंतांनीं पालखी पाठविली. तों इकडे नारायणराव नाना यांचे खासगीचे स्वार होते त्यांणीं भाल्याची झोळी करून झोळींत यांस घातलें, तों सरकारची पालखी आली. नंतर दाजी बोलले कीं, आह्मी असले पालखींत बसत नाहीं ! आमची शिलेदारांची झोळी हीच पालखी ! असें ह्मणतांच बातमी श्रीमंतांस समजली. श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, पुरुषोत्तमराव यांस सांगावें कीं, आजपासून तुह्मांस पालखी दिली[1]. तुह्मीं पालखींत बसावें. नंतर पालखींत बसून गोटास आले. मग सरकारचे कमानदार वगैरे जखमा शिवणारे श्रीमंतांनीं पाठवून दिले. तों त्याणीं येऊन पाहिलें आणि ह्मणाले जे, यांचा तीर काढतांच तिराबरोबर प्राण जाईल ! हे लोडास टेंकून बसले होते त्याणीं ऐकिलें, आणि आपले हातानें तीर उपसून टाकिला ! याप्रमाणें धैर्य असें पाहून सर्वांस आश्चर्य जाहलें. पुढें कांहीं दिवसांनीं जखमही बरी जाहली. नंतर श्रीमंतांनीं सावनूरचा बंदोबस्त करून स्वारी पुन्हां पुण्यास आली. आलेवर तैनात पालखीसुद्धां पसतीसशें रुपये तैनातजाबत्यास करून दिली. याप्रमाणें श्रीमंतांची कृपा व सेवाही याप्रमाणें केली.

१५. पुढें कांहीं दिवसांनीं[2] श्रीमंतांची स्वारी खासा श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब व दादासाहेब हे त्रिवर्ग बंधु कर्नाटकचे स्वारीस जाते समयीं पुरुषोत्तमराव दाजी यांनीं सक्त रदबदली करून परगणे मंगळवेढेवरून स्वारी येण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें स्वारी मंगळवेढ्यास दाखल जाहली. नंतर श्रीमंत नानासाहेब व दादासाहेब उभयतां बंधु किल्ल्यांत येऊन उतरले. श्रीमंत भाऊसाहेब लष्करांत उतरले. ते समयीं मेजवानीस श्रीमंतांची स्वारी आली. समागमें मल्हारजी होळकर आदि मानकरी होते. श्रीकाशीविश्वेश्वराचें दर्शन घेऊन आर्क[3] किल्ल्यांत आले. तों कृष्णंभट बापाजी यांनीं चौकांत सामोरे येऊन आशीर्वाद करून नारळ हातांत दिला. श्रीमंतांनीं नमस्कार केला. नंतर कचेरीस स्वारी येऊन बसली.

---

१ ह्मणजे पालखी दिली एवढेंच नाहीं, तर तिचा इतमाम सांभाळण्याकरितां दरसाल बाराशें रुपयांची तैनात अथवा सरंजामही दिला. २ ह्मणजे बखर लिहिणारांचे मतें पेशवे स. १७५७ त श्रीरंगपट्टणचे स्वारीस जातांना मंगळवेढ्यास आले होते. पण ही समजूत चुकीची आहे. स. १७५५ च्या अखेरीस सावनूरचे स्वारीस जातांना पेशवे मंगळवेढ्यास आले होते हेंच खरें. त्या वर्षी मात्र त्यांबरोबर भाऊसाहेब, दादासाहेब व मल्हारजी होळकर हे तिघेही होते. त्याच वर्षी रघुनाथराव दादासाहेबांचें दुसरें लग्न गलगलें येथें झालें. त्या स्त्रीचें नांव आनंदीबाई. ती रत्नागिरी जिल्ह्यांत गुहागराजवळ मळण ह्मणून गांव आहे तेथचे राहणारे राघोपंत ओक यांची कन्या. ३ आर्क किल्ला = किल्ल्यांतली गढी. बालेकिल्ला.

१६. नंतर आज्ञा जाहली जे, नारायणराव, पुरुषोत्तमराव, आमचे दादाचें दुसरें लग्न करावयाचें आहे. समागमें नवरी आहे. त्यास आज केळवण करावयाचें तें कृष्णंभट यांचे घरीं करूं. त्यास अभ्यंगाची वगैरे तरतूद करणें. असें सांगून मग मंडळीस आमंत्रणें करविलीं. नंतर नारायणराव, पुरुषोत्तमराव उभयतां बंधूनीं तेल उटणें श्रीमंत दादासाहेब यांस लावून मग पाणी घालावयास लागले. तों तेथें श्रीमंत नानासाहेब बसून आपण पाणी अधिक घाला ह्मणून सांगितलें. श्रीमंत दादासाहेब वरचेवर पुरे ह्मणत. श्रीमंत खुणावीत जे, पाणी अधिक घालणें ! याप्रमाणें नाहण्याचा समारंभ जाहला.

१७. पुढें श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, मल्हारजी होळकर यांस आमंत्रण केलें, परंतु ते माजघरांत भोजनास बसतील. त्यांचीं कुत्रीं जवळ असतात, तें कृष्णंभटजी यांस सोसणार नाहीं; त्यास तुह्मीं युक्तीनें सांगावें आणि सदरेवर बसावयाचें करावें. नंतर पुरुषोत्तमराव दाजी होळकर यांजपासीं येऊन म्हणाले जे, सुभेदार ! श्रीमंतांची स्वारी भोजनास येती. आपणही येतां. त्यास आपण सदरेवर भोजनास बसावें. हें आमचें भिक्षुकाचें घर, सोंवळें फार, यास्तव सांगतों. असें ह्मणतांच होळकर श्रीमंतांस म्हणाले जे, ' नाना, नाना, हा बामण मोठा बाटगा आहे ! आह्मास काय, कोठेंही टुकडा खातां येईल !' याप्रमाणें विनोदाचें भाषण करून नंतर भोजनास बसले.

१८. श्रीमंत भाऊसाहेब कांहीं भोजनास आले नाहींत. श्रीमंत भोजनास बसलेवर श्रीमंत भाऊसाहेब लष्करांत भोजन करून तेथें आले. मंगळवेढेकर कोरबूंचें कांहीं खटलें होतें त्यांची फिर्याद देशपांडे याणीं श्रीमंत भाऊसाहेब यांजजवळ केली. त्याची चवकशी करून त्याचा हात तोडावा याप्रमाणें ठरवून श्रीमंत भाऊसाहेब श्रीमंतांची परवानगी घ्यावी असें म्हणून ती गोष्ट पंगतींत काढिली; आणि बोलले जे, त्याचा हात तोडावयाची आज्ञा व्हावी. तों श्रीमंतांनीं कांहीं उत्तर केलें नाहीं. पुनः विचारलें जे, त्याचें बोट तोडावयाची तरी आज्ञा व्हावी[3]. नंतर श्रीमंत बोलले कीं 'अरे भाऊ, आह्मी कृष्णंभटजी यांचे घरीं जेवावयास आलों. लोकांचे हातपाय तोडावयास कांहीं आलों नाहीं !' असें म्हणून नारायणराव नाना यांस सांगितलें जे, याची चौकरी पाहून वाजवी असेल तें करावें. असें सांगतांच श्रीमंत भाऊसाहेब उगेच राहिले. नंतर भोजनें जाहलीं. आणखी भोजन करतांना बापाजी बोलले जे,

---

१ आपण पानांत कुत्रीं घेऊन जेवतों यांत ओंवळें कांहींच नाहीं, आणि हा भिक्षुक माजघरांत जेऊं नका ह्मणून सोंवळें मिरवितो तेव्हां हाच बाटगा, असें विनोदाचें तात्पर्य ! २ कानडी देशांत कोरबू हा गांवकीकडे नोकरी करणारा धनगर जातीचा एक बलुतेदार असतो. ३ भाऊसाहेब साऱ्या पेशवाईचा कारभार करीत होते; पण स्वराज्यांत अपराध्याचें बोट सुद्धां तोडण्यास त्यांस पेशव्यांची परवानगी लागत होती हें आश्चर्य करण्याजोगें आहे. गंगाधरराव गोविंद हे मिरजेच्या सुभ्यावर मामलेदार होते. मुलकी किंवा फौजदारी गुन्हा करणारास मार देणें योग्य वाटलें तर ते ती शिक्षा फक्त आपले समक्ष मात्र अमलांत आणीत हें त्या वेळच्या सरकारी कागदांवरून स्पष्ट होतें.

'भाऊ, आपण आजच श्मश्रु करविली व नानांनींही आजच करविली, त्यास उभयतां बंधूंनीं एके दिवशीं करूं नये.' असें ह्मणतांच श्रीमंत भाऊसाहेब बोलले जे, नानासाहेब यांनीं करविली हें मला समजलें नाहीं. याप्रमाणें बोलले. नंतर जेवणें जाहलियावर कचेरीस येऊन बसले. त्रिवर्ग बंधूंस वस्त्रें दिलीं.

१९. नंतर श्रीमंत नानासाहेब बोलले कीं, अरे भाऊ, कृष्णंभटजींनीं आह्मांस आशीर्वाद केला, यांस काय द्यावें ? यांचें कुटुंब मोठें, पांच पुत्र, सुना, नातू. याप्रमाणें बोललेवर नारायणराव नाना बोलले कीं, स्वामींनीं आह्मांस कमी काय केलें आहे ! मग श्रीमंत बोलले कीं, तुह्मी चाकऱ्या करून तैनाता खातां; परंतु कृष्णंभटजींनीं आशीर्वाद केला यांस काय द्यावें ? असें ह्मणून कलमदान आणविलें आणि स्वदस्तूरची भोजनखर्चाबद्दल दरमहा दीडशें रुपयेप्रमाणें अठराशें अर्काटी[1] रुपयांची यादी करून कृष्णंभटजी यांचे हवालीं करून नमस्कार करून स्वारी चालती झाली. याप्रमाणें श्रीमंत दयाळू कृपावंत. पुढें श्रीमंत दादासाहेब यांचें दुसरें लग्न गलगल्याचे मुक्कामीं जाहलें. याप्रमाणें ही गोष्ट वडिलांनीं सांगितलेवरून लिहिली असे.[2]

२०. श्रीमंत वारंवार कृपा करीतच गेले. कोणे एके दिवशीं श्रीमंतांनीं विचारिलें अरे पुरुषोत्तमराव, नारायणराव, तुम्हांला कांहीं द्यावेंसें वाटतें. यांनीं विनंति केली कीं महाराज, आह्मांस काय कमी आहे ? पालखी, तैनाता सर्व बंदोबस्त स्वामींनीं करून दिला आहे. असें बोलतांच श्रीमंत बोलले कीं, तुम्हांस मंगळवेढेंनजीक एक स्थळ तुमचीं मुलें माणसें रहाण्यास द्यावें असें मनांत आहे. नंतर यांनीं विनंति केली कीं, आह्मी आपले सोईचे जाग्याची योजना करून स्वामीस विदित करूं, असें ह्मणाले, आणि मौजे आंबें

---

१ मद्रास इलाख्यांतील अर्काट या राजधानींतल्या टंकसाळेंत पाडलेले. मंगळवेढे परिंगण्यांची जमाबंदी अर्काटी नाण्यांत होती. २ इंग्रजी कारकीर्द सुरू झाल्यावर गरीबी आली, पुन्हां नांवारूपास येण्याची आशा राहिली नाहीं, अशा स्थितींत पूर्वी कोणा एका काळीं पेशव्यांची स्वारी आपल्या घरीं आली होती तेव्हां काय काय घडलें हें वडील माणसें घरांत बोलत तें आठवून आठवून बखर लिहिणारानें प्रेमपूर्वक तपशीलवार लिहून ठेविलें आहे. प्रत्येक गोष्ट त्यास महत्त्वाची वाटावी हें ठीकच आहे. वाचकांस जर ती भाकडकथा वाटेल तर त्यांची मोठीच चूक होईल. या गोष्टी क्षुल्लक असल्या तरी त्या क्षुल्लक आहेत ह्मणूनच त्यांच्या सत्यतेचा उत्कृष्ट पुरावा होय. अशा सप्रमाण क्षुल्लक गोष्टींनींच प्रसिद्ध व्यक्तींच्या स्वभावाची खरी ओळख पटत असते. बॉसवेलचा समग्र ग्रंथ अशा क्षुल्लक तपशिलानेंच भरलेला आहे ! उदाहरणार्थ वर बखरींत वर्णिलेला मेजवानींचा प्रसंग घेऊं. यांतून हौळकराचा मनमिळाऊपणा, वडिलांच्या अधिकाराची मर्यादा रक्षण करण्याविषयीं भाऊसाहेबांची तत्परता, तसेंच राजकार्यांत मन सर्वथा व्यग्र झाल्यामुळें कोठें कोणती गोष्ट काढावी याविषयीं अनवधान, प्रसंगोचित वागण्याविषयीं पेशव्यांचा सावधपणा, प्रत्यक्ष बंधूनें केलेली चवकशी रद्द करून नारायणरावासारख्या कमी दर्जाच्या मनुष्यास पुनः ती करण्यास हुकूम देण्यांत दिसून येणारी निष्पक्षपात बुद्धि, पदरच्या लोकांविषयीं त्यांचें औदार्य, कृष्णंभटजीसारख्या धार्मिक व कर्मठ ब्राह्मणानें पर्वा न धरितां आचाराविषयीं श्रीमंत भाऊसाहेबांस दोष दाखवून देणें, व तो कबूल करण्यांत श्रीमंतांचा विनय, या गोष्टी वरील आख्यायिकेवरून ध्यानांत येतात !

हा गांव पंढरपूरनजीक, भीमातीर, मंगळवेढेंही सन्निध, असा पाहून जाऊन विनंति केली, त्याजवरून त्या वेळेसच चिठी स्वदस्तूरची गोविंद हरि यांचें नांवची दिली जे, "मौजे आंबें परगणे मंगळवेढें हा गांव दरोबस्त नारायणराव कृष्ण व पुरुषोत्तमराव कृष्ण या उभयतांस इनाम दिला असे. तरी साल दरसाल उभयतांचे नांवें पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनामखर्च लिहीत जाणें." याप्रमाणें श्रीमंतांची चिठी होऊन त्यापासून आजपर्यंत गांव चालत आहे. त्या गांवास किल्ला चौबुर्जी बांधला. मळे तळे भीमातीरास कोठें नाहींत, परंतु तेथें केले. याप्रमाणें पुण्यप्रतापी पुरुष! श्रीमंतांची कृपा या प्रकारची! श्रीमंतांच्या कीर्ति बहुत. त्या वर्णन करावयास कोण शक्त आहे?

२१. पुढें पानिपत जाहलेवर श्रीमंत नानासाहेब यांची स्वारी नर्मदेपर्यंत गेली. तिकडून पळ आला. श्रीमंत भाऊसाहेब गर्दीत मिसळले. फौज, दौलत, गारद जाहली. हें वर्तमान श्रीमंत नानासाहेब याणीं ऐकलेवर किंचित् भ्रम जाहला. ते समयीं पटवर्धन समागमेंच होते. पटवर्धनांची फौज कांहीं पानिपतचे स्वारीस गेली नाहीं. हे हुजूर पुण्यास होते. श्रीमंत भाऊसाहेब यांचा किंचित् रोष होता; सबब त्यांनीं समागमें नेले नाहींत. श्रीमंत सौभाग्यवती गोपिकाबाईसाहेब यांचे लक्षानें वागत होते. त्यां उभयतांचें ठीक नव्हतें असें ऐकीव. यांत गोपाळराव दादा याणीं पानिपतचे स्वारीची तयारी जाहली ह्मणोन ऐकिलें. त्यांत पटवर्धन समागमें नेण्याची योजना झाली नाहीं असें ऐकिलें; त्यावरून गोपाळरावदादा याणीं श्रीमंत भाऊसाहेब यांस विनंतिपत्र लिहिलें कीं, सरकारस्वारीची जाण्याची तयारी जाहली त्यांत आमची फौज नेण्याची मर्जी नसल्यास वडील गोविंदपंत नाना येथें चाकरीस आहेत. मी एकट्या घोड्यानिशीं सडा स्वामीचे बरोबर येतों. त्याचें उत्तर श्रीमंत भाऊसाहेब याणीं पाठविलें कीं सरकारांतून श्रीमंत विश्वासरावसाहेब यांस स्वारीस जाण्याची आज्ञा जाहली आहे. समागमें मलाही जाण्यास सांगितलें. त्यास आपली जाण्याची मर्जी असल्यास मी राहीन! याप्रमाणें उत्तर पाठविलेवरून पटवर्धन कोणी मंडळी गेली नाहींत. ते श्रीमंत नानासाहेब यांसमागमें नर्मदेपर्यंत गेले.

---

१ खरें ह्मटलें तर नर्मदेपलीकडे माळव्यांत सिरोंज भेलशापर्यंत पेशवे गेले होते. त्यांनीं समागमें पन्नास हजार फौज जमविली होती. आतां आपण होऊन अबदालीवर चालून जावयाचें नाहीं, पण तो दक्षिणेकडे येऊं लागेल तर त्याशीं निकरानें लढावयाचें, असा त्यांचा निश्चय होता. अबदाली दिल्लीच्या आसपास पावसाळ्याकरितां राहील तर मराठी राज्याची उत्तर सरहद्द जी चमेली नदी तिच्या तीरावर आपणही छावणी करून रहावें अशी त्यांची योजना होती. पण पानपतच्या लढायांत गिलचे लोक फार मेले, राहिले त्यांत पटकी उठली, रोहिले, पठाण व सुजाउद्दौला हे आपसांत भांडूं लागले, जाट, रजपूत व मराठे एक होण्याचा रंग दिसूं लागला पेशव्यांचें लष्कर माळव्यांत आलें, यामुळें दक्षिणेवर स्वारी करण्याचा नाद सोडून अबदाली काबुलास परत गेला. तेव्हां पेशवेही परत फिरले. नादिरशहानें दिल्ली लुटली तेव्हां त्यानें दक्षिणेकडे न यावें ह्मणून ज्याप्रमाणें बाजीराव फौज जमा करीत त्वरेनें माळव्यांत गेले, त्याचप्रमाणें पानपत झाल्यावर नानासाहेबांसही तिकडे राज्यरक्षणार्थ जावें लागलें. २ भाऊसाहेब व पेशव्यांची स्त्री गोपिकाबाई यांत.

२२. श्रीमंतांस किंचित् भ्रम जाहलाच होता. त्याजमुळें मर्जी फार कठिण. परंतु पुरुषोत्तमराव यावर पूर्ण कृपा. येविशीं कांहीं कथा लिहितों. नर्मदेपर्यंत स्वारी गेली तेथून माघारे फिरले. श्रीमंत रागानें लोकांस थोरथोरांस कमचीनें मारूं लागले; यामुळें मंडळी फारशी जवळ जाईनाशी जाहली. परंतु पुरुषोत्तमराव यास वरचेवर जवळ बोलावीत. कोणी एके दिवशीं नर्मदातीरास संध्या करीत होते. मंडळी सारी शेलेपागोटीं, ढालतलवार याप्रमाणें तयारीनें होती. श्रीमंत मात्र प्रातःसंध्या करीत होते. तों उपस्थान करीत असतां अकस्मात् झोंक गेला. तों नारायणराव नाना हे तसेच उठोन श्रीमंतांस धरिलें. श्रीमंतांनीं मागें पाहिलें आणि बोलले जे, दुसरा कोणी असता तर कमच्यांनीं मारिलें असतें ! असें म्हणतांच पुरुषोत्तमराव बोलले कीं महाराज, नारायणराव यांचा अपराध कमच्यांनीं मारावयाचा जाहला ! आपण पडतां आणि सर्व लोक हंसते आणि म्हणते कीं जवळ होते ते आंधळे होते कीं काय ? असें म्हणतांच श्रीमंत म्हणाले, मला विटाळ जाहला. हे बोलले कीं पुन्हा स्नान करावें ! असें म्हणतांच श्रीमंत हंसूं लागले आणि बोलले, अरे पुरुषोत्तमराव, तूं बोललास म्हणजे माझा राग कोणीकडे जातो नकळे ! याप्रमाणें श्रीमंतांची कृपा पूर्ण होती.

२३. पुढें पुण्यास आलेवर वरचेवर बोलावणें पाठवीत. ते समयीं गोविंदपंत नाना म्हणाले कीं तूं घरास जा. तूं वरचेवर श्रीमंतांकडे जातोस, एखादे वेळेस कमच्यांनीं मारितील, मग आह्मास तोंड दाखवावयास जागा नाहींशी होईल ! हे बोलले कीं मला निरोप देववून घरास पाठवावें. श्रीमंत निरोपच देणार नाहींत, त्यापेक्षां आपले पुण्यानें काय पार पडेल तें खरें !

२४. कोणी एके दिवशीं दहा बारा घटका रात्रीं श्रीमंतांचें बोलावणें आलें. तों गोविंदपंत नाना म्हणाले कीं लौकर जाऊन ये. मग नानांची आज्ञा घेऊन दाजी श्रीमंतांकडेस गेले. श्रीमंत दिवाणखान्यांत होते. श्रीमंत बाईसाहेबही तेथें होत्या. तों हे गेले आणि हुजऱ्यास विचारिलें, श्रीमंत कोठें आहेत ? तों यांचा शब्द ऐकून श्रीमंतांनीं विचारिलें कीं, पुरुषोत्तमराव कीं काय ? हे बोलले कीं, मी आहें. श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, आंत येणें. तों हे पडदे उघडून आंत जातात तों उभयतां पलंगावर बसलीं होतीं तें पाहिलें. मग विनंति केली कीं, महाराज, आतां रात्र फार जाहली. मी उदईक येईन. श्रीमंत म्हणाले आंत ये. असें म्हणतांच आंत गेले. हे आंत जातांच श्रीमंत बाईसाहेब पलंगावरून उठून एकीकडे उभ्या राहिल्या. श्रीमंतांनीं यांस जवळ बोलाविलें. हे जवळ जातांच हात धरला. हे मनांत म्हणाले कीं, आतां तोंडांत मारितात ! असें मनांत आणिलें तों श्रीमंतांनीं ओढून आपले पलंगावर बसविलें. हे बोलले कीं, महाराज, बाईसाहेब उभ्या आहेत. मी खालीं उभा राहतों. असें म्हणतांच श्रीमंत म्हणाले, तिला बसावयास सांगावें. नंतर

बाईसाहेब खालीं बसल्या. मग पूर्वीच्या गोष्टी काढिल्या. तों मध्यान्हरात्र जाहली. वरचेवर दाजी म्हणत, आतां रात्र जाहली, उदईक उजाडावयाचें नाहीं कीं काय ? श्रीमंत म्हणत, तुझ्या गोष्टी ऐकिल्या म्हणजे मला किंचित् स्वस्थ वाटतें. याप्रमाणें बोलत असतां रात्र दोनप्रहर अखेर जाहली. मग श्रीमंत म्हणाले, तुला कांहीं द्यावेंसें वाटतें; परंतु आतां जामदार[1] पोतनीस सारे घरास गेले असतील. मग दाजी म्हणाले कीं, महाराज, आम्हांस काय कमी आहे ! असें म्हणाले; तों श्रीमंतांनीं आपले अंगाकडे अवलोकन करून पांढरी शालजोडी पांघरले होते ती शालजोडी काढून पुरुषोत्तमराव यांचे अंगावर घातली. याणीं पायावर डोई ठेऊन निघाले तों श्रीमंतांनीं बाईसाहेब यांस सांगितलें जे, पुरुषोत्तमराव यास विडे[3] द्यावे. तेव्हां यांनीं आपले हातानेंच विडे घेऊन बाईसाहेब यांचे पायावर मस्तक ठेऊन निघाले ते आपले वाड्यांत आले. तों गोविंदपंतनाना हे सदरेवर वाट पहातच बसले होते. तों यांची मशाल[4] दृष्टीस पडली. तों याणीं येऊन नानांचे पायांवर मस्तक ठेऊन शालजोडी पुढें ठेविली. मग नानास संतोष जाहला, आणि बोलले कीं तुझें दैव चांगलें ! याप्रमाणें श्रीमंतांची पूर्ण कृपा संपादिली[5]. पुढें श्रीमंत दादासाहेब यांचे कारकीर्दीतही यांजवर मर्जी होती.

२५. श्रीमंत नानासाहेब यांचे पुत्र माधवरावसाहेब व नारायणरावसाहेब उभयतां बंधु श्रीमंत दादासाहेब यांचे अज्ञातवासांत होते. सर्व दौलतीचा कारभार श्रीमंत दादासाहेब करीत. राज्याधिकारी श्रीमंत माधवरावसाहेब, सबब त्यांचे लक्षानें पटवर्धन वागत. याजमुळें श्रीमंत दादासाहेब यांचा राग जाहला आणि यांनीं पुण्यांत राहूं नये असें सांगितलें. नंतर एकांतीं गोपाळरावदादा व नारायणरावनाना व पुरुषोत्तमराव दाजी याणीं श्रीमंत माधवरावसाहेब यांची गांठ घेतली आणि विचारिलें कीं, पुढें आमची वाट काय ? ते समयीं श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं तूर्त तुह्मांस जिकडे वाट फुटेल तिकडे जाऊन जीव रक्षण करणें. जे दिवशीं माझा हात चालेल ते दिवशीं तुम्ही जेथें असाल तेथून आणवून तुमचें चालवीन. यांनीं विनंति केली कीं, याप्रमाणें आम्हांस वचन द्यावें. नंतर श्रीमंतांनीं वचन दिलें. मग पुण्याहून निघाले ते टाकोटाक मिरजेस आले.

---

१. जवाहीर जामदाराच्या ताब्यांत, रोकड पोतनिसाच्या ताब्यांत. २. अंगावरचें महावस्त्र, अलंकार, दागिने उतरून देणें ही प्रेमयुक्त आदराची सीमा. शिवाय हिंदूस पांढरी व मुसलमानास हिरवी शालजोडी देणें ह्मणजे त्याचा फार मोठा बहुमान करणें होय. ३. विडे देणें ही निरोपाची खूण. ४. मशालीचा बहुमान सरकारी आहे. मशाल कोणी घरीं बाळगावयाची नाहीं. ती सरकारांतून मिळावयाची. अर्थात् मशालीचे पोत, तेल, मशालजीचा पगार हा सारा खर्च सरकारी असे. मोठमोठे दरकदार, सरदार, सरकारकून यांच्या दिमतीस मशाली असत त्या फक्त सरकारी कामाकरितांच असत. पण सामान्य रयतेपैकींसुद्धां ज्यांची विद्या, पराक्रम, कौशल्य, हुन्नर, सरकारी कामाचा उपयोग हीं फार असतील त्यांस मशालीचा बहुमान मिळत असे. ५. सन १७६१ च्या एप्रिलमध्यें ही गोष्ट घडली आहे. त्या वर्षी जूनच्या तेविसाव्या तारखेस नानासाहेब पेशवे वारले.

२६. तों श्रीमंतांनीं यांस धरावयास मागून फौजा रवाना केल्या[1]. मिरजेस आलेवर गोपाळराव दादा यांनीं सांगितलें कीं, मिरज लढविल्याखेरीज सरकारांत देऊं नये. मला मोगलाईंत जावयाचें आहे, त्यास दाजीस म्हणाले कीं, तूं येथें राहिल्याखेरीज मिरज लढविणार कोणी नाहींत. मी अथवा नारायणराव अथवा तूं. त्यांतून नारायणराव माझ्यासमागमें पाहिजे. त्यास तूं येथें रहा. वडील व भास्करपंत आप्पा येथें आहेतच. हजार गोष्टींतून एक गोष्ट सांगतों, मिरज लढविलेखेरीज मात्र देऊं नये. असा बंदोबस्त करून नाना[2] आदि सर्व वडिलांस पुसोन नमस्कार करून मिरजेंतून नारायणराव नानास घेऊन निघाले तों पुण्याकडील फौजा आल्या. त्यांची यांची गांठ जमखंडीवर पडली[3]. तेथें एक लढाई मातबर जाहली. दैवयोगेंकरून गोपाळराव यांचा मोड जाहला. तें तेथून निघाले तों फौजा पाठीशीं लागल्या. परंतु गोपाळराव दादा यांचेसमोर उभें राहण्यास त्यांत कोणासही अवसान नव्हतें ! तसेच फिरत फिरत तीन चार दिवशीं मंगळवेढें परगण्यांत नंदेश्वर गांव आहे, तेथें आले. गांवकरी यांनीं गोळ्या मारिल्या ! तेथून निघून मंगळवेढ्यास आले. पांच दिवस घोड्यावरून उतरले नाहींत, पाय सुजले. त्यानें रिकिबींतून पाय निघेनात ! तेव्हां रिकिब्या तोडून पाय काढिले. दोन चार दिवस गुप्तरूपें मंगळवेढ्यास राहून तेथून निघाले ते मोगलाईंत गेले. हैदराबादेस जाऊन मोगल यांचे कारभारी विठ्ठल सुंदर यांची भेट घेऊन नबाब निजामउल्मुल्ख[4] यांची भेट घेतली आणि तेथें राहिले.

२७. इकडील वर्तमान, सर्व पटवर्धन मंडळी मिरजेच्या किल्ल्यांत राहिले. बायका वगैरे कांहीं कोंकणांत गुप्तरूपें राहिल्या. पुरुषोत्तमराव यांची स्त्री दुसरी. त्यांस प्रथम पुत्र हरिहरराव जाहले होते. त्यांचा जन्म शके १६८४ चित्रभानु संवत्सर. त्यांचें वय एक[5] वर्षाचें. ती बाई कोंकणांत आपले आजोळीं कोतवड्यास, मुलास घेऊन गुप्तरूपें राहिली. बाकी सारी मंडळी मिरजेच्या किल्ल्यांत राहिली. पुरुषोत्तमराव दाजी यांची प्रथम स्त्री गोपिकाबाई. त्यास एक कन्या मात्र जाहली. तिचें नांव जिऊआक्का. ती काकाजी रास्ते वांईकर यांस दिली. गोपिकाबाई बाळंतरोग लागून वारली. नंतर दुसरें लग्न पुरुषोत्तमराव यांचें केलें. चिंचणेरकर कानिटकर यांची कन्या केली. त्यांस पुढें संतति जाहली ती कथा पुढें येईल.[6]

२८. हल्लीं मिरज लढविली हा कथाविस्तार लिहितों. श्रीमंत दादासाहेब यांस गोपाळराव

---

१. वस्तुतः खुद्द दादासाहेबच फौजांनिशीं पटवर्धनांचें पारिपत्य करण्याकरितां व त्यांपासून मिरजेचा किल्ला घेण्याकरितां स. १७६२ च्या डिसेंबरांत आले. २. गोविंद हरि ३. गोपाळरावास धरण्याकरितां दादासाहेबांनीं आबा पुरंदरे यांस बरोबर फौज देऊन पाठविलें होतें. त्यांची व गोपाळरावांची ही लढाई. (पहा, ऐतिहासिक-लेखसंग्रह नं. १४१.) ४. हें नांव चुकलें. येथें निजामअल्ली हें नांव पाहिजे. ५. वस्तुतः चार सहा महिन्यांचें असेल. कारण याच संवत्सराच्या पौषांत मिरजेस वेढा पडला. ६. हीच बाई कोंकणांत जाऊन राहिल्याबद्दल वर उल्लेख आला आहे.

मोगलाईंत गेले ह्मणोन समजलेवर बहुत रोष आला. मग खासा श्रीमंत फौजसुद्धां निघाले. कारभारी सखारामपंतबापू यांचा व गोपाळरावदादा यांचा अत्यंत द्वेष. याजमुळें पटवर्धन यांचे पाय भुईस न लागावे येविशीं कारभारी यांचा प्रयत्न मोठा ! श्रीमंत दादासाहेब ह्मणों लागले जे, पटवर्धन यांजकडील कुत्रें देखील सांपडलें असतां जिवें मारावें ! असें म्हणून मिरजेवर स्वारी केली. ते मिरजेस आले. तों इकडे दारूगोळीची तयारी जाहली. पुरुषोत्तमराव दाजी यांनीं साऱ्या बायकांस देखील गोळ्या घडावयास लाविलें. ही कथा साळूआक्का[1] यांनीं वडिलांजवळ सांगितली ती लिहितों. स्वारी श्रीमंतांची येतांच किल्ल्यांतून तोफखाना सुरू जाहला. श्रीमंतांनीं मोर्चे बसविले. तीन हल्ला मातबर जाहल्या. एक हल्ला केली तेव्हां, दारूचे बुधले पुरून बुरूज उडविला तो पुन्हां तसाच त्या ठिकाणीं बसला. त्यांतील एक ढेंकूळ देखील एकीकडे गेलें नाहीं ! श्रीमंतांचे मोर्चे खंदकास येऊन लागले. याप्रमाणें एक महिना किल्ला लढविला. भास्करपंत आपा व पुरुषोत्तमराव दाजी या उभयतांस महिनाभर अहोरात्र निद्रा नाहीं. ढाल तलवार बांधून महिनाभर फिरत होते. दुसरी हल्ला केली ती लोक दरवाजास येऊन लागले. लांकडें घालून दरवाजा जाळितात असें पाहून पुरुषोत्तमराव दाजींनीं किल्लचाचे पानावर पडून शंख केला जे, अरे किल्ला गेला ! किल्ला गेला ! असें म्हणाले. तों किल्लचांतील जमातदार—त्याचे पांचशें लोक—त्या जमातदारानें दाजीचे कंबरेस धरून एक शिवी देऊन माघारे ओढिलें आणि बोलिला जे, 'अरे बामणा, आरडतोस कां ? आम्ही इतके मरूं तेव्हां किल्ला जाईल. आतां आमचा तमाशा पहा ! ' असें म्हणून पांचशें असामी यांनीं कंबरा बांधून ढाल तलवारी घेऊन हल्लचाचे लोक यांचे डोकीवर किल्लचावरून उड्या टाकिल्या; आणि पांच हजार गाडदी चालोन आले त्यांत मारामारी करून हल्ला माघारी फिरविली !!! ही लढाई श्रीमंतांनीं दृष्टीनें पाहून ह्मणाले जे, वाहवा गोपाळराव ! काय माणूस पदरीं बाळगिलें आहे ! किल्लचावरून उड्या टाकून हल्ला माघारी फिरविली ही गोष्ट परम काठिण; तेव्हां श्रीमंतांस पुरतें समजलें कीं, किल्ला कांहीं लढोन येत नाहीं. श्रीमंत माधवरावसाहेब यांचें सूत्र आंतून होतेंच. श्रीमंत रावसाहेब पेठेंत येऊन बसत हें किल्लचांत यांस समजलें. यांनीं सांगून पाठविलें कीं, आपण येतां, वरून तोफा सुटतात, एखादा घात होईल. श्रीमंतांनीं सांगितलें जे, मी जेथें बसेन तेथें अबदागिरी वर धरवीत जाईन. त्या सुमारास गोळे मारूं नयेत. याप्रमाणें सूचना केली त्याप्रमाणें करीत.

---

१ साळूआक्का ही गोपाळरावांची बहीण. ही ह्या प्रसंगीं वेढ्यांत सांपडली होती. तिनें सांगितलेली हकीकत. २ ऐति० ले० सं० नं० १६३ सदर पुस्तकांतील मिरजेच्या वेढ्यासंबंधाच्या पत्रांशीं वर आलेला मजकूर ताडून पहातां कांहीं तफावत दिसून येईल. प्रत्यक्ष अनुभवलेल्या व परंपरेनें ऐकिलेल्या हकीकतींत फरक दिसून आला तर नवल नाहीं.

२९. पुढें आंत फितूर होऊं लागला. नंतर सल्ल्याचें बोलणें लागलें. तेव्हां बोलण्यास कोणी पाठवून द्यावें ह्मणून गोविंदपंतनानांस श्रीमंत दादासाहेबांनीं सांगून पाठाविलें. तेव्हां बोलण्यास कोणी जाईनात. तेव्हां नानांनीं सांगितलें कीं, अरे दाजी, तूं जा. हे कोणी जावयाचे नाहींत. असें सांगितलें. नंतर पुरुषोत्तमराव दाजी बोलावयास बाहेर पडले ते ढाल, तलवार, चोळणा, कांच्या असे बाहेर पडले ते श्रीमंतांचे लष्करांत आले. तों लष्करचे लोक मुसलमान ह्मणाले कीं, 'लढणेवाला जो बामण तो हा,' असें ह्मणों लागले. हे श्रीमंतांचे डेऱ्यासन्निध गेले तों श्रीमंत दादासाहेब स्नान करून पूजा करीत बसले होते. तों नीट श्रीमंतांजवळ गेले. जाऊन श्रीमंतांस नमस्कार केला. श्रीमंतांनीं 'या, पुरुषोत्तमराव,' ह्मणून बोलाविलें. याणीं तलवार जी होती ती श्रीमंतांपुढें ठेविली. तों श्रीमंतांनीं दाजीच्या शालजोडीच्या पदरास धरून बोलले जे, पुरुषोत्तमराव, मी येथें आलों. मला यश द्यावें. असें म्हणतांच यांनीं विनंति केली कीं, आह्मी स्वामींचे चाकर. किल्ला स्वामींचा. आम्हीं सेवा करून दाखविली. लोक म्हणतील जे, ब्राम्हणाकडे किल्ला, आणि श्रीमंतांची स्वारी येतांच लढविले-खेरीज दिला ! याजमुळें स्वामींची चाकरी केली. आतां स्वामींचे पायांपाशीं ढाल तलवार ठेविलीच आहे, आह्मांस निरोप द्यावा. तों श्रीमंत ह्मणाले कीं, तुम्हांस दाली जी बांधली ती घ्यावयास कांहीं बांधिली नाहीं. तुह्मी ढाल तलवार घेणें, अशी आज्ञा जाहली. तों इतक्यांत सखारामबापू याणीं शागीर्दाकडून ढाल तलवार उचलविली. तों पुरुषोत्तमराव बोलले जे, मी स्वामींस विनंति करितों. स्वामींनीं आज्ञा केली कीं ढाल तलवार घ्यावी. परंतु इतक्यांत कोणी लुच्च्यानें ढाल तलवार उचलविली ! नंतर श्रीमंत रागें भरले जे, पुरुषोत्तमराव याची ढाल तलवार आणोन देणें. तों दुसरी ढाल तलवार आणून ठेविली. याणीं विनंति केली कीं, ही माझी ढाल तलवार नव्हे. कोणी ती ××××नें बदलली ! स्वामींनीं माझी मला दिल्यास मी घेईन. नाहींपेक्षां श्रीमंतांचे पंगतीस भोजन करून राहीन. याप्रमाणें बोलतांच श्रीमंत फारच रागें भरले. नंतर यांची ढाल तलवार यांस आणून दिली. मग पुरुषोत्तमराव याणीं विनंति केली कीं आम्हांस तीन रोजांची मुदत द्यावी, म्हणजे लोकांनीं किल्ल्यांत कांहीं ठेविलें आहे तें अवघें उतरून किल्ला स्वामींचे स्वाधीन करूं. आम्ही शिलेदार. आम्हाजवळ कांहीं नाहीं. परंतु लोकांनीं ठेविलें आहे, त्यास पार करून द्यावें आणि बाहेदारीस कोणी मातबर गृहस्थ द्यावा याप्रमाणें ठरविलें. नंतर नरसिंगरावबाबा धायगुडे यांस बाहेदारीस देऊन तीन रोजांची मुदत दिली. आणि जरा बाजरा श्रीकृष्णा-

१ यावरून पुरुषोत्तमराव शालजोडी पांघरले होते असें दिसतें. चोळणा, कांच्या आणि शालजोडी हा वेष आतांच्या काळांत चमत्कारिक दिसतो ! २ कांहीं द्रव्य. ३ जामिनकीस. ४ मध्यस्थीस विंचूरकर व नारो शंकर होते असें ऐ. ले. संग्रहांत आहे. येथें धायगुड्यांची मध्यस्थी लिहिली आहे ती कुरुंदवाडास खटलें व वित्तविषय पोंचविण्यापुरती असावी. ५ सर्व. एकूण एक.

पार कुरुंदवाडास न्यावें असें ठरविलें. नंतर नरसिंगरावबाबा धायगुडे यांस पुरुषोत्तमराव दाजी यांनीं बजाविलें कीं, माझा एक सुतळीचा तोडा तजावजा जाहल्यास पुरुषोत्तमराव यासीं गांठ आहे, याचा पुरता विचार करून आपण बाहेदारीस असावें ! त्याणीं सांगितलें कीं, पुरुषोत्तमराव, मी मध्यस्थ आहें त्यापेक्षां कोणे गोष्टीची फिकीर न करणें. याप्रमाणें बोलणें अंताजीपंत बापू लिमये यांचे विद्यमानें जाहलें. नंतर जरा बाजरा उतरून पटवर्धन यांचीं मुलेंमाणसें बाहेर येऊन राहिलीं. किल्ला सरकारचे हवालीं केला.

३०. नंतर ते दिवशीं रात्रीं धायगुडे यांचे मुलास श्रीमंतांनीं फितविलें आणि फौज तयार करून पटवर्धन ह्यांचीं मुलेंमाणसें लुटावीं असा बेत केला. ती बातमी पुरुषोत्तमराव दाजी यांस समजली. तों प्रहर रात्र जाहलेवर धायगुडे यांचे फौजेंत तयारी झाली व सरकारचे पागेंतही तयारी जाहली. हें पाहून रात्रीं बापू लिमये यांचे राहुटीस पुरुषोत्तमराव दाजी एकटे गेले. त्यास जागें करून सांगितलें कीं, घर बुडालें. आम्हांस लुटतात. असें ह्मणतां लिमये म्हणाले, अशी गोष्ट व्हावयाची नाहीं, आपण नरसिंगरावबाबांकडे यावें. असें ह्मणून उभयतां नरसिंगरावबाबा यांचे लष्करांत आले. ते आपले डेऱ्यांत निजले होते, तों हे तसेंच आंत गेले. ते पलंगावर निजले होते. त्यांचें पांघरूण ओढून जागें केलें, आणि बोलले कीं, तुह्मीं आमचें घर बुडविलें ! तेव्हां ते बोलले कीं असें आपण कां ह्मणतां ? माझी खातरजमा आहे त्यापेक्षां आपण कांहीं फिकीर करूं नये. असें म्हणतांच पुरुषोत्तमराव यांस राग आला आणि बोलले कीं, गाढवाच्या धसा ! तुझे फौजेंत तयारी जाहली ही तुला कशी समजली नाहीं ? बरें ! पटवर्धनांशीं गांठ आहे ! आमचा एक पुरुष जिवंत राहिला तत्रापि तुझी मुळी खांदून टाकील ! असें म्हणतांच त्यांनीं आपल्या लष्करांत शोध केला तों वर्तमान खरें. मूल फितला. मुलाचा शोध केला तों श्रीमंतांचे डेऱ्यास गेला असें कळलें ! नंतर नरसिंगरावबाबा यांनीं सांगितलें कीं, पुरुषोत्तमराव, आपण येथें बसावें. मी श्रीमंतांकडे जातों. असें म्हणून पालखींत बसोन श्रीमंतांकडे गेले. तों श्रीमंतांपाशीं आपला मूल पाहिला. त्यास एक दोन शिव्या देऊन श्रीमंतांस साफ सांगितलें कीं, आपण ही गोष्ट योजिली आहे, परंतु मजकडून घडावयाची नाहीं. पटवर्धन माझीं रांडापोरें ढाणकास[1] वांटतील. असें म्हणून आपले लेंकास घेऊन आपले लष्करांत आले. आणि पुरुषोत्तमराव यांचे गळ्यावर हात ठेऊन सांगितलें कीं, आपण स्वस्थ असावें. यांनीं उत्तर केलें कीं, उदईक तुम्हीं फौजसुद्धां लढाईस तयार होऊन उभें रहावें. नंतर माझीं मुलेंमाणसें चालतीं होतील. याप्रमाणें बोलणें जाहलें. दुसरे दिवशीं धायगुडे आपले पतकानिशीं तयार होऊन यांचीं (पटवर्धनांचीं) मुलेंमाणसें कृष्णेपलीकडे कुरुंदवाडास पोंहचतीं केलीं.

३१. याप्रमाणें मिरज लढविली. पुढें एक वर्षाचे आंतच श्रीमंत दादासाहेब यांची

---

१ मारून वेशीच्या दारास बांधितील.

२९. पुढें आंत फितूर होऊं लागला. नंतर सल्ल्याचें बोलणें लागलें. तेव्हां बोलण्यास कोणी पाठवून द्यावें ह्मणून गोविंदपंतनानांस श्रीमंत दादासाहेबांनीं सांगून पाठविलें. तेव्हां बोलण्यास कोणी जाईनात. तेव्हां नानांनीं सांगितलें कीं, अरे दाजी, तूं जा. हे कोणी जावयाचे नाहींत. असें सांगितलें. नंतर पुरुषोत्तमराव दाजी बोलावयास बाहेर पडले ते ढाल, तलवार, चोळणा, कांच्या असे बाहेर पडले ते श्रीमंतांचे लष्करांत आले. तों लष्करचे लोक मुसलमान ह्मणाले कीं, 'लढणेवाला जो बामण तो हा,' असें ह्मणों लागले. हे श्रीमंतांचे डेऱ्यासन्निध गेले तों श्रीमंत दादासाहेब स्नान करून पूजा करीत बसले होते. तों नीट श्रीमंतांजवळ गेले. जाऊन श्रीमंतांस नमस्कार केला. श्रीमंतांनीं 'या, पुरुषोत्तमराव,' ह्मणून बोलाविलें. याणीं तलवार जी होती ती श्रीमंतांपुढें ठेविली. तों श्रीमंतांनीं दाजीच्या शालजोडीच्या[1] पदरास धरून बोलले जे, पुरुषोत्तमराव, मी येथें आलों. मला यश द्यावें. असें म्हणतांच यांनीं विनंति केली कीं, आह्मी स्वामींचे चाकर. किल्ला स्वामींचा. आम्हीं सेवा करून दाखविली. लोक म्हणतील जे, ब्राम्हणाकडे किल्ला, आणि श्रीमंतांची स्वारी येतांच लढविले-खेरीज दिला ! याजमुळें स्वामींची चाकरी केली. आतां स्वामींचे पायांपाशीं ढाल तलवार ठेविलीच आहे, आह्मांस निरोप द्यावा. तों श्रीमंत ह्मणाले कीं, तुम्हांस दाली जी बांधली ती घ्यावयास कांहीं बांधिली नाहीं. तुह्मी ढाल तलवार घेणें, अशी आज्ञा जाहली. तों इतक्यांत सखारामबापू याणीं शागीर्दाकडून ढाल तलवार उचलविली. तों पुरुषोत्तमराव बोलले जे, मी स्वामींस विनंति करितों. स्वामींनीं आज्ञा केली कीं ढाल तलवार द्यावी. परंतु इतक्यांत कोणी लुच्च्यानें ढाल तलवार उचलविली ! नंतर श्रीमंत रागें भरले जे, पुरुषोत्तमराव याची ढाल तलवार आणोन देणें. तों दुसरी ढाल तलवार आणून ठेविली. याणीं विनंति केली कीं, ही माझी ढाल तलवार नव्हे. कोणी ती ××××नें बदलली ! स्वामींनीं माझी मला दिल्यास मी घेईन. नाहींपेक्षां श्रीमंतांचे पंगतीस भोजन करून राहीन. याप्रमाणें बोलतांच श्रीमंत फारच रागें भरले. नंतर यांची ढाल तलवार यांस आणून दिली. मग पुरुषोत्तमराव याणीं विनंति केली कीं आम्हांस तीन रोजांची मुदत द्यावी, म्हणजे लोकांनीं किल्ल्यांत कांहीं[2] ठेविलें आहे तें अवघें उतरून किल्ला स्वामींचे स्वाधीन करूं. आम्ही[3] लेदार. आम्हाजवळ कांहीं नाहीं. परंतु लोकांनीं ठेविलें आहे, त्यास पार करून द्यावें ाणि बाहेदारीस[4] कोणी मातबर गृहस्थ द्यावा याप्रमाणें ठरविलें. नंतर नरसिंगरावबाबा धायगुडे यांस बाहेदारीस देऊन तीन रोजांची मुदत दिली. आणि जरी[5] बाजरा श्रीकृष्णा-

१ यावरून पुरुषोत्तमराव शालजोडी पांघरले होते असें दिसतें. चोळणा, कांच्या आणि शालजोडी हा वेष आतांच्या काळांत चमत्कारिक दिसतो ! २ कांहीं द्रव्य. ३ जामिनकीस. ४ मध्यस्थीस विचूरकर व नारो शंकर होते असें ऐ. ले. संग्रहांत आहे. येथें धायगुड्यांची मध्यस्थी लिहिली आहे ती कुरुंदवाडास खटलें व वित्तविषय पोंचविण्यापुरती असावी. ५ सर्व. एकूण एक.

पार कुरुंदवाडास न्यावें असें ठरविलें. नंतर नरसिंगरावबाबा धायगुडे यांस पुरुषोत्तमराव दाजी यांनीं बजाविलें कीं, माझा एक सुतळीचा तोडा तजावजा जाहल्यास पुरुषोत्तमराव यासीं गांठ आहे, याचा पुरता विचार करून आपण बाहेदारीस असावें ! त्याणीं सांगितलें कीं, पुरुषोत्तमराव, मी मध्यस्थ आहें त्यापेक्षां कोणे गोष्टीची फिकीर न करणें. याप्रमाणें बोलणें अंताजीपंत बापू लिमये यांचे विद्यमानें जाहलें. नंतर जरा बाजरा उतरून पटवर्धन यांचीं मुलेंमाणसें बाहेर येऊन राहिलीं. किल्ला सरकारचे हवालीं केला.

३०. नंतर ते दिवशीं रात्रीं धायगुडे यांचे मुलास श्रीमंतांनीं फितविलें आणि फौज तयार करून पटवर्धन ह्यांचीं मुलेंमाणसें लुटावीं असा बेत केला. ती बातमी पुरुषोत्तमराव दाजी यांस समजली. तों प्रहर रात्र जाहलेवर धायगुडे यांचे फौजेंत तयारी झाली व सरकारचे पागेंतही तयारी जाहली. हें पाहून रात्रीं बापू लिमये यांचे राहुटीस पुरुषोत्तमराव दाजी एकटे गेले. त्यास जागें करून सांगितलें कीं, घर बुडालें. आम्हांस लुटतात. असें ह्मणतां लिमये म्हणाले, अशी गोष्ट व्हावयाची नाहीं, आपण नरसिंगरावबाबांकडे यावें. असें ह्मणून उभयतां नरसिंगरावबाबा यांचे लष्करांत आले. ते आपले डेऱ्यांत निजले होते, तों हे तसेंच आंत गेले. ते पलंगावर निजले होते. त्यांचें पांघरूण ओढून जागें केलें, आणि बोलले कीं, तुह्मीं आमचें घर बुडविलें ! तेव्हां ते बोलले कीं असें आपण कां ह्मणतां ? माझी खातरजमा आहे त्यापेक्षां आपण कांहीं फिकीर करूं नये. असें म्हणतांच पुरुषोत्तमराव यांस राग आला आणि बोलले कीं, गाढवाच्या धसा ! तुझे फौजेंत तयारी जाहली ही तुला कशी समजली नाहीं ? बरें ! पटवर्धनांशीं गांठ आहे ! आमचा एक पुरुष जिवंत राहिला तत्रापि तुझी मुळी खांदून टाकील ! असें म्हणतांच त्यांनीं आपल्या लष्करांत शोध केला तों वर्तमान खरें. मूल फितला. मुलाचा शोध केला तों श्रीमंतांचे डेऱ्यास गेला असें कळलें ! नंतर नरसिंगरावबाबा यांनीं सांगितलें कीं, पुरुषोत्तमराव, आपण येथें बसावें. मी श्रीमंतांकडे जातों. असें म्हणून पालखींत बसोन श्रीमंतांकडे गेले. तों श्रीमंतांपाशीं आपला मूल पाहिला. त्यास एक दोन शिव्या देऊन श्रीमंतांस साफ सांगितलें कीं, आपण ही गोष्ट योजिली आहे, परंतु मजकडून घडावयाची नाहीं. पटवर्धन माझीं रांडापोरें ढाणकास[1] वांटतील. असें म्हणून आपले लेंकास घेऊन आपले लष्करांत आले. आणि पुरुषोत्तमराव यांचे गळ्यावर हात ठेऊन सांगितलें कीं, आपण स्वस्थ असावें. यांनीं उत्तर केलें कीं, उदईक तुम्हीं फौजसुद्धां लढाईस तयार होऊन उभें रहावें. नंतर माझीं मुलेंमाणसें चालतीं होतील. याप्रमाणें बोलणें जाहलें. दुसरे दिवशीं धायगुडे आपले पतकानिशीं तयार होऊन यांचीं (पटवर्धनांचीं) मुलेंमाणसें कृष्णेपलीकडे कुरुंदवाडास पोंहचतीं केलीं.

३१. याप्रमाणें मिरज लढविली. पुढें एक वर्षाचे आंतच श्रीमंत दादासाहेब यांची

---

१ मारून वेशीच्या दारास बांधितील.

मर्जी संपादून दाजींनीं मिरज सोडविली. येविशीं पत्र गोपाळरावदादा यांस लिहिलें आहे जे, ' वडिलीं आज्ञा केली होती त्याप्रमाणें मिरज लढविली. हल्लीं श्रीमंतांची कृपा संपादून मिरजेचा किल्ला मुलें माणसें राहण्यास सोडवून घेतला. तुमची चाकरी केली ही लक्षांत असावी, ' असें लिहिलें आहे. जे समयीं मिरजेच्या सनदा जाहल्या ते समयीं श्रीमंत दादासाहेब ह्मणाले कीं, पुरुषोत्तमराव, तुझे नांवच्या सनदा लिहीन, असें ह्मणून सनदा पुरुषोत्तमराव याच्या नांवाच्या लिहिल्या. असें असतां गोविंदपंतनाना वडील, त्यापेक्षां आपले नांवच्या सनदा कशा घेऊन जावें, अशी वडीलपणाची मर्यादा रक्षण करून गोविंद हरि यांचे नांवची सनद घेऊन आले. तें साल सन अर्बा सीतैन. याप्रमाणेंच मंगळवेढेचे किल्ल्याची सनद. मुलेंमाणसें रहाण्यास श्रीमंतांचें अस्सल पत्र आहे तेंही गोविंद हरि यांचे नांवचें. याप्रमाणें निरपेक्षतः वागून भावाबंदांवर उपकार केले तें सर्व पूर्वीची मंडळी होती त्यांस जाहीर होतें व हल्लीं पत्रें आहेत तीं पहावीं, त्यांवरून कळेल.

३२. इकडे गोपाळरावदादा मोगलाईंत गेले तेथें राहिले. तों मोगलांचें ह्मणणें, तुह्मीं आमच्या चाकरीस रहावें. तेव्हां यांनीं सांगितलें कीं, आह्मी आपले यजमानावर रुसून आलों. आमची समजूत करून नेतील तोंपर्यंत तुह्मांजवळ आहों. तूर्त आम्हांस कर्ज ह्मणून लक्ष रुपये द्यावेत. असें ह्मणून लाख रुपयेचें खत लिहून देऊन खर्चास लाख रुपये घेतले. नंतर मोगलांस घेऊन देशीं आले. मोगलांची स्वारी पुण्यास आली. पुण्यांत मोगलांचें लष्कर शिरलें. पुण्यास आगी लाविल्या. त्याजमुळें नबाबाचें व गोपाळराव यांचें कांहीं बिघडलें. श्रीमंत रावसाहेब यांची वरचेवर सूचना होतीच. सर्व कृत्य त्यांचे आज्ञेवरूनच केलें होतें. मोगलाईंत लाख रुपयेचें खत गुंतलें; परंतु आम्हांस कांहीं यांजपाशीं रहावयाचें नाहीं; खत गुंतलें तें हरतऱ्हेनें हातास येई अशी युक्ति करावी असें म्हणोन पागेकडील एक कारकून होता त्याची चर्या वेड्याप्रमाणें होती त्यास नारायणरावनाना यांनीं सांगितलें जे, मी खत हिशेबाकरितां कचेरींत मागून घेतों. तूं माझे हातचें हिसकावून घेऊन मला शिव्या दोन चार व मोगलांच्या दिवाणजीसही दोन चार देऊन खत फाडून टाकावें, आणि आपलें शेलापागोटें फाडून शंख करीत कचेरींतून उठून जावें. पुढें प्रसंग पडेल तो सांभाळतां येईल ! याप्रमाणें सांगून त्याप्रमाणें केलें. याणीं कचेरीस जाऊन विठ्ठल सुंदर दिवाण याजपाशीं खत पहाण्यास मागून घेतलें. तों त्यानें त्याप्रमाणें खत हिसकावून घेऊन फाडून टाकलें. आणि शिव्या देऊन आपलें अंगरखा पागोटें वगैरे फाडून शंख करीत बाहेर निघून गेला ! याप्रमाणें करतांच विठ्ठल सुंदर हंसों लागले. सर्व मंडळी

---

१ मोगलांनीं आपली रदबदली न जुमानतां पुणें जाळिलें, आपणास जहागीर देऊं केली होती ती दिली नाहीं, फौजेच्या खर्चास कांहीं पैकाही दिला नाहीं, हें पाहून पटवर्धनांनीं खत फाडण्याची ही अश्लाघ्य युक्ति योजिली ! ! ! पहा ऐ. ले. सं. नं. ३२२ वगैरे.

हंसली. तेव्हां नारायणरावनाना ह्मणों लागले, त्यानें आपलीं पांघरुणें फाडलीं तीं असो. परंतु खत फाडलें, आतां काय करावें ? तेव्हां विठ्ठल सुंदर म्हणाले कीं, खताचें असो, परंतु ज्यापेक्षां आपलीं पांघरुणें देखील यानें फाडलीं तेव्हां असा हा कोण आहे ? यांनीं सांगितलें कीं, वडिलोपार्जित कारकून आहे, त्यास आठ पंधरा दिवशीं असा विक्षेप होतो. त्यास बहुत जपत असतों. नजर चुकावून केव्हां आमचे पाठीमागें येऊन बसला नकळे ! असें परस्परें विनोदें बोलून निघून आले. आणि गोपाळरावदादा यांस सांगितलें. त्यांनीं ठीक आहे म्हणाले. पुढें राजकारण दाजींनीं श्रीमंतांकडे रक्षिलें; येविशीं गोपाळरावदादा यांचें पत्र स्वदस्तुरचें दाजीस आहे तें पहातां कळेल. नंतर एके दिवशीं नबाबाचें कूच जाहलें तेव्हां गोपाळरावदादा याणीं श्राद्ध आहे असा लटका बहाणा करून मागें राहिले आणि मजल दरमजल करून माघारे श्रीमंतांकडे आले.

३३. तेव्हां श्रीमंत रावसाहेब यांचा अंमल बसोन उलट श्रीमंत दादासाहेबच कैदेंत होते. येविशीं कथा सांगतों. ती कथा दिनकरपंत आठवले वांईकर याणीं सांगितली ती सांगतों. राक्षसभुवनचे लढाईंत मोगल यांची फौज, खासा मोगल, विठ्ठल सुंदर कारभारी व इकडून सरकारची फौज, श्रीमंत दादासाहेब व श्रीमंत माधवरावसाहेब व श्रीमंत नारायणरावसाहेब, याप्रमाणें जे समयीं लढाईस प्रारंभ जाहला ते समयीं तोफखाना इकडील व तिकडील सुरू जाहला. याप्रमाणें लढाई चालली. तिकडून मोगलांचे कारभारी विठ्ठल सुंदर यांनीं साडेतीनशें हौदे तिरंदाजीचे रिकामे केले ! याप्रमाणें तिरांचा मार ! खासा निजामअल्ली जनानखान्यासुद्धां लढाईपासोन एका कोशावर होते. अशी लढाई होत असतां विठ्ठल सुंदर यांनीं तिरंदाजीचे हौद्याचे हत्ती आपले तोफखान्यापुढें घातले. तें मोगल यांनीं दुर्बिणींतून पाहिलें आणि बोलले जे, लढाई बिघडली. आतां मोड होतो ! असें ह्मणोन ते जनानखाना संभाळून मागें सरूं लागले. तों विठ्ठल सुंदर याणीं यवनी भाषेनें ह्मणों लागले, काय पहातां ! पेशवे यांचा हत्ती असाच वळवा ! असें ह्मणून श्रीमंतांचे अंबारीवरच गर्दी केली. ते समयीं श्रीमंतांचे खवासखान्यांतील चवरीबारदार उभा होता तो गोळी लागून उडाला. हें पहातांच श्रीमंतांस धीर धरवेनासा जाहला आणि बावा महात यास बोलले कीं, हत्ती बसव. त्यानें उत्तर केलें जे, महाराज, हत्ती बसवावयाची ही वेळ नव्हे. जर हत्ती बसविला तर आतां लढाई बिघडेल. याप्रमाणें बोलतांच पुढें सरोन त्याचे गळ्यास धरून बोलले जे, अरे मला मारतोस कीं काय ? मी घोड्यावर बसणार. याप्रमाणें बोलतांच फौजदार यांनीं हत्ती बसविला. तों गनीम यांनीं येऊन

---

१ ही लढाई तारीख १० ऑगस्ट रोजीं झाली. २ श्रीमंत नारायणरावसाहेब लढाईंत होते ही माहिती चुकली आहे. त्यांचें वय त्या वेळीं सात आठ वर्षांचें असून ते आपल्या आईजवळ पुरंदरास होते. ३ महातास 'फौजदार' हा शब्द बहुमानार्थी लावितात.

हत्ती वेढिला. इकडील फौज हत्ती बसवितांच बेदिल जाहली. तों श्रीमंतांचा हत्ती मोगलांनीं तसाच वळविला.

३४. हें श्रीमंत माधवरावसाहेब यांनीं पाहिलें. ते कैदेंत होते. रखवालीस हुजरातचे मानकरी खासे पांचशें असामी होते ते सारे घोड्यावर बसोन तयार होते. तेव्हां श्रीमंत रावसाहेब बोलले कीं, अहो, दादासाहेब यांचा हत्ती वळला हें तुह्मी काय पहातां ? तेव्हां मानकरी बोलले कीं, आमची चाकरी पहाणार धनी कोण आहे ? श्रीमंतांनीं विचारिलें कीं, मी धनी नव्हें कीं काय ? तेव्हां मानकरी बोलले कीं, आपण ज्यास हटकून मारावयास सांगाल त्यास मारूं; परंतु जें मागूं तें बक्षीस स्वामींनीं द्यावें लागेल. ते समयीं श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, विठ्ठल सुंदर यांचे हत्तीवरील महात भाल्यानें जाऊन मारावा. तेव्हां महादजी शितोळे बोलले कीं, दहा हजारांचा गांव इनाम व बसता हत्ती घेईन. ते समयीं श्रीमंतांनीं कबूल केलें. नंतर महादजी शितोळे याणीं घोड्यास येडं केली आणि आंत शिरले. जाऊन विठ्ठल सुंदर यांचा महात भाल्यानें ठार मारिला आणि येऊन श्रीमंतांस मुजरा केला. नंतर अंकली, मांजरी हे गांव दहा हजारांचे इनाम दिले ते अद्यापि शितोळे यांजकडे चालले आहेत. याप्रमाणें मानकरी यांनीं कामकाज केलें. त्या लढाईंत विठ्ठल सुंदर ठार झाले. त्यांचे चिरंजीवही ठार जाहले. मोगलांकडील निशाणें, तोफा, हत्ती वगैरे पाडाव आले. मोगलांकडील फौज सारी लुटून टाकिली. खासा मोगल मात्र जनानखाना बचावून दौलताबादेस गेले. श्रीमंतांस यश आलें. श्रीमंत माधवरावसाहेब यांचें तेज फौजेवर पडलें. तेच दिवशीं साऱ्या फौजेंत हुकूम श्रीमंत रावसाहेब यांचा बसला. सर्वांचें चित्त श्रीमंत रावसाहेब यांचे पायांशीं लागलें. याप्रमाणें जाहलें.

३५. श्रीमंत दादासाहेब यांचा हत्ती माघारा आणिला तेव्हां अंबारींत श्रीमंत रावसाहेब यांसीं बोलाविलें. तेव्हां घोड्यावरून श्रीमंत रावसाहेब उतरले तों तेच वेळेस गोपाळराव येऊन श्रीमंत रावसाहेब यांस भेटले. तेव्हां श्रीमंत दादासाहेब यांचे अंबारींत बसते वेळेस श्रीमंत रावसाहेब यांनीं गोपाळरावदादा यांचा हात धरून तसेंच अंबारींत चढले. श्रीमंत दादासाहेब यांजवळ श्रीमंत रावसाहेब बसले. गोपाळरावदादा मागें खवासखान्यांत बसले. तेव्हां श्रीमंत दादासाहेब यांचे मांडीखालीं तलवार होती ती गोपाळरावदादा याणीं हळूच काढून घेतली. तेव्हां श्रीमंत दादासाहेब यांनीं पाठीमागें पाहिलें,

---

१ दादासाहेबांचा हत्ती खालीं बसल्यामुळें ते सर्व सैन्यास दिसेनासे झाले, तेव्हां ते मारले गेले असें समजून सैन्य निरुत्साह झालें. २ ज्यावर आपण नेहमीं बसतां तो. ३ प्रेरणा. ४ शत्रूच्या व्यूहांत. ५ दोन्ही गांव मिरजेनजीक आहेत. ६ वस्तुतः दौलताबादेस न जातां औरंगाबादेस गेले. त्या वेळीं दौलताबाद पेशव्यांकडे होती. दोन्ही स्थलांत अंतर अगदीं थोडें आहे. पहा ऐ. ले. सं. नं. ३३५ वगैरे.

आणि बोलले कीं तुह्मी आलां काय ? नंतर गोपाळरावदादा उगेच राहिले. तों श्रीमंत शहाजानें वाजवीत डेऱ्यास आले[1].

३६. तों अस्तमान जाहला. श्रीमंत दादासाहेब पूजेस बसले. त्या लढाईंत श्रीमंत दादासाहेब यांस थोडीशी जखम लागली होती. परंतु त्यांचा नेम, सबब पूजेस बसले. तों नैवेद्याची साखर सरली सबब शागीर्द कोठींत साखर मागावयास गेला. तेव्हां वाकनीस बोलले कीं, श्रीमंत रावसाहेबांची परवानगी पाहिजे ! असें ह्मणतांच शागीर्द फिरोन आला. जेव्हां नैवेद्याचा समय आला ते समयीं खुणेनें श्रीमंतांनीं विचारिलें. तेव्हां शागीर्द बोलला कीं वाकनीस परवानगी मागतो. श्रीमंतांनीं कोणाची ह्मणोन हस्तसंकेतानें विचारिलें. शिष्या बोलला कीं, रावसाहेबांची. तेव्हां ऐकून घेऊन तसेंच रागानें नैवेद्याशिवाय, पूजा समाप्त करून भोजन न करतां जाऊन निजले. तों इकडे श्रीमंत रावसाहेब यांचे आज्ञेप्रमाणें सरकारची भोजनाची तयारी जाहलीच होती. तों श्रीमंत दादासाहेब चार घटकांनीं विचार करून मुदबकाचे राहुटीकडे आले, आणि पानें मांडावीं ह्मणोन हुकूम केला. तों लागलींच पांच चार पानें मांडिलीं. श्रीमंत दादासाहेब पानावर बसले आणि बोलले कीं, अरे, बाळास बोलवा. असें म्हणतांच श्रीमंत उभयतां येऊन पानावर बसले. तों अर्धी भोजनें जाहलेनंतर श्रीमंत दादासाहेब बोलले कीं, बाळा, आतां हें सारें तूं पहात जा. याप्रमाणें जिकर्डाल तिकडे शहाणपणानेंच ओपून दिलें.

३७. त्या दिवसापासोन श्रीमंत माधवरावसाहेब यांचा अंमल जाहला. त्याणीं बारा वर्षें राज्य केलें, त्यांत पराक्रम, कीर्ति बहुत केल्या. तो विस्तार लिहितां कोणासही शक्त होणार नाहीं. त्यांतून शक्तिनुसार वर्णन करितों. श्रीमंत रावसाहेब याणीं पटवर्धन यांचा बंदोबस्त बोलल्याप्रमाणें केला. सर्वांवर कृपा केली. पुरुषोत्तमराव दाजी यांजवर पूर्ण कृपा. जशी श्रीमंत नानासाहेब यांनीं कृपा केली त्याप्रमाणेंच श्रीमंत रावसाहेब यांची जाहली. त्याच प्रकरणीं कांहीं कथा वर्णन करितों.

३८. कोणी एके समयीं श्रीमंतांची स्वारी श्रीपंढरी क्षेत्रास आली. आल्यावर मंगळवेढ्यास पुरुषोत्तमराव दाजी यांस येणेविशीं चिठी पाठविली. चिठी येतांच मेघश्यामरावबापू व दाजी उभयतां निघाले. समागमें कुसाजी गोविंद व आप्पाजीपंत मामा लेले हे उभयतां होते. ही कथा सदर लेले ह्यांनीं सांगितली. पंढरीस गोविंदपंतनाना यांचे वाड्यांत

---

१. राक्षसभुवनाच्या लढाईच्या दिवशीं गोपाळराव येऊन भेटल्याचें लिहिलें आहे हें चुकलें आहे.गोपाळरावाची भेट लढाईनंतर बाराव्या दिवशीं झाली. अर्थात् अंबारींत बसण्याचा प्रसंग लढाईच्या दिवशींचा नव्हे. पहा ऐ. ले. सं. नं. ३४६. २. परवानगी पाहिजे असें ह्मणतो. जुन्या लेखांत परवानगी रसानगी असे शब्द येतात ते एकाच अर्थाचे आहेत असें मोलस्वर्थ लिहितो, पण माहीतगार वृद्धांचे मतें स्वतः सांगितलेली ती परवानगी. दुसऱ्याच्या मुखें अगर चिठ्ठीनें कळविलेली रसानगी. ३. पंढरपुरास स. १७६९ च्या डिसेंबरांत श्रीमंतांचा मुक्काम होता. स्वारीबरोबर बंधु नारायणरावही होते. (ऐ. ले. सं. नं. ८४५.)

हत्ती वेढिला. इकडील फौज हत्ती बसवितांच बेदिल जाहली. तों श्रीमंतांचा हत्ती मोगलांनीं तसाच वळविला.

३४. हें श्रीमंत माधवरावसाहेब यांनीं पाहिलें. ते कैदेंत होते. रखवालीस हुजरातचे मानकरी खासे पांचशें असामी होते ते सारे घोड्यावर बसोन तयार होते. तेव्हां श्रीमंत रावसाहेब बोलले कीं, अहो, दादासाहेब यांचा हत्ती वळला हें तुह्मी काय पहातां ? तेव्हां मानकरी बोलले कीं, आमची चाकरी पहाणार धनी कोण आहे ? श्रीमंतांनीं विचारिलें कीं, मी धनी नव्हें कीं काय ? तेव्हां मानकरी बोलले कीं, आपण ज्यास हटकून मारावयास सांगाल त्यास मारूं; परंतु जें मागूं तें बक्षीस स्वामींनीं द्यावें लागेल. ते समयीं श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, विठ्ठल सुंदर यांचे हत्तीवरील महात भाल्यानें जाऊन मारावा. तेव्हां महादजी शितोळे बोलले कीं, दहा हजारांचा गांव इनाम व बसता हत्ती घेईन. ते समयीं श्रीमंतांनीं कबूल केलें. नंतर महादजी शितोळे याणीं घोड्यास येडं केली आणि आंत शिरले. जाऊन विठ्ठल सुंदर यांचा महात भाल्यानें ठार मारिला आणि येऊन श्रीमंतांस मुजरा केला. नंतर अंकली, मांजरी हे गांव दहा हजारांचे इनाम दिले ते अद्यापि शितोळे यांजकडे चालले आहेत. याप्रमाणें मानकरी यांनीं कामकाज केलें. त्या लढाईंत विठ्ठल सुंदर ठार झाले. त्यांचे चिरंजीवही ठार जाहले. मोगलांकडील निशाणें, तोफा, हत्ती वगैरे पाडाव आले. मोगलांकडील फौज सारी लुटून टाकिली. खासा मोगल मात्र जनानखाना बचावून दौलताबादेस गेले[६]. श्रीमंतांस यश आलें. श्रीमंत माधवरावसाहेब यांचें तेज फौजेवर पडलें. तेच दिवशीं साऱ्या फौजेंत हुकूम श्रीमंत रावसाहेब यांचा बसला. सर्वांचें चित्त श्रीमंत रावसाहेब यांचे पायांशीं लागलें. याप्रमाणें जाहलें.

३५. श्रीमंत दादासाहेब यांचा हत्ती माघारा आणिला तेव्हां अंबारींत श्रीमंत रावसाहेब यांसीं बोलाविलें. तेव्हां घोड्यावरून श्रीमंत रावसाहेब उतरले तों तेच वेळेस गोपाळराव येऊन श्रीमंत रावसाहेब यांस भेटले. तेव्हां श्रीमंत दादासाहेब यांचे अंबारींत बसते वेळेस श्रीमंत रावसाहेब यांनीं गोपाळरावदादा यांचा हात धरून तसेंच अंबारींत चढले. श्रीमंत दादासाहेब यांजवळ श्रीमंत रावसाहेब बसले. गोपाळरावदादा मागें खवासखान्यांत बसले. तेव्हां श्रीमंत दादासाहेब यांचे मांडीखालीं तलवार होती ती गोपाळरावदादा याणीं हळूच काढून घेतली. तेव्हां श्रीमंत दादासाहेब यांनीं पाठीमागें पाहिलें,

---

१ दादासाहेबांचा हत्ती खालीं बसल्यामुळें ते सर्व सैन्यास दिसेनासे झाले, तेव्हां ते मारले गेले असें समजून सैन्य निरुत्साह झालें. २ ज्यावर आपण नेहमीं बसतां तो. ३ प्रेरणा. ४ शत्रूच्या व्यूहांत. ५ दोन्ही गांव मिरजेनजीक आहेत. ६ वस्तुतः दौलताबादेस न जातां औरंगाबादेस गेले. त्या वेळीं दौलताबाद पेशव्यांकडे होती. दोन्ही स्थलांत अंतर अगदीं थोडें आहे. पहा ऐ. ले. सं. नं. ३३५ वगैरे.

आणि बोलले कीं तुह्मी आलां काय ? नंतर गोपाळरावदादा उगेच राहिले. तों श्रीमंत शहाजानें वाजवीत डेऱ्यास आले[1].

३६. तों अस्तमान जाहला. श्रीमंत दादासाहेब पूजेस बसले. त्या लढाईंत श्रीमंत दादासाहेब यांस थोडीशी जखम लागली होती. परंतु त्यांचा नेम, सबब पूजेस बसले. तों नैवेद्याची साखर सरली सबब शागीर्द कोठींत साखर मागावयास गेला. तेव्हां वाकनीस बोलले कीं, श्रीमंत रावसाहेबांची परवानगी पाहिजे ! असें ह्मणतांच शागीर्द फिरोन आला. जेव्हां नैवेद्याचा समय आला ते समयीं खुणेनें श्रीमंतांनीं विचारिलें. तेव्हां शागीर्द बोलला कीं वाकनीस परवानगी मागेतो. श्रीमंतांनीं कोणाची ह्मणोन हस्तसंकेतानें विचारिलें. शिष्या बोलला कीं, रावसाहेबांची. तेव्हां ऐकून घेऊन तसेंच रागानें नैवेद्याशिवाय, पूजा समाप्त करून भोजन न करतां जाऊन निजले. तों इकडे श्रीमंत रावसाहेब यांचे आज्ञेप्रमाणें सरकारची भोजनाची तयारी जाहलीच होती. तों श्रीमंत दादासाहेब चार घटकांनीं विचार करून मुदबकाचे राहुटीकडे आले, आणि पानें मांडावीं ह्मणोन हुकूम केला. तों लागलींच पांच चार पानें मांडिलीं. श्रीमंत दादासाहेब पानावर बसले आणि बोलले कीं, अरे, बाळास बोलवा. असें म्हणतांच श्रीमंत उभयतां येऊन पानावर बसले. तों अर्धी भोजनें जाहलेनंतर श्रीमंत दादासाहेब बोलले कीं, बाळा, आतां हें सारें तूं पहात जा. याप्रमाणें जिकर्डाल तिकडे शहाणपणानेंच ओपून दिलें.

३७. त्या दिवसापासोन श्रीमंत माधवरावसाहेब यांचा अंमल जाहला. त्याणीं बारा वर्षें राज्य केलें, त्यांत पराक्रम, कीर्ति बहुत केल्या. तो विस्तार लिहितां कोणासही शक्त होणार नाहीं. त्यांतून शक्तिनुसार वर्णन करितों. श्रीमंत रावसाहेब याणीं पटवर्धन यांचा बंदोबस्त बोलल्याप्रमाणें केला. सर्वांवर कृपा केली. पुरुषोत्तमराव दाजी यांजवर पूर्ण कृपा. जशी श्रीमंत नानासाहेब यांनीं कृपा केली त्याप्रमाणेंच श्रीमंत रावसाहेब यांची जाहली. त्याच प्रकरणीं कांहीं कथा वर्णन करितों.

३८. कोणी एके समयीं श्रीमंतांची स्वारी श्रीपंढरी क्षेत्रास आली[2]. आल्यावर मंगळवेढ्यास पुरुषोत्तमराव दाजी यांस येणेविशीं चिठी पाठविली. चिठी येतांच मेघश्यामरावबापू व दाजी उभयतां निघाले. समागमें कुसाजी गोविंद व आप्पाजीपंत मामा लेले हे उभयतां होते. ही कथा सदर लेले ह्यांनीं सांगितली. पंढरीस गोविंदपंतनाना यांचे वाड्यांत

---

१. राक्षसभुवनाच्या लढाईच्या दिवशीं गोपाळराव येऊन भेटल्याचें लिहिलें आहे हें चुकलें आहे. गोपाळरावाची भेट लढाईनंतर बाराव्या दिवशीं झाली. अर्थात् अंबारींत बसण्याचा प्रसंग लढाईच्या दिवशींचा नव्हे. पहा ऐ. ले. सं. नं. ३४६. २. परवानगी पाहिजे असें ह्मणतो. जुन्या लेखांत परवानगी रसानगी असे शब्द येतात ते एकाच अर्थाचे आहेत असें मोलस्वर्थ लिहितो, पण माहीतगार वृद्धांचे मतें स्वतः सांगितलेली ती परवानगी. दुसऱ्याच्या मुखें अगर चिठ्ठीनें कळविलेली रसानगी. ३. पंढरपुरास स. १७६९ च्या डिसेंबरांत श्रीमंतांचा मुक्काम होता. स्वारीबरोबर बंधु नारायणरावही होते. (ऐ. ले. सं. नं. ८४५.)

उतरले. दुसरे दिवशीं स्नानसंध्या आटोपून श्रीमंतांकडे निघाले. तों श्रीमंत देवदर्शन घेऊन खासगीवाले यांचे वाड्याचे पाठीमागें पूर्वेस नदीकडे धक्का आहे तेथें बसले होते. झाडून तमाम मानकरी मंडळी कारभारी वगैरे बसले. श्रीमंत गाशा घालून त्याजवर बसले. वर अबदागिरी धरिली आहे. बाकी सारी मंडळी जमिनीवर कोणी अंगवस्त्रें टोप्या खालीं घेऊन बसले. इतक्यांत दाजी व बापू निघाले तों तेथें आले. तों हजारों लोक बसलेले पाहिले. तेव्हां आप्पाजीपंत मामा बोलले कीं, दाजी, वाट व्हावयाची कठिण दिसती. तेव्हां दाजी बोलले कीं, पहा आम्हांस वाट होती कीं नाहीं ! असें ह्मणोन अंमळ मोठ्यानें बोलले कीं, अहो, आह्मांस वाट सोडा, श्रीमंतांकडे जावयाचें आहे. असें म्हणतांच श्रीमंतांनीं ऐकिलें; तेव्हां श्रीमंत बोलले कीं, कोण, पुरुषोत्तमराव कीं काय? इकडे या. असें म्हणतांच गर्दीचे दोन भाग जाहले. नंतर श्रीमंतांजवळ जाऊन नमस्कार केला. पुरुषोत्तमराव व मेघश्यामराव उभयतां भेटले तों श्रीमंतांनीं पुरुषोत्तमराव यांचा हात धरून ओढून आपले गाशावर बसविलें. मेघश्यामराव मागें बसले. नंतर श्रीमंत बोलले कीं, तुम्हांस उशीर जाहला. यांनीं उत्तर केलें कीं, मेघश्यामराव यांचे स्नानसंध्येमुळें थोडासा उशीर जाहला. नंतर श्रीमंतांनीं विचारिलें कीं, येथें वाळवंटींत हत्तींची लढाई लावावयाची आहे, त्यास तुमचे विचारास आल्यास लावावयाची. असें म्हणतांच पुरुषोत्तमराव दाजी म्हणाले कीं, आपलेपेक्षां मला कांहीं अधिक समजतें कीं काय ? तेव्हां श्रीमंत बोलले कीं, तुमचा मनसुबा जो आहे तोच करावयाचा. नंतर यांनीं सांगितलें कीं, येथें वाळवंटींत लढाई लावावयाची, त्यास आपली स्वारी येथें आली याजमुळें लोक पहावयास हजारों मनुष्यें बायकामुलें वृद्ध आदि सर्व आले आहेत. त्यास लढाई लागून एखादें मनुष्य जायां जाहल्यास नीट दिसणार नाहीं. त्यास अगोदर गाडदी उभे करून सारे घांट बंद करावे. नंतर लढाई लावावी. असें म्हणतांच श्रीमंतांस संतोष जाहला. नंतर गाडदी उभे करून वाळवंटींत मनुष्य नाहीं असें करून नंतर हत्तींची लढाई चार घटका जाहली. श्रीमंत उठोन अंबारींत बसोन नदीपलीकडे डेऱ्यास गेले. पुरुषोत्तमराव यांस आज्ञा जाहली कीं, दोन प्रहरीं यावें. तुह्माशीं कांहीं बोलावयाचें आहे, त्यास यावें. त्याप्रमाणें दाजी दोन प्रहरीं गेले होते.

३९. दुसरे दिवशीं जनोबा भाऊ व हरिहरराव तात्या व दामोदर बाबा या त्रिवर्गांस श्रीमंतांचे भेटीस मंगळवेढ्याहून आणविलें, आणि प्रातःकाळीं घेऊन गेले. तों श्रीमंत स्नान करून पाटावर बसून भस्म लावीत होते, तों हे गेले. यांस कोठेंही श्रीमंतांचे घरीं आडकाठी नाहीं. जेथें श्रीमंत असतील तेथें जावयाचें याप्रमाणें श्रीमंत नानासाहेबांपासून सांप्रदाय. त्याप्रमाणें गेले. जाऊन श्रीमंतांस नमस्कार केला. या पुरुषोत्तमराव, ह्मणून बसावयास पाट दिला. नंतर त्रिवर्ग मुलांकडून नमस्कार करविला; आणि सांगितलें जे, हा मेघश्यामरायाचा, हा माझा व हा

१ हरिहरराव पुरुषोत्तम, जनार्दन मेघश्याम व दामोदर महादेव असे त्रिवर्ग मुलगे.

महादेवरायाचा. याप्रमाणें सांगितलें. नंतर वडिलांनीं सांगितलें कीं, आह्मी पाठीमागें बसलों. तों श्रीमंत नारायणरावसाहेब स्नान करून त्या राहुटींत येऊन धोत्रें नेसावयास लागले. धोत्रें नेसून लागलेंच सोंवळें आणविलें आणि सोंवळें नेसले. तें श्रीमंत रावसाहेब याणीं पाहून रागें भरले जे, तुला इतक्यांत विटाळ कशाचा जाहला ? तों पुरुषोत्तमराव दाजी यांनीं श्रीमंत नारायणरावसाहेब यांस विचारिलें कीं, रावसाहेब, आपणास विटाळ जाहला कीं काय ? तों श्रीमंत बोलले कीं, त्याचा स्वभावच तसला आहे. फार छांदस आहे ! येथें विटाळ व्हावयास राहुटीच्या कनाथा लहान आहेत कीं काय ? याप्रमाणें बोलतांच पुरुषोत्तमराव दाजी म्हणाले कीं, महाराज, श्रीमंत नानासाहेब यांचे पाठीमागें आपणच वडील. आपण सांभाळून घ्यावें. तेव्हां श्रीमंत बोलले कीं, पुरुषोत्तमराव, याचे कपाळीं राज्य नाहीं ! याप्रमाणें बोलणें जाहलें. नंतर निरोप घेऊन माघारे आले. याप्रमाणें कथा वडिलांनीं सांगितली ती लिहिली असे.

४०. आणखी एक श्रीमंत माधवरावसाहेब यांची कथा लिहितों. कोणे एके दिवशीं श्रीमंतांची स्वारी मोरेश्वरास आली. तेथें दर्शन घेऊन कऱ्हेचे तीरीं हत्तींची लढाई लाविली. श्रीमंत एका टेंकडीवर खुली चांदणी देऊन बसले. तमाम मानकरी भोंवताली बसले. तों मस्त हत्तींस पक्के चार चार शेर दारू पाजोन नंतर लढाई लाविली. तों हत्ती लढत असतां अकस्मात् ज्या टेंकडीवर श्रीमंत बसले होते त्या टेंकडीवर एक हत्ती चढला. तेव्हां सारे मानकरी तमाम पळाले. तों हत्ती येऊन त्यानें चांदणीचे काढण्यांवर पाय दिला. परंतु श्रीमंतांचें आसन चळलें नाहीं. तों खंडेराव दरेकर[1] यांनीं हत्तीस भाला लाविला. श्रीमंतांचें तेज मोठें ! हत्ती माघारा फिरला. ते समयीं खंडेराव दरेकर यांस श्रीमंतांनीं चौघडा दिला[2]. तेव्हां स्वारी पुण्यास आली. पुढें सारे मानकरी श्रीमंतांचे मुजऱ्यास येईनात. तेव्हां श्रीमंतांनीं सर्व मानकरी यांस मेजवानी करून वस्त्रें दिलीं. तेव्हां मानकरी बोलले जे, आपणाकडे यावयास आम्हांस लाज वाटती. आम्ही सारे पळालों, आणि खंडेराव यांनीं भाला मारून हत्ती फिरविला. तेव्हां श्रीमंत बोलले कीं, हें काय ! एक वेळ तुमचा दिल कच्चा जाहला म्हणोन तुम्ही शिपाई नव्हेत कीं काय ? तुम्हीं मागें शिपाईगिरी केल्या त्या आम्हीं पाहिल्याच आहेत. याप्रमाणें बोलून सर्वांचे दिलांत हुशारी आणून सर्वांनीं एकचित्त असावें असें केलें; कां कीं पुढें त्यांचे हातून कामकाज घ्यावयाचें. याप्रमाणें शिपाई लोकांची हुशारी बहुमान श्रीमंत राखीत होते.

४१. कोणे एके दिवशीं यशवंतराव देवकांते सरकारचे मानकरी यांचे घरीं मुलांचीं लग्नें होतीं. त्यांचे घराकडील पत्रें खर्चास पाठवावें म्हणोन

१. ही हत्तीची लढाई गुलटेंकडीजवळ झाली व आप्पाजीराव पाटणकर यांनीं सोंडेवर कट्यार चालवून हत्ती माघारा फिरविला, असें डफसाहेब लिहितात. २. ह्मणजे सालीना बाराशें रुपयांची तैनात करून दिली. हत्ती, चौघडा व पालखी हे तीन मान दरसाल बाराशें रुपये खर्चाचे आहेत.

उतरले. दुसरे दिवशीं स्नानसंध्या आटोपून श्रीमंतांकडे निघाले. तों श्रीमंत देवदर्शन घेऊन खासगीवाले यांचे वाड्याचे पाठीमागें पूर्वेस नदीकडे धक्का आहे तेथें बसले होते. झाडून तमाम मानकरी मंडळी कारभारी वगैरे बसले. श्रीमंत गाशा घालून त्याजवर बसले. वर अबदागिरी धरिली आहे. बाकी सारी मंडळी जमिनीवर कोणी अंगवस्त्रें टोप्या खालीं घेऊन बसले. इतक्यांत दाजी व बापू निघाले तों तेथें आले. तों हजारों लोक बसलेले पाहिले. तेव्हां आप्पाजीपंत मामा बोलले कीं, दाजी, वाट व्हावयाची कठिण दिसती. तेव्हां दाजी बोलले कीं, पहा आम्हांस वाट होती कीं नाहीं ! असें ह्मणोन अंमळ मोठ्यानें बोलले कीं, अहो, आह्मांस वाट सोडा, श्रीमंतांकडे जावयाचें आहे. असें म्हणतांच श्रीमंतांनीं ऐकिलें; तेव्हां श्रीमंत बोलले कीं, कोण, पुरुषोत्तमराव कीं काय? इकडे या. असें म्हणतांच गर्दीचे दोन भाग जाहले. नंतर श्रीमंतांजवळ जाऊन नमस्कार केला. पुरुषोत्तमराव व मेघश्यामराव उभयतां भेटले तों श्रीमंतांनीं पुरुषोत्तमराव यांचा हात धरून ओढून आपले गाशावर बसविलें. मेघश्यामराव मागें बसले. नंतर श्रीमंत बोलले कीं, तुम्हांस उशीर जाहला. यांनीं उत्तर केलें कीं, मेघश्यामराव यांचे स्नानसंध्येमुळें थोडासा उशीर जाहला. नंतर श्रीमंतांनीं विचारिलें कीं, येथें वाळवंटींत हत्तींची लढाई लावावयाची आहे, त्यास तुमचे विचारास आल्यास लावावयाची. असें म्हणतांच पुरुषोत्तमराव दाजी म्हणाले कीं, आपलेपेक्षां मला कांहीं अधिक समजतें कीं काय ? तेव्हां श्रीमंत बोलले कीं, तुमचा मनसुबा जो आहे तोच करावयाचा. नंतर यांनीं सांगितलें कीं, येथें वाळवंटींत लढाई लावावयाची, त्यास आपली स्वारी येथें आली याजमुळें लोक पहावयास हजारों मनुष्यें बायकामुलें वृद्ध आदि सर्व आले आहेत. त्यास लढाई लागून एखादें मनुष्य जायां जाहल्यास नीट दिसणार नाहीं. त्यास अगोदर गाडदी उभे करून सारे घांट बंद करावे. नंतर लढाई लावावी. असें म्हणतांच श्रीमतांस संतोष जाहला. नंतर गाडदी उभे करून वाळवंटींत मनुष्य नाहीं असें करून नंतर हत्तींची लढाई चार घटका जाहली. श्रीमंत उठोन अंबारींत बसोन नदीपलीकडे डेऱ्यास गेले. पुरुषोत्तमराव यांस आज्ञा जाहली कीं, दोन प्रहरीं यावें. तुह्माशीं कांहीं बोलावयाचें आहे, त्यास यावें. त्याप्रमाणें दाजी दोन प्रहरीं गेले होते.

३९. दुसरे दिवशीं जनोबा भाऊ व हरिहरराव तात्या व दामोदर बाबा या त्रिवर्गांस श्रीमंतांचे भेटीस मंगळवेढ्याहून आणविलें, आणि प्रातःकाळीं घेऊन गेले. तों श्रीमंत स्नान करून पाटावर बसून भस्म लावीत होते, तों हे गेले. यांस कोठेंही श्रीमंतांचे घरीं आडकाठी नाहीं. जेथें श्रीमंत असतील तेथें जावयाचें याप्रमाणें श्रीमंत नानासाहेबांपासून सांप्रदाय. त्याप्रमाणें गेले. जाऊन श्रीमंतांस नमस्कार केला. या पुरुषोत्तमराव, ह्मणून बसावयास पाट दिला. नंतर त्रिवर्ग मुलांकडून नमस्कार करविला; आणि सांगितलें जे, हा मेघश्यामरायाचा, हा माझा व हा

१ हरिहरराव पुरुषोत्तम, जनार्दन मेघश्याम व दामोदर महादेव असे त्रिवर्ग मुलगे.

महादेवरायाचा. याप्रमाणें सांगितलें. नंतर वडिलांनीं सांगितलें कीं, आह्मी पाठीमागें बसलों. तों श्रीमंत नारायणरावसाहेब स्नान करून त्या राहुटींत येऊन धोत्रें नेसावयास लागले. धोत्रें नेसून लागलेंच सोंवळें आणविलें आणि सोंवळें नेसले. तें श्रीमंत रावसाहेब यांणीं पाहून रागें भरले जे, तुला इतक्यांत विटाळ कशाचा जाहला ? तों पुरुषोत्तमराव दाजी यांनीं श्रीमंत नारायणरावसाहेब यांस विचारिलें कीं, रावसाहेब, आपणास विटाळ जाहला कीं काय ? तों श्रीमंत बोलले कीं, त्याचा स्वभावच तसला आहे. फार छांदस आहे ! येथें विटाळ व्हावयास राहुटीच्या कनाथा लहान आहेत कीं काय ? याप्रमाणें बोलतांच पुरुषोत्तमराव दाजी म्हणाले कीं, महाराज, श्रीमंत नानासाहेब यांचे पाठीमागें आपणच वडील. आपण सांभाळून घ्यावें. तेव्हां श्रीमंत बोलले कीं, पुरुषोत्तमराव, याचे कपाळीं राज्य नाहीं ! याप्रमाणें बोलणें जाहलें. नंतर निरोप घेऊन माघारे आले. याप्रमाणें कथा वडिलांनीं सांगितली ती लिहिली असे.

४०. आणखी एक श्रीमंत माधवरावसाहेब यांची कथा लिहितों. कोणे एके दिवशीं श्रीमंतांची स्वारी मोरेश्वरास आली. तेथें दर्शन घेऊन कऱ्हेचे तीरीं हत्तींची लढाई लाविली. श्रीमंत एका टेंकडीवर खुली चांदणी देऊन बसले. तमाम मानकरी भोंवताली बसले. तों मस्त हत्तींस पक्के चार चार शेर दारू पाजोन नंतर लढाई लाविली. तों हत्ती लढत असतां अकस्मात् ज्या टेंकडीवर श्रीमंत बसले होते त्या टेंकडीवर एक हत्ती चढला. तेव्हां सारे मानकरी तमाम पळाले. तों हत्ती येऊन त्यानें चांदणीचे काढण्यांवर पाय दिला. परंतु श्रीमंतांचें आसन चळलें नाहीं. तों खंडेराव दरेकर यांनीं हत्तीस भाला लाविला. श्रीमंतांचें तेज मोठें ! हत्ती माघारा फिरला. ते समयीं खंडेराव दरेकर यांस श्रीमंतांनीं चौघडा दिला[1]. तेव्हां स्वारी पुण्यास आली. पुढें सारे मानकरी श्रीमंतांचे मुजऱ्यास येईनात. तेव्हां श्रीमंतांनीं सर्व मानकरी यांस मेजवानी करून वस्त्रें दिलीं. तेव्हां मानकरी बोलले जे, आपणाकडे यावयास आम्हांस लाज वाटती. आम्ही सारे पळालों, आणि खंडेराव यांनीं भाला मारून हत्ती फिरविला. तेव्हां श्रीमंत बोलले कीं, हें काय ! एक वेळ तुमचा दिल कच्चा जाहला म्हणोन तुम्ही शिपाई नव्हेत कीं काय ? तुम्हीं मागें शिपाईगिरी केल्या त्या आम्हीं पाहिल्याच आहेत. याप्रमाणें बोलून सर्वांचे दिलांत हुशारी आणून सर्वांनीं एकचित्त असावें असें केलें; कां कीं पुढें त्यांचे हातून कामकाज घ्यावयाचें. याप्रमाणें शिपाई लोकांची हुशारी बहुमान श्रीमंत राखीत होते.

४१. कोणे एके दिवशीं यशवंतराव देवकांते सरकारचे मानकरी यांचे घरीं मुलांचीं लग्नें होतीं. त्यांचे घराकडील पत्रें खर्चास पाठवावें म्हणोन

१. ही हत्तीची लढाई गुलटेंकडीजवळ झाली व आप्पाजीराव पाटणकर यांनीं सोंडेवर कट्यार चालवून हत्ती माघारा फिरविला, असें डफसाहेब लिहितात. २. ह्मणजे सालीना बाराशें रुपयांची तैनात करून दिली. हत्ती, चौघडा व पालखी हे तीन मान दरसाल बाराशें रुपये खर्चाचे आहेत.

आलीं. त्यांनीं कारकुनास सांगितलें कीं, श्रीमंतांकडे जाऊन दोन हजार रुपये खर्चास मागून घेऊन येणें. याप्रमाणें सांगतांच कारकून श्रीमंतांकडे येऊन मजकूर कानावर घातला. श्रीमंतांनीं विचारिलें कीं, तुह्मांस सालमजकूरची तैनात पावली कीं नाहीं? कारकुनानें विनंति केली कीं सालमजकूर पावलें, पेस्तर सालपैकीं ऐवज देववावा, याप्रमाणें यशवंतराव यांनीं सांगितलें आहे. तेव्हां श्रीमंतांचें उत्तर जाहलें नाहीं. त्यास आठ दिवस जाहले. नंतर यशवंतराव यांनीं कारकुनास विचारिलें. कारकुनानें सांगितलें कीं, मीं एक दोन वेळ विचारिलें, परंतु उत्तर जाहलें नाहीं. नंतर यशवंतराव जातीनें येऊन श्रीमंतांस विचारिलें, 'घरीं लग्नें आहेत. त्यास खर्चास पेस्तर सालपैकीं द्यावें.' याप्रमाणें विनंति केली. परंतु श्रीमंतांचें उत्तर जाहलें नाहीं. श्रीमंत स्नानास उठले आणि जिना उतरूं लागले. तों यशवंतराव पाठीमागेंच होते. श्रीमंतांच्या झग्याची दावण मागले पायरीवर पडली, तों यशवंतराव यांनीं तिजवर पाय दिला, तों पुढील पायरीवर श्रीमंत पाय जों टाकितात तों झगा कमरेपासून चिरला, तेव्हां श्रीमंतांनीं पाठीमागें पाहिलें. तों यशवंतराव बोलले कीं, मी यशवंतराव देवकांते आहें. खर्चाची विनंति केली त्याचें कांहींच उत्तर जाहलें नाहीं! तेव्हां कारकुनास आज्ञा जाहली कीं, यशवंतराव यास दोन हजार रुपये देवविणें. अशी आज्ञा जाहली. नंतर यशवंतराव यांनीं दोन हजार रुपये घेऊन घरास पाठविले. पुढें कांहीं एक दिवस जाहले तों युद्धाचा प्रसंग आला. ते समयीं श्रीमंत अंबारींत होते. तेव्हां यशवंतराव देवकांते यांनीं हातांत भाला घेऊन घोडा हत्तीचे समोर आणिला आणि श्रीमंतांस मुजरा करून विनंति केली कीं महाराज, मी यशवंतराव देवकांत्या झगा फाडलेला! मजवर नजर असावी! असें ह्मणून जे समयीं उठिले[1] ते समयीं शत्रूचे सैन्याचे दोन भाग जाहले! पुन्हां बचाऊन माघारे आले आणि पुन्हां श्रीमंतांस मुजरा करून 'मी झगा फाडलेला, मजवर नजर ठेवावी,' असें ह्मणोन पुनः उठोन शत्रूस मारिलें. याप्रमाणें तीन वेळ मारिलें. चवथे वेळेस श्रीमंत बोलले कीं, अहो यशवंतराव, तुह्मीं पायपोस दिले तरी घ्यावयाचे, तेथें झगा फाडला हें वारंवार काय सांगतां! आतां उठूं नका. मागें उभें रहावें. असें ह्मणून लगामास धरून बळजबरीनें मागें उभें करविलें. याप्रमाणें शिपाई लोकांची आड सोशीत होते. ही कथा बळवंतराव सोनी बावधनकर यांनीं सांगितली ती लिहिली असे.

४२. श्रीमंत रावसाहेब यांची जस्त मोठी होती. होळकर यांचे दिवाण गंगोबा[2] यांस छड्यांनीं मारिलें ती कथा सर्वांस जाहीर आहेच. आणखी कोणी मातबर पदरचे गृहस्थ यांचे तोंडांत मारिली व दुसऱ्या कोणाचे वाकसानें हात तोडिले, याप्रमाणें जरबेच्या कथा बहुत आहेत.

१ उठले = त्वरेनें हल्ला करिते जाहले. शत्रूवर जाऊन धडकले. २ गंगाधर यशवंत चंद्रचूड. पेशव्यांनीं यांच्याच तोंडांत मारल्याचें डफसाहेब लिहितात.

४२. कोणे एके समयीं शेखमिरा[1] ह्मणून शत्रूकडील यवन होता त्यास श्रीमंतांनीं अभय देऊन आपले लष्करानजीक उतरविला. तों दुसरे दिवशीं लष्करचे हांगे याणीं लुटिला. तेव्हां त्यानें सांगून पाठविलें कीं, ब्राह्मणी फौज बेकैदी. हुकूम चालत नाहीं असें सांगतांच श्रीमंतांस अतिशय राग आला आणि डेऱ्याचे बाहेर येऊन बसले. आणि दोन सुतार उभे करून त्याचे लष्करांतून जो येईल त्याचा हात तोडावयास आरंभ केला! याप्रमाणें पांच पंचवीस हात तोडिले[2]. त्यांत पांच चार सोन्याचे कडयांचे देखील हात तोडिले! परंतु कोणाचा दम—तुह्मी कां असें करतां असें—ह्मणावयाचा नाहीं! नंतर गोविंद शिवराम खांसगीवाले आपले डेऱ्यांत होते त्यांस वर्तमान समजलें. ते तसेच निघून श्रीमंतांकडे आले आणि हात तोडणार होते त्यांस प्रथम रागें भरून नंतर श्रीमंतांस बोलले कीं, रावसाहेब, हें काय करतां? याणीं उत्तर केलें कीं, माझा हुकूम मोडिला! गोविंदरावतात्या बोलले कीं, सारी फौज थोटी करावयाची आहे कीं काय? याप्रमाणें ह्मणून श्रीमंतांचा हात धरून डेऱ्यांत घेऊन गेले; आणि बोलले कीं, सारी फौज एकदिल होऊन बदलल्यास तुह्मी काय करतां?. असें ह्मणून राग शांत केला. याप्रमाणें पदरचे मंडळींत अशींही माणसें रक्षिलीं होतीं.

४५ आणखी गोविंदरावतात्या यांची गोष्ट लिहितों. कोणे एके समयीं मोगल यांचे दिवाण रुकनुद्दौला श्रीमंतांचे भेटीस येणार होते तेव्हां त्यांस सामोरें जावें ह्मणून श्रीमंतांचे मनांत येऊन तयारी करविली; आणि गोविंदरावतात्यांस बोलावणें पाठविलें. तों त्यांस मजकूर समजून दाटून पोशाख न करतां अंगवस्त्र पांघरून श्रीमंतांकडेस आले. श्रीमंतांनीं पाहून बोलले कीं, गोविंदराव, हें काय! आह्मी निघालों. तुह्मीं पोशाख वगैरे करून यावें कीं नाहीं? तुह्मांस समजलें नाहीं कीं काय? गोविंदरावतात्या बोलले कीं, स्वारी कोणीकडे जाणार मजला कांहीं समजलें नाहीं. असें ह्मणतांच श्रीमंत ह्मणाले, निजामअल्ली यांचे दिवाण रुकनुद्दौला आले आहेत त्यांस सामोरें जावयाचें आहे. त्यास गोविंदरावतात्या बोलले कीं, खासा नबाब जर आले तर त्यांस सामोरें कोण जाणार याची योजना करून नंतर त्यांच्या दिवाणास सामोरें जावयाचें करावें. श्रीमंत बोलले कीं, तर आतां दिवाणास सामोरें कोणीं जावें? गोविंदराव बोलले कीं, मी जातों. असें ह्मणून अंबारींत बसून तोच सरंजाम घेऊन सामोरे गेले. याप्रमाणें गोविंदराव यांची योग्यता होती.

---

१ हें नांव चुकलें असून या ठिकाणीं मीर रेजा असें नांव पाहिजे. मीर रेजा हा हैदरअल्लीचा मेहुणा होता. यास लुटल्याची हकीकत ता० ८ मार्च स० १७६७ रोजीं घडली. तिचें मनोरंजक तपशीलवार वर्णन ऐ. ले. संग्रहांत नं. ६९२ पासून ६९७ च्या पत्रांत आहे. २ लुगारे, लुटारू. ३ पेशव्यांनीं अडीचशें माणसांचे हात व कान कापल्याचें ऐ. ले. संग्रहांत लिहिलें आहे. ४ त्या समयीं सखारामबापूनीं श्रीमंतांपुढें पदर पसरून त्यांचा राग शांत केला असें ऐ. ले. संग्रहांत आहे.

४५. गोविंदरावतात्यांचा व पुरुषोत्तमराव दाजी यांचा अत्यंत लोभ. तात्यांनीं दाजीस दोन श्रीनर्मदाबाण दिले ते इनामगांव मौजे आंबें मुक्कामीं श्रीउत्तरेश्वरास एक स्थापना व श्रीअमृतेश्वरीं देवालयाचे बाहेर आहे तो असे दोन बाण दिलेले स्थापिले; व अगत्य बहुत बाळगीत.

४६. श्रीमंतांचाही दाजींवर विश्वास मोठा. येविशीं कथा सांगतों. मंगळवेढ्यास बापूजी नाईक भोसकर ह्मणून सावकार होते. त्यांचा व शिवाजीपंत[1] नाना म्हैसकर यांचा कांहीं कारणामुळें देण्याघेण्यास्तव खटला पडला. मंगळवेढीं चौघांनीं सांगितलें, परंतु शिवाजीपंत नाना ऐकेनात. भोसकर याजवर लोभ दाजींचा मोठा. शिवाजीपंत हे दरबारांत प्रसिद्ध. यामुळें खटला मंगळवेढीं तुटला नाहीं. शिवाजीपंत नाना पुण्यास जाऊन भोसकर याजवर सरकारचा रोखा[2] केला आणि ढालाईत दोन असामी रवाना केले; आणि मामलेदार मेघश्यामरावबापू यांस लिहिलें कीं, देखतचिठ्ठी[3] भोसकर यास हुजूर रवाना करणें. याप्रमाणें रोखा आला तेव्हां मेघश्यामरावबापू यांनीं भोसकर यांस बोलाऊन सांगितलें कीं, तुह्मास पूर्वीच सांगत होतों कीं, हत्तीसीं गाडा (?) खेळों नये. तें प्रत्ययास आलें, आतां पुण्यास जावें ! असें सांगितलेनंतर भोसकर निघून दाजीकडे आले. तेव्हां दाजी यांनीं ढालाइतांस बोलावून सांगितलें कीं, सहा रोजांत तुह्मांस मनाई आणून देऊं. नाहींपेक्षां असामी हवालीं करूं. याप्रमाणें सांगून ढालाइतांस पोटास वगैरे देऊन बंदोबस्त करविला. आणि लागलीच सुलतानबा झाडकर ह्मणोन बारगीर होते त्यांस तयार करून पुण्यास रवाना केलें; आणि गोविंदरावतात्या यांस लिहिलें कीं, बापूजी नाईक भोसकर आमचे परम स्नेही. त्यांचा जाबसाल समक्ष मी येऊन श्रीमंतांजवळ विनंति करीन. तोंपर्यंत ढालाइतांस मनाई पाठवून द्यावी. सहस्र कामें टाकून हें काम अगोदर करावें. असें पत्र लिहून स्वारास सांगितलें, तूं अगोदर पुण्यास जाणें. पुण्यांत शोध करून नंतर थेउरास जावें. तेथें श्रीमंत आहेत. तेथें गोविंदरावतात्या असले तर बरेंच जाहलें. पत्र देऊन काम करून यावें. पुण्यांत असल्यास गोविंदरावतात्या यांस सांगावें कीं, आपण थेउरास जावयास पालखी आणली ह्मणजे नंतर मी घोड्यावरून उतरेन असें ह्मणावें. पालखी आणली ह्मणजे घोड्यावरून उतरावें. असें सांगून स्वारास जलद रवाना केलें. तो तिसरे दिवशीं दोन प्रहरचे आंत पुण्यास गेला. तों तेच दिवशीं श्रीमंतांचा निरोप घेऊन थेउराहून गोविंदरावतात्या पुण्यास आले होते ते भोजनास बसले होते. स्वार तेथें गेला. जातांच परवानगी लागली. दाजींकडून स्वार आला असें समजतांच 'आंत येणें'

१. ज्यांचीं पुणें दरबारच्या हालहवालीविषयीं अत्यंत मनोवेधक अशीं शेंकडों पत्रें आह्मीं ऐ. ले. संग्रहांत आजपर्यंत छापिलीं आहेत व पुढेंही छापणार आहों ते हेच शिवाजीपंत म्हैसकर. हे पटवर्धनांकडून पेशव्यांच्या दरबारीं वकील होते. २. ताकीदपत्र. ३. तगाव्यासाठीं सरकारांतून शिपाई पाठविण्यांत येत त्यांत सक्ती, बेपर्वाई, उद्धामपणा या गुणांमुळें ढालाइतांनीं पहिला नंबर पटकाविला होता !

म्हणोन सांगितलें. तों गोविंदरावतात्याच आंचवावयास बाहेर आले. तों लाखोटा स्वारानें घोड्यावरून दिला. गोविंदरावतात्या बोलले कीं, स्वारास उतरावयास सांगावें आणि पोटास द्यावें. स्वारानें सांगितलें कीं आपण श्रीमंतांकडे जावयास पालखी आणविली ह्मणजे नंतर मला घोड्यावरून उतरावयास सांगितलें आहे. असें म्हणतांच तात्यांनीं लागलीच पालखी आणावयास सांगितलें. नंतर लाखोटा फोडिला, पत्र वाचिलें, तों भोसकर याचें काम ! तेव्हां बोलले कीं, काम थोडें आणि निकड फार ! परंतु मला दाजीचे कामास नाहीं म्हणावयाचें नाहीं. असें म्हणून विडा घेऊन लागलीच पालखींत बसले. स्वारास पात्र वाढून दिलें. स्वारही जेऊन बरोबरच निघाला. तों दोन प्रहर भरतात तों थेउरास गेले. श्रीमंतांकडे गेले तों श्रीमंत निजले होते. प्रकृति बिघडली होती सबब फारसी झोंप नव्हती. गोविंदरावतात्या येतांच जागृत झाले आणि विचारिलें कीं, गोविंदराव, तुम्ही दोन रोजांचा निरोप घेऊन गेलां आणि लागलीच आलां ? त्याणीं सांगितलें कीं, पुरुषोत्तमराव दाजीचे कामामुळें आलों. मंगळवेढ्यांत बापूजी नाईक भोसकर म्हणोन सावकार दाजीचे स्नेही आहेत, त्यांचा व शिवाजीपंत म्हैसकर यांचा खटला पडोन त्यांनीं सरकारचा रोखा करून ढालाईत पाठविले. याजकरितां दाजींनीं लिहिलें आहे जे, त्यांच्या जामगिरीची मी समक्ष येऊन विनंति करीन, ढालाइतांस मनाई पाठवून द्यावी, म्हणोन लिहिलें आहे. श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, ढालाइतांस मनाई देवणें. गोविंदरावतात्या यांनीं त्याच वेळेस मनाई आपले हातची लिहून तयार केली तो इतक्यांत श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, गोविंदराव, पुरुषोत्तमराव यांसच लिहावें कीं, म्हैसकर व भोसकर या उभयतांचा खटला काय असेल तो मनास आणोन वाजवी असेल तें करणें, असें लिहिणें. पुरुषोत्तमराव यांची खातरजमा मला आहे. ते गैरवाजवी करणार नाहींत. त्याप्रमाणें पत्र देऊन गोविंदरावतात्या यांनीं स्वारास त्याच वेळेस रवाना केलें आणि आपण अस्तमानीं पुन्हां पुण्यास आले. स्वार मनाई घेऊन सहावे रोजीं मंगळवेढ्यास आला. दाजीस पत्र दिलें. दाजी यांनीं सांगितलें कीं, हें पत्र मामलेदारांस दाखवावें. आमची ओळख पुण्यांत आहे किंवा नाहीं हें समजलें पाहिजे ! याप्रमाणें श्रीमंतांची दाजीविषयीं खातरजमा व गोविंदरावतात्या यांस अगत्य. ही कथा वडिलांनीं सांगितलेवरून लिहिली आहे.

४७. आणखी वडिलांची कथा एक लिहितों. श्रीमंत माधवरावसाहेब पट्टणचे स्वारीस जावयास निघाले ते धारवाडास आले. धारवाडास मोर्चे बसविले[२] तों पट्टणाहून हैदरखान फौजसुद्धां धारवाडच्या कुमकेस निघाला. ही बातमी श्रीमंतांची आली. नंतर

१. स. १७७२ च्या मेपासून आक्टोबरपर्यंत केव्हां तरी घडलेली ही गोष्ट आहे. २. सन १७६४ च्या सप्तंबरांत.

गोविंदरावतात्या यांसी बोलले कीं, हैदरखान पट्टणाहून निघाला. त्याचे तोंडावर कोणी पाठवावा लागेल. आह्मास तो मोर्चे बसले त्यापेक्षां येथून जावयाचें नाहीं. त्यास कोण पाठवावा ? गोविंदराव बोलले कीं, हैदरखान याचे तोंडावर गोपाळराव यांस पाठवावें. त्यांजवांचून त्याचे तोंडावर जावयास कोणी योग्य नाहींत. असें ह्मणतांच श्रीमंत 'उत्तम' म्हणाले. आणि गोपाळरावदादा यांस बोलावून आज्ञा केली कीं, हैदरखान पट्टणाहून निघाला, त्यास त्याचे तोंडावर कोणी गेलें पाहिजे. त्यास आपण जावें. असें म्हणतांच 'आज्ञा' म्हणाले. नंतर श्रीमंतांनीं दहा हजार फौज व दहा हजार गाडदी याप्रमाणें जाजती फौज देऊन रवाना केलें. तों धारवाडाहून दोन मुक्काम गेले. हैदरखानास बातमी समजली कीं, गोपाळराव आले. असें समजतांच कूच करून माघारे पट्टणांस गेला. याप्रमाणें रायाची दहशत होती.

४८. भवानराव प्रतिनिधि यांनीं सांगितलें कीं, या पृथ्वींत साडेतीन राव. ते कोणते ? एक मुरारराव घोरपडे, एक भवानराव प्रतिनिधि, एक गोपाळराव पटवर्धन व अर्धा श्रीमंत माधवरावसाहेब ! असें प्रतिनिधि बोलले. येविशीं कथा सांगतों. कोणी एके दिवशीं प्रतिनिधि पुण्यांत आपले वाड्यांत बसले होते. तों गोपाळनाईक तांबवेकर हे सावकार पालखींत बसून जात होते. समागमें कांहीं स्वार पायदळ व इटेकरी[2] व पट्टेकरी असे जात होते. ते यांचे माडीखालून गेले तों यांनीं शोधास पाठविलें कीं स्वारी कोणाची ? त्यांचे माणसांनीं सांगितलें कीं, स्वारी गोपाळराव यांची. असें म्हणतांच त्याप्रमाणें पंत यांस येऊन सांगितलें कीं, गोपाळराव यांची स्वारी. पंत यांनीं शोधास पाठविलें कीं, गोपाळराव पटवर्धन कीं काय ? त्यांचे माणसांनीं सांगितलें कीं, तांबवेकर. पटवर्धन नव्हेत. असें समजतांच पंतांनीं आज्ञा केली जे, काय पहातां ! धरून ठोका ! हा राव कोठून जाहला ? अशी आज्ञा होतांच पंतांकडील शेंपन्नास मनुष्य जाऊन तांबवेकर याची पालखी मोडून त्यासही मारिलें. इटे व पट्टे हिरावून घेतले. नंतर श्रीमंतांकडे तांबवेकर जाऊन मजकूर सांगितला. श्रीमंत बोलले कीं, तुह्मी आपणास राव कां ह्मणत होतां ? भवानराव यापुढें आमचें चालावयाचें नाहीं ! याप्रमाणें गोपाळराव पटवर्धन यांची योग्यता. तो केवळ प्रति अर्जुन. याप्रमाणें तो गोपाळराव हैदरखान याचे तोंडावर जातांच हैदरखान माघारा गेला. नंतर श्रीमंतांनीं धारवाड घेऊन स्वारी पुढें चालती जाहली.

---

१ ही माहिती चुकली. पट्टणास न जातां तो बिदनूरच्या झाडींतून बाहेर पडला होता तिकडेच परत गेला. पहा ऐ. ले. सं. नं. ४८६ व ४९१ वगैरे. २ इटा हें भाल्याच्या जातीचें एक पायदळाचें हत्यार आहे. याचा मारा बारा हातपर्यंत चालतो. एक इटेकरी व दहा पट्टेकरी बरोबर अशी ह्मण आहे.

४९. आतां[1] मुरारराव घोरपडे याची एक कथा सांगतों. कर्नाटकांत निजगल म्हणोन एक ठाणें होतें, तेथें श्रीमंतांचे मोर्चे बसले. एके दिवशीं लढाई होत असतां श्रीमंत मोर्च्यांत बुद्धिबळें खेळत बसले होते. मुरारराव याचे बंधु दौलतराव आणि आपण असे उभयतां खेळत होते. खेळत असतां अकस्मात् गोळी येऊन श्रीमंत नारायणरावसाहेब यांस निसरती लागली. लागतांच श्रीमंतांस विनंति केली कीं, महाराज, नारायणरावसाहेब यांस गोळी लागली. तेव्हां आज्ञा जाहली कीं, त्यांस गोटास घेऊन जावें. नंतर पालखींत बसून श्रीमंत नारायणरावसाहेब गोटास गेले. ज्या जाग्यावर गोळ्या येऊन पडत त्या जाग्यावर श्रीमंत बुद्धिबळें खेळत बसले; व श्रीमंत नारायणरावसाहेब यांस गोळी लागली. तेव्हां सर्वांस मोठी काळजी पडली. परंतु श्रीमंतांस येथून उठा ह्मणण्याची कोणाची शक्ति नाहीं! तेव्हां सर्व सरदारांनीं जाऊन मुरारराव यास सांगितलें कीं, राव, श्रीमंत बुद्धिबळें खेळत बसले तेथें गोळ्या येऊन पडतात. श्रीमंत नारायणरावसाहेब यांस गोळी लागली. आमची कांहीं श्रीमंतांस 'उठा' म्हणावयाची ताकद नाहीं!!! तेव्हां मुरारराव तसेच निघून श्रीमंतांपुढें आले. आणि एक शिवी देऊन बोलले कीं, ऊठ! नाहीं तर आतां तोडंतों! असें ह्मणतांच श्रीमंतांनीं वरतें पाहिलें. तों राव म्हणाले कीं, तूं मरणार कीं काय? त्या पोरास[2] गोळी लागली, दैववशात् वांचला म्हणून वांचला. आणि तुला गोळी लागल्यावर पुढें काय करावयाचें! असें म्हणोन आपले भावास रागें भरले आणि विनोबा[3] आबा व धोंडोबादादा हे उभयतां ते समयीं जवळ होते त्यांसही रागें भरले. तों श्रीमंत म्हणाले कीं, हें ठाणें येत नाहीं त्यास काय करावें? मुरारराव म्हणाले हे एकांडे[4] नू × × बरोबर! माझा

---

१ साडेतीन रावांची गोष्ट निघाली आहे त्या अर्थी साडेतीन रावांत पहिल्या नंबरचा राव मुरारराव याची गोष्ट लिहितों असा लिहिण्याचा ओघ. २ गजेंद्रगडकर. ३ ज्या ठिकाणीं खेळत बसले होते त्या ठिकाणीं किल्ल्यावरून तोफांचे गोळे येऊन पडूं लागले असा अर्थ. किल्ल्यावरून बंदुकीच्या गोळीचा मारा इतक्या लांबवर पोंचणार नाहीं हें उघडच आहे. ४ जखमी करितों. ५ पेशव्यांचे बंधु नारायणराव हें पोर. या वेळीं मुरारराबाचें वय पासष्टपासून सत्तर वर्षांचें असावें. ६ दिनोबा आबा व धोंडोबा दादा हे भास्कर हरि पटवर्धन यांचे पुत्र. उभयतांही नामांकित एकांडे शिलेदार होते. ७ तुह्मांसारखे शूर सरदार व पन्नास हजार फौज घेऊन या भिकारी किल्ल्यास वेढा घालून बसलों, दहा बारा दिवस झाले तरी किल्ला हातीं येत नाहीं, तेव्हां आह्मी येथें लढण्यासाठीं आलों नसून खेळण्यासाठीं आलों हेंच खरें, ह्मणून खेळत बसलों; इतकी खोंच या प्रश्नांत आहे. ८ एकांडे (cavaliers) ह्मणजे एकटे स्वार. हे निधड्या छातीचे मर्द शिलेदार ब्राह्मण, मराठे, रजपूत, मुसलमान वगैरे सर्व जातींचे असत. सामान्य स्वारांचें वेतन जरी सालिना अडीचशें, तीनशें, चारशें रुपयेपर्यंत घोडें माणूस पाहून पाहून असे, तरी सात आठशेंपासून दोन दोन हजार पर्यंत तैनाता देऊन व पालख्या अबदागिऱ्या वगैरे बहुमान देऊन हे एकांडे प्रत्येक पथकांत व पागेंत पन्नास, पंचावन्न, शंभर असे एकंदर स्वारांच्या संख्येचें मान पाहून बाळगलेले असत. आणीबाणीच्या वेळीं नेहमीं हे मोहरे अघाडीस असावयाचे. हेच पुढें बढती मिळून पागे व पथके होत असत. ३७ व ४१ या सदरांत ज्यांचीं नांवें आलीं आहेत ते शितोळे व देवकांते हे त्या त्या वेळीं एकांडेच होते.

गोविंदरावतात्या यांसी बोलले कीं, हैदरखान पट्टणाहून निघाला. त्याचे तोंडावर कोणी पाठवावा लागेल. आह्मास तो मोर्चे बसले त्यापेक्षां येथून जावयाचें नाहीं. त्यास कोण पाठवावा ? गोविंदराव बोलले कीं, हैदरखान याचे तोंडावर गोपाळराव यांस पाठवावें. त्यांजवांचून त्याचे तोंडावर जावयास कोणी योग्य नाहींत. असें ह्मणतांच श्रीमंत 'उत्तम' म्हणाले. आणि गोपाळरावदादा यांस बोलावून आज्ञा केली कीं, हैदरखान पट्टणाहून निघाला, त्यास त्याचे तोंडावर कोणी गेलें पाहिजे. त्यास आपण जावें. असें म्हणतांच 'आज्ञा' म्हणाले. नंतर श्रीमंतांनीं दहा हजार फौज व दहा हजार गाडदी याप्रमाणें जाजती फौज देऊन रवाना केलें. तों धारवाडाहून दोन मुक्काम गेले. हैदरखानास बातमी समजली कीं, गोपाळराव आले. असें समजतांच कूच करून माघारे पट्टणास गेला. याप्रमाणें रायाची दहशत होती.

४८. भवानराव प्रतिनिधि यांनीं सांगितलें कीं, या पृथ्वींत साडेतीन राव. ते कोणते ? एक मुरारराव घोरपडे, एक भवानराव प्रतिनिधि, एक गोपाळराव पटवर्धन व अर्धा श्रीमंत माधवरावसाहेब ! असें प्रतिनिधि बोलले. येविशीं कथा सांगतों. कोणी एके दिवशीं प्रतिनिधि पुण्यांत आपले वाड्यांत बसले होते. तों गोपाळनाईक तांबवेकर हे सावकार पालखींत बसून जात होते. समागमें कांहीं स्वार पायदळ व इटेकरी व पट्टेकरी असे जात होते. ते यांचे माडीखालून गेले तों यांनीं शोधास पाठविलें कीं स्वारी कोणाची ? त्यांचे माणसांनीं सांगितलें कीं, स्वारी गोपाळराव यांची. असें म्हणतांच त्याप्रमाणें पंत यांस येऊन सांगितलें कीं, गोपाळराव यांची स्वारी. पंत यांनीं शोधास पाठविलें कीं, गोपाळराव पटवर्धन कीं काय ? त्यांचे माणसांनीं सांगितलें कीं, तांबवेकर. पटवर्धन नव्हेत. असें समजतांच पंतांनीं आज्ञा केली जे, काय पहातां ! धरून ठोका ! हा राव कोठून जाहला ? अशी आज्ञा होतांच पंतांकडील शंपन्नास मनुष्य जाऊन तांबवेकर याची पालखी मोडून त्यासही मारिलें. इटे व पट्टे हिरावून घेतले. नंतर श्रीमंतांकडे तांबवेकर जाऊन मजकूर सांगितला. श्रीमंत बोलले कीं, तुह्मी आपणास राव कां ह्मणत होतां ? भवानराव यापुढें आमचें चालावयाचें नाहीं ! याप्रमाणें गोपाळराव पटवर्धन यांची योग्यता. तो केवळ प्रति अर्जुन. याप्रमाणें तो गोपाळराव हैदरखान याचे तोंडावर जातांच हैदरखान माघारा गेला. नंतर श्रीमंतांनीं धारवाड घेऊन स्वारी पुढें चालती जाहली.

---

१ ही माहिती चुकली. पट्टणास न जातां तो बिदनूरच्या झाडींतून बाहेर पडला होता तिकडेच परत गेला. पहा ऐ. ले. सं. नं. ४८६ व ४९१ वगैरे. २ इटा हें भाल्याच्या जातीचें एक पायदळाचें हत्यार आहे. याचा मारा बारा हातपर्यंत चालतो. एक इटेकरी व दहा पट्टेकरी बरोबर अशी ह्मण आहे.

४९. आतां मुरारराव घोरपडे याची एक कथा सांगतों. कर्नाटकांत निजगल म्हणोन एक ठाणें होतें, तेथें श्रीमंतांचे मोर्चे बसले. एके दिवशीं लढाई होत असतां श्रीमंत मोर्च्यांत बुद्धिबळें खेळत बसले होते. मुरारराव याचे बंधु दौलतराव आणि आपण असे उभयतां खेळत होते. खेळत असतां अकस्मात् गोळी येऊन श्रीमंत नारायणरावसाहेब यांस निसरती लागली. लागतांच श्रीमंतांस विनंति केली कीं, महाराज, नारायणरावसाहेब यांस गोळी लागली. तेव्हां आज्ञा जाहली कीं, त्यांस गोटास घेऊन जावें. नंतर पालखींत बसून श्रीमंत नारायणरावसाहेब गोटास गेले. ज्या जाग्यावर गोळ्या येऊन पडत त्या जाग्यावर श्रीमंत बुद्धिबळें खेळत बसले; व श्रीमंत नारायणरावसाहेब यांस गोळी लागली. तेव्हां सर्वांस मोठी काळजी पडली. परंतु श्रीमंतांस येथून उठा ह्मणण्याची कोणाची शक्ति नाहीं ! तेव्हां सर्व सरदारांनीं जाऊन मुरारराव यास सांगितलें कीं, राव, श्रीमंत बुद्धिबळें खेळत बसले तेथें गोळ्या येऊन पडतात. श्रीमंत नारायणरावसाहेब यांस गोळी लागली. आमची कांहीं श्रीमंतांस 'उठा' म्हणावयाची ताकद नाहीं !!! तेव्हां मुरारराव तसेच निघून श्रीमंतांपुढें आले. आणि एक शिवी देऊन बोलले कीं, ऊठ ! नाहीं तर आतां तोडतों ! असें ह्मणतांच श्रीमंतांनीं वरतें पाहिलें. तों राव म्हणाले कीं, तूं मरणार कीं काय ? त्या पोरास गोळी लागली, दैववशात् वांचला म्हणून वांचला. आणि तुला गोळी लागल्यावर पुढें काय करावयाचें ! असें म्हणोन आपले भावास रागें भरले आणि विनोबा आबा व धोंडोबादादा हे उभयतां ते समयीं जवळ होते त्यांसही रागें भरले. तों श्रीमंत म्हणाले कीं, हें ठाणें येत नाहीं त्यास काय करावें ? मुरारराव म्हणाले हे एकांडे नू × × बरोबर ! माझा

---

१ साडेतीन रावांची गोष्ट निघाली आहे त्या अर्थी साडेतीन रावांत पहिल्या नंबरचा राव मुरारराव याची गोष्ट लिहितों असा लिहिण्याचा ओघ. २ गजेंद्रगडकर. ३ ज्या ठिकाणीं खेळत बसले होते त्या ठिकाणीं किल्ल्यावरून तोफांचे गोळे येऊन पडूं लागले असा अर्थ. किल्ल्यावरून बंदुकीच्या गोळीचा मारा इतक्या लांबवर पोंचणार नाहीं हें उघडच आहे. ४ जखमी करितों. ५ पेशव्यांचे बंधु नारायणराव हें पोर. या वेळीं मुरारराबाचें वय पासष्टपासून सत्तर वर्षांचें असावें. ६ विनोबा आबा व धोंडोबा दादा हे भास्कर हरि पटवर्धन यांचे पुत्र. उभयतांही नामांकित एकांडे शिलेदार होते. ७ तुह्मांसारखे शूर सरदार व पन्नास हजार फौज घेऊन या भिकारी किल्ल्यास वेढा घालून बसलों, दहा बारा दिवस झाले तरी किल्ला हातीं येत नाहीं, तेव्हां आह्मी येथें लढण्यासाठीं आलों नसून खेळण्यासाठीं आलों हेंच खरें, ह्मणून खेळत बसलों; इतकी खोंच या प्रश्नांत आहे. ८ एकांडे (cavaliers) ह्मणजे एकटे स्वार. हे निधड्या छातीचे मर्द शिलेदार ब्राह्मण, मराठे, रजपूत, मुसलमान वगैरे सर्व जातींचे असत. सामान्य स्वाराचें वेतन जरी सालिना अडीचशें, तीनशें, चारशें रुपयेपर्यंत घोडें माणूस पाहून पाहून असे, तरी सात आठशेंपासून दोन दोन हजार पर्यंत तैनाता देऊन व पालख्या अबदागिऱ्या वगैरे बहुमान देऊन हे एकांडे प्रत्येक पथकांत व पागेंत पांच, पंचवीस, पन्नास, शंभर असे एकंदर स्वारांच्या संख्येचें मान पाहून बाळगलेले असत. आणीबाणीच्या वेळीं नेहमीं हे मोहरे अघाडीस असावयाचे. हेच पुढें बढती मिळून पागे व पथके होत असत. ३७ व ४१ या सदरांत ज्यांचीं नांवें आलीं आहेत ते शितोळे व देवकांते हे त्या त्या वेळीं एकांडेच होते.

तमाशा पहा ! असें म्हणून झाडून मानकरी घेऊन पायउतारा होऊन नीट चालोन गेले तों हल्लाच केली. मुरारराव खासा जातीनिशीं निशाण घेऊन चढले. वर निशाण चढवून खालीं पाहतात तों शिडीच्या खालच्या पायरीजवळ श्रीमंत उभे ! तें पाहून मुरारराव यांनीं तोंडांत बोट घालून आश्चर्य केलें कीं, याचेपुढें शिपाईगिरी मिरविण्याची आमची हद्द जाहली ! याप्रमाणें श्रीमंतांचे मर्दुमीची गोष्ट सांगितली. ही कथा विनोबा आबा यांचे मुखेंची.

५०. पुढें श्रीमंतांची प्रकृति बिघडली सबब त्रिंबकरावमामा यांस मागें ठेऊन त्यांबरोबर पटवर्धन, सारे पागे, पथकें, फौजा ठेऊन श्रीमंत पुण्यास आले. नंतर मागें गोपाळरावदादा यांचीही प्रकृति बिघडली. उदराची भावना जाहली. तेव्हां ती॥ ताई व नाना या उभयतांची भेट ध्यावी अशी मनांत फारच उत्कंठा लागली. लष्करांत सर्वत्रांस सांगून परशुरामभाऊ, वामनरावबाबा इत्यादि सर्वत्रांस निरवानिरव करून गोपाळराव मिरजेस यावयास निघाले. पुरुषोत्तमराव दाजी त्या वेळीं घरास आले होते. नारायणरावनाना वारले होते. गोपाळरावदादा यांनीं परशुरामभाऊस सांगितलें कीं, माझे पाठीमागें माझें नांव तूं रक्षण करिशील. असें सांगून त्रिंबकरावमामास सांगून पाठाविलें कीं, माझी प्रकृति बिघडली; शरीराचा भरंवसा नाहीं; यास्तव मी वडिलांस भेटावयास जातों. असें म्हणतांच त्रिंबकरावमामा बोलले कीं, श्रीमंतांनीं जरीपटका आपले भरंवशावर येथें ठेऊन प्रकृति बिघडली सबब श्रीमंत पुण्यास गेले. आपणही प्रकृति बिघडली म्हणोन जातां. सा-यांनींच असा बहाणा केल्यास पुढें वाट काय ? शत्रु-सान्निध्य आणि आपण फौजेंतून गेलां ही गोष्ट शत्रूस समजल्यावर पुढें कसें होईल ? श्रीमंतांचा राग कोणे प्रकारचा हें आपणास माहीत आहे. मीं सांगावें असें नाहीं. असें म्हणतांच गोपाळरावदादा बोलले कीं, हजार गोष्टी असोत, मी वडिलांचे पाय पहावयास जाणार. मीं वांचल्यावर नंतर पुढें श्रीमंत चाकरीविशीं रागें भरतील ! असें म्हणून डोलींत बसून डांकेवरून मिरजेस आले[३].

५१. इकडे त्रिंबकरावमामा यांनीं ' गोपाळराव, तुम्ही जाऊं नका, ' असें मी सांगत असतां ते घरास आजारहानें निघून गेले, असें श्रीमंतांस पत्र लिहिलें. प्रकृति अत्यवस्थ हें

१. घोरपड्यांचें निशाण जरीपटका. थोरले राजाराममहाराज यांनीं संताजी घोरपडे सेनापति यांस दिलेला. २. निजगलचा किल्ला हल्ला करून घेतल्याविषयीं ऐ. ले. संग्रहांत नं. ९७३ चें पत्र नाना फडनविसांनीं लिहिलेलें आहे तें पहा. त्यांत हल्ल्याच्या गर्दीत श्रीमंत उभे होते, त्यांचे मागें नारायणराव उभे होते तेव्हां त्यांस गोळी लागल्याचें लिहिलें आहे. या हल्ल्यांत चित्रदुर्गचा संस्थानिक पुढारी होता असें कर्नल विल्क लिहितो. बखरींत मुरारराव्याचें वर्णन आहे तें विनोबा आबाच्या तोंडचें असल्यामुळें तेंच खरें आहे. स. १७७० च्या मेमध्यें निजगलचा किल्ला घेतला. ३. ऐ. ले. सं. नं. १०४४। १०५८। १०८०. वगैरे पहा.

कांहींच न लिहितां जितका गिल्ला तितका लिहून पाठविला ! श्रीमंत यांनीं लष्करच्या डांकेचें पत्र फोडून पाहिलें. त्यांत गोपाळराव घरास गेले हें वाचतांच तप्त जाहले. आणि ह्मणाले कीं, मी मोफत सरंजाम चालवितों कीं काय ? असें ह्मणून लागल्याच जप्ती चिठ्ठ्या लिहून दोनशें असामी स्वार व पांचशें पायदळ व एक कारकून याप्रमाणें सरंजाम जप्त करण्याकरितां रवाना केले.

५२. तों इकडे गोपाळरावदादा मिरजेस येऊन पोंहचले. नंतर थोरले दिवाणखान्याचें काम चाललें होतें, संपत आलें होतें, तें डोलीचा पडदा उघडून पाहिलें. रात्रीं नानाची व ताईची भेट घेतली. सर्व मंडळी भेटली. एक रात्र होते. प्रातःकाळीं वारले. नंतर गोविंदपंत नानांनीं श्रीमंतांस पत्र लिहिलें जे, प्रकृति बिघडली ह्मणोन लष्करांतून राव घरास आले. एक रात्र होतें. प्रातःकाळीं वारले. आतां आह्मांस वृद्धपणीं ही गोष्ट प्राप्त जाहली ! याप्रमाणें अनेक प्रकारें पत्र लिहून जासूद जोडीबराबर जलद रवाना करून नंतर गोपाळराव याचें शव बाहेर काढिलें. तो कहर कोठवर लिहावा ! गोपाळरावदादासारखें रत्न गेलें ! सर्व पटवर्धन त्यांनीं उदयास आणिले. त्यांजविशीं शोक जाहला तो कोठवर ल्याहावा !

५३. इकडे पुण्याकडून जप्तीचा कारकून रवाना जाहला तो पुण्यानजीक शिरवळ म्हणून गांव आहे तेथें आला तों इकडून जासूद गेलेले त्यास आढळले. त्यानें शोध केला जे, जासूद कोठील कोण ? जासूद बोलले कीं आम्हांस बोलावयास फुरसत नाहीं. गोपाळराव दादा वारले, सबब आम्ही श्रीमंतांकडे पुण्यास जातों. असें म्हणून जासूद चालते जाहले. कारकून यानीं विचार केला कीं, श्रीमंतानीं गोपाळरावदादा घरास गेले म्हणून जप्तीस आम्हांस रवाना केलें, परंतु अशी अवस्था जाहली. हें श्रीमंतांस समजलें असतां आम्हावर वेडेपणा येईल. त्यास येथेंच मुक्काम करावा. श्रीमंतांस कळवून जशी आज्ञा येईल तसा विचार करावा. असें मनांत आणून सांडणीस्वारासमागमें पत्र श्रीमंतांस लिहून पाठविलें जे, ऐकीव वर्तमान गोपाळराव वारल्याचें लिहिलें आहें. जासूदही स्वामीकडे आलेच आहेत. जशी आज्ञा येईल तसें करीन. याप्रमाणें लिहून सांडणीस्वार रवाना केला. जासूदही पुण्यास जाऊन पोंहोचले. मिरजेहून जासूदजोडी आली म्हणोन परमाणगी लागून आंत जाऊन लखोटे हवालीं केले. फोडून वाचतांच श्रीमंत अंमळ पाव घटका सर्द जाहले. आणि बोलले कीं माझा एक हात गेला ! असें म्हणून त्यावेळीं चौघडा जो वाजत होता तो, बंद करविला[1]; आणि चिंताक्रांत जाहले कीं, कारकून जप्तीस पाठविला त्यास

---

१ गोपाळरावाच्या मृत्यूसंबंधें ऐ. ले. सं. नं. १०८९ चें पत्र फार उत्तम आहे तें पहा. २ गोपाळराव वारल्याचें वर्तमान समजतांच पेशव्यानीं पुण्यांतले चौघडे चार दिवस बंद केले होते व त्या अवधींत दरबार भरण्याचेंही मना केलें होतें. पहा ऐ. ले. सं. नं. १०८९.

तमाशा पहा ! असें म्हणून झाडून मानकरी घेऊन पायउतारा होऊन नीट चालोन गेले तों हल्लाच केली. मुरारराव खासा जातीनिशीं निशाण[1] घेऊन चढले. वर निशाण चढवून खालीं पाहतात तों शिडीच्या खालच्या पायरीजवळ श्रीमंत उभे ! तें पाहून मुरारराव यांनीं तोंडांत बोट घालून आश्चर्य केलें कीं, याचेपुढें शिपाईगिरी मिरविण्याची आमची हद्द जाहली ! याप्रमाणें श्रीमंतांचे मर्दुमीची गोष्ट सांगितली. ही कथा विनोबा आबा यांचे मुखेंची.

५०. पुढें श्रीमंतांची प्रकृति बिघडली सबब त्रिंबकरावमामा यांस मागें ठेऊन त्यांबरोबर पटवर्धन, सारे पागे, पथकें, फौजा ठेऊन श्रीमंत पुण्यास आले. नंतर मागें गोपाळरावदादा यांचीही प्रकृति बिघडली. उदराची भावना जाहली. तेव्हां ती॥ ताई व नाना या उभयतांची भेट ध्यावी अशी मनांत फारच उत्कंठा लागली. लष्करांत सर्वत्रांस सांगून परशुरामभाऊ, वामनरावबाबा इत्यादि सर्वत्रांस निरवानिरव करून गोपाळराव मिरजेस यावयास निघाले. पुरुषोत्तमराव दाजी त्या वेळीं घरास आले होते. नारायणरावनाना वारले होते. गोपाळरावदादा यांनीं परशुरामभाऊस सांगितलें कीं, माझे पाठीमागें माझें नांव तूं रक्षण करिशील. असें सांगून त्रिंबकरावमामास सांगून पाठविलें कीं, माझी प्रकृति बिघडली; शरीराचा भरंवसा नाहीं; यास्तव मी वडिलांस भेटावयास जातों. असें म्हणतांच त्रिंबकरावमामा बोलले कीं, श्रीमंतांनीं जरीपटका आपले भरंवशावर येथें ठेऊन प्रकृति बिघडली सबब श्रीमंत पुण्यास गेले. आपणही प्रकृति बिघडली म्हणोन जातां. सा-यांनींच असा बहाणा केल्यास पुढें वाट काय ? शत्रु-सान्निध्य आणि आपण फौजेंतून गेलां ही गोष्ट शत्रूस समजल्यावर पुढें कसें होईल ? श्रीमंतांचा राग कोणे प्रकारचा हें आपणास माहीत आहे. मीं सांगावें असें नाहीं. असें म्हणतांच गोपाळरावदादा बोलले कीं, हजार गोष्टी असोत, मी वडिलांचे पाय पहावयास जाणार. मीं वांचल्यावर नंतर पुढें श्रीमंत चाकरीविशीं रागें भरतील ! असें म्हणून डोलींत बसून डांकेवरून मिरजेस आले[2].

५१. इकडे त्रिंबकरावमामा यांनीं ' गोपाळराव, तुह्मी जाऊं नका, ' असें मी सांगत असतां ते घरास आग्रहानें निघून गेले, असें श्रीमंतांस पत्र लिहिलें. प्रकृति अत्यवस्थ हें

---

१. घोरपड्यांचें निशाण जरीपटका. थोरले राजाराममहाराज यांनीं संताजी घोरपडे सेनापति यांस दिलेला. २. निजगलचा किल्ला हल्ला करून घेतल्याविषयीं ऐ. ले. संग्रहांत नं. ९७३ चें पत्र नाना फडनवीस यांसीं लिहिलेलें आहे तें पहा. त्यांत हल्ल्याच्या गर्दीत श्रीमंत उभे होते, त्यांचे मागें नारायणराव उभे होते तेव्हां कर्नल [illegible] त्यांस गोळी लागल्याचें लिहिलें आहे. या हल्ल्यांत चित्रदुर्गचा संस्थानिक पुढारी होता असें [illegible] विलक्ष लिहितो. बखरींत मुरारराव[illegible] वर्णन आहे तें विनोबा आबाच्या तोंडचें असल्यामुळें तेंच खरें आहे. स. १७७० च्या मेमध्यें निजगलचा किल्ला घेतला. ३. ऐ. ले. सं. नं. १०४४। १०५८। १०८० वगैरे पहा.

कांहींच न लिहितां जितका गिल्ला तितका लिहून पाठविला ! श्रीमंत यांनीं लष्करच्या डांकेचें पत्र फोडून पाहिलें. त्यांत गोपाळराव घरास गेले हें वाचतांच तप्त जाहले. आणि ह्मणाले कीं, मी मोफत सरंजाम चालवितों कीं काय ? असें ह्मणून लागल्याच जशी चिठ्ठ्या लिहून दोनशें असामी स्वार व पांचशें पायदळ व एक कारकून याप्रमाणें सरंजाम जप्त करण्याकरितां रवाना केले.

५२. तों इकडे गोपाळरावदादा मिरजेस येऊन पोंहचले. नंतर थोरले दिवाणखान्याचें काम चाललें होतें, संपत आलें होतें, तें डोलीचा पडदा उघडून पाहिलें. रात्रीं नानाची व ताईची भेट घेतली. सर्व मंडळी भेटली. एक रात्र होते. प्रातःकाळीं वारले. नंतर गोविंदपंत नानांनीं श्रीमंतांस पत्र लिहिलें जे, प्रकृति बिघडली ह्मणोन लष्करांतून राव घरास आले. एक रात्र होते. प्रातःकाळीं वारले. आतां आह्मांस वृद्धपणीं ही गोष्ट प्राप्त जाहली ! याप्रमाणें अनेक प्रकारें पत्र लिहून जासूद जोडीबराबर जलद रवाना करून नंतर गोपाळराव याचें शव बाहेर काढिलें. तो कहर कोठवर लिहावा ! गोपाळरावदादासारखें रत्न गेलें ! सर्व पटवर्धन त्यांनीं उदयास आणिले. त्यांजविशीं शोक जाहला तो कोठवर ल्याहावा !

५३. इकडे पुण्याकडून जशीचा कारकून रवाना जाहला तो पुण्यानजीक शिरवळ म्हणून गांव आहे तेथें आला तों इकडून जासूद गेलेले त्यास आढळले. त्यानें शोध केला जे, जासूद कोठील कोण ? जासूद बोलले कीं आम्हांस बोलावयास फुरसत नाहीं. गोपाळराव दादा वारले, सबब आम्ही श्रीमंतांकडे पुण्यास जातों. असें म्हणून जासूद चालते जाहले. कारकून यानीं विचार केला कीं, श्रीमंतानीं गोपाळरावदादा घरास गेले म्हणून जशीस आम्हांस रवाना केलें, परंतु अशी अवस्था जाहली. हें श्रीमंतांस समजलें असतां आम्हावर वेडेपणा येईल. त्यास येथेंच मुक्काम करावा. श्रीमंतांस कळवून जशी आज्ञा येईल तसा विचार करावा. असें मनांत आणून सांडणीस्वारासमागमें पत्र श्रीमंतांस लिहून पाठविलें जे, ऐकीव वर्तमान गोपाळराव वारल्याचें लिहिलें आहें. जासूदही स्वामीकडे आलेच आहेत. जशी आज्ञा येईल तसें करीन. याप्रमाणें लिहून सांडणीस्वार रवाना केला. जासूदही पुण्यास जाऊन पोंहोचले. मिरजेहून जासूदजोडी आली म्हणोन परमाणगी लागून आंत जाऊन लखोटे हवालीं केले. फोडून वाचतांच श्रीमंत अंमळ पाव घटका सर्द जाहले. आणि बोलले कीं माझा एक हात गेला ! असें म्हणून त्यावेळीं चौघडा जो वाजत होता तो, बंद करविला[2]; आणि चिंताक्रांत जाहले कीं, कारकून जशीस पाठविला त्यास

---

१ गोपाळरावाच्या मृत्यूसंबंधें ऐ. ले. सं. नं. १०८९ चें पत्र फार उत्तम आहे तें पहा. २ गोपाळराव वारल्याचें वर्तमान समजतांच पेशव्यानीं पुण्यांतले चौघडे चार दिवस बंद केले होते व त्या अवधींत दरबार भरण्याचेंही मना केलें होतें. पहा ऐ. ले. सं. नं. १०८९.

कसें करावें ? असें मनांत आणिलें तों इतक्यांत सांडणीस्वार आला त्यानें लाखोटे दिले. ते वाचून पहातांच अंमळ स्वस्थ जाहले. नंतर गोविंदपंतनाना यांचे पत्राचें उत्तर दिलें. त्यांत मजकूर बहुत लिहिले; परंतु हांशील काय आहे कीं, आपण मनांत असें आणावें जे, माधवराव गेले आणि गोपाळराव आहेत असें मनांत आणावें !! असें लिहून जासूद रवाना केले. आणि जप्तीचे कारकुनास पत्र लिहिलें कीं, तुह्मीं सांडणीस्वार पाठविला हें फार चांगलें केलें. आतां पत्रदर्शनीं निघून यावें. शहरांत याल ते दिवशीं रात्रीं चार दिशांनीं फुटून यावें. एकंदर जमावसुद्धां एकाच वाटेनें येऊं नये. असें लिहून पाठविलें. आणि त्रिंबकराव मामास हें वर्तमान लिहून त्यांस लिहिलें कीं, गोपाळराव यांची इतकी प्रकृति बिघडली असतां तें कांहींच तुह्मी न लिहितां घरास गेले म्हणोन सारा गिल्लाच लिहिला यांत सरदार लोकांची हुरमत तुम्ही घेणार हें चांगलें कीं काय ? याप्रमाणें नानाप्रकारें फजिती करून लिहिलें.

५४. याप्रमाणें गोपाळरावदादा यांनीं सरकारचाकरी करून वैकुंठवासी जाहले. गोपाळरावदादा यांचे वेळेस हे पंचभाई, पांचजण भाऊ म्हणजे भारती वीर; याप्रमाणें यांचा लौकिक. वडील गोपाळराव, दुसरे नीलकंठराव, तिसरे कोन्हेरराव, चौथे नारायणराव, पांचवे पुरुषोत्तमराव, याप्रमाणें पांचजण. हा अनुक्रम शिपाईगिरीचा. यांत वयानें लहान मागें पुढें आहेत. परंतु पराक्रम सर्वांचे समान. शिपाईगिरी समान.

५५. आतां नीलकंठराव यांचे पराक्रमाचें वर्णन करितों. गोपाळरावदादा वारलेवर कर्नाटकचे स्वारीस त्रिंबकराव मामा होते; तेथें सारे सरदार पटवर्धन आदिकरून होते. पटवर्धन भाईमंडळी सारी होती. कोणे एके दिवशीं त्रिंबकराव मामा यांनीं भालदाराचे हातीं पटवर्धन यांजकडे सांगून पाठविलें कीं, तुमचें पथक उदईक कहीसमागमें नेमिलें आहे. तर तयार होऊन कहीबरोबर जावें. अशी ताकीद करावयास भालदार पटवर्धन यांचे लष्करांत आला. तों सारी मंडळी चांदणींत कचेरींत अस्तमानाचे समयास बसले आहेत, तेथें भालदार येऊन सलाम करून आपले यवनी भाषेनें सांगितलें कीं, उदईक आपलें पथक कहीबरोबर जावें ह्मणून मामासाहेब याणीं हुकूम केला आहे. सर्व एकमेकांकडेस पाहूं लागले. त्यांत पुरुषोत्तमराव दाजी बोलले कीं, अरे, याचीं उत्तरें बहुत आहेत, परंतु तीं तुजपाशीं बोलावयाचीं नव्हेत. त्यास मामास सांगावें जे, आमचें पथक कहीबरोबर जावयाचें नाहीं असें सांगावें. असें ह्मणतांच भालदार दहावीस पाउलें माघारा जाउन पुन्हां उलटून येऊन सलाम करून बोलला जे, आणखी मामासाहेब यांनीं सांगावयास सांगितलें आहे,

१ प्रतिष्ठितांकडे दरबाराचीं बोलावणीं व निरोप पोंचविण्याचें काम भालदाराचें. २ लष्करची दाणावैरण आणणारी टोळी. हीन लढणारे लोक नसल्यामुळें तिच्या रक्षणार्थ बरोबर जुनची फौज द्यावी लागत असे. कही संभाळून आणण्याचें हें पोलीसचें भिकार काम आमच्या दर्जाचें नाहीं, या कामासाठीं आह्मीं आपलीं घोडीं माणसें शिणवीत नाहीं, हें पटवर्धनांचें ह्मणणें.

त्यास आपली आज्ञा जाहली तर विनंति करीन. असें म्हणतांच पुरुषोत्तमराव दाजी बोलले कीं, तुला जें सांगितलें असेल तें बोलावें. याप्रमाणें म्हणतांच भालदार बोलला कीं, हे मानपान गोपाळराव दादा यांजबरोबर गेले, आतां जी चाकरी सांगूं ती करून रहावें, असा मामासाहेबांचा हुकूम आहे. याप्रमाणें बोलतांच प्रथम मामास एक शिवी देऊन दाजी बोलले कीं, अरे, गोपाळराव मात्र गेले, परंतु ज्यांनीं गोपाळराव केले ते जिवंत आहेत ! असें म्हणाले. तो भालदार इतकें बोलून निघून गेला. त्यास मामानीं बोलावयास तसेंच सांगितलें होतें. नंतर पुरुषोत्तमराव दाजी पालखींत बसून त्रिंबकराव मामाकडे गेले. तों भालदार यानें जाऊन वर्तमान सांगितलेंच होतें. तों हेही गेले. जातांच ' या पुरुषोत्तमराव ' म्हणोन उठोन मामानीं ताजीम दिली आणि बसले. तों घटका रात्र जाहली. तेही बोलेनात व हेही बोलेनात. तेव्हां त्रिंबकराव मामा यांनीं गोष्ट काढिली जे, पुरुषोत्तमराव, काय करावें ? या उपर घोड्यांस दाणावैरण मिळून घोडीं कांहीं जगावयाचा सुमार दिसत नाहीं. हैदरखान याचे बेदंडे[1] चोहीकडे फिरतात. कही निभावून येईनाशी जाहली. त्यास आपल्यासारखे मातबर यांचें पथक समागमें देऊन कही निभावून आली तर आली. नाहींपेक्षां सारीं पथकें देऊन पाहिलीं, कही निभावून येत नाहीं, यास कसें करावें ? असें म्हणतांच पुरुषोत्तमराव दाजी बोलले कीं, हें वर्तमान सारें खरेंच. परंतु तुम्हीं शेवटील निरोप काय सांगून पाठविला जे, हे मानपान गोपाळराव यांजसमागमें गेले, आतां जी चाकरी सांगूं ती करावी, असें सांगून तुम्हीं पाठविलें. त्यास आपण कांहीं नवे आलां नाहीं. श्रीमंत भाऊसाहेब यांचे मामा ते सारे राज्याचे मामा. कां कीं, शिपाई मर्द माणूस, म्हणून श्रीमंतांनीं जरीपटक्यासमागमें आपणास नेमिलें. नाहींपेक्षां श्रीमंतांचे घरीं मामा पुष्कळ आहेत ! परंतु मामा, गोपाळराव मात्र गेले, परंतु ज्यांनीं गोपाळराव केले ते मात्र जिवंत आहेत ! आणखी आपण सारे हैदरखानाच्या माणिकचौकांत[2] आहोंत. हरवक्त काम पडतें, कोण मनुष्यें कशीं हें तुम्हीं नजरेनें पहातां, असें असोन भलतेंच बोललां ! त्यास मामा, तुह्मी जुने माहितगार आहां म्हणोन उगेच राहिलों. नाहींपेक्षां नवा कोणी जर असता तर ××××× ला पायपोसानें मारिलें असतें ! याप्रमाणें तोंडावर बोलून निघून आपले लष्करांत आले. आणि सर्व लहान थोर जमा करून त्यांस सांगितलें कीं, आम्ही जाऊन जें पाहिजे तें बोलून आलों. परंतु उद्यां प्रसंगास जर नांव रक्षिलें तर बरें, नाहींपेक्षां पडलें काम करावें लागेल ! त्यास तुमचे सर्वांचे मनांत काय

१ गोपाळरावास ज्यांनीं एवढ्या योग्यतेस आणिलें ते आह्मी भाऊबंद अजून जिवंत आहों. २ कर्नाटकचे लुटारू लोकांस बेद ही संज्ञा आहे. जसे इकडचे पेंढारी तसे तिकडचे बेद. मराठींतला ' बेदा ' हा शब्द ' बेद ' या शब्दापासूनच निघाला आहे. बेद यांचेंच तुच्छतावाचक रूप ' बेदडा.' ३ माणिक चौक जसा शहराच्या मध्यभागीं असतो तसे आपण हैदरखानाच्या मुलखांत मध्यभागीं आहोंत. तो केव्हां गांठून आपणास अडचणींत घालील हा नेम नाहीं, असें तात्पर्य.

आहे तें सांगावें. याप्रमाणें बोलतांच सर्वांनीं उत्तर केलें कीं, हा अभिमान सर्वांसच आहे. असें बोलून सर्वांपासून बेलभंडार घेतला जे, प्रसंगास आम्ही मागें सरणार नाहीं.

५६. याप्रमाणें बोलुन ठरलें तों कांहींएक दिवशीं प्रसंग आला. हैदरखान याची छाप्याची बातमी आली ती त्रिंबकराव मामा यांनीं पटवर्धन यांस सांगितली नाहीं. आपलें बुणगें वगैरे लावून देऊन तयारी करून आयते वेळेस यांस सांगून पाठविलें, आणि अवघड तोंड होतें तिकडील चाकरी सांगितली. पटवर्धन यांनींही परभारें बातमी आणविलीच होती. पटवर्धन यांनीं त्रिंबकराव मामा यांस सांगून पाठविलें कीं, तुह्मीं आपलें बुणगें सारें रवाना करून आयते वेळेस आह्मांस सांगितलें, त्यास आमचें बुणगें अद्यापि गोटांतच आहे. त्यापेक्षां आतां कसें होईल तसें होऊ ! आम्ही तयार आहोंत. असें सांगून पाठवून ही सारी मंडळी तयार जाहली. आणि क्रोधही सर्वांस फार, याजमुळें सर्व लढाईस उदितच होते. तों पहांटेचे प्रहर रात्रींचे सुमारास खासा हैदरखान चालोन आला. तेव्हां पटवर्धन यांची गांठ पडोन लढाई मातबर जाहली. त्यांत हैदरखान मात्र यानीं जिवानिशीं सोडिला सबब तो माघारा गेला. बाकी तोफा सुमार[२] ५ व हत्ती निशाणें सारें पाडाव आलें. तों इतक्यांत सूर्योदय जाहला. लढाई शिकस्त करून सारे माघारे फिरले. हैदरखान याची एक तोफ व शंभर पायदळ तोफ रक्षण करून घेऊन जात होते तें नीलकंठराव यांनीं पाहिलें, आणि बोलले कीं अरे, तुमचे उरावरून तोफ घेऊन जातात ! पाहतां काय ! घोडीं यांजवर घालावीं ! असें म्हणून नीट तोफेवर चालून गेले. त्या लोकांनीं फैर झाडली तों गोळ्या अकस्मात् नीलकंठराव यांस लागल्या व ते ठार जाहले[३]. तों फौज तेथेंच सारी थिजली. सारे भाई मंडळी घोड्यावरून उतरून जमा जाहले. तों इतक्यांत त्रिंबकराव मामा तिकडून आले आणि बोलले कीं, माँझा[४] हैदरखान

१ या प्रसंगाची माहिती देण्यांत बखर लिहिणाराची थोडी चूक झाली आहे. तो हैदरखानाच्या छाप्याची जी हकीकत देतो ती छाप्याची नसून उलट मोतीतलावाच्या लढाईची आहे. ती लढाई ता० ७ मार्च स० १७७१ रोजीं झाली व तींत हैदराचा पूर्ण पराजय झाला. हैदरखानाच्या श्रीरंगपट्टणास जाण्याच्या वाटेवर त्यास अडविण्याकरितां मामानीं पटवर्धनांस नेमिलें होतें. ती फार अवघड चाकरी होती. २ जुन्या लेखांत 'सुमार' याचा अर्थ नक्की संख्या. अजमास नव्हे ! ही नक्की संख्या लिहिण्याच्या संज्ञा निरनिराळ्या होत्या. बैलांस व टोणग्यांस 'सर.' हत्तींस 'नग.' घोड्यांस 'रास.' उंटास 'नफर.' बकऱ्यास 'बुध.' होन रुपये वगैरे नाण्यांस 'नक्त.' संख्येनें मोजतां येणाऱ्या बाकीच्या सर्व पदार्थांस 'सुमार' असा शब्द लावीत असत. जसें बैल सर पंधरा ह्मणजे पंधरा बैल फक्त. तसेंच हत्ती नग १०. घोडे रास पंचवीस. उंट नफर ७. मोहरा नक्त ११. नारळ सुमार ३०. इत्यादि. माणसांस 'असामी' व 'कस' हे शब्द लावीत असत त्यांपैकीं 'असामी' हा शब्द प्रचारांत आहेच. 'कुणबीण 'कस' एक' असें मात्र आतां कोणी म्हणत नाहीं ! तसेंच कोठींत कैली, वजनी व सुमारी जिन्नस असतो त्यांत सुमारी ह्मणजे संख्येनें मोजावयाचा. ३ नीलकंठराव बखरींत वर्णिल्याप्रमाणें लढाईनंतरच्या क्षुल्लक चकमकींत पडले नसून ऐन लढाईंत शत्रूवरच्या अंगदीं शेवटच्या हल्ल्यांत ठार झाले. पहा ऐ. ले. सं. नं. ११०० ते ११०३.
४ मीं मारावयाचा.

कोठें आहे ? तेव्हां पुरुषोत्तमराव बोलले कीं, हैदरखानास काय करितोस ? हा तुझा × × पडला पहा ! असें म्हणतांच त्रिंबकराव मामाही घोड्यावरून उतरले आणि तेथें आले. नंतर दहन केलें.

५७. दहावे दिवशीं पिंडास कावळा शिवेना. तेव्हां नानाप्रकारचीं उदकें सोडिलीं. तिसरा प्रहर जाहला, परंतु कावळा शिवेना. तेव्हां त्यांचे बंधु कोन्हेरराव बोलले कीं, मला एक सुचलें आहे तें मी बोलतों. असें म्हणतांच पुरुषोत्तमराव दाजी बोलले कीं काय सुचलें असेल तें बोलावें. असें म्हणतांच कोन्हेरराव बोलले कीं, अहो नीलकंठराव, आपले मनांत असेल जे, माझा भाऊ एक आहे हा घरांत पडशा खोकल्यानें बिछान्यावर मरेल, अशी काळजी आपणास लागली असेल. त्यास आपणास ठाऊक असों द्यावें कीं, जसे आपण हैदरखान याचे निशाणावर चालून जाऊन रणाचे ठायीं ठार जाहलां, त्याप्रमाणेंच मी कोन्हेरराव या हैदरखानाचे निशाणावर चालून जाऊन रणाचे ठायीं देह अर्पण करीन[1] ! याप्रमाणें बोलून उदक सोडतांच तत्काळ कावळा शिवला ! हें सारें फौजेनें व मानकरी वगैरे सर्व मंडळीनें पाहून सर्वांनीं आश्चर्य केलें आणि कीर्तीचीही वर्णना केली.

५८. पुढें तेरावे दिवशीं त्रिंबकराव मामा समाचारास आले आणि बोलले कीं, नीलकंठराव आह्मांस टाकून वैकुंठास गेले ! असें म्हणतांच पुरुषोत्तमराव दाजी बोलले कीं, अहो त्रिंबकराव, कोणते लढाईस आमचा पुरुष पडला नाहीं अशी लढाईच नाहीं. दर लढाईस आमचा एक पुरुष खर्च होतो तेव्हां श्रीमंत सरंजाम चालवितात ! आह्मीं शिरें हातांत घेतलीं आहेत. आह्मीं कांहीं लेकी अथवा बहिणी देऊन रोजगार मिळवून श्रीमंतांची कृपा संपादिली असा अर्थ नाहीं ! असें ह्मणतांच त्रिंबकराव मामा यांनीं पदर पसरून बोलले जे, पुरुषोत्तमराव, मी चुकलों. आतां सर्वांनीं मजवर कृपा करावी. वारंवार आपण असें बोलूं नये. असें ह्मणून राग शांत केला.

५९. याप्रकारें पटवर्धन यांचे पुरुष कीर्तिवान् जाहले. त्या कीर्ति साऱ्याच वर्णन, करीन ह्मटलें तर आयुष्य देखील पुरावयाचें नाहीं. त्यांतून शक्तचनुसार वर्णन करितों. हें जाहलें वर्तमान श्रीमंतांस कळोन त्यांनीं इनामगांव रघुनाथराव नीळकंठ यांस देऊन वस्त्रें दिलीं. जशी कृपा नीळकंठराव यांजवर, त्याप्रमाणें रघुनाथराव यांजवर जाहली. याप्रमाणें कथा वडिलांनीं सांगितली ती लिहिली.

---

१ या प्रतिज्ञेप्रमाणें कोन्हेरराव सांवशीच्या लढाईत हैदरखानाच्या फौजेशीं लढून ठार जाहले. ती लढाई ता० ९ जानेवारी सन १७७७ रोजीं झाली. २ चिमाजी आपास त्रिंबकराव मामाची बहीण दिलेली होती त्या गोष्टीस अनुलक्षून हा टोमणा ! पटवर्धन पेशव्यांचे आप्त होते असें डफसाहेबांनीं लिहिलें आहे तें चूक आहे. पेशव्यांच्या घराण्याशीं पटवर्धनांचा संबंध झालेला आहे तो पेशवाई गेल्यावर पुष्कळ वर्षांनीं झाला आहे.

आहे तें सांगावें. याप्रमाणें बोलतांच सर्वांनीं उत्तर केलें कीं, हा अभिमान सर्वांसच आहे. असें बोलून सर्वांपासून बेलभंडार घेतला जे, प्रसंगास आम्ही मागें सरणार नाहीं.

५६. याप्रमाणें बोलुन ठरलें तों कांहींएक दिवशीं प्रसंग आला. हैदरखान याची छाप्याची बातमी आली ती त्रिंबकराव मामा यांनीं पटवर्धन यांस सांगितली नाहीं. आपलें बुणगें वगैरे लावून देऊन तयारी करून आयते वेळेस यांस सांगून पाठविलें, आणि अवघड तोंड होतें तिकडील चाकरी सांगितली. पटवर्धन यांनींही परभारें बातमी आणविलीच होती. पटवर्धन यांनीं त्रिंबकराव मामा यांस सांगून पाठविलें कीं, तुम्हीं आपलें बुणगें सारें रवाना करून आयते वेळेस आम्हांस सांगितलें, त्यास आमचें बुणगें अद्यापि गोटांतच आहे. त्यापेक्षां आतां कसें होईल तसें होऊ ! आम्ही तयार आहोंत. असें सांगून पाठवून ही सारी मंडळी तयार जाहली. आणि क्रोधही सर्वांस फार, याजमुळें सर्व लढाईस उदितच होते. तों पहांटेचे प्रहर रात्रींचे सुमारास खासा हैदरखान चालोन आला. तेव्हां पटवर्धन यांची गांठ पडोन लढाई मातबर जाहली. त्यांत हैदरखान मात्र यानीं जिवानिशीं सोडिला सबब तो माघारा गेला. बाकी तोफा सुमार[२] ५ व हत्ती निशाणें सारें पाडाव आलें. तों इतक्यांत सूर्योदय जाहला. लढाई शिकस्त करून सारे माघारे फिरले. हैदरखान याची एक तोफ व शंभर पायदळ तोफ रक्षण करून घेऊन जात होते तें नीलकंठराव यांनीं पाहिलें, आणि बोलले कीं अरे, तुमचे उरावरून तोफ घेऊन जातात ! पाहतां काय ! घोडीं यांजवर घालावीं ! असें म्हणून नीट तोफेवर चालून गेले. त्या लोकांनीं फैर झाडली तों गोळ्या अकस्मात् नीलकंठराव यांस लागल्या व ते ठार जाहले[३]. तों फौज तेथेंच सारी थिजली. सारे भाई मंडळी घोड्यावरून उतरून जमा जाहले. तों इतक्यांत त्रिंबकराव मामा तिकडून आले आणि बोलले कीं, माँझा हैदरखान

१ या प्रसंगाची माहिती देण्यांत बखर लिहिणाराची थोडी चूक झाली आहे. तो हैदरखानाच्या छाप्याची जी हकीकत देतो ती छाप्याची नसून उलट मोतीतलावाच्या लढाईची आहे. ती लढाई ता० ७ मार्च स० १७७१ रोजीं झाली व तींत हैदराचा पूर्ण पराजय झाला. हैदरखानाच्या श्रीरंगपट्टणास जाण्याच्या वाटेवर त्यास अडविण्याकरितां मामानीं पटवर्धनांस नेमिलें होतें. ती फार अवघड चाकरी होती. २ जुन्या लेखांत 'सुमार' याचा अर्थ नक्की संख्या. अजमास नव्हे ! ही नक्की संख्या लिहिण्याच्या संज्ञा निरनिराळ्या होत्या. बैलांस व टोणग्यांस 'सर.' हत्तींस 'नग.' घोड्यांस 'रास.' उंटास 'नफर.' बकऱ्यास 'बुध.' होन रुपये वगैरे नाण्यांस 'नक्त.' संख्येनें मोजतां येणाऱ्या बाकीच्या सर्व पदार्थांस 'सुमार' असा शब्द लावीत असत. जसें बैल सर पंधरा ह्मणजे पंधरा बैल फक्त. तसेंच हत्ती नग १०. घोडे रास पंचवीस. उंट नफर ७. मोहरा नक्त ११. नारळ सुमार ३०. इत्यादि. माणसांस 'असामी' व 'कस' हे शब्द लावीत असत त्यांपैकीं 'असामी' हा शब्द प्रचारांत आहेच. 'कुणबीण 'कस' एक' असें मात्र आतां कोणी म्हणत नाहीं ! तसेंच कोठींत कैली, वजनी व सुमारी जिन्नस असतो त्यांत सुमारी ह्मणजे संख्येनें मोजावयाचा. ३ नीलकंठराव बखरींत वर्णिल्याप्रमाणें लढाईनंतरच्या क्षुल्लक चकमकींत पडले नसून ऐन लढाईंत शत्रूवरच्या अंगदीं शेवटच्या हल्ल्यांत ठार झाले. पहा ऐ. ले. सं. नं. ११०० ते ११०३.

* मीं मारावयाचा.

कोठें आहे ? तेव्हां पुरुषोत्तमराव बोलले कीं, हैदरखानास काय करितोस ? हा तुझा × × पडला पहा ! असें म्हणतांच त्रिंबकराव मामाही घोड्यावरून उतरले आणि तेथें आले. नंतर दहन केलें.

५७. दहावे दिवशीं पिंडास कावळा शिवेना. तेव्हां नानाप्रकारचीं उदकें सोडिलीं. तिसरा प्रहर जाहला, परंतु कावळा शिवेना. तेव्हां त्यांचे बंधु कोन्हेरराव बोलले कीं, मला एक सुचलें आहे तें मी बोलतों. असें म्हणतांच पुरुषोत्तमराव दाजी बोलले कीं काय सुचलें असेल तें बोलावें. असें म्हणतांच कोन्हेरराव बोलले कीं, अहो नीलकंठराव, आपले मनांत असेल जे, माझा भाऊ एक आहे हा घरांत पडशा खोकल्यानें बिछान्यावर मरेल, अशी काळजी आपणास लागली असेल. त्यास आपणास ठाऊक असों द्यावें कीं, जसे आपण हैदरखान याचे निशाणावर चालून जाऊन रणाचे ठायीं ठार जाहलां, त्याप्रमाणेंच मी कोन्हेरराव या हैदरखानाचे निशाणावर चालून जाऊन रणाचे ठायीं देह अर्पण करीन[1] ! याप्रमाणें बोलून उदक सोडतांच तत्काळ कावळा शिवला ! हें सारें फौजेनें व मानकरी वगैरे सर्व मंडळीनें पाहून सर्वांनीं आश्चर्य केलें आणि कीर्तीचीही वर्णना केली.

५८. पुढें तेरावे दिवशीं त्रिंबकराव मामा समाचारास आले आणि बोलले कीं, नीलकंठराव आह्मांस टाकून वैकुंठास गेले ! असें म्हणतांच पुरुषोत्तमराव दाजी बोलले कीं, अहो त्रिंबकराव, कोणते लढाईस आमचा पुरुष पडला नाहीं अशी लढाईच नाहीं. दर लढाईस आमचा एक पुरुष खर्च होतो तेव्हां श्रीमंत सरंजाम चालवितात ! आह्मीं शिरें हातांत घेतलीं आहेत. आह्मीं कांहीं लेकी अथवा बहिणी देऊन रोजगार मिळवून श्रीमंतांची कृपा संपादिली असा अर्थ नाहीं ! असें ह्मणतांच त्रिंबकराव मामा यांनीं पदर पसरून बोलले जे, पुरुषोत्तमराव, मी चुकलों. आतां सर्वांनीं मजवर कृपा करावी. वारंवार आपण असें बोलूं नये. असें ह्मणून राग शांत केला.

५९. याप्रकारें पटवर्धन यांचे पुरुष कीर्तिवान् जाहले. त्या कीर्ति साऱ्याच वर्णन, करीन ह्मटलें तर आयुष्य देखील पुरावयाचें नाहीं. त्यांतून शक्तयनुसार वर्णन करितों. हें जाहलें वर्तमान श्रीमंतांस कळोन त्यांनीं इनामगांव रघुनाथराव नीळकंठ यांस देऊन वस्त्रें दिलीं. जशी कृपा नीळकंठराव यांजवर, त्याप्रमाणें रघुनाथराव यांजवर जाहली. याप्रमाणें कथा वडिलांनीं सांगितली ती लिहिली.

---

१ या प्रतिज्ञेप्रमाणें कोन्हेरराव सांवशीच्या लढाईत हैदरखानाच्या फौजेशीं लढून ठार जाहले. ती लढाई ता० ९ जानेवारी सन १७७७ रोजीं झाली. २ चिमाजी आपास त्रिंबकराव मामाची बहीण दिलेली होती त्या गोष्टीस अनुलक्षून हा टोमणा ! पटवर्धन पेशव्यांचे आप्त होते असें डफसाहेबांनीं लिहिलें आहे तें चूक आहे. पेशव्यांच्या घराण्याशीं पटवर्धनांचा संबंध झालेला आहे तो पेशवाई गेल्यावर पुष्कळ वर्षांनीं झाला आहे.

६०. हैदरखान याचे लढाईंत मेघश्यामराव बापू सांपडले ती कथा लिहितों. लढाईचे प्रसंगानंतर मेघश्यामराव बापू कांहीं जरूरीसाठीं घोडयावरून उतरले यामुळें फुरसद मिळून शत्रूनें गांठिलें. तों इतक्यांत जलदी करून घोडयावर बसले, परंतु घोडी कांहीं केल्यानें जागा सोडीना! नाना प्रकार केले, सोंटे मारिले, परंतु जागा सोडीना! शेवटीं पागेकडील बारगी याणीं पुठ्ठयावर तलवारीचे वार केले तरी घोडी जागा सोडीना! नाहींपेक्षां मेघश्यामराव बापूप्रमाणें घोडयावर बसणार पटवर्धन मंडळींत नाहीं! परंतु होणार बलवत्तर! धरले गेले! नंतर हैदरखान यानें पिंजऱ्यांत ठेविलें. पुढें श्रीमंत माधवरावसाहेब यांची स्वारी जातीनिशीं आली ते समयीं लढाई होऊन शत्रूस जिंकिलें. नंतर तहाचें बोलणें आलें तेव्हां खंडणी ठरून बंदींत नरगुंदकर होते त्यांसही सोडावयाचें ठरलें. त्यांत मेघश्यामराव यांस सोडावयाचें कलम लिहिलें नाहीं. हें वर्तमान पुरुषोत्तमराव दाजीस समजलें. त्या वेळेस गोपाळराव दादा होते. दादांचे कानावर मजकूर घालतांच त्यांनीं श्रीमंतांकडे सांगून पाठविलें कीं सरकारचा तह होऊन खंडणी ठरविली व नरगुंदकर यांस सोडावें असेंही ठरलें; आणि मेघश्यामराव यांचें कांहींच बोलणें नाहीं! त्यास आमचे भावाचे पायांत बेडी असोन आपणाजवळ चाकरी करण्याची आमची प्रतिष्ठा काय? त्यास आज्ञा दिल्यास हैदरखान याजकडे जाऊन मी त्याच्या कैदेंत राहतों आणि मेघश्यामराव यांस घरास पाठवून देतों. वडिलानीं ध्यास फार घेतला आहे. असें सांगतांच श्रीमंतांनीं हैदरखान याजकडील वकिलास बोलावून आणोन सांगितलें जे, मेघश्यामराव यांस सोडल्यास तुमचा आमचा तह. नाहींपेक्षां बिघाड! तेव्हां वकील यांनीं विनंति केली जे, यादी वगैरे ठरल्या. तेव्हां श्रीमंतांनीं आज्ञा केली जे, तें कांहीं असो. मेघश्यामराव यांस सोडल्याखेरीज तह नाहीं. नाहींपेक्षां आजच लढाई! असें ह्मणतांच मेघश्यामराव यांस हैदरखान याणीं बहुमान करून श्रीमंतांकडे पोंचतें करविलें.

६१. बापाजी यांस फारच काळजी लागली होती. नारायणराव नाना वारले, आतां बापूस कोण सोडवील? याप्रमाणें निरंतर ध्यास. नाना वारले व बापू बंदीस, या पुत्रशोकानेंच बापाजी कैलासवासी जाहले! बापू घरास येईपर्यंत त्यांस उभयतांचें वर्तमान अगदींच सांगितलें नाहीं. घरीं मंगळवेढ्यास आलेवर बापाजीचें व नानांचें वर्तमान समजलें. मग त्यांनीं जो शोक केला त्यास अंतपार नाहीं! तें लिहितां पुरवत नाहीं. बापू बोलले जे, मी दीड वर्ष पिंजऱ्यांत होतों तेथें अंत जाहला असता तरी पुरवता, परंतु हें दुःख सोसणें कठिण!

---

१ सन १७६३ त मेघश्यामराव व नरगुंदकर भावे वगैरे सरदार यांची हैदराचा सरदार मीर फैझुल्लाखान याशीं लढाई होऊन यांचा पराजय झाला, व हे पळत सुटले आणि त्यांची फौज यांच्या पाठीस लागली. तों मेघश्यामराव यांस शत्रूनें वर सांगितल्याप्रमाणें अचानक गांठलें. २ ही लढाई ह्मणजे १७६४-६५ मध्यें पेशव्यांनीं हैदरअल्लीवर केलेली पहिली स्वारी होय. ३ यादी ठरल्यावर आतां नवीन कलम कसें घालतां येईल, असा अर्थ.

६२. मेघश्यामराव बापू यांणीं मंगळवेढ्याची मामलत यावज्जीव पन्नास साठ वर्षें अंमल केला. त्यांनीं प्रजापालन केलें असें राज्यांत देखील कोणीं केलें नाहीं. नांगर धरणारे यांजवर अबदागिऱ्या धरिल्या ! प्रजा रानांतच राहून झाडांस पाळणे बांधिले. याप्रमाणें निर्भय राज्य केलें. अद्यापि मंगळवेढ्यांत ओव्या गातात. असे पुण्यवान् ! प्रजापालनाविशीं मानवांत उपमाच नाहीं.

६३. आतां बाप्पाजींचे चतुर्थ पुत्र महादेवराव अण्णा तेही महापराक्रमी. ते हैदरखान याचे छाप्यांत सरकारकामास आले. तेथें तोफेचा गोळा लागून ठार झाले. त्या वेळेस परशुरामभाऊ जवळ होते. भाऊ यांचीं तीन घोडीं पडलीं परंतु त्यांनीं जागा सोडिली नाहीं ! त्या वेळेस भाऊस सालिना वीस हजार तैनात करून दिली. पुढें महादेवराव अण्णा यांचे पुत्र दामोदर महादेव यांस श्रीमंतांनीं कृपा करून नांदोरें गांव इनाम करून दिला, व तैनात दीड हजार रुपये करून दिली. याप्रमाणें ते कीर्तिवान्.

६४. धाकटे बळवंतरावदादा पांचवे पुत्र बाप्पाजीचे. हेही पराक्रमी, घोड्यावर बसणार उत्कृष्ट. यांनींही श्रीमंतांचे घरीं चाकरी करून तैनाता वगैरे मेळविल्या.

६५. याप्रमाणें पंचपुत्र बाप्पाजीचे महापराक्रमी. कृष्णंभटबाप्पाजी पुत्रशोकानें वारले. ते त्रिवर्ग बंधु पुत्रशोकानेंच वारले. कृष्णंभटबाप्पाजी व गोविंदपंत नाना व त्रिंबकपंत आप्पा या त्रिवर्गांसही पुत्रशोक जाहला. त्रिवर्गांचे पुत्र केवळ भार्गवरामासारखे. पुत्र असें त्यांसच ह्मणावें. ज्या पुत्रांनीं मेळविलें तें त्यांचे वंशज अद्यापि खातात व पुढेंही यावत् वंश आहे तोंपावेतों अचळ खातील, अशा कीर्ति करून गेले !

६६. श्रीमंत माधवरावसाहेब यांची प्रकृति फारच बिघडली. थेउरास श्रीगणपतीजवळ अनुष्ठान केलें, परंतु महद्रोग जाहला. राजयक्ष्मा रोग होऊन श्रीमंत शके १६९४ कार्तिक वद्य ८ रोज बुधवारीं वारले. श्रीमंत रमाबाईसाहेब सहगमनें गेली. त्या वेळेस त्यांनीं प्रसाद सर्वांस दिला. पांच मोहरा प्रसाद पुरुषोत्तमराव दाजी यांस श्रीमंत बाईसाहेब यांनीं दिल्या. तें दाजींनीं स्वदस्तूरचें लिहून ठेविलें आहे.

६७. पुढें श्रीमंत नारायणरावसाहेब राज्याधिकारी, परंतु श्रीमंत दादासाहेब कारभारांत पुढें जाहले. श्रीमंत रावसाहेब यांचे वेळेस जे बंदींत होते ते सारेच पुढें सरले. सखारामपंतबापू हे दिवाण श्रीमंत रावसाहेब यांचे वेळेस बंदींत होते ते श्रीमंत दादासाहेब यांच्या लक्षानें वागणार. याप्रमाणें सारी सृष्टि नवी जाहली. श्रीमंत नारायण-

---

१ छाप्यांत माधवरावास तोफेचा गोळा गुडघ्यावर लागून त्याच्या चिंधड्या झाल्या. त्याच दुखण्यानें ते कांहीं दिवसांनीं शिरें येथें वारले. त्याविषयीं ऐ. ले. सं. नं. ९५५ पहा व या छाप्याचे वर्णनाविषयीं नं. ९०९ व ९१५ पहा. २ नारायणरावसाहेबांस फक्त मुजऱ्याचे धनी करून दादासाहेब स्वतःच कारभार करूं लागले असें येथें लिहिलें आहे. पण यास ऐ. ले. संग्रहांत अगर अन्यत्र आधार नाहीं.

रावसाहेब मुजऱ्याचे मात्र धनी. सारा कारभार श्रीमंत दादासाहेब करीत. याप्रमाणें नऊ महिने सुरक्षित गेले. श्रीमंत रावसाहेब यांनीं सांगितलेंच होतें कीं, याचे कपाळीं राज्य नाहीं; तोच समय प्राप्त जाहला. पुढें श्रीमंत दादासाहेब यांची कन्या दुर्गाबाई हिचें लग्न जाहलें.

६८. श्रीमंत नारायणरावसाहेब हूड होते. कारभारी यांचा बहुमान रक्षीत नसत. एके दिवशीं पर्वतीस स्वारी गेली तेथें सारे बोथाट्या खेळत होते. याप्रमाणें खेळ खेळत असतां श्रीमंतांनीं नाना फडणीस यांचें पागोटें बोथाटीनें पाडिलें, आणि हंसूं लागले जे, नाना, तुमचें पागोटें खालीं पडलें. तेव्हां नानांनीं उत्तर केलें कीं, मी कारकूनच आहें. माझें पागोटें पडलें हें कांहीं आश्चर्य नाहीं. स्वामींनीं आपलें पागोटें संभाळावें ! असें उत्तर केलें. परंतु नानांनीं सूचना केली हें कांहीं समजलें नाहीं ! सूचना कोणती तर, कांहीं सखाराम-बापूसीं श्रीमंत दादासाहेब यांचें खलबत जाहलें, त्यांत श्रीमंत नारायणरावसाहेब यांस कैद करावें असें ठरलें. ती सूचना नानांनीं श्रीमंतांस या प्रकारें केली, परंतु त्यांच्या समजुतींत आली नाहीं. श्रीमंतांजवळ हरिपंत फडकेही होते, परंतु केवळ राजकारणांत पडत नव्हते. श्रीमंत रावसाहेब यांनीं एकांतीं श्रीमंत नारायणरावसाहेब यांस सांगितलें होतें जे, काय करणें तें हरिपंत याचे विचारें करीत जा, तर कांहीं दिवस वांचशील नाहींपेक्षां तुझ्या जिवास कठिण आहे; असा बहुत बोध केला होता. कांहीं कांहीं विचारीत. कोणती गोष्ट पोटांतही फारशी रहात नव्हती, यामुळें हरिपंत फारशी लगट करीत नव्हते.

६९. तों फितूर जाहला जे, यांस कैद करावें. त्यास सुमेरसिंग गाडदी व खरक-सिंग गाडदी हे उभयतां पांच हजार गाडद्यांचे जमातदार, त्यांस सांगितलें जे, श्रीमंत नारायणरावसाहेब यांस तुह्मीं धरावें; म्हणजे तुह्मांस बक्षीस गांव इनाम वगैरे मिळतील. त्यांनीं उत्तर केलें कीं, आह्मांस दस्तऐवज करून दिला तर आह्मी हा उद्योग करूं. असें म्हणतांच श्रीमंत रघुनाथराव दादासाहेब यांनीं दस्तऐवज करून दिला जे, नारायणराव यांस धरावें, नंतर तुम्हांस अमुक बक्षीस देऊं. असें नानाप्रकारें लिहून दिलें. तों आनंदीबाई रघुनाथरावदादा यांची पत्नी, तिनें गाडद्यांस बोलावून सांगितलें जे, तुम्हांस धरावें असें लिहून दिलें; त्यास धरिलें असतां पुढें कांहीं लोक तिकडे, कांहीं इकडे, असें होऊन राजकारण उभें राहील. त्यास मारून टाकावें हेंच बरें, म्हणजे एकछत्री जाहलें ! असेंच करावें. नंतर गाडदी यांनीं उत्तर केलें कीं, आपण 'धरावें' असें लिहून दिलें आणि मारावें कसें ? तेव्हां आनंदीबाईनीं सांगितलें कीं, तुम्हांस मारावें असें लिहून देतें. तुमचा कागद कोठें आहे तो आणवावा. नंतर त्यांनीं कागद आणून दिला; तेथें 'धरावा' जें होतें तें तेथेंच 'मारावा' असें करून दिलें. 'ध' चा 'मा' केला. नंतर सारा मजकूर ठीकच होता !

७०. याप्रमाणें बंदोबस्त करून जे दिवशीं मारावयाचें, तेच दिवशीं श्रीमंत गांवांतच

१. ती मोरोपंत कवीचे आश्रयदाते पांडुरंगराव बारामतीकर यांस दिली.

पुणें मुक्कामीं सासुरवाडी होती तेथें भोजनास सहकुटुंब गेले होते. इकडे वाड्यांत नाकेबंदी होऊन तलब चढली ह्मणोन गाडदी जमा जाहले. श्रीमंत सासुरवाडीस भोजन करून विडे घेतात तों कोणी सूचना केली कीं, आपण वाड्यांत जाऊं नये. कांहीं दंगा फितूर आहे, त्यास कृपा करून वाड्यांत जावयाचें करूं नये. तेव्हां त्याजवर रागें भरले आणि तसेच पालखींत बसोन वाड्यांत आले. आणि तिसरे मजल्यावर खबूतरखाना होता तेथें अम्मळ उभे राहिले. तों उभयतां गाडदी तेथें आले आणि विनंति केली कीं, महाराज ! आमची तलब चढली याची वाट काय ? आमचा रोजमुरा फडशा करून द्यावा. श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, तिसरे प्रहरीं कचेरीस विनंति करावी. नंतर काय जी आज्ञा व्हावयाची ती होईल. गाडदी यांनीं उत्तर केलें कीं, आह्मांस कचेरीची काय गरज ! आपण धनी. आपण फडशा करावा. तों श्रीमंत तेथून खालीं येऊं लागले. तों जिना उतरतांनांच गाडदी यांनीं लगट केली कीं, आह्मांस येथें ऐवज द्यावा; नाहींपेक्षां आह्मी उतरूं देणार नाहीं. तों इच्छारामपंत ढेरे ह्मणून कारकून होते ते गाडद्यांस रागें भरले जे, असा दंगा केल्यानें ऐवज मिळतो कीं काय ! असें उचलून बोलतांच त्यांनीं तलवारी ओढून इच्छारामपंतास ठार मारिलें. तों श्रीमंत जिना उतरून खालीं आले. तों खालीं चौकांत पूजेच्या गाई दोन बांधिल्या होत्या त्या गारद्यांच्या नाग-द्या तलवारी पाहून बुजाल्या आणि दावीं तोडून गारद्यांच्या अंगावर आल्या. तों तेथें फुरसद सांपडली. नाहीं तर तेथेंच श्रीमंतांस मारावें असें होतें. गाई आड्या येतांच गाडद्यांनीं तलवारीनें गाई ठार मारिल्या ! तों श्रीमंत पार्वतीबाईचे खोलींत गेले, आणि सांगितलें कीं, काकी, मला गाडदी मारितात ! तेव्हां पार्वतीबाई बोलली कीं, मी तुला लपवितें. तूं कांहीं भिऊं नको. आणि तुला मी पारही करितें. असें ह्मणाली. तों श्रीमंतानीं उत्तर केलें कीं, मी दादासाहेबां यांजकडे जातों. असें ह्मणून तेथून निघाले. तों गाडदी यांनीं गांठिलें तों तेथें कुणबीण होती ती आडवी जाहली. तिलाही ठार केली. गारद्यांस खून चढला. तों दादासाहेबांजवळ श्रीमंत जाऊन कमरेस मिठी घालून बोलले कीं मला मारूं नका. किल्लयावर कैद करून पीठमीठ लावून ठेवा ! मारूं नका ! असें दीन वचन बोलले तेव्हां दादासाहेबांस दया आली. तों गाडदीही तेथें आले आणि बोलले कीं, आतां आह्मी यास जिवंत सोडणार नाहीं. हा वांचल्यास आमचीं रांडापोरें ढाणकास वांटील ! सर्पास दुखवून सोडितों कीं काय ? असें ह्मणतांच दादासाहेब ह्मणाले कीं, अरे, बाळास मारूं नका ! असें ह्मणून हात पुढें केला. तों आंत खोलींत तेथेंच आनंदीबाई होती तेथून दादासाहेब यांस ह्मणाली कीं, 'आतां कांकणें हातांत घाल !' असें

१ कृष्णाजी हरि साठे यांचे घरीं. श्रीमंतांचे श्वशुर यापूर्वीच वारले होते. सासू ताई साठी जिवंत होती. तिचा मुलगा महिपतराव साठे हा या वेळीं लहान होता. २ पगार. विशेषेंकरून आरबांचा पगार, तलब चढली = पगाराची बाकी तुंबली. ३ म्यानांतून उपसून.

ह्मणून गाडद्यांस सांगितलें कीं, उभयतांस मारून टाका!!! तों गाडद्यांनीं एक वार टाकिला तो दादासाहेब यांचे हातास लागला. तों तुळ्या पवार आनंदीबाईचा खिसमतगार होता त्यानें श्रीमंतांचे पायास धरून दादासाहेब यांचे कमरेपासून ओढिलें. तों चाफाजी टिळेकर श्रीमंत माधवरावसाहेब यांचा खिसमतगार तसाच श्रीमंतांवर पडला. तों गाडदी यांची तलवार चालली तेथें कांहीं बाकी राहिली नाहीं! उभयतांचे तुकडे एके ठिकाणीं जाहले. श्रीमंत साखरभात भोजन करून गेले तो पोटांतून तसाच पडला! हें कृत्य रघुनाथरावदादा यांचेसमोर जाहलें. गर्दी जाहली तो दिवस शके १६९५ भाद्रपद शुद्ध चतुर्दशी. याप्रमाणें जी गोष्ट न व्हावयाची ती झाली.

७१. नंतर गाडदी याणीं वाड्यावरून रघुनाथराव यांची द्वाही फिरवून 'दीन्'[१] गाजविला. तों श्रीमंत गंगाबाईसाहेब पालखींत बसून वाड्यांत आली. तों बाहेर हांक जाहली कीं, गाडदी वाड्यांत शिरून गाडद्यांनीं दंगा केला. असें ह्मणतांच हुजरातीचे लोक व पागे तमाम फौजा तयार होऊन आल्या. गाडदी यांनीं दिल्ली दरवाजा लाविला. पानसे यांनीं तोफखान्यांतून तोफा ओढून आणून ह्मणाले जे, वाड्यास तोफा लावून वाडा उडवून देतों! गाडदी यांनीं वरून सांगितलें जे, जी व्हावयाची ती गोष्ट सरकारहुकुमावरून पार जाहली. आतां तुह्मी आक्रोश कां करतां? आतां सरकारच्या पायापाशींच लक्ष ठेवा!

७२. याप्रमाणें वरून बोलतात तों त्रिंबकरावमामा हातांत भाला आणि घोड्यावर बसोन आले, आणि बोलले कीं काय पहातां! ×××××ना तोफेचे तोंडीं द्या! असें बोलतांच गाडद्यांनीं वरून मामास मुजरा करून बोलले कीं, मामासाहेब, आपण पुढें येऊं नये. आलां असतां गोळी घालूं! आपण सडे आंत यावें. असें ह्मणतांच घोड्यावरून उतरून पाय उतारा दिंडींतून मामा आंत गेले. ते रघुनाथरावदादाजवळ गेले तों मारलेले मुडदे गाशांत गुंडाळून आंत खोलींत ठेविले होते. तों रघुनाथरावदादा बोलले कीं, मामा, माझ्या कपाळास ही गोष्ट आली! आपण आंत जाऊन पहावें. त्रिंबकरावमामा यांचे मनांत नारायणराव जखमी असतील, असें वाटून आंत जाऊन पहातात तों फक्त मांस पाहिलें! नंतर तसेच बाहेर येऊन रागानें रघुनाथरावदादा यांचे तोंडापुढें हात नेऊन बोलले कीं, श्रीमंत बाजीरावसाहेब यांचे पोटीं पोरगी जन्मास

---

१ 'दिन् दिन्' अशी गर्जना केली. गर्दीच्या वेळीं शनिवारच्या वाड्यांत सारे सात आठशें गारदी शिरले होते. त्यांत थोडे रजपूत व शीख असून बाकीचे मुसलमान होते. त्यांचे प्रमुख जमादार तिघे होते. ह्मणत सुमेरसिंग व खरगासिंग हे रजपूत व महमद इसफ हा मुसलमान. या गारद्यांत स्वदेशी माणूस–हिंदु अगर मुसलमान–एकही नव्हतें! सारे परदेशीच होते. पुणें मुक्कामीं पेशव्यांची स्वारी असे, तेव्हांचा बंदोबस्त ह्मटला तर वर सांगितलेले हे गारदी व पुण्याच्या आसपास वैरणीची सोय पाहून ठेवलेल्या हुजुरपागा व शहरांत थोडेसे हुजरातीचे मानकरी व कांहीं तोफखान्याचे लोक अशी सारी फौज तीन हजारपर्यंत असे. याशिवाय कोतवालीकडचे लोक बारमहांचे ते निराळे.

आला असतास तर एक्या ब्राह्मणाचें घर उभें राहतें ! हें काय केलेंस ! ! ! असें म्हणतांच दादासाहेब कपाळास हात लावून उगेच राहिले. आणि मामास ह्मणाले कीं आतां पुढें याचे दहनाचा विचार करावा. मामा बोलले कीं, अरे, दहन कशाचें करितोस ? मलाही मारून टाक ह्मणजे झालें ! तुझ्या घरीं ब्राह्मण कोण येतो ? दहन कोण करितो ? असें अनेक प्रकारें बोलले. रघुनाथरावदादा परम पुण्यवान्, स्नानसंध्याशील, परंतु स्त्रीचे योगेंकरून अनर्थास पावून अपेश माथां घेतलें. पूर्वीही राज्यनाशास कारण स्त्रीच. तसेंच आतांही जाहलें.

७३. तों प्रहररात्र जाहली. ब्राह्मण कोणी मिळेनात. परंतु प्रयत्नानें तैलंग ब्राह्मण दोन असामी मिळाले. नंतर मशाल लावून ते तुकडे निवडिले. शूद्राचे एकीकडे काढून हे तुकडे ब्राह्मणांजवळ दिले. तों गाडदी कांहीं दरवाजा उघडीनात ! नंतर दिंडीतून प्रेत बाहेर काढिलें. तों श्रीमंत गंगाबाईसाहेब यांनीं आग्रह केला कीं, मी सहगमन जाणार. होणारं बलवत्तर ! श्रीमंतांचा उदयकाळ होऊन सर्वांचीं पारिपत्यें करून प्रजेस सुख द्यावयाचें होतें, यामुळें अकस्मात् आनंदीबाईचे मुखांतून आलें जे, जातीस कोठें ? तुझी पाळी चुकली आहे ! तेव्हांच वाग्देवता ' तथास्तु ' ह्मणाली ! याप्रमाणें मागें वर्तमान जाहलें. नंतर प्रेत बाहेर काढून अग्निसंस्कार त्रिंबकरावमामानीं करविला. तो संस्कार त्रिंबकरावमामानीं ह्मणून करविला ! नंतर मध्यरात्रीचे सुमारास पागे पतके सारे निराश होऊन माघारे आले. पानसे यांनींही तोफखाना माघारा नेला. एक गाडदी खेरीजकरून बाकी सारी फौज अगदीं दिलगीर जाहली. सर्वांचे मनांतून जे, रघुनाथराव यांचे पाय भुईस न लागत येविशीं प्रयत्न करावा.

७४. पुढें दुसरे दिवशीं गांवांतील शिष्ट ब्राह्मण बोलावून विचार आरंभिला जे, कांहीं प्रायश्चित्त करावें, ह्मणून जमा करून रामशास्त्री यांस बोलावून आणिलें. तों हें वर्तमान होतांच शास्त्रीबावा यांनीं आपलीं मुलें माणसें माहुलीस रवाना करून आपण हातांत पंचपात्र घेऊन सोंवळ्यानीं वाड्यांत आले. तों रघुनाथरावदादा कचेरीस बसले आहेत. तों शास्त्रीबावा येतांच श्रीमंतानीं नमस्कार केला. तेव्हां शास्त्री बोलले कीं, नमस्कार न करणें. तुह्मास अशौच आहे. असें बोलतांच वरकड पंडित ह्मणाले कीं, शास्त्रीबावा, आपणास यजमान यांनीं बोलाविलें जे, गाडदी यांचे हातून हें कर्म जाहलें; परंतु शब्ददोष श्रीमंतांवर आला, त्यास कांहीं प्रायश्चित्त करावें; यामुळें आपणास बोलाविलें. तेव्हां शास्त्रीबावा ह्मणाले कीं, प्रायश्चित्त कशाचें करतां व कोणास देतां ? ब्रह्महत्या, गोहत्या, स्त्रीहत्या बालहत्या जेथें जाहल्या तेथें कोणतें प्रायश्चित्त पुस्तकांत लिहिलें आहे ? एक प्रायश्चित्त

१ नारायणरावसाहेबांच्या खुनासंबंधें ऐ. ले. संग्रहांत नं. १२५७ वगैरे पत्रें आहेत त्यांतील मजकुराशीं वर आलेला बखरींतील मजकूर ताडून पहातां [illegible] पुष्कळच अधिक तपशील दिला आहे हें दिसून येईल इतकी एकत्र तपशीलवार हकीकत आजपर्यंत कोठेंही छापिलेली नाहीं.

यांस देहांत प्रायश्चित्त करावें ! शिसें तापवून प्राशन करावें, किंवा दर्भाचें गृह करून आंत बसावें आणि अग्निसंस्कार करावा. यांतून वांचल्यास पुढें प्रायश्चित्त करावें. असें ह्मणतांच सारे पंडित बोलले जे, शास्त्रीबावा, आपण असें काय म्हणून बोलतां ? हे बोलले कीं, मला यांचे राज्यांत कांहीं रहावयाचें नाहीं. तुम्हांस रहावयाचें असेल म्हणून तुम्ही ग्रथ्थ-खेरीज भाषण करतां ! मी मुलें माणसें रवाना करून सोंवळ्यानींच आलों. मी असाच निघणार. कालपासोन जलस्पर्श देखील नाहीं केला ! मी जीवित्वास उदार जाहलों. मर्जी असल्यास आणखी एक ब्रह्महत्या करावी ! याप्रमाणें शास्त्रीबावा बोलतांच कोणी एक बोलेनासें जहालें. शास्त्रीबावा तसेच निघून माहुलीस आले, नंतर अन्नव्यवहार केला ! मागें कांहीं प्रायश्चित्त केलें नाहीं[1].

७५. पुढें रघुनाथरावदादा यांजकडोन हें अकर्म जहलें याजमुळें सखारामबापू यांचे मनांत आलें जे, यांस राज्यापासोन बहिष्कृत करावें, असें आलें. त्यांत त्रिंबकराव-मामा व नाना फडणीस व हरिपंततात्या फडके या त्रिवर्गांचें मत एक होऊन सखाराम-बापू यांचा मनसुबा घ्यावा, त्यांस कसें करावें हें विचारावें, असें त्रिवर्गांनीं ठरविलें. त्यांचा भरंवसा कोणास लागेना ! मग हरिपंततात्या यांनीं त्यांजकडे जाऊन त्यांचाही मनसुबा घेतला. सरदार मंडळी मालोजी राजे वगैरे सारे एकवटले. असे बारा असामी एक जाहले. त्यांस बारभाई ह्मणों लागले. आणि मनसुबा केला कीं, श्रीमंत गंगाबाईसाहेब गर्भि-णी आहेत. कशावरून ? जे समयीं सहगमन जातें म्हणाली ते समयीं आनंदीबाई बोलली जे, ' तुझी पाळी चुकली, त्यास कोठें जातीस ? ' असें म्हणाली. तर हाच मनसुबा बळा-वून पुरंदरास तिजला कैदेंत ह्मणोन ठेवावी आणि रघुनाथरावदादा यांस स्वारीस ह्मणोन बाहेर काढावें. गर्भिणीस महिना दोन महिने खास जाहले असें समजल्यास नंतर त्यासा-रखें इकडे फौजेचा वगैरे मनसोबा बळावून उलट रघुनाथरावदादा यांचे पाठीशीं लागावें. याप्रमाणें सर्वांनीं एक विचार करून बेलभंडार जाहले. जर अंतर देऊं तर काशींत ×××××× अशा शपथा केल्या व सारे अनुकूल याप्रमाणेंच केलें.

७६. तों एक महिना जाहला. श्रीमंत गंगाबाईसाहेब गर्भिणी असें समजलेवर आनंदीबाईनीं मारेकरी घालून मारावी असा मनसुबा करून शेतखान्यांत मारेकरी घातले. कुणबीण तांब्या ठेवावयास गेली तों आंत हत्यारबंद पाहून तिनें शंख केला. तों बोभाट जाहला. मारेकरी धरिले. त्यांचीं लटकींच पारिपत्यें केलीं. हें वर्तमान कारभारी यांस समज-लेवर फारच मनसुब्याची जलदी केली आणि सखारामपंतबापू यांनीं रघुनाथरावदादा यांस सांगितलें जे, आतां आपला अंमल बसला. परंतु आपण येथेंच राहिले असतां परराज्यांत जरब बसणार नाहीं. त्यास बाहेर स्वारीस निघावें. अगोदर श्रीमंत गंगाबाईसाहेब यांस

१ रामशास्त्री निघून गेल्यावर श्रीमंतांनीं कांहीं प्रायश्चित्त घेतलें नाहीं.

कैद करावें. यांस येथें ठेविलें किंवा बरोबर स्वारींत घेतलें असतां हें फंदासच कारण. त्यास किल्ल्यावर पुरंदरास कैद करावें. तमाम सरदारांस पत्रें पाठवून सरदार आणवावे. अशी मसलत बळावून सुमुहूर्तें स्वारीस डेऱ्यांत आणिलें. श्रीमंत गंगाबाईसाहेब यांस पुरंदरास किल्ल्यावर कैद केल्यादाखल ठेविली[1]. तमाम सरदारांस पत्रें गेलीं.

७७. पटवर्धन यांसही पत्रें आलीं. पटवर्धन पुण्यास कांहीं नव्हते. घरीं होते. वामनरावबाबा व परशुरामभाऊ व रघुनाथरावदादा या त्रिवर्ग सरदारांस पत्रें आलीं. सारे सरदार तासगांवाजवळ रामापूर कमळापूर म्हणोन गांवें आहेत तेथें जमा जाहले. त्या वेळेस पुरुषोत्तमरावदाजी मंगळवेढ्यास घरीं होते. पटवर्धन यांस काळजी लागली जे, रघुनाथरावदादा यांचा आह्मांवर अत्यंत राग. त्यांनीं प्रत्यक्ष पुतण्यास गाडद्यांकडून मारविलें तेथें आमची कथा काय ? पुढें विचार ठीक दिसत नाहीं ! सर्वांनीं ठरविलें जे, पुरुषोत्तमरावदाजीस आणविलेखेरीज परिणाम नाहीं ! याप्रमाणें ठरविलेनंतर परशुरामभाऊ यांची मातुश्री जानकीबाई यांचे नांवें पत्र पाठवून जासूद रवाना केले.

७८. जासूद मंगळवेढ्यास आले व पत्रें येतांच भुजंगभट जोशी मंगळवेढेकर यांजकडून मुहूर्त काढून दाजी रातोरात निघाले ते तासगांवास आले. तेथें बाईची भेट घेतली. तों बाई बोलली कीं, अरे दाजी, भाऊ रामापूर कमळापुरावर उतरून आठ रोज जाहले. तूं कोठें होतास ? तुला समजलें कीं नाहीं ? तेव्हां दाजीनीं उत्तर केलें कीं, बाई, दूधभात खाण्यास भाऊ आणि मरावयाचे वेळेस मात्र दाजींची आठवण तुला जाहली ! असें ह्मणतांच बाईनीं पदर पसरला आणि बोलली कीं, या वेळेस तूं भलतेंच बोलूं नको ! असें म्हणण्याचें कारण, एकदां तासगांवास असतांना भोजनास सारी मंडळी बसली त्यांत बाईनीं दूध आणोन भाऊस मात्र वाढिलें, दाजीस कांहीं वाढिलें नाहीं. असें होतांच मुकाट्यानेंच दुसरे दिवशीं निरोप घेऊन दाजी घरास गेले. नंतर प्रसंग आला ह्मणून हें उत्तर केलें !

७९. नंतर बाई ह्मणाली कीं, तूं लष्करांत जा. तेव्हां दाजी बोलले कीं मी जात नाहीं. भाऊ जोंपर्यंत लहान होता तोंपर्यंत तूं जें सांगितलेंस तें मीं केलें. आतां त्याचें त्यास कळों लागलें. असें म्हणतांच बाईनीं वडिलांची शपथ घातली जे, तूं अक्षर देखील बोलूं नको. मी सांगतें त्याप्रमाणें ऐक. तेव्हां यांनीं उत्तर केलें कीं बाई, तुझी आज्ञा प्रमाण; परंतु मला समागमें घ्यावयाचें असल्यास मी जें करीन गोंनी म्होचा मान्य केल्यास बरें. नाहींपेक्षां पाणी प्यावयास देखील रहाणार नाहीं ! याप्रमांच बाईनीं रे तिलश पांगितलें कीं मी येऊन त्रिवर्गांसही ताकीद करितें. असें ह्मणोन बाई बसून दाजीस घेऊ स पाठ न लष्करांत आली. आणि त्रिवर्गांस बोलावून सांगितलें कीं जीस आणिलें आहे. नेरी वर्ख

---

१ वस्तुतः रघुनाथरावानीं गंगाबाईस पुरंदर किल्ल्यावर कैदेंत ठेवि कारभाऱ्यानीं रघुनाथराव कर्नाटकांत गेल्यावर तिला तेथें नेलें. २ रामचंद्र हरीची.

त्यास तुह्मांस वांचण्याचें असल्यास जें दाजी सांगेल त्याप्रमाणें ऐकावें. न ऐकल्यास तो घरास निघून जाईल. याप्रमाणें सांगतांच त्रिवर्गांनीं सांगितलें कीं, जें दाजी करितील तें आह्मांस प्रमाण. ते जितकें पाणी प्यावयास सांगतील तितकेंच पाणी पिऊं ! याप्रमाणें बाईचे पायावर त्रिवर्गांनीं हात ठेविले.

८०. नंतर त्या स्वारीस पुरुषोत्तमराव दाजी यांनीं जी मेहेनत केली ते उपकार परशुरामभाऊ स्मरत जे, आह्मीं आमचे अंगाचें कातडें काढून जोडे करून दाजीचे मुलाचे पायांत घातले तरी दाजींचे उपकार फिटावयाचे नाहींत ! याप्रमाणें बोलत हें सर्वांस माहीत आहे.

८१. पटवर्धन पुण्यास गेलेनंतर अलीकडे दोन कोश उतरून पुरुषोत्तमराव दाजी अगोदर पुढें पुण्यांत शहरांत गेले. जाऊन प्रथम मोरोबादादा फडणीस यांची गांठ घेतली. त्या वेळेस मोरोबादादा दरबारच्या कामांत वागत होते. नंतर त्यांचेच द्वारानें पटवर्धन आले असें रघुनाथरावदादाचे कानावर घालून नंतर भेट घेतली. भेटी जाहलेवर रघुनाथरावदादासाहेब यांचें म्हणणें पडलें कीं, पटवर्धन यांजपासून बेलभंडार घेऊन नंतर चाकरीस समागमें न्यावें. असें बोलणें घातलें. पटवर्धन त्रिवर्ग सरदार यांनीं सांगितलें कीं, आम्हांस काय ते वडील पुरुषोत्तमरावदाजी. त्यास सरकारची आज्ञा जी काय होणें ती दाजीस व्हावी. दाजी जें करितील त्यांत आम्ही आहों. असें सांगितलें. नंतर नित्य कचेरीस जाणें ते दाजीच जात होते. आठ पंधरा दिवशीं त्रिवर्ग सरदार जात. दाजी गेले म्हणजे श्रीमंत नित्य तबकांत बेलभंडार आणोन ठेवीत. तेव्हां दाजीनीं विनंति केली कीं, महाराज, आम्हांस बेलभंडार कशास पाहिजे ! आम्ही नवीन चाकरीस रहावयास आलों कीं काय ? असें म्हणतांच रघुनाथरावदादासाहेब म्हणाले जे, सर्वांपासून आम्हीं बेलभंडार घेतला; त्यास तुह्मींही देणें. याप्रमाणें प्रत्यहीं चालत होतें. एके दिवशीं फारच आग्रह पडला. पुरुषोत्तमरावदाजी यांनीं मनांत विचार केला जे, श्रीमंत नानासाहेब यांचा जो वंश तो आह्मांस पूज्य. सर्व धनी ते. यांनीं त्यांचे वंशासीं अनुचित गोष्ट केली त्यापेक्षां यांसीं आह्मांस बदमामली अवश्य करावयाची ! श्रीमंत नानासाहेब यांचे वंशासीं मात्र करावयाची नाहीं. असें मनांत आणोन उच्चार केला कीं, "आम्ही पहिलेपासोन सरकारचे चाकर. सरकालने पायासीं अंतर करणार नाहीं. एकनिष्ठपणें वर्तणूक करूं." याप्रमाणें बोलून [illegible] बेलभंडार लेऊन दिला.

८२. नंतर स्वारी चौघाहून बाहेर निघाली. प्रथम हिंदुस्थानचे रोखें स्वारी निघाली. पुढें [illegible] दिवशीं स्वारींत रघुनाथरावदादासाहेब यांनीं विचारिलें जे, अहो पुरुषोत्तमराव, परशुरामपंतभाऊ यांचे डोळे लाल दिसतात. त्यास ते भांग ओढीत असतात कीं काय ?

---

१ पण सरकार कोण या वेलेगडा मोघमच ठेविला ! २ वस्तुतः सारे पटवर्धन भेटण्याआधींच दादासाहेब पुण्याहून निघाले [illegible]

तेव्हां दाजीनीं विनंति केली कीं, महाराज, डोळे लाल दिसतात खरे. भांग ओढतात किंवा नाहीं हें कांहीं समजलें नाहीं. त्यांत पूर्ववय. बारमहा हत्याराखेरीज रहात नाहींत. लष्करांत जाहलें तरी भलत्यावरच कारणावांचून तलवार उपसतात, असा अविचारही थोडाबहुत आहे. असें सांगतांच दादासाहेब यांनीं आज्ञा केली कीं, त्यांस दरबारांत आणीत न जाणें. दाजीनीं उत्तर केलें कीं, महाराज, मी हीच विनंति करणार होतों. आज्ञा जाहली बरी जाहली ! असें म्हणून आपल्या गोटांत आले आणि परशुरामभाऊस सांगितलें कीं, तुला[1] आज रघुनाथरावदादासाहेब यांनीं भांग ओढतात काय म्हणोन विचारिलें. मीं सांगितलें, ओढीत असतील ! त्यांचा भरंवसा नाहीं. ' नंतर आज्ञा जाहली कीं त्यांस दरबारास न आणणें. असें सांगतांच भाऊनीं सांगितलें जे, बरें जाहलें ! आम्हांस तो दरबार नको ! याप्रमाणें बोलले.

८३. एके दिवशीं आनंदीबाईजवळ चार दुष्ट मिळोन मसलत दिली कीं, पटवर्धन यांचा विश्वास धरितां नये. त्यांस हरतऱ्हा करून दगा करावा. प्रथम पुरुषोत्तमराव यास मारावें. नंतर मग साऱ्यांचें कांहीं कठिण नाहीं ! पुरुषोत्तमराव हे फार सावध, यांस दगा करावा. असें सांगून दादासाहेब यांसही मजकूर सांगून मसलत सिद्ध करविली. भोजनास बोलावून विषप्रयोग करावा तों पटवर्धन यांणीं त्याचा बंदोबस्त पूर्वीच केला होता जे, " आम्हीं कोंकणांत कुलदेवतेस जाण्याचा नवस केला होता तों सरकारचें पत्र आल्यावरून आलों. त्यास एक अडत केली आहे जे, दर्शन घेतल्याखेरीज कोठें भोजनास जावयाचें नाहीं, याप्रमाणें बोललों आहों. " असें म्हणून भोजनास जाण्याचा बंदोबस्त प्रथमच पुढील अंदेश मनांत आणून हें बोलून ठेविलें. त्यास भोजनास बोलवावयाचें राहिलें.

८४. पुरुषोत्तमरावदाजी यांचा नेम सरकारचे विडे जरी आले तरी ते आपले गोटास आणोन पुरून टाकावे, याप्रमाणें प्रत्यहीं नेम. एखादे वेळेस विडा खावा अशी त्याणीं आज्ञा केली तरी दाजीनीं विनंति करावयाची जे, महाराज, आमचा सांप्रदाय सरकारचें काय जें येईल तें सर्वांस दिल्याखेरीज आह्मांस खातां नये, याप्रमाणें रामचंद्रपंत आप्पा यांजपासून चाल आहे. आमचे मानकरी आहेत त्यांस दिल्याखेरीज आम्हांस खातां नये. खाल्लें असें त्यांस समजल्यास ते प्रसंगास दगा करितील, यामुळें त्यांची मर्जी रक्षण करणें प्राप्त ! असें सांगून तेथें विडे खाण्याचा बंदोबस्त केला.

८५. एके दिवशीं मकरसंक्रमण आलें. ते दिवशीं तीळगुळाचा समारंभ जाहला. सर्वांनीं सरकारांस तिलशर्करा दिली. पुरुषोत्तमराव दाजी आनंदीबाईकडे तिलशर्करा द्यावयास गेले तों आनंदीबाई बोलल्या जे, या पुरुषोत्तमराव; असें म्हणून बसावयास पाट दिला. याणीं नमस्कार करून तिलशर्करा दिली. नंतर त्यांनीं रुप्याचे तबकांत तिलशर्करा—सोनेरी वर्ख

१ तुजविषयीं.

लावलेली व केशरी असा नानाप्रकारचा हलवा—त्याचें तबक भरून आणून आपले हातानें तबक उचललें तों दाजीनीं शेला पुढें पसरला. तों तबक शेल्यांत सारें ओतिलें; आणि बोलल्या कीं तिलशर्करा घेणें. नंतर याणीं विडचाप्रमाणेंच विनंति केली आणि आपले लष्करांत तिलशर्करा घेऊन आले; आणि सर्वांस सांगितलें जे, सरकारची तिलशर्करा आली ही भक्षण करतां कीं काय ? चांगली आहे, सोनेरी वर्ख लाविले आहेत, ज्यास मरावयाचें असेल त्यानें खावी ! असें ह्मणून कुत्रीं लष्करांत होतीं त्यांस आणून त्यांजपुढें टाकिली. त्यांनीं खातांच तत्काळ गरगर फिरून लागलींच मेलीं; हें सर्वांनीं पाहिलें. नंतर सर्वांची खातरजमा जाहली जे, दाजी सांगतात तें खरें !

८६. एके दिवशीं दरबारास दाजी गेले तों अस्तमान जाहला. तेव्हां आनंदीबाईनीं सांगितलें कीं, पुरुषोत्तमराव, आज येथेंच संध्या करणें. यांनीं 'आज्ञा' ह्मणाले. तों सूचनेप्रमाणें शिष्यानें संध्येस मांडिलें. पाय धुवावयास पाणी दिलें. हे पाय धुवून आले तों समईजवळ येऊन पाट मांडून आनंदीबाई आपण जवळ बसली. तों यांनीं विनंति केली कीं महाराज, माझे डोळ्यास आजार आहे. डोळे फार दुखतात, त्यास दिवा अगदीं सोसत नाहीं, यामुळें समई जवळ कामाची नाहीं. असें सांगून भांडीं आपणच घेऊन समईपासून लांब गेले आणि तेथें जाऊन तोंडांत पाणी न घेतां ताह्मन मात्र भरलें, आणि पळी संध्येची वाजविली ! याप्रमाणें संध्या करून निरोप घेऊन लष्करांत आले; आणि सांगितलें कीं आज बाईसाहेबांनीं संध्येस ठेऊन घेतलें. संध्या करून आलों. सर्वांनीं विचारिलें कीं, आचमनाचें कसें केलें ? नंतर वर्तमान जाहलें तें सारें सांगितलें. याप्रमाणें बाईसाहेब हरइलाज करीत, परंतु यांजवर ईश्वराची कृपा, आणि श्रीमंतांचे पायासीं निष्ठा, ह्मणून सारीं विघ्नें टळत.

८७. एके दिवशीं रात्रीं सरकारचें बोलावणें आलें तों पुरुषोत्तमराव दाजी निघाले. सरकारचे लष्करानजीकै आले, आणि शोध केला जे, श्रीमंत कोठें आहेत ? तों बातमी लागली जे, एक्या राहुटींत श्रीमंत दादासाहेब व मुरारराव घोरपडे उभयतां खलबत करीत बसले आहेत; आणि शोध करविला तों लष्करांत हत्ती पांच चार तयार करून वर महात बसोन तयार आहेत अशी बातमी लागली. नंतर यांनीं मनांत आणिलें जे, लहान राहुटींत ज्यापेक्षां बसले आहेत त्यापेक्षां कांहीं दगा आहे ! आणि सर्वांनीं श्रीमंतांस सांगितलेंच होतें जे, पुरुषोत्तमराव यास मारिलें ह्मणजे सर्वांस मारिलेंसें जाहलें; याही बातम्या येत. नंतर वडिलांचे पाय स्मरून दाजी त्या राहुटींत गेले. जातांच 'या पुरुषोत्तमराव,' ह्मणून श्रीमंत दादासाहेब ताजीम देऊन बसले. तो इकडील तिकडील

१ संध्येच्या पाण्यांत आनंदीबाईनीं विष कालवलें असेल ही कांहीं तरी शंका दिसते ! २ बारभाईंचें कारस्थान उभारण्याच्या सुमारास पटवर्धन थोरल्या लष्करापासून निराळेच कोस अर्ध कोस अंतरावर उतरत असत.

गोष्टी काढिल्या. इतक्यांत एका शिष्यानें येऊन विनंति केली जे, लघुशंकेस पाणी आणिलें असें ह्मणतांच श्रीमंत उठले. नंतर मुरारराव व पुरुषोत्तमराव उभयतांच तेथें राहिले.. नंतर मुरारराव यांस दाजी ह्मणाले जे, राव, आपण महाराज छत्रपति यांचे सेनापति, आणि श्रीमंत हे पंत प्रधान. उभयतांचा बरोबरीचा मायना; त्यापेक्षां आपण बसले असतां यांनीं उठून जावें कीं काय ? ही चाल पूर्वी नव्हती. आपणांस तितकें लक्षांतच आलें नाहीं. आपणास विडे देऊन निरोप दिल्यानंतर मग लघुशंकेस अथवा अन्यत्र जिकडे पाहिजे तिकडे जावें[1]. असें ह्मणतांच मुरारराव बोलले जे, पुरुषोत्तमराव, आपण ह्मणतां ही गोष्ट खरी आहे. तेव्हां पुरुषोत्तमराव बोलले जे, यांतील अभिप्राय आपल्यास समजला नाहीं! आतां आपणास बोलावणें येईल. आपण गेल्यावर मी येथें एकटा. नंतर राहुटीवर हत्ती घालून मला तुडवून मारावें असा बेत दिसतो ! राव, आपणास ठाऊक असों द्या कीं—राव यांचे गळ्यांत पाचेची कंठी होती त्या कंठीस धरून पुरुषोत्तमराव बोलले जे—जशी ही कंठी आपले गळ्यांत आहे तसा पुरुषोत्तमराव आहे बरें ! मी आपणास जाऊं देणार नाहीं. असें म्हणतांच मुरारराव बोलले जे, पुरुषोत्तमराव, मी आपणास सोडून जाणार नाहीं. असें बोलतात तों मुरारराव यांस बोलावणें आलें जे, राव, श्रीमंतांनीं आपणास बोलाविलें. असें म्हणतांच मुरारराव म्हणाले जे, पुरुषोत्तमराव येथें बसले आहेत, मी येत नाहीं. इतकें ह्मणतांच तसाच निरोप गेला. नंतर दादासाहेब माघारे राहुटींत आले. येतांच पुरुषोत्तमराव यांनीं विनंति केली कीं, महाराज, मुरारराव बसले असतां आपण जाऊं नये; यांस विडे देऊन निरोप दिल्यावर आपण जावें; याप्रमाणें श्रीमंत नानासाहेबांपासोन चाल आहे. आम्ही आपले चाकर, आमची गोष्ट निराळी, आणि हे आपले बरोबरीचे, त्यापेक्षां असें दिसतें कीं, प्रथम आपण गेलां; नंतर मुरारराव यांसही बोलावणें पाठविलें; मग मी येथें एकटा, मजवर हत्ती घालून मला मारावें अशी मसलत ! ही मसलत आपले मनांत नाहीं, परंतु चार लुच्चे आपणास सांगतात तें प्रमाण वाटून आह्मांस मारावयाचा यत्न करतां ! त्यास मारावें असें आपल्या मनांत असल्यास एकादे शत्रूवर घालून मारावें. तेथें जर आह्मी मागें सरलों तर सरकारचे अन्यायी ! आणि असें दग्यानें मारणें हें श्रीमंतांस योग्य नव्हे. त्यापेक्षां याउपर आम्हास आपला विश्वास नाहीं. अतःपर मुरारराव यांचे गोटाजळ उतरत जाऊं. याप्रमाणें सांगून तसेंच करिते जाहले.

८८. एके दिवशीं पटवर्धन यांस लुटावें ह्मणून सरकारचे पागेंत हुजुरातींत वगैरे तयारी जाहली. ही बातमी पटवर्धन यांस समजोन हे सारे तयार होऊन सरकारचे डेऱ्यानजीक नगारा वाजवीत आले ! तों कोण आले ह्मणून शोध घेतला तों पटवर्धनांची फौज. तेव्हां सांगून पाठविलें कीं, रात्रींच तयार होऊन येण्याचें कारण कोणतें ? यांनीं उत्तर

[1] जावयाचें होतें.

लावलेली व केशरी असा नानाप्रकारचा हलवा—त्याचें तबक भरून आणून आपले हातानें तबक उचललें तों दाजीनीं शेला पुढें पसरला. तों तबक शेल्यांत सारें ओतिलें; आणि बोलल्या कीं तिलशर्करा घेणें. नंतर याणीं विडयाप्रमाणेंच विनंति केली आणि आपले लष्करांत तिलशर्करा घेऊन आले; आणि सर्वांस सांगितलें जे, सरकारची तिलशर्करा आली ही भक्षण करतां कीं काय ? चांगली आहे, सोनेरी वर्ख लाविले आहेत, ज्यास मरावयाचें असेल त्यानें खावी ! असें ह्मणून कुत्रीं लष्करांत होतीं त्यांस आणून त्यांजपुढें टाकिली. त्यांनीं खातांच तत्काळ गरगर फिरून लागलींच मेलीं; हें सर्वांनीं पाहिलें. नंतर सर्वांची खातरजमा जाहली जे, दाजी सांगतात तें खरें !

८६. एके दिवशीं दरबारास दाजी गेले तों अस्तमान जाहला. तेव्हां आनंदीबाईनीं सांगितलें कीं, पुरुषोत्तमराव, आज येथेंच संध्या करणें. यांनीं ' आज्ञा ' ह्मणाले. तों सूचनेप्रमाणें शिष्यानें संध्येस मांडिलें. पाय धुवावयास पाणी दिलें. हे पाय धुवून आले तों समईजवळ येऊन पाट मांडून आनंदीबाई आपण जवळ बसली. तों यांनीं विनंति केली कीं महाराज, माझे डोळ्यास आजार आहे. डोळे फार दुखतात, त्यास दिवा अगदीं सोसत नाहीं, यामुळें समई जवळ कामाची नाहीं. असें सांगून भांडीं आपणच घेऊन समईपासून लांब गेले आणि तेथें जाऊन तोंडांत पाणी न घेतां ताह्मन मात्र भरलें, आणि पळी संध्येची वाजविली ! याप्रमाणें संध्या करून निरोप घेऊन लष्करांत आले; आणि सांगितलें कीं आज बाईसाहेबांनीं संध्येस ठेऊन घेतलें. संध्या करून आलों. सर्वांनीं विचारिलें कीं, आचमनाचें कसें केलें ? नंतर वर्तमान जाहलें तें सारें सांगितलें. याप्रमाणें बाईसाहेब हरइलाज करीत, परंतु यांजवर ईश्वराची कृपा, आणि श्रीमंतांचे पायासीं निष्ठा, ह्मणून सारीं विघ्नें टळत.


८७. एके दिवशीं रात्रीं सरकारचें बोलावणें आलें तों पुरुषोत्तमराव दाजी निघाले. सरकारचे लष्करानजीक आले, आणि शोध केला जे, श्रीमंत कोठें आहेत ? तों बातमी लागली जे, एक्या राहुटींत श्रीमंत दादासाहेब व मुरारराव घोरपडे उभयतां खलबत करीत बसले आहेत; आणि शोध करविला तों लष्करांत हत्ती पांच चार तयार करून वर महात बसोन तयार आहेत अशी बातमी लागली. नंतर यांनीं मनांत आणिलें जे, लहान राहुटींत ज्यापेक्षां बसले आहेत त्यापेक्षां कांहीं दगा आहे ! आणि सर्वांनीं श्रीमंतांस सांगितलेंच होतें जे, पुरुषोत्तमराव यास मारिलें ह्मणजे सर्वांस मारिलेंसें जाहलें; याही बातम्या येत. नंतर वडिलांचे पाय स्मरून दाजी त्या राहुटींत गेले. जातांच ' या पुरुषोत्तमराव, ' ह्मणून श्रीमंत दादासाहेब ताजीम देऊन बसले. तो इकडील तिकडील


१ संध्येच्या पाण्यांत आनंदीबाईनीं विष कालवलें असेल ही कांहीं तरी शंका दिसते ! २ बारभाईंचें कारस्थान उभारण्याच्या सुमारास पटवर्धन थोरल्या लष्करापासून निराळेच कोस अर्ध कोस अंतरावर उतरत असत.

गोष्टी काढिल्या. इतक्यांत एका शिष्यानें येऊन विनंति केली जे, लघुशंकेस पाणी आणिलें असें ह्मणतांच श्रीमंत उठले. नंतर मुरारराव व पुरुषोत्तमराव उभयतांच तेथें राहिले.. नंतर मुरारराव यांस दाजी ह्मणाले जे, राव, आपण महाराज छत्रपति यांचे सेनापति, आणि श्रीमंत हे पंत प्रधान. उभयतांचा बरोबरीचा मायना; त्यापेक्षां आपण बसले असतां यांनीं उठून जावें कीं काय ? ही चाल पूर्वी नव्हती. आपणांस तितकें लक्षांतच आलें नाहीं. आपणास विडे देऊन निरोप दिल्यानंतर मग लघुशंकेस अथवा अन्यत्र जिकडे पाहिजे तिकडे जावें[1]. असें ह्मणतांच मुरारराव बोलले जे, पुरुषोत्तमराव, आपण ह्मणतां ही गोष्ट खरी आहे. तेव्हां पुरुषोत्तमराव बोलले जे, यांतील अभिप्राय आपल्यास समजला नाहीं! आतां आपणास बोलावणें येईल. आपण गेल्यावर मी येथें एकटा. नंतर राहुटीवर हत्ती घालून मला तुडवून मारावें असा बेत दिसतो ! राव, आपणास ठाऊक असों द्या कीं—राव यांचे गळ्यांत पाचेची कंठी होती त्या कंठीस धरून पुरुषोत्तमराव बोलले जे—जशी ही कंठी आपले गळ्यांत आहे तसा पुरुषोत्तमराव आहे बरें ! मी आपणास जाऊं देणार नाहीं. असें म्हणतांच मुरारराव बोलले जे, पुरुषोत्तमराव, मी अप्पणास सोडून जाणार नाहीं. असें बोलतात तों मुरारराव यांस बोलावणें आलें जे, राव, श्रीमंतांनीं आपणास बोलाविलें. असें म्हणतांच मुरारराव म्हणाले जे, पुरुषोत्तमराव येथें बसले आहेत, मी येत नाहीं. इतकें ह्मणतांच तसाच निरोप गेला. नंतर दादासाहेब माघारे राहुटींत आले. येतांच पुरुषोत्तमराव यांनीं विनंति केली कीं, महाराज, मुरारराव बसले असतां आपण जाऊं नये; यांस विडे देऊन निरोप दिल्यावर आपण जावें; याप्रमाणें श्रीमंत नानासाहेबांपासोन चाल आहे. आम्ही आपले चाकर, आमची गोष्ट निराळी, आणि हे आपले बरोबरीचे, त्यापेक्षां असें दिसतें कीं, प्रथम आपण गेलां; नंतर मुरारराव यांसही बोलावणें पाठविलें; मग मी येथें एकटा, मजवर हत्ती घालून मला मारावें अशी मसलत ! ही मसलत आपले मनांत नाहीं, परंतु चार लुच्चे आपणास सांगतात तें प्रमाण वाटून आह्मांस मारावयाचा यत्न करतां ! त्यास मारावें असें आपल्या मनांत असल्यास एकादे शत्रूवर घालून मारावें. तेथें जर आह्मी मागें सरलों तर सरकारचे अन्यायी ! आणि असें दग्यानें मारणें हें श्रीमंतांस योग्य नव्हे. त्यापेक्षां याउपर आम्हास आपला विश्वास नाहीं. अतःपर मुरारराव यांचे गोटाजळ उतरत जाऊं. याप्रमाणें सांगून तसेंच करिते जाहले.

८८. एके दिवशीं पटवर्धन यांस लुटावें म्हणून सरकारचे पागेंत हुजुरातींत वगैरे तयारी जाहली. ही बातमी पटवर्धन यांस समजोन हे सारे तयार होऊन सरकारचे डेऱ्यानजीक नगारा वाजवीत आले ! तों कोण आले म्हणून शोध घेतला तों पटवर्धनांची फौज. तेव्हां सांगून पाठविलें कीं, रात्रींच तयार होऊन येण्याचें कारण कोणतें ? यांनीं उत्तर

[1] जावयाचें होतें.




सरदार पटेल विद्यालय, आबू
हा. क. 4 39
प्रति - मात्र स्थल प्रति

यांचे फौजेस बारभाईंची फौज असें म्हणूं लागले. ती स्वारी एकंदर छत्तीस महिन्यांची. त्यांत लढाया मोठमोठ्या जाहल्या व राजकारणेंही मोठमोठीं जाहलीं. तीं सारीं लिहिलीं तर भारतातुल्य ग्रंथ वाढेल, आणि तितकें लिहिण्यास माझी योग्यता नाहीं. परंतु ज्या कथा वडिलांनीं सांगितल्या तितक्याच लिहितों.

९१. प्रथम लढाई श्रीक्षेत्र पंढरपुरनजीक कासेगांव येथील मैदानांत जाहली. तेथें त्रिंबकरावमामा धरले गेले, लढाई बिघडली, तें विस्तारें लिहितों. प्रथम इकडील सरदार रघुनाथरावदादाबाहेब यांचे पाठीस लागले तेव्हां ज्या मुक्कामाहून दादासाहेब पुढें जात त्या मुक्कामावर या फौजा उतरत. याप्रमाणें फिरत होते. जसे त्यांचे चिरंजीव बाजीरावसाहेब पुढें पळत, पाठीमागें इंग्रजांची फौज लागली, त्याप्रमाणें. दादासाहेब यांचा मुक्काम श्रीक्षेत्र पंढरीस आला. तेथें वेडी बया म्हणून भगवद्भक्त होती. ती जें सांगेल त्याप्रमाणें होत होतें. श्रीमंत दादासाहेबांनीं तिजला आणोन विचारिलें. तिनें सांगितलें जे, तुला आज जय येतो. तूं पुढें जाऊं नको, लढाई कर. असें सांगितलें. त्या भरंवशावर त्यानीं मुक्काम केला. तों त्रिंबकरावमामा फौजसुद्धां पाठीमागून आले ते कासेगांवावर नजीक राहिले. तों बातमी आली जे, दादासाहेब यांचा मुक्काम पंढरीस आहे. आज लढाईचा मनसुबा आहे. असें समजल्यावर त्रिंबकरावमामा यांनीं पुरुषोतमराव दाजीस बोलावणें पाठविलें. पटवर्धन यांची फौज माण नदीवर उतरली होती तेथून पुरुषोत्तमरावदाजी निघून आले ते त्रिंबकरावमामा यांजकडे आले तों मामा गाशा घालून बसले होते. तों पुरुषोत्तमराव गेले. जातांच मामानीं ताजीम दिली आणि बसले. तों मामानीं वर्तमान सांगितलें जे, नित्य आम्ही त्यांचे पाठीसीं लागलों. ते पुढें पळतात, त्यांचे मुक्कामावर आमचा मुक्काम; असें असतां आज त्यांनीं कूच केलें नाहीं. त्यांचा लढाईचा मनसुबा दिसतो. त्यास आपण आलांच आहां, त्यास लौकर परशुरामपंतभाऊ व वामनरावबाबा व रघुनाथरावदादा यांस आणवा. आतांच चालोन जावयाचें. त्यांचीही तयारी जाहली. असें म्हणतांच पुरुषोत्तमरावदाजी बोलले कीं, बरें आहे. आम्ही त्यांच्या पाठीस कशासाठीं लागलों ? लढावयासाठींच ! परंतु माझा मनसुबा ऐकावा. लढाईचा मोकदमा आज करूं नये. उदईक करावा. कां म्हणाल तर, आज आम्हांस वीस कोसांची मजल पडली. सारी गाळण जाहली. हे आमचे सरदार पांचशें स्वारांचे धनी, परंतु यांचे समागमें स्वार पंचवीस देखील नाहींत ! याप्रमाणें सर्वांचेंच जाहलें आहे. मागून सारी फौज सायंकाळीं जमा होईल. ताजे तवाने होऊन उदईक लढाईची मसलत करावी. हें एक. आणखी एक वर्तमान कळवावयाचें. हुजुरातींत सारा फितूर जाहला आहे. त्यास याचाही विचार करावयाचा. असें म्हणतांच त्रिंबकरावमामा बोलले कीं, पुरुषोत्तमराव, अशी गोष्ट कां सांगतां ? लढाई आजच करावयाची. तुम्ही लौकर आपली

१ जुजबी विश्रांति घेण्यासाठीं.

फौज आणवा. असें म्हणतांच पुरुषोत्तमराव दाजी बोलले कीं मामा, जर आज गडबड कराल तर हुजुरात सारी फितली आहे हे तुमच्याच मुसक्या बांधितील ! असें तोंडावर सांगितलें. परंतु मामास क्रोधाचा आवेश फार. कांहीं केल्यानें ऐकेनात. सरदारांस आणवा असेंच म्हणूं लागले. तेव्हां पुरुषोत्तमराव दाजी यांनीं सांगितलें कीं, ते मी गेल्याशिवाय यावयाचे नाहींत. तर मी जाऊन त्यांस तयारी करून घेऊन येतों. असें म्हणून घोडयावर बसून चालते जाहले. जातेवेळेस सांगितलें कीं, मामा, आम्ही येईतोंपर्यंत गडबड करूं नये. असें सांगून चालते जाहले. आपले फौजेंत येऊन तयारी करून जों निघाले तों तिकडून दादासाहेब यांची फौज चालून आली. वेडी बया जी होती तिला श्रीमंतांनीं अंबारींत बसविली. तिनें हत्ती पुढें घातला आणि तोंडानें सांगितलें जे, काय पाहतां, पुढें हत्ती ढकला ! आज फत्ते आहे. तों इकडून त्रिंबकरावमामा चालोन गेले. लढाईचें जों तोंड लागतें तों हुजुरातींत पहिलाच फितूर होता. लागलीच जखम लागून मामा घोडेंयाखालीं आले. तशाच मुसक्या बांधल्या ! फौज सारी उधळली. दादासाहेब यांची फौज मामाचे फौजेस लुटीत पांठीस लागली[1].

९२. तों पटवर्धन यांची फौज जों तयार होऊन येती तों त्रिंबकरावमामाकडील पळ सुटला. त्याबरोबर यांचीही फौज उधळली. यांचेजवळ खासे खासे मात्र दोन चारशें राहिले. नंतर दादासाहेब यांचे फौजेंत स्वारांनीं निंबाचे ढाळे[2] खोंविले. तों पुरुषोत्तमराव दाजी यांनीं आपलेही लोकांकडून निंबाचे फांटे खोंवविले, आणि सांगितलें जे, तुम्हांस ' कोणाकडले ' म्हणून विचारल्यास ' दादासाहेब यांजकडीलच ' असें दटावून सांगा. असें सांगून त्यांजबरोबर आपणही निघाले. तों मध्यें एक शेरताटी होती, तेथें परशुरामभाऊ व सारी मंडळी उभी होती. शेरताटीचे पलीकडे सुमेरसिंग गाडदी वगैरे उभे होते. आपले डोचकीवर अबदागिरी धरवून—असे उभे होते. त्यांस परशुरामभाऊनीं पाहिलें, आणि पुरुषोत्तमराव यांस ह्मणाले जे, दाजी, हे गाडदी उभे आहेत यांजपाशीं जमाव थोडाच आहे. त्यास यांजवर घोडीं घालावीं ! असें ह्मणतांच दाजी बोलले, भाऊ, तुला समजलें ? आह्मीच शिपाई आणि त्यांनीं हातांत काय कांकणें भरलीं कीं काय ? आम्हीं त्यांजवर घोडीं घातलीं, त्यांस आह्मीं मारिलें, त्यांनीं आम्हांस मारिलें, त्यांत आमचा एखादा खासा पडला, तरी आम्हांस पहाणारा कोण आहे ? आम्हांस धनी ना गोसावी, अशी आमची अवस्था जाहली आहे ! त्यांनीं त्या म्हाताऱ्याच्या[3] मुसक्या बांधून टाकल्या तशा तुझ्या मुसक्या बांधितील ! आतां आपली अब्रु बचावून सांभाळून निघून जावें हेंच खरें ! असें म्हणतांच परशुरामभाऊ बोलले जे, ते काय गाडदी[4], श्रीमंत नारायणराव-

१ ऐ. ले. संग्रह नं. १३९ त कासेगांवच्या लढाईचें वर्णन पहा. ही लढाई ता० २६ मार्च १७७४ रोजीं झाली. २ शत्रु कोण, मित्र कोण, ही ओळख पटण्यासाठीं. ३ त्रिंबकरावमामाच्या. ४ त्या गारद्यांची कथा काय !

मेणबत्ती धरवून चिठी वाचून पाहिली. त्यांत लिहिलें होतें जे, हरिपंत आले आहेत त्याचें ह्मणणें उदईक आपलें कूच जाहलेखेरीज मी उठत नाहीं. त्यांस मीं हरतऱ्हेनें सांगितलें. शेवटीं कंटाळून निजलों तरी ते पलंगासच टेंकून बसले. त्यास खावंदानीं मेहेरबानी करून उदईक प्रातःकाळीं कूच होण्याच्या हुकुमाचा शेरा या अर्जीवर आला पाहिजे. अशी चिठी वाचतांच नबाबांस हरिपंत यांची काम करण्याची तारीफ वाटून कारभारी यांचे चिठीवर शेरा पारशी अक्षरांचा जाहला जे, ' हरिपंतके खातर छे कोस का कूच करना. ' असा शेरा होऊन खोजानें चिठी आणून कारभारी यांजजवळ दिली, नंतर कारभारी यांनीं शेरा सरकारचा वाचून पाहून हरिपंत यांस सांगितलें जे, तुमचें काम बशर्ह जाहलें. उदईक सरकारचें कूच आहे. तुम्हीं आपली फौज तयार करून सामोरे मुजऱ्यास येणें. असें सांगतांच हरिपंत यांनीं कारभारी यांस खुरनिसा करून निघाले. तों चार घटिका पहांटेचे रात्रीस नबाबाची कुचाची तोफ जाहली. ही बातमी दादासाहेब यांस कळतांच त्यांनीं लागलेंच आपलें कूच करून पळाले!

९७. पुढें परशुरामभाऊस घेऊन हरिपंततात्या सारी फौजसुद्धां नबाबाकडे मुजऱ्यास येऊन उभे राहिले. नबाब अंबारींत बसले होते. खवासखान्यांत रुकनुद्दौला कारभारी बसले होते. तेव्हां नबाबांनीं विचारिलें कीं, हरिपंत कोठें आहेत? तों हरिपंत परशुरामभाऊचे डावे बाजूस सफेत पोषाख करून डोईवर अंबदागिरी[३] न धरितां उभे होते त्यांस दाखविलें. तेव्हां नबाबांनीं हरिपंत यांचे अकलेची फार तारीफ केली कीं, यानें जसा बुद्धिबळाचा डाव टाकावा तसें केलें! दादासाहेब लढाई न देतां पळाले! असें ह्मणून ' खवासखान्यांत त्यांस बोलावणें ' असा हुकूम जाहला. नंतर खवासखान्यांत हरिपंत यांस घेतलें तों परशुरामभाऊ यांचा मुजरा जाहला. नंतर नबाब यांनीं परशुरामभाऊस खवासखान्यांत बोलावणें म्हणून हुकूम केला. तेव्हां रुकनुद्दौला बोलले कीं ते सरदार लोक आहेत. त्यांचा मरातब मोठा. ते खवासखान्यांत यावयाचे नव्हेत. याप्रमाणें बोलले. नंतर नबाबाची स्वारी मुक्कामास आली, परशुरामभाऊही मुक्कामास आले. सारी फौज परशुरामभाऊजवळ जमली. पुढें न-

---

१ हटकून. २ पेशवाईत छत्र्या नव्हत्या! उष्णनिवारणासाठीं अबदागिऱ्या होत्या. पण तो सरकारी बहुमान असल्यामुळें ज्यास पराक्रम वगैरे योग्यतेबद्दल सरकारांतून अबदागिरी मिळेल त्यानेंच ती वापरावी, इतर कोणी श्रीमंतीच्या जोरावर अबदागिरी वापरीन ह्मणेल तर त्यास तत्काल शेणमार व्हावयाचा! सरकारांतून ज्यास अबदागिरी मिळे, त्यास अबदागिरी धरणाऱ्या गडयाचा पगार व दर तीन वर्षांनीं अबदागिरीचें नवें सामान हा सर्व खर्च सरकारांतून मिळे. बाकी सर्व आबालवृद्ध लोक उन्हांतूनच फिरत. लग्नकार्य वगैरे समारंभांतून ज्याची अबदागिरी असेल, त्याजकडून ती कामापुरती मागून आणून निर्वाह चालवीत. राष्ट्रांतील लोकांत तेज जागृत रहावें, नांवलौकिकाचीं कृत्यें करण्यास लोकांत नेहमीं हुरूप असावा, यासाठीं निशाण, चौघडा, अर्धे आसन, मांडीस मांडी लावून बसण्याचा मान, पालखी, छत्री, अबदागिरी, मशाल वगैरे बहुमान देण्याची त्या वेळच्या सरकारची युक्ति होती!

बाबास मेजवानी करावयाची, त्यास नाना फडणीस व सखारामबापू यावयाचे ते आले पाहिजेत, असें लष्करांतून हरिपंत फडके यांनीं लिहून पाठविलें.

९८. नंतर पुरंदरास मसलत पडली जे, येथें श्रीमंतांजवळ कोणास ठेवावें? ही योजना पडली. झाडून मंडळीची नांवनिशी लिहिली. तेव्हां सखारामबापू म्हणाले जे, श्रीमंतांजवळ ज्यास ठेवावयाचें त्यास चार गुण चांगले पाहिजेत. एक तर मातबर नामांकित मनुष्य पाहिजे. दुसरा गुण विश्वासूक पाहिजे. तिसरा गुण निस्पृह पाहिजे. कोट रुपये मृत्तिकेसमान असें पाहिजे. चौथा गुण शिपाई मर्द माणूस पाहिजे; कीं, जो प्रसंग पडला असतां प्राण-समर्पण करणार. हे चार गुण ज्यामध्यें आहेत त्यानेंच श्रीमंतांजवळ रहावें. तेव्हां मंडळीपैकीं कोणामध्यें कांहीं गुण, कोणामध्यें कांहीं गुण, परंतु चारी गुण संपूर्ण असे कोणांत नाहींत. ते पुरुषोत्तमराव दाजी यांमध्यें आहेत सबब त्यांस आणवावें असें ठरून लष्करांतून पत्र पाठवून पुरुषोत्तमराव दाजी यांस आणविलें; आणि सांगितलें जे, आम्हांस लष्करांत नबाबास मेजवानी करावयाची यास्तव गेलें पाहिजे. त्यास आपणास श्रीमंताजवळ ठेवावयाचें यास्तव आणविलें; त्यास आपण येथें रहावें; असें उभयतां कारभारी यांणीं सांगितलें.

९९. तेव्हां पुरुषोत्तमराव बोलले कीं, हें सरदाराचें काम-मी सरकारचा एकांडया शिपाई, लष्करांत फिरणार, मला हें मोठें काम कशास पाहिजे? सरकारचे पदरीं माझेसारखे लक्षावधि आहेत. हें काम कोणा सरदारास सांगावें. पटवर्धन सरदार तिघे आहेत त्यांतून कोणास सांगावें. अशी झाडाझाडीच केली. तेव्हां सखारामबापू बोलले कीं, आह्मीं सर्वांची चौकशी करून ठेविली. कोणी शिपाई आहेत तेथें मसलत नाहीं. मसलत शिपाईगिरी आहे तेथें विश्वास नाहीं. असे कोणांत कांहीं गुण; परंतु जे सर्व गुण आह्मांस पाहिजेत ते आपलेपाशीं आहेत. त्यास आपणासच ठेवावयाचें. तेव्हां पुरुषोत्तमराव दाजी यांनीं उत्तर केलें कीं, मी सरकारचा चाकर खरा, परंतु मला दुसऱ्याचे ताबेदारीस आपण लावून दिलें त्यापेक्षां मला भाऊची परमाणगी पाहिजे. असें म्हणतांच कारभारी यांणीं सांगितलें जे, आह्मी भाऊंचें पत्र आणवितों. असें ह्मणून डांकेवरून पत्र आणविलें. भाऊनीं लिहिलें कीं, दाजी वडील आहेत. ते आह्मास आज्ञा करणार, आणखी सरकार त्यांस तेथें ठेवणार, त्यापेक्षां आह्मी नाहीं ह्मणतों कीं काय? कोठेंही सरकारची चाकरी करावयाची. याप्रमाणें परशुरामभाऊचें पत्र आलें.

१००. तेव्हां कोठें सवड नाहींसी जाहली. तेव्हां दाजी बोलले कीं, आपण मला येथें ठेवितां; परंतु सारी मुखत्यारी जर मला सांगितली तर राहीन. तेव्हां कारभारी बोलले

१ नबाबास मेजवानी करण्यास जाणार हें सारें दरबारी भाषणाचें ढोंग. वस्तुतः नबाबाच्या मदतीनें खानदेशांत जाऊन दादासाहेबांस गांठून त्यांस आपल्या कह्यांत आणण्यासाठीं जाणार!

जे, जसे आह्मी उभयतां, त्याप्रमाणें आपण. तेव्हां दाजी बोलले कीं, मला येथील कामगार आहेत त्यांची रुजुवात करून द्यावी. नंतर जनोबाआप्पा यांस बोलाविलें. त्यांजकडे किल्ला होता. त्यांस कारभारी यांनीं सांगितलें जे, आह्मी लष्करास जातों. पुरुषोत्तमराव दाजीस येथें श्रीमंतांजवळ ठेविलें आहे; तर जसे आम्ही उभयतां, त्याप्रमाणें दाजी. ते जी आज्ञा करितील त्याप्रमाणें वागावें. असें सांगतांच दाजी बोलले कीं, अहो आप्पा, तुमचा माझा स्नेह. हे कारभारी मला येथें ठेवणार. त्यास मी जो हुकूम करीन त्याप्रमाणें तुह्मांस ऐकावें लागेल. नाहींपेक्षां तुमचें पारिपत्य करीन ! आतांच सांगावें. याप्रमाणें स्पष्ट बोलले. तेव्हां जनोबाआप्पानीं सांगितलें जे, माझें काय गेलें ? उभयतां सांगतात जे आपले ठिकाणीं दाजी; त्यापेक्षां जें आपण सांगाल तेंच आम्हांस मान्य. आपण शिबंदी अधिक उणी ठेवावयास सांगाल त्यांत आमचें काय गेलें ? सरकारचा पैका खर्च होईल. याप्रमाणें सांगितलेनंतर नाना याणीं गोपाळपंत बिवलकर यांस बोलावून आणून सांगितलें जे, आम्ही लष्करास जातों. दाजी जशी आज्ञा करितील त्याप्रमाणें करणें. त्यांसही दाजीनीं विचारिलें. तेव्हां बिवलकर बोलले जे, मी एक वेळ विनंति करीन कीं नानाची शिस्त अशी अशी आहे. मग जें आपण सांगाल त्याप्रमाणें करीन. दोन रुपये खर्च जास्त करावयास सांगाल, त्यास माझें काय गेलें ! आतां नानानीं सांगितलें जे, जसा मी तसे दाजी; मग आमचें काय गेलें ? याप्रमाणें झाडून सरकारचे दरकदार यांची रुजुवात करून घेऊन यादी वगैरे सारा दौलतीसंबंधें बंदोबस्त करून घेतला. नंतर विचारिलें जे, आपण मला एकटें ठेविलें, त्यास प्रसंग पडल्यास मी एकटा मरून जाईन. परंतु माझे हिमतीस कांहीं लोक करून द्यावे. तेव्हां चारशें प्याद्यांची यादी करून घेतली. उभयतां कारभारी लष्करास जावयाकरितां निघाले ते वेळेस सखारामबापू यांनीं दाजीस एकांतीं बोलावून सांगितलें जे, अहो पुरुषोत्तमराव, दादासाहेब पन्नास हजार फौज घेऊन बाहेर फिरतात. आह्मीं आपणास श्रीमंतांजवळ ठेविलें. त्यास बहुत सावधगिरीनें रहावें. तेव्हां दाजी बोलले कीं, बापू, हें सारें माझे पोटांत गडबडत आहे ! मी श्रीमंतांचे घरीं दहा वर्षांपासोन—पंचेचाळीस वर्षें माझ्या वयास जाहलीं—आजपर्यंत वागलों. परंतु कोणाचे पाचोळ्यावर देखील पाय दिला नाहीं. ते माझी अब्रु घ्यावयासाठीं मला हें काम आपण सांगितलें ! परंतु बापू, आपणास एक ठाऊक असों द्या कीं, हे चारशें प्यादे आपण करून दिले हे मारवीन, नंतर आभाळ जरी कडकडून पडलें तरी या मुलावर पालथा पडेन; परंतु पुरुषोत्तमराव जिवंत असोन भलती गोष्ट आपण ऐकणार नाहीं ! याप्रमाणें बोलले तेव्हां सखारामबापू बोलले कीं पुरुषोत्तमराव, तुम्हाविषयीं माझी खातरजमा आहे. असें बोलून नंतर लष्करास कार-

१ यावरून स. १७२९ त पुरुषोत्तमराव दाजींचा जन्म झाला हें स्पष्ट होतें.

भारी चालते जाहले. पुरुषोत्तमराव दाजी श्रीमंतांजवळ राहिले. श्रीमंत गंगाबाईसाहेब यांनीं दाजीस आपले बंधु म्हणविलें होतें. दाजी यांनीं ढाल तलवार घेऊन खोलीचे दारांत निजावें. चौकी पहारा पहात सारी रात्र फिरत असावें.

१०१. तों इकडे कारभारी लष्करांत गेले. नबाबास मेजवानी जाहली. तेव्हां नबाब यांनीं कारभारी यांस विचारिलें जे, तुह्मी उभयतां आलां, आणि राव पंडतके पास कोण आहे ? तेव्हां कारभारी यांनीं सांगितलें कीं, पुरुषोत्तमराव पटवर्धन यांस ठेविलें आहे. तेव्हां नबाब बोलले कीं, गोपाळराव यांचे बंधु नारायणराव व पुरुषोत्तमराव आह्मास माहीत आहेत; चांगले योग्य मनुष्य आहेत; याप्रमाणें नबाब बोलले. येविशीं प्रमाण परशुरामभाऊ यांचें पत्रही आहे पुरंदरप्रकरणीं; त्यांत लिहिलें आहे जे, पटवर्धनांची चौकी विश्वासाची ही नबाबापावेतों कीर्ति. याप्रमाणें पुरुषोत्तमराव दाजी यांची विश्वासाची चौकी.

१०२. कारभारी यांस जाऊन महिना पंधरा दिवस जाहले. तों सरकारचीं शागीर्दपेशाचीं माणसें कारकून खासगीकडील वगैरे यांचे नेबादं[1] श्रीमंत नानासाहेब यांचे कारकीर्दीपासोन राहिले होते. त्यांनीं श्रीमंत बाईसाहेब यांजजवळ रदबदली लाविली जे, आमचे नेबाद फार राहिले. हल्लीं दाजी यांचा कारभार आहे, त्यास आपण दाजींस सांगून आमचे हिशेब करवावे. आणि दाजीनीं केल्यास नाना कांहीं नाहीं म्हणावयाचे नाहींत. याप्रमाणें त्या माणसांनीं विनंति केली. नंतर दाजींची गांठ पडल्यावर श्रीमंत बाईसाहेब यांनीं सांगितलें कीं, दाजी, आमचीं हीं खासगीकडील माणसें हुजरे, जासूद, दिवटे, अबदागिरे, वगैरे शागीर्दपेशा. यांचे हिशेब श्रीमंत नानासाहेबांपासोन जाहले नाहींत. त्यास हल्लीं आपण मनावर घेऊन त्यांचे हिशेब करून नेबाद देववावे. गरीब फार हांका मारितात ! त्यांचा पैका फार राहिला. आणि तुह्मीं केल्यास नाना कांहीं तुह्मांस म्हणावयाचे नाहींत. याप्रमाणें सांगतांच दाजी बोलले कीं, बाईसाहेब, आमचा कारभार औट घटकेचा. जसा साडेतीन घटकेचा शिराळशेटीचा राजा तसें आमचें. उद्यां नाना आले म्हणजे ते नेबाद देवोत, हिशेब करोत, काय पाहिजे तें करोत. बाईसाहेब, आपण या कामांत अगदीं पडों नये. अशी झाडाझाडी केली. तों आणखी दोन दिवस मध्यें गेले. तों बाईसाहेब यांनीं गोष्ट काढिली जे, कसेंही करून आपण मनावर घेऊन गरीबांचें काम करावें. आपण केलें तर होईल. नाहीं तर नाना आलेवर ते कांहीं करावयाचे नाहींत. याप्रमाणें दोनचार वेळ गोष्टी काढल्यावर दाजी बोलले कीं, बरें. आपण सांगतां त्यापेक्षां आतां माझेंच नाना काय करितील तें करोत ! असें म्हणून गोपाळपंत बिवलकर यांस हांक मारिली आणि बोचारलें जे, अहो गोपाळपंत, हीं तुमचीं सरकारचीं खासगीकडील माणसें. यांचे हिशेब

---

१ पगारापैकीं तहकूब ठेवलेल्या रकमा.

श्रीमंत नानासाहेबांपासून नाहींत ? तेव्हां गोपाळपंत यांनीं हिशेब नाहींत म्हणून सांगितलें. तेव्हां दाजी बोलले कीं, आह्मीं कांहीं काम सांगितलें असतां माणसें ह्मणतात जे, आपण काम मात्र सांगणार; आणि रोजमुऱ्यास ठिकाण नाहीं ! त्यास ही माणसांची रड वाईट. मी काम सांगणार तो चुकला असतां लागलीच पायपोसानें मारणार ! तुमचा तीन पिढ्यांचा चाकर असला तरी सोडणार नाहीं. तेव्हां गोपाळपंत बोलले कीं, मी नानांचे समक्ष बोललों होतों जे, मी एकवेळ विनंति करीन. पुन्हां बोलणार नाहीं. त्यास मी एकदां सांगतों, या कामांत आपण पडूं नये. उद्यां नाना आलेवर ते नेबाद देवोत अथवा न देवोत; काय पाहिजे तें करोत. हें माझे युक्तीस येतें. असें ह्मणतांच पुरुषोत्तमराव दाजी बोलले कीं, अहो, तुम्ही सांगतां हें सारें खरेंच, परंतु माझे गळ्यांत ही गोणी घालून ते लष्करास निघून गेले. आणि हीं शागीर्दपेशा वगैरे खासगीचीं माणसें यांत सारी खिचडी आहे. हे कांहीं दादासाहेब यांजकडे आहेत, कांहीं इकडे आहेत. बाप तिकडे, लेंक इकडे. मामा इकडे, भाचा तिकडे. चुलते तिकडे, पुतणे इकडे. अशी ही सारी खिचडी आहे. आणि उद्यां हे पैका खाऊन ×××××जर फितले, आणि बरें वाईट जाहलें, तर मला मात्र प्राण द्यावा लागेल ! त्यास परिछिन्न सांगतों, हिशेब करून नेबाद सारें फडशा करणें. असें म्हणतांच गोपाळपंत बोलले जे, मीं प्रथमच सांगितलें आहे कीं, एक वेळ विनंति करीन, पुनः बोलणार नाहीं. आतां जशी आज्ञा कराल तसें करीन. असें म्हणून मग हिशेब करावयास प्रारंभ केला. आठ पंधरा दिवसांत झाडून हिशेब करून एकंदर यादी केली तों पाऊण लक्ष रुपये सुमार बेरीज जाहली ! यादी पुरुषोत्तमराव दाजी यांजकडे आणिली. दाजी यांणीं मखलाशी करून 'देणें'[3] केलें, आणि रोजमुरा दरोबस्त वांटला ! सारीं मनुष्यें संतुष्ट जाहलीं आणि चाकरीस नीट वर्तूं लागलीं. हें सारें गंगाबाईसाहेब यांचे आज्ञेवरून केलें; परंतु नानाजवळ कांहीं बाईसाहेब यांचें नांव घ्यावयास यावयाचें[4] नाहीं. श्रीमंत बाईसाहेब यांची दाजीवर पूर्ण कृपा. केवळ बंधूप्रमाणें मानीत.

१०३. एके दिवशीं दोन प्रहरीं दाजी खोलीचे दारांत निजले होते. तों कुणबीण नित्य आंत जाणार तीच जात होती. तों यांची चाल कीं, नित्य माणसें आंत जाणार त्यांचा झाडा घेऊन नंतर आंत जाऊं द्यावीं. याप्रमाणें नित्यकृत्याची शिस्त होती. तों कुणबीण आंत चालली ती दाजीनीं पाहिली आणि बोलले जे, रांड फितुरी आहे, धरा ! असें ह्मणतांच धरून झाडा घेतला. तों कांहीं निघालें नाहीं. दुसऱ्या कुणबिणी आणून अगदीं लुगड्यासुद्धां झाडा घेतला, नंतर वेणी सोडविली तों बुचड्यांत सुरी निघाली ! आणि चौ-

---

१ निक्षून. २ हिशेब मंजूर केल्याचा शेरा. ३ 'देणें' व 'देवाविणें' या शब्दांविषयीं सविस्तर खुलासा अधिकार-योग पृ. ५२।५३ येथें पहा. ४ आलें नसतें. अर्थात् पैसा खर्च करण्याचे कामीं बाईसाहेबांच्या हुकुमास कांहीं किंमत नव्हती !

कशी केली तों फितुरी असें खास जाहलें. नंतर भोतांत घालून कडेलोट करून दिला याप्रमाणें दाजींची धूर्तता बहुत होती.

१०४. तों कांहीं दिवशीं नाना व बापू लष्करांतून आले. हरिपंततात्यांसमागमें फौज देऊन पटवर्धन परशुरामभाऊ व मानकरी व नबाबाची फौजसुद्धां दादासाहेब यांच्या पिछाडीवर रवाना केले. दादासाहेब इंग्रज यांचे पाठीशीं पडोन गाडर[1] ह्मणून इंग्रज गोरे लोकांचीं चार पलटणें कुमकेस घेऊन आले. तों त्यांची व इकडील फौजेची गांठ गुजराथेंत महीनदी[2] ह्मणून आहे तेथें पडली. तेथें पलीकडे दादासाहेब व सरकारची फौज मानकरी-सुद्धां नदीचे अलीकडे. दोन प्रहर दिवस आला होता. सरकारची फौज सारी तयार होती. परंतु ऊन फार यामुळें झाडाखालीं गाशे घालून सावलीस कोणी बसले आहेत, कोणी निजले आहेत, तों इंग्रजांचीं दोन पलटणें भर दोनप्रहरीं नदी उतरलीं. बाकी दोन पलटणें उतरावयाची तयारी जाहली होती. हत्तीवरून बावा महात यांनीं तीं पलटणें आलेलीं पाहिलीं. सरकारचे अल्लीबक्ष व ऐरावत असे दोन हत्ती, एकावर बावा महात व एकावर दावल महात हे उभयतां बंधू. अल्लीबक्ष याजवर जरीपटका होता. त्यांनीं हत्तीवरून पाहून एकमेकांत बोलले कीं हीं दोन पलटणें अलीकडे उतरलीं. आणखी दोन पलटणें उतरावयास तयार जाहलीं. अशीं चार पलटणें एके ठिकाणीं जाहलीं असतां मग आमचे फौजेस ऐकणार नाहींत. त्यास हीं दोन पलटणें जीं उतरलीं आहेत, यांत हत्ती घालून हीं तुडवून मारून टाकावीं ! अशी उभयतांनीं मसलत करून दोन हत्ती उठविले. तों ते हत्ती नीट पलटणांवर चालोन गेले. तेव्हां बाकीचे फौजेनें पाहिलें. आणि हत्ती कां उठविले असें जों पाहतात तों इंग्रजांचीं पलटणें पाहिलीं ! तेव्हां मालोजी राजे बोलले जे, अरे, काय पहातां ! तें फडकें[3] गेलें ह्मणजे आमची अब्रु गेली ! असें ह्मणून चहूंकडून पलटणांवर घोडीं घातलीं. तों हत्ती आंत पलटणांत जाऊन मिसळले[4]. तेव्हां हत्तींचे सोंडेंत पट्टे दिले. तों चहूंकडून फौजा मिसळल्या. दोन[5] पलटणांपैकीं एकही मनुष्य राहिलें नाहीं. दोनही पलटणें कापून काढिलीं.

---

१ नांव चुकलें, गाडरच्या जागीं कर्नल कीटिंगचें नांव पाहिजे. २ हें जाग्याचें नांव चुकलें. इंग्रजांशीं मराठ्यांची ही लढाई मही नदीवर झाली नाहीं. ती नापार येथें झाली. ३ जरीपटका. ज्या सैन्याचीं निशाणें शत्रूनें हिरावून घेतलीं तें सैन्य पराजित होय, ही सर्व देशांतील युद्धनीति आहे. ४ या लढाईंत अल्लीबक्षावरच्या बावा महातास तोफेचा गोळा लागला व निशाणदारास गोळ्या लागल्या. हत्तीसही दहा गोळ्या लागल्या. पहा ऐ. ले. सं. नं. १४६७. ५ ही अतिशयोक्ति आहे. नापारच्या लढाईंत इंग्रजांचे ह्मटले तर सारे जखमी व ठार मिळून सव्वादोनशें लोक होते. बाकी आरब व गारदी वगैरे पुष्कळ माणूस मारलें गेलें तें दादासाहेबांकडचें होतें. नापारच्या लढाईसंबंधाचें पत्र वामनराव पटवर्धन यांचें ऐ. ले. सं. नं. १४६४ चें आहे. त्यांतही इंग्रजांचें एक पलटण मारल्याचें लिहिलें आहे तें चुकलें आहे. शत्रूची संख्या व लढाईंत त्याचें झालेलें नुकसान यासंबंधाचे अजमास खुद्द लढाईतल्या सरदारांचेसुद्धां पुष्कळ वेळां चुकतात. याच लढाईसंबंधें कर्नल कीटिंग् व मि. फोर्बस् यांनीं हकीकती लिहिल्या आहेत त्यांत मराठ्यांची एकंदर संख्या व लढाईमुळें त्यांचे जायां जखमी झालेले लोक यांचे अजमास चुकले आहेत.

तेव्हां गाडरसाहेब यानें दुर्बीण लावून सारी लढाई पाहिली. आणि तोंडांत बोट घालून आश्चर्य केलें जे, आमचीं पलटणें ह्मणजे दारूची आग. त्यांजवर मुकीं जनावरें ज्यापेक्षां चालून येऊन पलटणें मारिलीं, त्यापेक्षां हें राज्य आह्मांस येतं नाहीं ! तेव्हां दादासाहेब बोलले कीं, हीं माझीं माणसें अशींच आहेत. मी घरभांडणामुळें तुमचे पाठीशीं पडलों. याप्रमाणें बोलले.

१०५. आणखी एके दिवशीं दोनही फौजांच्या गांठी पडल्या तेव्हां सरकारचा गोलंदाज मुसा नारंज म्हणून फरासीस होता. तिकडे दादासाहेब अंबारींत होते. तेव्हां इकडील कोणी बोलला जे, तोफेचा गोळा दादासाहेब यांस मारावा. असें ह्मणतांच मुसा नारंज बोलला जे, ते धनी आहेत. त्यांस कसें मारावें ? परंतु माझी शिस्त पहावी. असें ह्मणून तोफेचे गोळ्यानें अंबारीचा कळस उडविला ! हें दादासाहेब यांनीं पाहून इंग्रजांस फार निषिद्ध केलें जे, मी व्यर्थ तुमचे पाठीसीं पडलों ! अरे, ज्यानें अंबारीचा कळस उडविला त्यास माझा प्राण घ्यावयास उशीर लागेल कीं काय ? असें ह्मणतांच इंग्रज यांस फार राग येऊन मनगटें चावलीं; आणि बोलले जे, ही शिस्त फरासिसाशिवाय नव्हे ! दुसऱ्याचे हातून असें घडावयाचें नाहीं. असें म्हणून नीट तोफेवर चालून घेतलें आणि मुसा नारंज याचा गळा कापून नेला. तेथें लढाई मातबर जाहली. याप्रमाणें लढाया मातबर होऊन दादासाहेब यांस कोठें चैन पडों देईनात.

१०६. इकडे उभयतां कारभारी पुरंदरास आले. आलेवर गोपाळपंत बिवलकर यांनीं खर्चाच्या कीर्दी नेऊन पुढें ठेविल्या. नानानीं कीर्दी पाहिल्या. ज्या महिन्यांत नेबाद वांटले ती बेरीज मोठी पाहून गोपाळपंत यांस विचारिलें, हें काय आहे ? त्यांनीं विनंति केली कीं, मला ज्यांचे हवालीं केलें होतें त्यांस विचारावें ! त्यांनीं सांगितलें त्याप्रमाणें केलें. असें ह्मणतांच दाजीस बोलावून आणिलें आणि कीर्दी पुढें टाकून नाना ह्मणाले कीं, हें काय केलें ! दाजीनीं उत्तर केलें कीं, बहुरूप नाचविलें कीं काय ! अहो, तुम्हीं माझे डोचकीवर ओझें ठेविलें, आणि हीं सरकारचीं माणसें तिकडील पैका खाऊन जर फितलीं असतीं तर मला प्राण द्यावा लागता ! असें ह्मणतांच सखारामबापू बोलले कीं, दाजीनीं केलें तें ठीकच केलें. नंतर नाना कांहीं एक बोलले नाहींत. पुढें पलंगचौकीचें काम दाजीकडे जसें होतें तसेंच होतें.

१०७. एके दिवशीं दाजी पुरंदराखालीं भिंवडी म्हणून गांव आहे तेथें पागा बार-

---

१ मिळत नाहीं. २ मुसा नारंज हा पेशव्यांचा सरदार फ्रेंच जातीचा होता. हें त्याच्या नांवावरूनच दिसत आहे. या १०५ सदरांत वर्णिलेली गोष्ट मुसा नारंज याची नसून सय्यद हुसेन नांवाचा एक पेशव्यांचा नामांकित गोलंदाज होता त्याची आहे व ती नापारच्या लढाईतच घडलेली आहे. मुसा नारंज याचें नांव काव्येतिहाससंग्रहांत पत्रें यादी वगैरे ले. २९१ मध्यें मुसा भरंज असें आहे. ती मोडीचें बालबोध करणाराची चूक आहे. ३ भोरप्यांचा खेळ. बहुरूपी याचाच अपभ्रंश भोरपी. ४ पलंगचौकीचें काम = पे- [illegible] शरीरसंरक्षणाचें काम.

गीर वगैरे शेंपन्नास लोक यांचे निसबतीस असत, तेथें घोडीं पहावयास ह्मणून किल्ल्यावरून आले. फार दिवस आले नव्हते ते कारभारी परत आलेवर खालीं आले. मागती पालखींत बसोन पुन्हां किल्ल्यावर जाऊं लागले. तों दरवाज्यांत 'परमाणगी पाहिजे' असें दरवाजकरी बोलले. तेव्हां हे तसेच माघारे फिरून आपले राहुटीस गेले. हें वर्तमान नानास कळतांच नानानीं स्वदस्तूरची चिठी पाठविली; त्यांत लिहिलें आहे जे, "काल आपण माचीस येऊन दरवाज्यापासून श्रीमंत राजश्री माधवरावसाहेब यांजवर रागें भरून गेलां, त्यास दरवाज्यावर कारकून नित्य होता तो नव्हता; कालच नवा नेमून दिला; यास्तव आज राग टाकून यावें. नाहीं तर मला आपली आज्ञा जाहलीयास मीच आपले राहुटीस येईन!" याप्रमाणें चिठी येतांच निघून किल्ल्यावर गेले. नानाची गांठ पडली. नंतर दाजी बोलले कीं, नाना, मला श्रीमंतांचे घरीं तीन पिढ्या परमाणगी ह्मणून नाहीं. याप्रमाणें श्रीमंत नानासाहेबांपासोन चाललें. असें बोलतांच नाना बोलले कीं, आतां तरी आपणास आडकाठी कोठें आहे! त्या दिवसापासोन जसे उभयतां कारभारी, त्याप्रमाणें दाजी. यांस कांहीं दरवाज्यावर आडकाठी नाहीं. कोणी आपलेकडील आला असतां दरवाज्यावर सांगून पाठवून आणवावें याप्रमाणें सांप्रदाय. सरकारवाड्यांत कोणी सरकारचे दर्शनास येणार—त्यास नाना याणीं दाजीचे नांवें चिठी पाठवावी जे, अमके आले अहेत यांस श्रीमंतांचें दर्शन करवावें; याप्रमाणें नानाच्या चिठ्या आहेत.

१०८. पुढें श्रीमंत गंगाबाईसाहेब यांनीं आज्ञा केली कीं, आपण कुटुंब आणवावें. येथें कुटुंबसुद्धां रहावें. श्रीमंत लहान, त्यापेक्षां तुम्हांस घरास जावयास निरोप व्हावयाचा नाहीं, त्यास कुटुंब आणवावें; असा फारच आग्रह पडला. नंतर मंगळवेढेहून कुटुंब नेलें. दाजी यांस पुत्र चार, कन्या दोघी. वडील पुत्र हरिहररावतात्या. यांचें वय दहा बारा वर्षांचें होतें. त्यांस दरबारास जातेसमयीं समागमें नेत. श्रीमंत गंगाबाईसाहेब यांची पूर्ण कृपा. जें लागेल तें सरकारवाड्यांतून आणवावें. दाजी कधीं सरकारचे पंगतीस भोजन करीत नव्हते. आपले घरींच जेवीत. जे दिवशीं आज्ञा होईल ते दिवशीं भोजनास जावयाचें, याप्रमाणें पूर्वीपासोन सांप्रदाय. आठ चार दिवशीं श्रीमंत बाईसाहेब यांनीं दाजीस भोजनास ठेवून घ्यावें. दाजीनीं म्हणावें जे, मुलास ठेवून मी जातों. बाईसाहेब यांनीं ह्मणावें, मुलासुद्धां येथेंच भोजन करा. असें म्हटलेवर यांनीं तेथें रहावें. श्रीमंत पार्वतीबाईसाहेब—श्रीमंत भाऊसाहेब यांची पत्नी—व श्रीमंत गंगाबाईसाहेब या उभयतांचीं तारें मांडीत त्यांचे समोर या उभयतांचीं तारें. याप्रमाणें श्रीमंत लोभ करीत. वडील सांगत जे, दाजीनीं श्रीमंतांचें घर आह्मास आपले घराप्रमाणें केलें होतें! याप्रमाणें पूर्ण लोभ. एकादे दिवशीं बाईसाहेबांनीं दाजींचे कुटुंबास बोलावून न्यावें. त्यांचें नांव कृष्णाबाई. त्यांस आई म्हणत. ती मातुश्री मोठी प्रसिद्ध—ज्यांस परशुरामभाऊसाहेब व बाळासाहेब मानीत—त्यांची कीर्ति

तेव्हां गाडरसाहेब यानें दुर्बीण लावून सारी लढाई पाहिली. आणि तोंडांत बोट घालून आश्चर्य केलें जे, आमचीं पलटणें म्हणजे दारूची आग. त्यांजवर मुकीं जनावरें ज्यापेक्षां चालून येऊन पलटणें मारिलीं, त्यापेक्षां हें राज्य आम्हांस येतं नाहीं ! तेव्हां दादासाहेब बोलले कीं, हीं माझीं माणसें अशींच आहेत. मी घरभांडणामुळें तुमचे पाठीशीं पडलों. याप्रमाणें बोलले.

१०५. आणंखी एके दिवशीं दोनही फौजांच्या गांठी पडल्या तेव्हां सरकारचा गोलंदाज मुसा नारंज म्हणून फरासीस होता. तिकडे दादासाहेब अंबारींत होते. तेव्हां इकडील कोणी बोलला जे, तोफेचा गोळा दादासाहेब यांस मारावा. असें म्हणतांच मुसा नारंज बोलला जे, ते धनी आहेत. त्यांस कसें मारावें ? परंतु माझी शिस्त पहावी. असें म्हणून तोफेचे गोळ्यानें अंबारीचा कळस उडविला ! हें दादासाहेब यांनीं पाहून इंग्रजांस फार निषिद्ध केलें जे, मी व्यर्थ तुमचे पाठीसीं पडलों ! अरे, ज्यानें अंबारीचा कळस उडविला त्यास माझा प्राण घ्यावयास उशीर लागेल कीं काय ? असें म्हणतांच इंग्रज यांस फार राग येऊन मनगटें चावलीं; आणि बोलले जे, ही शिस्त फरासिसाशिवाय नव्हे ! दुसऱ्याचे हातून असें घडावयाचें नाहीं. असें म्हणून नीट तोफेवर चालून घेतलें आणि मुसा नारंज याचा गळा कापून नेला. तेथें लढाई मातबर जाहली. याप्रमाणें लढाया मातबर होऊन दादासाहेब यांस कोठें चैन पडों देईनात.

१०६. इकडे उभयतां कारभारी पुरंदरास आले. आलेवर गोपाळपंत बिवलकर यांनीं खर्चाच्या कीर्दी नेऊन पुढें ठेविल्या. नानानीं कीर्दी पाहिल्या. ज्या महिन्यांत नेबाद वांटले ती बेरीज मोठी पाहून गोपाळपंत यांस विचारिलें, हें काय आहे ? त्यांनीं विनंति केली कीं, मला ज्यांचे हवालीं केलें होतें त्यांस विचारावें ! त्यांनीं सांगितलें त्याप्रमाणें केलें. असें म्हणतांच दाजीस बोलावून आणिलें आणि कीर्दी पुढें टाकून नाना म्हणाले कीं, हें काय केलें ! दाजीनीं उत्तर केलें कीं, बहुरूप नाचविलें कीं काय ! अहो, तुम्हीं माझे डोचकीवर ओझें ठेविलें, आणि हीं सरकारचीं माणसें तिकडील पैका खाऊन जर फितलीं असतीं तर मला प्राण द्यावा लागता ! असें म्हणतांच सखारामबापू बोलले कीं, दाजीनीं केलें तें ठीकच केलें. नंतर नाना कांहीं एक बोलले नाहींत. पुढें पलंगचौकीचें काम[4] दाजीकडे जसें होतें तसेंच होतें.

१०७. एके दिवशीं दाजी पुरंदराखालीं भिंवडी म्हणून गांव आहे तेथें पागा बार-

---

१ मिळत नाहीं. २ मुसा नारंज हा पेशव्यांचा सरदार फ्रेंच जातीचा होता. हें त्याच्या नांवावरूनच दिसत आहे. या १०५ सदरांत वर्णिलेली गोष्ट मुसा नारंज याची नसून सय्यद हुसेन नांवाचा एक पेशव्यांचा नामांकित गोलंदाज होता त्याची आहे व ती नापारच्या लढाईतच घडलेली आहे. मुसा नारंज याचें नांव काव्येतिहाससंग्रहांत पत्रें यादी वगैरे ले. २९१ मध्यें मुसा भरंज असें आहे. ती मोडीचें बालबोध करणाराची चूक आहे. ३ भोरप्यांचा खेळ. बहुरूपी याचाच अपभ्रंश भोरपी. ४ पलंगचौकीचें काम = पेशव्यांच्या शरीरसंरक्षणाचें काम.

गीर वगैरे शेंपन्नास लोक यांचे निसबतीस असत, तेथें घोडीं पहावयास ह्मणून किल्ल्यावरून आले. फार दिवस आले नव्हते ते कारभारी परत आलेवर खालीं आले. मागती पालखींत बसोन पुन्हां किल्ल्यावर जाऊं लागले. तों दरवाज्यांत 'परमाणगी पाहिजे' असें दरवाजकरी बोलले. तेव्हां हे तसेच माघारे फिरून आपले राहुटीस गेले. हें वर्तमान नानास कळतांच नानानीं स्वदस्तूरची चिठी पाठविली; त्यांत लिहिलें आहे जे, "काल आपण माचीस येऊन दरवाज्यापासून श्रीमंत राजश्री माधवरावसाहेब यांजवर रागें भरून गेलां, त्यास दरवाज्यावर कारकून नित्य होता तो नव्हता; कालच नवा नेमून दिला; यास्तव आज राग टाकून यावें. नाहीं तर मला आपली आज्ञा जाहलीयास मीच आपले राहुटीस येईन!" याप्रमाणें चिठी येतांच निघून किल्ल्यावर गेले. नानाची गांठ पडली. नंतर दाजी बोलले कीं, नाना, मला श्रीमंतांचे घरीं तीन पिढ्या परमाणगी ह्मणून नाहीं. याप्रमाणें श्रीमंत नानासाहेबांपासोन चालले. असें बोलतांच नाना बोलले कीं, आतां तरी आपणास आडकाठी कोठें आहे! त्या दिवसापासोन जसे उभयतां कारभारी, त्याप्रमाणें दाजी. यांस कांहीं दरवाज्यावर आडकाठी नाहीं. कोणी आपलेकडील आला असतां दरवाज्यावर सांगून पाठवून आणवावें याप्रमाणें सांप्रदाय. सरकारवाड्यांत कोणी सरकारचे दर्शनास येणार—त्यास नाना याणीं दाजीचे नांवें चिठी पाठवावी जे, अमके आले अहेत यांस श्रीमंतांचें दर्शन करवावें; याप्रमाणें नानाच्या चिठ्या आहेत.

१०८. पुढें श्रीमंत गंगाबाईसाहेब यांनीं आज्ञा केली कीं, आपण कुटुंब आणवावें. येथें कुटुंबसुद्धां रहावें. श्रीमंत लहान, त्यापेक्षां तुम्हांस घरास जावयास निरोप व्हावयाचा नाहीं, त्यास कुटुंब आणवावें; असा फारच आग्रह पडला. नंतर मंगळवेढेहून कुटुंब नेलें. दाजी यांस पुत्र चार, कन्या दोघी. वडील पुत्र हरिहररावतात्या. यांचें वय दहा बारा वर्षांचें होतें. त्यांस दरबारास जातेसमयीं समागमें नेत. श्रीमंत गंगाबाईसाहेब यांची पूर्ण कृपा. जें लागेल तें सरकारवाड्यांतून आणवावें. दाजी कधीं सरकारचे पंगतीस भोजन करीत नव्हते. आपले घरींच जेवीत. जे दिवशीं आज्ञा होईल ते दिवशीं भोजनास जावयाचें, याप्रमाणें पूर्वीपासोन सांप्रदाय. आठ चार दिवशीं श्रीमंत बाईसाहेब यांनीं दाजीस भोजनास ठेवून घ्यावें. दाजीनीं म्हणावें जे, मुलास ठेवून मी जातों. बाईसाहेब यांनीं ह्मणावें, मुलासुद्धां येथेंच भोजन करा. असें म्हटलेवर यांनीं तेथें रहावें. श्रीमंत पार्वतीबाईसाहेब—श्रीमंत भाऊसाहेब यांची पत्नी—व श्रीमंत गंगाबाईसाहेब या उभयतांचीं ताटें मांडीत त्यांचे समोर या उभयतांचीं ताटें. याप्रमाणें श्रीमंत लोभ करीत. वडील सांगत जे, दाजीनीं श्रीमंतांचें घर आह्मास आपले घराप्रमाणें केलें होतें! याप्रमाणें पूर्ण लोभ. एकादे दिवशीं बाईसाहेबांनीं दाजींचे कुटुंबास बोलावून न्यावें. त्यांचें नांव कृष्णाबाई. त्यांस आई म्हणत. ती मातुश्री मोठी प्रसिद्ध—ज्यांस परशुरामभाऊसाहेब व बाळासाहेब मानीत—त्यांची कीर्ति

पुढें वर्णन करीन. त्यांस वाड्यांत बाईसाहेब बोलावून नेत. दाजींची कन्या धाकटी सगुणाबाई म्हणून होती तिला बया म्हणत. ती स्वरूपानें फार सुंदर होती. तिचें वय सहा सात माहिन्यांचें लहान होतें. तेव्हां बाईसाहेब यांनीं म्हणावें जे, दाजी, तुमची गोजरी आमचे बाळास करावयाची ! असें म्हटलेवर दाजीनीं बोलावें जे, महाराज, आम्ही पदरचे चाकर. आमची योग्यता मुलगी द्यावयाची आहे कीं काय ? आम्ही गरीब. कण्याभाकरी खाणार. असें म्हटलें म्हणजे त्याणीं म्हणावें, काय हें दाजी ! कण्याभाकरी म्हणजे काय ! यांनीं बोलावें जे, महाराज, आम्हांस कण्याभाकरीचा मुलुख दिला. त्या मुलखांत दुसरें धान्यच नाहीं ! असें म्हणतांच त्यांनीं हंसावें. या मुलीस श्रीमंतांचें दूध उरलेलें पाजावें. सोन्याचीं बोंडलीं, सोन्याच्या वाट्या घेऊन बाईसाहेब यांनीं आपले पायांवर घेऊन मुलीस दूध पाजावें. श्रीमंतांनींही 'दूध पाजणें' असें म्हणावें. याप्रमाणें केवळ आज्ञाप्रमाणें मानीत.

१०९. एके दिवशीं कचेरींतून पुरुषोत्तमरावदाजी मागील चौकांत गेले. श्रीमंत बाईसाहेब झोंपाळ्यावर बसल्या होत्या; आणि जवळ पुरुषोत्तमरावदोजी यांचें कुटुंब यांस बसविलें होतें, आणि कांहीं झोंपाळ्यावरील गाणीं म्हणत होत्या. तें पुरुषोत्तमरावदाजी यांनीं पाहिलें आणि रागें भरले जे, काय वेडीं माणसें आहेत ! आपली योग्यता काय ! उभें राहून झोंपाळा हालवावयाची देखील योग्यता नाहीं, आणि बरोबरीनें बसणें म्हणजे काय ? असें रागें भरतांच श्रीमंत बाईसाहेब बोलल्या जे, येथें बरोबरी व मानपान बायकांत कशाचे ! ते तुमचे मानपान काय ते कचेरींत पहावे ! नंतर पुरुषोत्तमरावदाजी बोलले जे, महाराज, कसें झालें तरी आम्हीं आपले योग्यतेनें असावें ! याप्रमाणें श्रीमंत बाईसाहेब यांची पूर्ण कृपा.

११०. पुढें कांहीं दिवशीं दादासाहेब यांचा बंदोबस्त कोपरगांवीं गंगातीरीं जाहला. दादासाहेबांस हरिपंत फडके घेऊन आले. त्यांस दादासाहेब बोलले जे, तुह्मीं आह्मांस बरे धुळीचे दिवे दाखविले ! असें म्हणतांच हरिपंत फडके यांनीं उत्तर केलें कीं, महाराज, याचें उत्तर आह्मीं सेवकांनीं काय करावें ? आपण श्रीमंत रावसाहेब यांस विचारावें. ते आपणास सांगतील. असें बोलून दादासाहेब यांनीं सर्व प्रायश्चित्त करून गंगातीरीं राहिले.

१११. सुमेरसिंग गाडदी व तुळाजी पवार उभयतां फिरंग्यांचे राज्यांत पळून गेले होते. तेथून त्यांस आणून पुण्यांत पांच पाट काढून शेंदूर घालून चारी रस्त्यांनीं हिंडवून चावडीवर आणून बांधिलें. नंतर मार्गानीं अठरापगड

१ हें हरिपंतांचें उत्तर किती मार्मिक व अर्थपूर्ण आहे ! सालबाईचा तह झाल्यावर दादासाहेबांस इंग्रजांचा आश्रय नाहींसा झाला; तेव्हां आपला मानमरातब व खर्चाची सोय यथास्थितपणें होईल अशाबद्दल हरिपंत फडके, तुकोजी होळकर व परशुरामभाऊ यांजपासून लेखी हमी घेऊन श्रीमंतांची स्वारी सन १७८३ च्या जलईत सुरतेहून गोदातीरीं कोपरगांव येथें येऊन राहिली. त्यांस आणावयास हरिपंत व रास्ते गेले होते.

जात जाणार त्यांनीं त्यांचे तोंडावर थुंकावें, याप्रमाणें चार दिवस केलें. नंतर अंगास सुया टोंचून त्यांस पलिते गुंडून पेटविलें आणि जाळून मारिलें. याप्रमाणें गाडद्यांचें पारिपत्य केलें. कांहीं त्या प्रकरणीं होते त्यांस फांशीं दिलें.

११२. मानाजी फांकडे हे दादासाहेब यांस कोपरगांवीं आणविलें तोंपर्यंत दादासाहेब यांजपाशींच होते.[1] दादासाहेब यांचा बंदोबस्त केल्यावर ते आपले घरास गेले. ते कांहीं फितुरीप्रकरणांत नव्हते. फक्त शिपाईगिरीचे इराद्यानें होते, म्हणोन श्रीमंतांनीं त्यांस बोलावणें पाठवून आणविलें. पुरंदरास भेटीस येण्याचें ठरलें तेव्हां नाना फडणीस यांनीं पुरुषोत्तमरावदाजींस सांगितलें जे, मानाजी फांकडे यांजबरोबर बोलावयाचा आमचा कांहीं लाग नाहीं. त्यांजबरोबर आपणच बोलावें. दाजी बोलले कीं, तुमचा पंचहत्यारी कसला जरी आला तरी मी त्याजबरोबर बोलतों. सारे माझे ओळखीचे आहेत ! असें बोलले. नंतर कचेरीचे वेळेस पुरुषोत्तमरावदाजी श्रीमंत रावसाहेब यांस आणावयास गेले. तेव्हां बाईसाहेब बोलल्या कीं, दाजी, बाळास सांभाळावें. यांनीं उत्तर केलें कीं, बाईसाहेब, आपण कांहीं काळजी करूं नये. पुरुषोत्तमराव जिवंत आहे तों कोणाचें भय नाहीं ! मानाजी फांकडे भेटीस येणार ह्मणून सर्वत्रांस भय वाटलें. दाजी यांनीं श्रीमंतांस कडेवर घेऊन कचेरीस आणून मसनदीवर बसविलें. शेजारीं तलवार घेऊन पुरुषोत्तमरावदाजी बसले. नाना फडणीस व सखारामबापू झाडून मानकरी बसले. नंतर मानाजी फांकडे आले. त्यांस दोन समले, समागमें पंचवीस तीस खासे, याप्रमाणें आले. नीट कचेरींत येऊन मसनदीजवळ आले. तों पुरुषोत्तमरावदाजी बोलले कीं, रावसाहेब, मानाजीबावांस ताजीम द्यावी. असें म्हणतांच श्रीमंतांचे मसनदीवर खुरनिसा करून समोर मध्येंच मसनदीजवळ मानाजी फांकडे बसले; आणि कचेरींत चहूंकडे पाहून ' दाजी, रामराम. ' असें ह्मणतांच हे बोलले कीं, 'मानाजीबावा, रामराम.' मग त्यानें कोणासही रामराम केला नाहीं; आणि बोलावयास आरंभ केला; पुरुषोत्तमराव, मी कसा आहें तो मीं आपल्या तोंडानें वर्णन करावेंसें नाहीं. परंतु मला हीं बामणें फितुरी ह्मणतात ! त्यास आह्मास कोठेंही चाकरी करावयाची. दादासाहेब काय आणि हे पाय काय, त्यास आतां पुरे. आह्मी कांहीं आईचे पोटांतून दाली बांधून आलों नाहीं. यांनीं आह्मांस दाली बांधिली. असें म्हणून गळ्यांतून पडदळसुद्धां तलवार काढून श्रीमंतांचे पायांपुढें ठेविली. तों नाना फडणीस यांनीं खुणेनें पुरुषोत्तमराव यांस सांगितलें जे, यास लौकर जावयाचें करा ! असें ह्मणतांच दाजी बोलले कीं, मानाजीबावा, हें काय करितां ! तुह्मांस दाली बांधिली ती माघारी घ्यावयास बांधिली

१ ही माहिती चुकली आहे. १७७६ च्या जून महिन्यांत दादासाहेबांस सोडून देऊन हरिपंतांबरोबर मानाजी फांकडे पुण्यास आले. सखाराम हरि व सदाशिव रामचंद्र हेही त्याच वेळीं आले. २ सवाईमाधवराव यांणीं. ३ यापूर्वी इतर मानकऱ्यांबरोबर मानाजी फांकड्याचा व पेशव्यांची भेट झालीच होती. ही दुसरी स्वतंत्रच भेट. पहा ऐ. ले. सं. नं. १८५३.

कीं काय ? आणि तुह्मांस फितुरी तरी ह्मणतो कोण ? तुह्मीं आपला सरंजाम खाऊन श्रीमंतांचे पायासीं लक्ष ठेवून स्वस्थ असावें.असें ह्मणतांच मानाजी फांकडे बोलले कीं, पुरुषोत्तमराव, आम्ही सरकारचे चाकर. आजपर्यंत चाकरी कशी केली ती आपणास माहीत आहेच. असें म्हणतांच दाजी बोलले कीं, मानाजीबावा, आम्हीं काय, ब्राह्मण ! असें ह्मणतांच मानाजीबावा बोलले कीं, वरकड बामणावाणी तुम्ही ब्राम्हण नव्हे. तुमची खातरजमा मला आहे आणि माझी खातरजमा तुम्हांला आहे ! असें म्हणतांच दाजी बोलले जे, रावसाहेब, मानाजीबावांस तलवार उचलून द्यावी. असें म्हणून श्रीमंतांचा हात लावून तलवार उचलून आपण दिली. आणि बोलले जे, मानाजीबावा, श्रीमंतांची भोजनाची वेळ जाहली, निरोप घ्यावा. असें म्हणून लागलीच विडे आणविले आणि श्रीमंतांचा हात लावून विडे दिले आणि बोलले जे, अहो, मानाजीबावांचे लोकांस विडे देणें, असें ह्मणून त्यांचे लोकांस विडे दिले. नंतर सांगितलें जे, आतां निरोप द्यावा, असें ह्मणून श्रीमंतांस उठावयाची खूण करतांच श्रीमंत उठले. तों मानाजी फांकडे मुजरा करून निघाले. दाजी बोलले, तुह्मीं सरकारचे पायांशीं लक्ष ठेऊन स्वस्थ असावें. कोणे गोष्टीची फिकीर न करणें असें ह्मणून त्यांस निरोप दिला. ते गेल्यावर नाना फडणीस बोलले जे, दाजी, आज आपण होतां ह्मणून मानाजी फांकडे यांसी बोललां. आमचा कांहीं त्याजबरोबर बोलण्याचा लाग नव्हता. अहो कचेरींत ह्मणतो, ' हीं बामणें मला फितुरी म्हणतात ! ' त्यासी काय बोलावें ! याप्रमाणें मानाजी फांकडे यांची कथा वडिलांनीं सांगितली ती लिहिली.

११३. आणखी एके दिवशीं जी गोष्ट घडली ती लिहितों. कारभारी श्रीमंत गंगाबाईसाहेब व श्रीमंत पार्वतीबाईसाहेब उभयतां बायांकडे नित्य तिसरे प्रहरीं येऊन बसत. तेथें कांहीं राजकारणप्रकरणीं गोष्टी आणि कांहीं खलबतांतील गोष्टी बोलत. तेव्हां कारभारी बोलावयास आले म्हणजे बाईसाहेब पुरुषोत्तमरावदाजीस बोलावीत. याप्रमाणें होऊं लागलें. तें सखारामबापूस आवडेनासें जाहलें. तेव्हां सखारामबापू यांनीं बाजीपंतअण्णा म्हणून सरकारचे कारकून यांस बोलावून आणून सांगितलें जे, तुमचा व दाजीचा ऋणानुबंध बरा आहे असें आह्मांस समजलें; त्यास आह्मी सांगतों एवढें काम करा. आह्मीं सांगितलें असें कांहीं त्यांस कळों नये. सहज गोष्ट स्नेहानें काढलीसी करून त्यांस निरोप कळवावा. कोणता म्हणाल तर जे, आम्ही तिसरे प्रहरीं बाईसाहेब यांजपाशीं कांहीं राजकारणप्रकरणीं गोष्टी बोलावयास येतों, तेथें पुरुषोत्तमरावदाजी असतात याजकरितां आम्हांस संकोच होतो. त्यास आम्ही खलबतास गेलों असतां त्यांनीं येऊं नये, अशी युक्तीनें गोष्ट काढून बंदोबस्त करावा, असें ह्मणतांच बाजीपंत बोलले जे, बापू, आपण सांगतां त्यापेक्षां आह्मास निरोप कळविणें प्राप्त; परंतु दाजीचा स्वभाव रागीट, ते

कांहीं बुद्धचा कोणाच्या बोलण्यांत शिरावयाचे नाहींत; बाईसाहेब बोलावणें पाठवितात सबब तेथें येऊन बसतात, आणि त्यांस आपण मोठे आग्रहानें येथें ठेऊन घेतलें आणखी असा निरोप त्यांस कळविल्यावर पुढें काय होईल तें मात्र मला विचारूं नये ! आपण सांगतां त्यापेक्षां मी युक्तीनेंच कळवितों. तेव्हां सखारामबापू बोलले जे, कांहीं चिंता नाहीं, तुह्मीं कळवावें असें सांगितलें. दुसरे दिवशीं सरकारचे वाड्यांत दहा घटका दिवसास जेवणें जाहलीं. नंतर बाजीपंत विडा खात तसेच पुरुषोत्तमराव यांचे बिऱ्हाडीं आले. हे भोजनास बसले होते. बाजीपंत येतांच बोलले जे, या बाजीपंतअण्णा, आज इकडे कोणीकडे आलां ! कांहीं काम योजून आलां असें वाटतें. अहो, त्यांस बसावयास पाट देणें, असें म्हणून बसावयास पाट दिला. तेव्हां बाजीपंत बोलले कीं, सहज आलों. दाजी बोलले कीं, तुम्ही सहज कधीं यावयाचे नव्हेत. कांहीं काम आहे. कामाखेरीज कांहीं आलां नाहीं. असें ह्मणून भोजनें झालीं. नंतर विडा खात बसले आणि बोलले जे, काय काम आहे सांगा. बाजीपंत दाजीस मामा म्हणत; वडिलांप्रमाणें मानीत; दाजीनीं बाजीपंतांस ' अरे बाजीपंत ' ह्मणावें. तेव्हां बाजीपंत बोलले कीं, मला आपण वचन दिलें तर मी सांगेन. तेव्हां दाजी बोलले कीं वचन कोणतें ? तेव्हां बाजीपंत बोलले कीं, आपण शिव्या देणार नाहीं याप्रमाणें वचन द्यावें. तेव्हां दाजी बोलले कीं, शिव्या द्यावयास असा अपराध तूं केला नाहींस व मीही केला नाहीं ! तेव्हां बाजीपंत बोलले कीं, तसेंच आहे. आपण वचन द्यावें. तेव्हां दाजीनीं वचन दिलें. मग बाजीपंत बोलले कीं, आपण तिसरे प्रहरीं दरबारास जातां तेव्हां कारभारी आंत खलबतास जातात त्या वेळेस आपणही आंत जातां. तेथें कांहीं राजकारणमजकूर बोलतात आणि आपण तेथें आलां म्हणजे त्यांस संकोच होतो. तेव्हां आपणास तरी तेथें खलबतांत जाण्याची गरज काय आहे ? इतकें म्हणतांच दाजी बोलले कीं, अरे, तुला हें बोलावयास सखारामबापूनें सांगितलें असेल[1] ! असें म्हणून तप्त जाहले, आणि बोलले जे, तूं वचन घेतलेंस म्हणून तुला कांहीं बोलत नाहीं. परंतु आतां तुमच्या सर्वांच्या मनांत काय आहे कीं, पुरुषोत्तमरावदाजी हे आमचे गरिबांचे मात्र काळ; त्यास कांहीं बोलावयाचे नाहींत; असा एक भ्रम तुम्हांस असेल. तरी सखारामबापू हे कोण आहेत ते माझ्या ओळखीचे आहेत ! आतां काय होणें तें कचेरीसच होईल ! आतां तूं जा. असें ह्मणून बाजीपंतांस निरोप दिला. मग तिसरे प्रहरीं वाड्यांत गेले तों श्रीमंत कचेरीस बसले होते. यांचा नित्य सांप्रदाय श्रीमंतांस नमस्कार करून मसनदीजवळ बसावें. नंतर श्रीमंत बाईसाहेब

१ पुरुषोत्तमरावदाजी तोतयास अनुकूल असल्याबद्दल कांहीं अंधुक अंधुक संशय त्या वेळीं कोणाकोणास आला होता हें लक्षांत घेतां खलबतासारख्या नाजूक प्रसंगीं दाजी हजर राहिले तर सखारामबापूस संकोच वाटणें अगदीं योग्य होतें असें वाटतें. आपणावर असा आरोप असल्याचा कांहीं भास खुद्द पुरुषोत्तमराव यांसही झालेला असावा असें त्यांनीं लिहिलेल्या ऐ. ले. सं. नं. १५२० च्या पत्रावरून दिसतें.

यांचा निरोप यावा जे, आंत येणें. नंतर आंत जावें. तेथें कारभारी बसलेच असतात. ते दिवशीं आंतून निरोप आला. सखारामबापू यांनीं बाजीपंतांबरोबर निरोप पाठविला हें कांहीं श्रीमंत बाईसाहेब यांस ठाऊक नाहीं. बाईसाहेब यांचें बोलावणें येतांच दाजी ह्मणाले जे, अहो, आम्हांस आंत जावयाची गरज नाहीं. ते कारभारी आंत आहेत. कांहीं राजकारणप्रकरणीं बोलतात. तेथें आमचें जावयाचें प्रयोजन काय ? बाइसाहेब आज्ञा करितात सबब जावयाचें, परंतु कारभारी यांस संकोच होतो !! नंतर कचेरीचे मानकरी वगैरे होते त्यांस बोलले, अहो, श्रीमंतांचे घरीं कारभारी मुख्य दिवाण पुरंदरे. त्यांचे कारकून हे सखारामबापू चांगले शहाणे सबब हेच[1] पुढें जाहले. परंतु तुम्हांस एक सांगतों. यांनीं मागें चाळे बहुत केले. तेव्हांचे श्रीमंत थोर सुज्ञ होते. त्या वेळेस अब्रु राहिली. हल्लीं हे पांय आहेत आणि तुम्हांआम्हांसारखें चाकर श्रीमंतांचे पदरीं बहुत आहेत. आतां सखारामबापू यांनीं चाळे करावे, पुरुषोत्तमराव पारिपत्य करील ! याप्रमाणें दोन तीन वेळां उरास हात लावून बोलले. यांचें बोलणें सारें कारभारी ऐकतात. बाहेर कचेरी आणि ते माजघरांत. मध्यें पडदी मात्र. दाजी असें ह्मणून आणखी बोलले जे, अहो, माझे वयास अठ्ठेचाळीस[2] वर्षें जाहलीं, परंतु मला कोणी श्रीमंतांचे घरीं बोलले नाहींत. श्रीमंत देखील माझी मर्जी रक्षण करीत. याप्रमाणें तीन पिढ्या चाललें. हल्लीं कारभारी यांचें बोलून घेऊन मला येथें रहावयाची जरूर नाहीं. यास्तव आज मी निरोपासच आलों. असें म्हणतांच कचेरीचे लोक म्हणाले जे, दाजी, आपण असें कां ह्मणतां ? आपणास कोण बोलणार आहे ? हे ह्मणाले कीं, अहो, मी बोलून घेऊन रहावयाचा गृहस्थच नव्हे ! तेव्हां सखारामबापू नानाकडे तोंड करून बोलले कीं, पुरुषोत्तमरावदाजीस राग आला ! असें म्हणतांच नाना बोलले कीं, तुह्मी त्यांस कशास सांगून पाठवीत होतां ? तेव्हां बाजीपंत तेथें होते त्यांस सखारामबापू बोलले कीं, अहो बाजीपंत, तुम्हीं काय सांगितलें ? बाजीपंत बोलले कीं, ही विनंति मीं पूर्वीच केली आहे. आतां मजकडे कांहीं शब्द नाहीं ! असें म्हणतांच बाईसाहेबांस बापू बोलले कीं, दाजीस आपण आणबून समजूत करावी. बाईसाहेब बोलल्या कीं, आह्मा काहीं बोललों असतां ते आतांच निघून जातील ! असें ह्मणतांच सखारामबापू मुकाट्यान उठून कचेरींतून

---

१ 'हे पाय आहेत' हें बोलणें सवाई रावसाहेब यांस उद्देशून. २ बहुधा या ११३ सदरांत वर्णिलेला प्रसंग स. १७७६ मध्यें घडलेला असावा. ज्या अर्थी याच वर्षाच्या सप्तंबर महिन्याच्या प्रारंभीं दाजी वारले, त्या अर्थी त्यांच्या वयास अठ्ठेचाळीस वर्षें पुरीं होण्याचे आधीं ते वारले हें स्पष्ट आहे. कारण त्यांचा जन्म स. १७२९त झाल्याचें मागें त्यांच्याच तोंडच्या एका वाक्यावरून सिद्ध केलें आहे. हें सर्व पाहतां बखरींत अठ्ठेचाळीस वर्षें झालीं, असें लिहिलें आहे तेथें 'अठ्ठेचालिसावें वर्ष लागलें' असें पाहिजे हें उघड आहे. आपल्या वयाविषयीं बोलतांना जें वर्ष सुरू असेल तें पुरें समजुन संख्या सांगण्याची ही चूक पुष्कळ लोक करितात.

आपले घरास गेले. नाना फडणीस बाहेर आले. येऊन दाजीस ' नमस्कार ' असें बोलले. तों दाजींनीं त्यांस उत्तर केलें कीं, तुम्ही कारभारीच आहां ! आज ते बोलले, उद्यां तुम्ही बोलणार ! त्यास मी असें बोलून घ्यावयाचा गृहस्थ नव्हें. मी श्रीमंतांचा निरोप घेऊन घरास जाणार. मला घर सोडून फार दिवस जाहले. असें ह्मणतांच नाना बोलले कीं, ठीक आहे. एकूण श्रीमंतांचा निरोप घेऊन तुम्ही जाणार, त्यास श्रीमंत निरोप द्यावयाजोगे जाहले म्हणजे निरोप देतील ! नंतर आपण जावें. दाजी बोलले कीं, आम्हीं पायांवर डोई ठेविली ह्मणजे तोच आमचा निरोप. नाना फडणीस बोलले जे, असें नाहीं. आपण काय बोललां जे, श्रीमंतांचा निरोप घेऊन जाणार, तेंच खरें. आतां दुसरें बोलूं नये. श्रीमंतांनीं निरोप दिला तर जावें ! याप्रमाणें बोलून नंतर हात धरून श्रीमंत बाईसाहेबांकडे घेऊन गेले. बाईसाहेब यांनींही याच रीतीनें सांगून मोठ्या आग्रहानें ठेऊन घेतलें. याप्रमाणें कारभारी यांस भर कचेरींत ' पुरुषोत्तमराव पारिपत्य करील ' असें बोलणार श्रीमंतांचे दरबारीं कोण होते ? पुरुषोत्तमरावदाजीप्रमाणें पराक्रम व बोलणें कोणासच नाहीं ! नाना फडणीस किती आर्जवानें बोलून मर्जी रक्षण करीत येविशीं कोणास असत्य वाटेल, परंतु जे खानदानी पुरुष आहेत त्यांस असत्य वाटणार नाहीं. जे अज्ञानी आहेत त्यांनीं असत्य मानल्यास दस्ताऐवजीं पुरवणी करून देऊं कीं, नाना फडणीस किती आर्जवानें बोलत. त्यावरून दाजीचें सामर्थ्य लक्षांत येईल.

११४. आणि पुरुषोत्तमरावदाजी गरीबांवर कृपा किती करीत आणि त्यांचा बहुमान किती राखीत, येविशीं एक कथा सांगतों. बापूजी नाईक भोसेकर[1] ह्मणोन मंगळवेढ्यांत सराफ होते. ते पुरंदरास आपले कामाकरितां आले. तेव्हां दाजी त्यांस बोलले जे, अहो बापूजी नाईक, तुह्मांस नानांची भेट करवितों. असें म्हणून त्यांस घेऊन नानांचे वाड्यांत चालले. पुरुषोत्तमरावदाजी पुढें, पाठीमागें तात्या[2], त्यांचे पाठीमागें बापूजी नाईक, याप्रमाणें चालले तों नानांचे वाड्यांत परकी माणूस कोणी जावयाचा सांप्रदाय नाहीं, म्हणून चौकीदार यांनीं बापूजी नाईक याचा हात धरिला. तेव्हां बापूजी नाईक बोलले जे, तात्या, मला चौकीदार येऊं देत नाहींत. तात्यांनीं दाजीस सांगितलें कीं, बापूजी नाईक यास येऊं देत नाहींत. असें ऐकतांच लागलीच दाजींनीं मागें फिरून 'कोण ××× येऊं देत नाहीं ?' असें म्हणतांच चौकीदार यांनीं हात सोडिला ! पुरंदरचीं घरें लहान, सबब यांचा शब्द ऐकून नाना बोलले, पुरुषोत्तमराव, काय जाहलें ? तेव्हां हे नानास बोलले जे, कसला तुमच्या घरचा कारभार ××××! आह्मी मातब्बर मनुष्य आपले भेटीस आणीत असतां पायचीं[3] माणसें-××××

---

१ या भोसकरांचा उल्लेख मागें आला आहे. २ बखर लिहिणाराचे वडील हरिहररावतात्या. हे तेव्हां तेरा चवदा वर्षांचे होते. ३ ' पायचीं माणसें ' ह्मणजे पायदळाचे लोक यांस शिलेदार त्या काळीं अगदीं तुच्छ लेखीत ! पण अठराव्या शतकाच्या अखेरीपासून पायदळ पलटणांनीं आपलें सामर्थ्य प्रकट केलें तेव्हां युरोपांतल्या व इकडच्या घोडेस्वारांचीही घमेंड आतां मात्र पार नाहींशी झाली आहे

नीं हात धरिला ! असें म्हणतांच नानांनीं लागलीच त्या जमातीस निरोप दिला. तेव्हां दाजी बोलले कीं, नाना, आह्मी आपले भेटीस भलतेंच माणूस आणूं कीं काय ? जीं विश्वासूक खातरजमेचीं माणसें असतील त्यांसच घेऊन येऊं. असें म्हणून नानास बोलले जे, नाना बापूजी नाईक यांस भेटावें. मग नाना उठून उभे राहून बापूजी नाईक यांस भेटले. नंतर दाजीनीं नानास सांगितलें जे, हे मंगळवेढ्यांतील सावकार मोठे मातबर, कांहीं कामाकरितां येथें आले होते. सहज आपली भेट घेऊन जावें ह्मणून आले. असें सांगून पानसुपारी वगैरे देववून निरोप घेऊन घरास आले. मग बापूजी नाईक बोलले जे, आमची सावकारी नानाजवळ कशास सांगितली ? तेव्हां दाजी बोलले कीं, तुम्ही सावकारच आहां. याप्रमाणें दाजी गरीबांचें भूषण राखीत.

११५. आणि एके दिवशीं नानांचें बोलावणें आलें. दाजींचा सांप्रदाय बोलाविल्याशिवाय कारभारी वगैरे यांचे घरीं जावयाचें नाहीं. सरकारवाड्यांत मात्र हरवक्त जावयाचें. तेथेंच कारभारी यांचा नमस्कार व्हावयाचा. तेव्हां बोलावणें आलें सबब तात्यास समागमें घेऊन गेले. नाना यांचे वाड्यांत गेले. जोतें जों चढतात तों नाना कोणी गृहस्थ होते त्यांजबरोबर खलबत करीत होते. तों दाजी येतांच गोपाळजी गुंड—नानांचा खिसमतगार—यानें कळविलें कीं, दाजी आले. तेव्हां नानानीं सांगितलें जे, गोपाळजी, तूं जाऊन युक्तीनें सांग, ' आपण अंमळ बसावें; नाना आतां येतात. ' असें म्हणतांच गोपाळजी दाजीजवळ येऊन बोलला. हे जोत्यावर उभे होते तों नानांनीं सांगितलेप्रमाणें गोपाळजी बोलला जे, 'आपण अंमळ बाहेर बसावें.' असें बोलतांच दाजी बोलले कीं, अरे, मी कोणा-××× चे दारांत आजपर्यंत बसलों नाहीं ! असें म्हणून माघारे फिरले, आणि जोडा आण म्हणोन खिसमतगाराकडून जोडा आणवून जोडा घालून चौकांत आले. तों नाना फडणीस तसेच बाहेर येऊन चौकांत आडवे जाहले, आणि हात धरून दाजींस माघारें नेलें. तेव्हां दाजी बोलले कीं, नाना, माझा सांप्रदाय आपणास माहीत असोन असें करतां हें काय ? मी दारोदार बसावयाचा गृहस्थ नव्हे ! मी श्रीमंतांचे दारीं देखील बसलों नाहीं, याप्रमाणें श्रीमंत नानासाहेब यांजपासून तीन पिढ्या जाहल्या, चाललें. आतां लोकांचे घरीं बसावयास मला फार दिवस कांहीं वांचावयाचें नाहीं ! आपणास कामें असल्यास मला बोलावणें पाठवीत जाऊं नये. असें म्हणतांच नाना कांहीं बोलले नाहींत. मग इकडील तिकडील कांहीं गोष्टी काढून नंतर नानानीं सांगितलें कीं, भोजनास यावें. तेव्हां दाजी बोलले कीं, मी कांहीं येत नाहीं. मुलास ठेऊन जातों. नाना बोलले कीं, नाहीं, मुलासुद्धां आपण यावें

१ ह्मणजे बदली केली. बडतर्फ केलें असा नेहमींचा अर्थ नव्हे. निरोप दिला या अर्थी रजा दिली असेंही म्हणण्याचा प्रघात होता. पण रजा शब्दाचे दोन अर्थ होते. एक रजा ह्मणजे बडतर्फी व दुसरा रजा ह्मणजे बिन पगारी रजा. भरपगारी रजेस ' फुरसदगी ' असा निराळा शब्द होता. निमपगारी वगैरे रजा तेव्हां मुळीच नव्हती !

व आपले शिष्यास बोलावणें पाठवावें. तेव्हां दाजीनीं तात्यांसच सांगितलें कीं, घरीं जाऊन आम्ही भोजनास येत नाहीं म्हणून सांगावें व शिष्यास सोंवळीं भांडीं घेऊन येणें म्हणून सांगणें. असें म्हणतांच नाना बोलले कीं, त्यास कशास पाठवितां ? आणखी कोणी जाईल. दाजी बोलले कीं, तोच कां जाईना ! कांहीं चिंता नाहीं. असें म्हणून तात्यासच पाठविलें. नंतर नानाचे घरीं भोजन करून आले. याप्रमाणें कथा वडिलांनीं प्रत्यक्ष पाहिलेली सांगितली ती लिहिली असे.

११६. एके दिवशीं दाजी नानाकडे गेले. जाऊन वर बसले तों नानानीं विड्याचें तबक पुढें ठेविलें. दाजीनीं विडा नानास देऊन आपण घेतला. उभयतांनींही विडे घेतले. तों नाना थुंकावयासाठीं पिकदाणी इकडे तिकडे पाहूं लागले. दाजींदेखत 'पिकदाणी आण' असें कसें म्हणावें असें त्यांस वाटलें. तें दाजींस समजून दाजी बोलले कीं, गोपाळजी, गोपाळजी, पिकदाणी घे. तेव्हां नाना समजले कीं, दाजीस पाहिजे. म्हणून नाना बोलले कीं, दाजी, आपणास पिकदाणी पाहिजे कीं काय ? तेव्हां दाजी बोलले कीं, मला कांहीं नको. मी कांहीं विडा थुंकीत नसतों. आपणासाठीं मीं आणविली. असें म्हणतांच नाना बोलले कीं, गोपाळजी, खालीं दाजीकडील माणूस असेल त्यास दाजींचा जोडा आणावयास सांग ! तेव्हां दाजी म्हणाले कीं, हें काय ? तेव्हां नाना बोलले कीं, आपण माझी पिकदाणी घ्यावी, मी आपला जोडा घेतों ! असें म्हणतांच दाजी हंसों लागले. याप्रमाणें नानांचा पूर्ण लोभ.

११७. आणखी दाजी यांची आर्जव करण्याची एक गोष्ट सांगतों. हरिपंत कानिटकर हे दाजी यांचे मेहुणे. ते धोडपेस फौंडणिशीचे कामावर पेठे यांजकडून होते. त्यांनीं तेथून धोतरजोडा रेशिमकांठी किंमत वीस रुपयेपर्यंत, चार बोटें रेशिमकांठ, लांबरुंद, बारीक, चांगला काढवून दाजीस नेसावयास म्हणून पाठविला. तो धोतरजोडा धुवून आणविला, तेव्हां कांठ फार; दाजींचा संप्रदाय दोन बोटें कांठाचा धोतरजोडा नेसावयाचा आणि याचा चार बोटें कांठ, हा धोतरजोडा नाना फडणिसांस द्यावा, असें मनांत आणून नानास भोजनास बोलाविलें. नानाचा संप्रदाय भोजनास गेले तर आपला आचारी स्वयंपाकास पाठवावयाचा, परंतु दाजींचे घरीं आचारी कांहीं पाठवावयाचा नाहीं. नाना भोजनास आले. यांचे घरीं येऊन स्नान केलें. तों दाजीनीं धोतरजोडा सोंवळ्यांत वाळत घालून चुन्या करून आपले हातांत घेऊन नाना अंग पुसून धोतरें नेसावयाचे वेळेस आपण धोतरें घेऊन पुढें गेले. यांचे हातांत धोतरें पाहून नाना समजले कीं, आमचे शिष्याजवळचीं धोतरें घेतलीं, म्हणोन शिष्याकडे पाहिलें; तों शिष्या बेताप्रमाणें धोतरें घेऊन उभा होता. तों दाजी बोलले कीं, हा धोतरजोडा हरिपंत कानिटकर आमचे मेहुणे धोडपेस असतात त्यांनीं पाठविला. तो उंच फार, येवढा मी कांहीं नेसत नाहीं, आपणास नेसावयास चांगला आहे, सबब आणिला आहे. तेव्हां नाना बोलले, हें सारें खरें, परंतु

तुम्हीं हातांत काय ह्मणून घेतला ? नंतर दाजी बोलले कीं, कांहीं चिंता नाहीं. असें ह्मणोन बळानें हातांत दिला. मग नाना नेसले आणि भोजनास बसले. तेव्हां पटवर्धन यांचे घरीं बायकांनीं वाढावयाचें. तेव्हां नाना बोलले जे, दाजी, ही तुमची कसली वेडी चाल बायकांनीं वाढावयाची ! दाजी बोलले कीं, आमच्या शिलेदारांच्या बायका सारीं कामें करितात ! तेव्हां नाना हंसूं लागले आणि जेवतांना बोलले—दाजींस मुलें, चार मुलगे व दोन मुली. तेव्हां नानांचे मनांत तात्या व नाना[1] हे पहिल्या कुटुंबाचे, व बाकी हीं या कुटुंबाचीं—याजवरून विचारिलें जे, या कुटुंबाची ममता या दोघांवर आहे कीं नाहीं ? कसें काय ? तेव्हां दाजी बोलले कीं, नसावयास काय जाहलें ? नाना बोलले कीं, सापत्न, सबब. तेव्हां दाजी हंसोन बोलले कीं, हीं सारीं मुलें हिचींच. पहिले कुटुंबाची एक मुलगी मात्र आहे ती रास्त्यांचे घरीं दिली आहे. असें ह्मणतांच नाना बोलले कीं, हें मला अगदीं ठाऊक नाहीं. माझी समजूत हीं दोन मुलें पहिले कुटुंबाचीं. याप्रमाणें बोलून नंतर भोजनें जाहलीं. विडे घेऊन आपले घरास गेले.

११८. पुंढें त्रिंबकचा किल्ला बदलला तेव्हां त्याचे पारिपत्यास पुरुषोत्तमरावदाजींस पाठविलें होतें.[3] दाजीनीं जाऊन त्रिंबकचे किल्ल्याचा बंदोबस्त करून नाशकास श्रीमंत गोपिकाबाईसाहेब होत्या त्याणीं ठेवून घेतलें ते कांहीं दिवस तेथेंच होते. मातुश्रींची मर्जी यांजवर बहुत. चिरंजीव ह्मणत. पत्रें बाईसाहेब यांचीं 'चिरंजीव राजश्री' म्हणून मायन्याचीं नाशकास होते त्या प्रकरणीं बहुत आहेत, त्याजवरून समजेल. तेथील बंदोबस्त करून पुरंदरास आले.

११९. पुरंदर मुक्कामीं असतां चिरंजीव मनाबाई म्हणून कन्या तिचें लग्न केलें तें सासवडास केलें. बावधनकर सोनी यांचे घरीं दिली. तो समारंभ चांगला जाहला.[2]

१२०. नंतर पंढरीनाथतात्यांचे चिरंजीव हरिहरराव ह्मणून होते त्यांचें लग्न सासवडासच झालें तें पुरुषोत्तमरावदाजी यांनींच केलें.[6] पंढरीनाथतात्या यांनीं मिरजेहून दाजीस लिहून पाठविलें जे, आपण वडील आहां. त्यास समारंभ चांगला करावा. नाना व सखारामबापू यांस व श्रीमंतांसही विनंति करून समारंभास आणावें. याप्रमाणें त्यांनीं पत्र पाठविलें. नंतर समारंभास नाना फडणीस आले व सखारामबापूचे चिरंजीव आले. श्रीमंतांस येण्याविषयीं विनंति केली, परंतु किल्ल्यावरून खालीं यावयाचें यामुळें मानसिक केलें. मिरजेहून गंगाधररावँ आले होते. त्यांस बाळासाहेब म्हणत. याप्रमाणें मोठा समारंभ जाहला.

---

१ कृष्णराव नाना. हे दाजीनीं आपल्या भावजयीच्या (नारायणराव कृष्ण यांच्या स्त्रीच्या) मांडीवर दत्तक दिले होते. २. 'पुंढें' हा शब्द येथें चुकला आहे. कारण ११७ सदरांतला मजकूर घडण्यापूर्वीचि ह्मणजे सवाईमाधवराव जन्मास आले त्या सुमारास दाजीनीं त्रिंबकच्या किल्ल्यावरचा फितूर मोडिला. पुढें पुष्कळ दिवसांनीं दाजीनीं मंगळवेढ्याहून पुरंदरास कुटुंब नेलें. त्यानंतर घडलेली हकीकत ११७ संदर्भात आहे. ३ पहा ऐ. ले. सं. नं. १३६४ चें पत्र. ४ पहा ऐ. ले. सं नं. १८०८. ५ पांडुरंगराव गोविंद. ६ या लग्नसमारंभाचें वर्णन ऐ. ले. सं. नं. १७६४ मध्यें आहे. ७. गंगाधरराव गोविंद.

१२१. नानास मेजवानी जाहली ते दिवशीं दाजी यांनीं आचारी यांस सांगून तिखटाचें सार करविलें. शुद्ध भगवतीची पूड वस्त्रगाळ करून तिचें तें सार रुप्याच्या पातेल्यांत घालून चमच्यानें वाढावयास आणिलें. सर्वांस वाढवून नानास वाढविलें. आचारी यांस सांगितलें जे, वरकड मंडळीस थोडें थोडें घालून नानाचे वाटींत मात्र अंमळ अधिक घालावें. याप्रमाणें सांगितलें होतें. त्याप्रमाणें आचारी यांनीं सार वाढावयास आणिलें. सर्वांस वाढून नानास वाढिलें. नाना यांचे मनांत द्राक्षांचें सार असेल, म्हणून पांचीं बोटें बुडवून तोंडांत घातलीं तों एकच आग जाहली. तोंड तसेंच पसरलें आणि बोलले कीं, दाजी, तिखट लागलें ! असें म्हणतांच हे आचारी यांस शिव्या देऊं लागले जे, हे ×××××× दररोज आम्हांस असेंच तिखट घालतात ! हे वडिलोपार्जित आहेत, यांस निरोपही देतां येत नाहीं ! असें म्हणतांच नाना म्हणाले जे, त्या गरीबांस शिव्या कशास देतां ? आपण तिखट लोकांस घालवीत असतां म्हणून ऐकलें होतें तें प्रत्यक्ष आजच पाहिलें ! आतां लोणी दहीं आणवा. नंतर लोणी दहीं आणविलें. मग तिखट थोडें शांत जाहलें. त्यांस जन्मांत तिखटाचा संस्कार नाहीं. त्यांची फारच आग जाहली ! भोजनें होत आलीं तों रामाजी नाईक गोखले म्हणून होते त्यांचा गळा फार मोठा व सुस्वर. त्यांस दाजीनीं सांगून ठेविलें होतें कीं, तुम्हीं माझे पाठीमागें उभें असावें. मी सूचना करीन त्याबरोबर सारंगांत एक असा कडकडावून श्लोक म्हणावा जे, सारी पंगत दचकावी ! याप्रमाणें सूचना केली होती, तों त्यांस डोळा घातला. त्याबरोबर त्यांनीं जों श्लोक म्हटला तों नाना दचकून मागें पाहूं लागले ! मग दाजीनीं सांगितलें कीं, हे रामाजी नाईक गोखले आमचे पदरींच असतात. असें म्हणतांच नाना बोलले कीं, सारें खरें, परंतु हा मांडव उडाला ! आतां धर्मास दुसरा श्लोक म्हणवूं नका ! याप्रमाणें हंसूं लागले. नंतर भोजनें जाहलीं. कचेरीस येऊन विडे घेतले. नानाचा सांप्रदाय कोठें मेजवानीस गेले असतां कोणी अहेर केल्यास तें पागोटें बांधून घालावें. त्यांचे पगडबंद भिकंभट म्हणून होते त्यांनीं दाजीस सूचना केली कीं, पागोटें बांधावयास द्यावें. तेव्हां दाजीनीं सांगितलें कीं, आमचा सांप्रदाय पागोटें बांधून अहेर करावयाचा नाहीं. तेव्हां गंगाधररावकाका बोलले कीं, आपण असें कशास करतां ? बांधूनच अहेर करावा. त्यास दाजीनीं उत्तर केलें कीं, कांहीं चिंता नाहीं. तसाच अहेर करूं. नंतर कचेरींत सर्वांस अहेर केले तों नानाचे अहेराचा सरपोस सोडून गंगाधररावकाकानीं पुढें ठेविला. दाजीनीं पागोट्याचा पदर चुणून हातांत घेतला. तों नानानीं मोकळें पागोटें पाहून मनांत समजले कीं, आतां ही परीक्षा दिसती ! यास कांहीं बहाणा योजावा. असें मनांत आणून बोलले कीं,

---

१ ही भारी आचरट व थट्टेखोर व्यक्ति होती. तोतयाची धामधूम सुरू असतां तो पकडला जाईल तर आपण श्रीविष्णूपुढें नग्न होऊन नृत्य करूं असा यानें नवस केला होता !!!

तुम्हीं हातांत काय ह्मणून घेतला ? नंतर दाजी बोलले कीं, कांहीं चिंता नाहीं. असें ह्मणोन बळानें हातांत दिला. मग नाना नेसले आणि भोजनास बसले. तेव्हां पटवर्धन यांचे घरीं बायकांनीं वाढावयाचें. तेव्हां नाना बोलले जे, दाजी, ही तुमची कसली वेडी चाल बायकांनीं वाढावयाची ! दाजी बोलले कीं, आमच्या शिलेदारांच्या बायका सारीं कामें करितात ! तेव्हां नाना हंसूं लागले आणि जेवतांना बोलले—दाजींस मुलें, चार मुलगे व दोन मुली. तेव्हां नानांचे मनांत तात्या व नानां[1] हे पहिल्या कुटुंबाचे, व बाकी हीं या कुटुंबाचीं—याजवरून विचारिलें जे, या कुटुंबाची ममता या दोघांवर आहे कीं नाहीं ? कसें काय ? तेव्हां दाजी बोलले कीं, नसावयास काय जाहलें ? नाना बोलले कीं, सापत्न, सबब. तेव्हां दाजी हंसोन बोलले कीं, हीं सारीं मुलें हिचींच. पहिले कुटुंबाची एक मुलगी मात्र आहे ती रास्त्यांचे घरीं दिली आहे. असें ह्मणतांच नाना बोलले कीं, हें मला अगदीं ठाऊक नाहीं. माझी समजूत हीं दोन मुलें पहिले कुटुंबाचीं. याप्रमाणें बोलून नंतर भोजनें जाहलीं. विडे घेऊन आपले घरास गेले.

१२८. पुंढें त्रिंबकचा किल्ला बदलला तेव्हां त्याचे पारिपत्यास पुरुषोत्तमरावदाजींस पाठविलें होतें.[3] दाजीनीं जाऊन त्रिंबकचे किल्ल्याचा बंदोबस्त करून नाशकास श्रीमंत गोपिकाबाईसाहेब होत्या त्याणीं ठेवून घेतलें ते कांहीं दिवस तेथेंच होते. मातुश्रींची मर्जी यांजवर बहुत. चिरंजीव ह्मणत. पत्रें बाईसाहेब यांचीं 'चिरंजीव राजश्री' ह्मणून मायन्याचीं नाशकास होते त्या प्रकरणीं बहुत आहेत, त्याजवरून समजेल. तेथील बंदोबस्त करून पुरंदरास आले.

११९. पुरंदर मुक्कामीं असतां चिरंजीव मनाबाई ह्मणून कन्या तिचें लग्न केलें तें सासवडास केलें. बावधनकर सोनी यांचे घरीं दिली. तो समारंभ चांगला जाहला.[5]

१२०. नंतर पंढरीनाथतात्यांचे चिरंजीव हरिहरराव ह्मणून होते त्यांचें लग्न सासवडासच झालें तें पुरुषोत्तमरावदाजी यांनींच केलें.[6] पंढरीनाथतात्या यांनीं मिरजेहून दाजीस लिहून पाठविलें जे, आपण वडील आहां. त्यास समारंभ चांगला करावा. नाना व सखारामबापू यांस व श्रीमंतांसही विनंति करून समारंभास आणावें. याप्रमाणें त्यांनीं पत्र पाठविलें. नंतर समारंभास नाना फडणीस आले व सखारामबापूचे चिरंजीव आले. श्रीमंतांस येण्याविषयीं विनंति केली, परंतु किल्ल्यावरून खालीं यावयाचें यामुळें मानसिक केलें. मिरजेहून गंगाधररावँ आले होते. त्यांस बाळासाहेब ह्मणत. याप्रमाणें मोठा समारंभ जाहला.

---

१ रुष्णराव नाना. हे दाजीनीं आपल्या भावजयीच्या (नारायणराव रुष्ण यांच्या स्त्रीच्या) मांडीवर दत्तक दिले होते. २. ' पुढें ' हा शब्द येथें चुकला आहे. कारण ११७ सदरांतला मजकूर घडण्यापूर्वीचि ह्मणजे सवाईमाधवराव जन्मास आले त्या सुमारास दाजीनीं त्रिंबकच्या किल्ल्यावरचा फितूर मोडिला. पुढें पुष्कळ दिवसांनीं दाजीनीं मंगळवेढ्याहून पुरंदरास कुटुंब नेलें. त्यानंतर घडलेली हकीकत ११७ सदरांत आहे. ३ पहा ऐ. ले. सं. नं. १३६४ चें पत्र. ४ पहा ऐ. ले. सं नं. १८०८. ५ पांडुरंगराव गोविंद. ६ या लग्नसभारंभाचें वर्णन ऐ. ले. सं. नं. १७६४ मध्यें आहे. ७. गंगाधरराव गोविंद.

१२१. नानास मेजवानी जाहली ते दिवशीं दाजी यांनीं आचारी यांस सांगून तिखटाचें सार करविलें. शुद्ध भगवतीची पूड वस्त्रगाळ करून तिचें तें सार रुप्याच्या पातेल्यांत घालून चमच्यानें वाढावयास आणिलें. सर्वांस वाढवून नानास वाढविलें. आचारी यांस सांगितलें जे, वरकड मंडळीस थोडें थोडें घालून नानाचे वाटींत मात्र अंमळ अधिक घालावें. याप्रमाणें सांगितलें होतें. त्याप्रमाणें आचारी यांनीं सार वाढावयास आणिलें. सर्वांस वाढून नानास वाढिलें. नाना यांचे मनांत द्राक्षांचें सार असेल, म्हणून पांचीं बोटें बुडवून तोंडांत घातलीं तों एकच आग जाहली. तोंड तसेंच पसरलें आणि बोलले कीं, दाजी, तिखट लागलें ! असें म्हणतांच हे आचारी यांस शिव्या देऊं लागले जे, हे ××××× दररोज आम्हांस असेंच तिखट घालतात ! हे वडिलोपार्जित आहेत, यांस निरोपही देतां येत नाहीं ! असें म्हणतांच नाना म्हणाले जे, त्या गरीबांस शिव्या कशास देतां ? आपण तिखट लोकांस घालवीत असतां म्हणून ऐकलें होतें तें प्रत्यक्ष आजच पाहिलें ! आतां लोणी दहीं आणवा. नंतर लोणी दहीं आणविलें. मग तिखट थोडें शांत जाहलें. त्यांस जन्मांत तिखटाचा संस्कार नाहीं. त्यांची फारच आग जाहली ! भोजनें होत आलीं तों रामाजी नाईक गोखले म्हणून होते त्यांचा गळा फार मोठा व सुस्वर. त्यांस दाजीनीं सांगून ठेविलें होतें कीं, तुम्हीं माझे पाठीमागें उभें असावें. मी सूचना करीन त्याबरोबर सारंगांत एक असा कडकडावून श्लोक म्हणावा जे, सारी पंगत दचकावी ! याप्रमाणें सूचना केली होती, तों त्यांस डोळा घातला. त्याबरोबर त्यांनीं जों श्लोक म्हटला तों नाना दचकून मागें पाहूं लागले ! मग दाजीनीं सांगितलें कीं, हे रामाजी नाईक गोखले आमचे पदरींच असतात. असें म्हणतांच नाना बोलले कीं, सारें खरें, परंतु हा मांडव उडाला ! आतां धर्मास दुसरा श्लोक म्हणवूं नका ! याप्रमाणें हंसूं लागले. नंतर भोजनें जाहलीं. कचेरीस येऊन विडे घेतले. नानाचा सांप्रदाय कोठें मेजवानीस गेले असतां कोणी अहेर केल्यास तें पागोटें बांधून घालावें. त्यांचे पगडबंद भिकंभट म्हणून होते त्यांनीं दाजीस सूचना केली कीं, पागोटें बांधावयास द्यावें. तेव्हां दाजीनीं सांगितलें कीं, आमचा सांप्रदाय पागोटें बांधून अहेर करावयाचा नाहीं. तेव्हां गंगाधररावकाका बोलले कीं, आपण असें कशास करतां ? बांधूनच अहेर करावा. त्यास दाजीनीं उत्तर केलें कीं, कांहीं चिंता नाहीं. तसाच अहेर करूं. नंतर कचेरींत सर्वांस अहेर केले तों नानाचे अहेराचा सरपोस सोडून गंगाधररावकाकानीं पुढें ठेविला. दाजीनीं पागोट्याचा पदर चुणून हातांत घेतला. तों नानानीं मोकळें पागोटें पाहून मनांत समजले कीं, आतां ही परीक्षा दिसती ! यास कांहीं बहाणा योजावा. असें मनांत आणून बोलले कीं

---

१ ही भारी आचरट व थट्टेखोर व्यक्ति होती. तोतयाची धामधूम सुरू असतां तो पकडला जाईल तर आपण श्रीविष्णूपुढें नग्न होऊन नृत्य करूं असा यानें नवस केला होता !!!

दाजी, आपणास समजलें ? पूर्वी गोविंदपंतनाना पुण्यांत होते त्या वेळेस आमचे बाबांचा व त्यांचा अत्यंत स्नेह. रात्रीं फराळ करावयाचा जाहल्यास एकमेकांस सोडून करीत नव्हते. केवळ एकोदर बंधुच कीं काय, अशा लोभानें वागत होते. त्यापेक्षां आपले घरीं आम्हांस वस्त्रें घ्यावयाचीं नाहींत. असें म्हणतांच दाजी बोलले कीं, नाना, ठीक योजिलें! मिरजेहून पंढरीनाथतात्यानीं आम्हांस लिहून पाठविलें कीं, आपण वडील तेथें आहां. बाळास पाठविलें आहे, त्यास कोणे गोष्टीची न्यूनता न पडतां समारंभ चांगला करावा. श्रीमंतांस व नानास सर्वांस लग्नास बोलावून आणवावें. मेजवानी, वस्त्रें, सारा मजकूर लिहिला. त्याप्रमाणें आपण आलां, समारंभ चांगला केला, आणि वस्त्रें न घेतां गेलां म्हणजे आमची येथें दरबारांत किती प्रतिष्ठा आहे याची परीक्षा जाहली ! आणि लौकिकांत ही गोष्ट फार योग्य दिसेल ! त्यास आम्ही अहेर केल्याखेरीज आपणास जाऊं देतों कीं काय ? असें म्हणून हातांत पागोट्याचा पदर दिला. तेव्हां नानानीं पागोटें बांधिलें तें जशीं लहान मुलें गुंडाळतात त्याप्रमाणें गुंडाळलें ! शेला घालून नमस्कार होईपर्यंत मोठी पराकाष्ठा जाहली ! नंतर चांगलें बांधलेलें पागोटें दुसरें घातलें. नंतर निरोप घेऊन निघाले. ते वेळेस नाना गोविंदभटजी निजसुरे, त्यांचे उपाध्ये, यांस बोलले जे, गोविंदभटजी, दाजीनीं आमची परीक्षा पाहिली ! आम्हांस तिखट घातलें, श्लोक म्हणविला आणि मला पागोटें बांधावयास येतें किंवा नाहीं हें कोणास ठाऊक नव्हतें तीही परीक्षा पाहिली ! असें बोलून पालखींत बसून पुरंदरास गेले. याप्रमाणें दाजी यांनीं नाना फडणीस यांची परीक्षा पाहिली.

---

१ हे निजसुरे उपाध्ये नेहमीं नानाजवळ असत व दरबारांत कोणाचीं कामें करून देऊन कांहीं पैकाही मिळवीत. बजाबा बावळे ह्मणून नानाच्या मर्जीतले एक कारकून होते त्यांजकडे नान किरकोळ न्यायमनसुबीचीं कामें कधींमधीं सोंपवीत असत. हरिपंत फडके हेही मूळचे फडणिशीकडचे कारकून असून केवढ्या योग्यतेस चढले होते हें प्रसिद्धच आहे. नानांजवळ राजहंस आडनांवाचा कोणी कारकून होता त्यास बढती मिळण्याचा योग येईना. बिचारा पुष्कळ वर्षें वाट पाहून पाहून थकला. शेवटीं त्यानें खालीं लिहिलेला श्लोक चिठ्ठीवर लिहून नानाकडे पाठविला–

भानूदयीं निजसुरा भट होय जागा ॥
तो बावळा असुनि न्याय करी बजा गा ॥
पीतांबरासमहि त्या फडक्यास मान ॥
मी राजहंस फुटक्या कवडी समान ! ॥ १ ॥

यांत भानु, निजसुरा, बावळा, पीतांबर, फडका या शब्दांत श्लेष आहे हें श्लोक वाचतांच ध्यानांत येण्याजोगें आहे. २ पूर्वीच्या काळांत सर्वच लोक पागोटीं घालीत असत यामुळें ज्याचें त्यास पागोटें बांधतां येणें जरूरच होतें. मग तो किती का श्रीमंत असेना ! नानास पागोटें बांधतां येत नव्हतें हा त्यांचा उणेपणा दाजीनीं उघडकीस आणिला ! त्या काळचीं पागोटीं लहान असून बांधणी अगदीं साधी असे. चक्रीदार पागोट्याची तऱ्हा पेशवाई गेल्यानंतर निघालेली असून ती पुण्यांत प्रथम मोघे आडनांवाच्या कोणी पगडबंदानें काढिली असें सांगतात.

१२२. पुरुषोत्तमरावदाजी एके दिवशीं आपले इनामगांवीं मौजे आंबें परगणे मंगळवेढें येथें ठाण्याचें काम चालत होतें तें पहावयास आले. चार दिवस होते. मौजे चळें परगणे मजकूर येथें निरंजनअय्या ह्मणून जंगम होता तो आंब्यास आला होता. तों दाजी आले त्यांजपाशीं येऊन फारच आर्जवानें पुढें पुढें बोलूं लागला. हे गंगेस[२] स्नानास गेले तेथें समागमें आपण जाऊन त्याजवळ रुद्राक्षांची माळ सोन्यांत गांठविलेली होती ती पाण्यांत भिजवून दाजीजवळ ठेविली, आणि जंगम बोलला जे, ही माळ आपण घ्यावी. तेव्हां हे जप करीत होते, कांहीं बोलले नाहींत. माघारे येते वेळेस सांगितलें कीं, आम्हांस कांहीं ही माळ नको. असें म्हणून ठाण्यांत आले. भोजन जाहलेनंतर मंगळवेढ्यास[१] जातेसमयीं गांवांतून जयराम पाटील यास बोलावून आणवून ताकीद केली जे, हा जंगम जर पुन्हां गांवांत आला तर तुझें डोचकें फोडीन ! हा चोर आहे. असें सांगून मंगळवेढ्यास गेले. पुढें आठपंधरा दिवशीं पंढरपुरीं दरवडा पडला त्या दरवड्यांत हा जंगम सांपडला. त्यास बेडी घालून मिरजेस बंदींत पाडिला.[२] याप्रमाणें दाजी यांची मनुष्य-परीक्षा होती. कोण मनुष्यें कशीं हें त्यांचे तोंडावरून ओळखीत होते. ही कथा पुरंदरास रहावयाचे पूर्वीची.

१२३. दाजी यांनीं पंढरीस मंगळमूर्तिबावा महान साधु होते त्यांस पालखींत बसवून आंब्यास आणिलें. त्यांनीं आंब्यास येऊन आंत किल्ल्यांत श्रीउत्तरेश्वर शिवालय आहे तेथें रात्रीं निद्रा केली. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं उठून दाजींस बोलले कीं, अरे पुरुषोत्तम, तुला नाना पेशवे यांनीं हें स्थळ दिलें आहे हें तुझे वंशपरंपरेनें चालेल. कांहीं चिंता नाहीं. असें म्हणतांच दाजीनीं पायांवर डोई ठेविली. बावानीं मस्तकीं हात ठेविला. याप्रमाणें दाजी यांजवर भगवद्भक्तही कृपा करीत.

१२४. एके दिवशीं पुरंदरीं दाजीचे चिरंजीव तात्या श्रीमंत बाईसाहेबांकडे दर्शनास गेले तों बाईसाहेब बिछान्यावर बसल्या होत्या. त्यांचे बंधु महिपतराव बापू साठे आले ते बिछान्यावर बसले. तों तात्या गेले. तोत्यानीं नमस्कार करून खालीं जाजम होतें त्यावर बसूं लागले. तों बाईसाहेब बोलल्या जे, अरे तात्या, वर बैस. तुला काय, जसा माझा बापू तसा तूं. असें ह्मणतांच हे तसेच बसले. तों बाईसाहेब पुढें वांकून हातास धरून ओढून आपले बिछान्यावर बसविलें. याप्रमाणें बाईसाहेबांचा पूर्ण लोभ. केवळ आपले मुलाप्रमाणें मानीत.

१२५. एके दिवशीं पुरुषोत्तमरावदाजी आपले घरीं भोजन करून विडे खात बसले. बसावयाचा पांढरा बुर्णूस होता तो फाटका होता. तों अकस्मात् नाना फडणीस बातमी राखून आले ते फाटक्या बुरणुसावर बसले. दाजी बोलले, ' नाना, हें काय ! अरे,

---

१ किल्ला बांधण्याचें. २ भोमेस.

गालिचा आणा,' म्हणून सांगतात, तों नाना बोलले कशास गालिचा ! हा बुरणूस बरा आहे. दाजी, बुरणूस धड नाहीं कीं काय ? तेव्हां दाजी नानास बोलले, नाना, आमचें शिलेदाराचें काय, मिशीवर तांदूळ ठेऊन संसार करावयाचा ! असें म्हणतांच नाना हंसूं लागले.

१२६. आणखी एके दिवशीं दाजी दरबारास गेले तों श्रीमंत भवानराव प्रतिनिधि यांची स्वारी आली ती अगोदर दाजीचे घरीं आली. पालखींतून उतरले आणि आंत आले. तों तात्या व नाना आंत लिहीत होते. जवळ चिंतोपंत घारपुरे कारकून होते. चिंतोपंत यांनीं उभयतांस घेऊन जाऊन नमस्कार करविला. तेव्हां पंत बोलले कीं, दाजी कोठें आहेत ? चिंतोपंत बोलले कीं वाड्यांत गेले आहेत. नंतर बोलले कीं, वहिनी कोठें आहेत ? असें ह्मणून तसेच आंत गेले तों मातोश्री आई वाती करीत होत्या तेथें आले; आणि वहिनी, नमस्कार करितों, ह्मणून भुईस हात लावून नमस्कार केला. तेव्हां चिंतोपंतानीं विनंति केली कीं, महाराज, आपण यजमान. हें काय ! मग पंत बोलले कीं, दाजीचे घरीं तसें ह्मणावयाचें नाहीं. मी दाजीचा धांकटा बंधु असें बोलले.[२] नंतर वाड्यांत गेले. याप्रमाणें पंतांचा पूर्ण लोभ.

१२७. पंतानीं वरचेवर सांगावयाचें कीं, दाजी, एक वेळ कऱ्हाडास यावें, असें सांगत. तेव्हां एकदां चिंचणेरास कानिटकर दाजींचे श्वशुर होते तेथें हे गेले होते. तेथून पुण्यास जावयाचें तें कऱ्हाडास सांगून पाठविलें कीं, मी आपल्यास भेटून पुण्यास जाईन, अशी सूचना केली होती. दाजी चिंचणेराहून निघाले ते कऱ्हाडास गेले. अगोदर श्रीगंगेस स्नानास उतरले. समागमें तात्यास घेतलें होतें. पालखी, दहा पांच घोडीं, याप्रमाणें गेले. गंगेवर आले ह्मणून पंतांस बातमी लागली आणि पंत लवाजमा, पालखी, हत्ती स्वार घेऊन आपण पायानें सामोरे आले. तों घोडीं माणसें पाहून दाजी बोलले कीं, काय करावें ! किंवडा सामोरा आला ! पंतांस ऐकूं येत नव्हतें. लढाईंत गुरघुंसाची जखम लागून कान गेले होते. जखम डोकींत लागली होती. यांनीं संध्या आटोपून शेला पागोटें घालून तयारी करितात तों पंत जवळ आले. हे दहापांच पावलें आडवे जाऊन वांकून नमस्कार केला. पंत भेटले. दाजी बोलले कीं, हें काय केलें ! आपण आडवे कशास्तव आलां ! आह्मी सेवक आपले. असें म्हणतांच पंत बोलले कीं, आपण वडील बंधु म्हणून आलों ! दाजीनीं विनंति केली कीं, आतां पालखींत बसावें. पंत म्हणाले कीं, कशास पाहिजे ? असें ह्मणून तसाच हात धरून चालत वाड्यांत गेले. जाऊन श्रीदेवीचें दर्शन करविलें. नंतर मागील चौकांत गेले तों पंतांच्या उभयतां स्त्रिया होत्या व मावशी होती त्यांस पंत बोलले कीं, मा-

१ सन १७७५ च्या फेब्रुवारींत भवानराव प्रतिनिधि पुरंदरास होते. पहा ऐ. ले. सं. नं. १४४०.
२ यावरून भवानराव पुरुषोत्तमरावापेक्षां वयानें लहान होते हें सिद्ध झालेंच. अर्थात् ते स. १७७७ त वारले तेव्हां त्यांच्या वयास अठ्ठेचाळीस वर्षें झालीं नव्हतीं. ३ गुरघूस हें गदेसारखें एक हत्यार आहे.

वशी, त्यांस नमस्कार करावयास सांगा. असें म्हणतांच त्यांनीं येऊन दाजीस नमस्कार केला. दाजी बोलले कीं पंत, हें काय? असें म्हणून पुन्हां दाजीनीं उभयतां बाईसाहेबांस नमस्कार केला. नंतर माजघरांत आले. मग आंबे पिकले आणविले. तऱ्हेतऱ्हेचे आंबे आणून पाट व ताटें मांडिलीं. तेव्हां तात्यानीं शेला पागोटें काढून पाय धुवून पाटावर बसले. दाजी तसेच बसले. मग आंबे चिरून काप वरचेवर ताटांत घालीत. पंत आंब्याचीं नांवें सांगत. हा अमका आंबा, हा अमका आंबा इत्यादि. पंत बोलले कीं दाजी, तुमचे चिरंजीव अंगरखा पागोटें काढून आंबे खावयास बसले, आणि आपण तसेच बसलां? असें म्हणतांच दाजी बोलले कीं, त्यास काय ठाऊक? आंबे खावयास पागोटें काढल्यावर मग जेवावयास काय करावें? नंतर पंत हंसों लागले. मग भोजनें झालीं. आठ दिवस ठेऊन घेतलें. आपले प्रपंचाची सारी शिस्त दाखविली. खर्च काय, आदा काय, हें सारें दाखवून मग पंतांचा आग्रह पडला जे, दाजी, तुम्हीं माझेजवळ रहावें. तुम्ही जितकें पाणी प्यावयास सांगाल तितकें पाणी पिऊन राहीन! दाजी बोलले कीं, मी एकाचा चाकर आहेंच, आणि आपलेजवळ कसा राहूं? त्यांजपाशीं मागून घ्यावें. त्यांनीं निरोप दिला तर येईन.

१२८. याप्रमाणें पंत अगदीं दाजींचे अर्धे वचनांत. इतका लोभ पडावयास कारण असें कीं पूर्वी दादासाहेब यांचे बंदींत पंत होते तेव्हां पंतांस काढून द्यावें अशी मसलत पटवर्धनानीं ठरविली. तेव्हां दाजी यांनीं पुराणिकाचा वेष घेतला. बरोबर एक शिष्या, त्याचेजवळ पुस्तक, याप्रमाणें प्रहर रात्रीं आवशीचे गेले. तों चौकीदार यांनीं विचारिलें, कोण आहे? यांनीं सांगितलें कीं, मी पंतांचा पुराणिक आहें. पुराण सांगावयास जात असतों. तेव्हां भटभिक्षुक यांस नेहमीं चौकीदार सोडीत, त्यामुळें हे आंत गेले. तों पंतानीं ओळखिलें. क्षणभर दाजी तेथें बसले. नंतर पंतांस सूचना केली कीं, आतां निघावें. तेव्हां पंत बोलले कीं, दाजी, हें काय करतां? सांपडल्यास उभयतांची अब्रु जाईल! हे बोलले कीं, आपणास काय, आपण निघावें. ही माझी पोथी काखेंत घ्या. असें म्हणून पोथी काखेंत दिली. प्रथम शिष्या आणिला होता तो शूद्रच होता. त्यास ब्राह्मणाचा वेष दिला होता. तो शूद्र पुढें, त्यांचे पाठीमागें दाजी, त्याचे पाठीमागें भवानराव प्रतिनिधि, याप्रमाणें निघाले तों चौकीदार यांनीं विचारिलें, कोण आहे? तेव्हां दाजी बोलले कीं, पुराणिक आहें. पुराण जाहलें, आतां माघारे जातों. चौकीदार बोलले कीं हा तिसरा कोण आहे? तेव्हां दाजी बोलले कीं, पंतांनीं पोंहचवावयास माणूस दिला आहे. असें म्हणून गोटाचे बाहेर आले. तेथें सरंजाम यांजकडील तयारच होता. निघून पार जाहले. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं समजलें कीं प्रतिनिधि पळाले[1]! त्या दिवसापासून दाजींवर पंतांचा पूर्ण विश्वास. जें दाजी सांगतील तें प्रमाण.

---

१ भवानराव प्रतिनिधीस दादासाहेबानीं प्रतिबंधांत ठेवण्याचा प्रसंग स. १७६३ सालीं घडलेला असावा.

१२९. भवानराव व भगवंतराव या उभयतांचा कज्जा होता. तेव्हां भगवंतराव यांजकडील हणमंतभट म्हणून होते, परंतु शिपाई मोठे मर्द माणूस होते[1]. तेव्हां हणमंतभट हे विटें खानापुरांत होते तेथें भवानराव ठाणीं घालावयास आले असतां हणमंतभट यानीं गोळी वाजविली. खानापूर लढों लागलें. तेव्हां भवानराव यांचें पत्र दाजीस आलें जे आपण यावें. आणि हणमंतभट यांचेंही पत्र दाजीस आलें जे, आपण यावें, आणि पंतांचा व माझा सल्ला करून द्यावा. तेव्हां दाजी पुरंदराहून श्रीमंतांचा निरोप घेऊन खानापुरास गेले. जाऊन हणमंतभटास बोलावणें पाठविलें जे, भेटीस येणें. बाहेर पंतांचे मोर्चे बसलेले. दाजींचें बोलावणें जातांच हणमंतभट त्या वेळेसच बाहेर पडून पुरुषोत्तमरावदाजीचे राहुटीस आले. दाजीनीं त्यास विचारिलें जे, तुह्मी लढाई किंनिमित्त करितां? तुम्हांस उभयतां यजमान सारखेच. तेव्हां हणमंतभट बोलले जे, जसा आपणं माझा बंदोबस्त कराल तो मला शिरसावंद्य आहे. असें म्हणतांच दाजी बोलले कीं अगोदर पंतांचे भेटीस चला. तेव्हां हणमंतभट बोलले जे, आपण पंतांचे कानावर मजकूर घातला नाहीं आणि कसे घेऊन जातां? दाजी बोलले कीं, तें तुम्हांस काय, तुमच्या केंसास धक्का तो माझ्या प्राणास. असें म्हणून हणमंतभटास घेऊन निघाले ते पंतांचे लष्करांत आले. तेव्हां लष्करचे लोकांनीं हणमंतभटास पाहून आश्चर्य करूं लागले. तेव्हां दाजी पंतांचे राहुटीजवळ गेले. बाहेर हणमंतभटास बसवून आपण आंत गेले. पंतांनीं दाजी येतांच उठोन उभे राहून भेटले. आणि बोलले जे, आपण आलां, ठीक जाहलें. असें म्हणतांच दाजी बोलले कीं, हणमंतभट आपले पदरचा असें असून त्यांसीं लढाई करण्याचें काय प्रयोजन? पंत बोलले जे, तोच किल्ला लढवीत आहे. तेव्हां दाजी बोलले कीं, मी त्यास भेटीस आणवितों. पंत बोलले कीं, तो येणार नाहीं. असें ह्मणतांच दाजीनीं हणमंतभटास हांक मारिली. हांक मारितांच ते आंत आले. दाजी बोलले कीं, पंत, हणमंतभटास भेटावें. असें म्हणून उभयतांची भेट करविली. नंतर तेथेंच बसून हणमंतभटाकडून किल्ल्याची सोडचिठी देवविली. पंतांचें निशाण वर चढविलें व भगवंतराव यांचे वेळेस हणमंतभटाचा जसा बंदोबस्त होता त्याप्रमाणें पंतांकडून करवून देऊन त्यास त्याचे गांवास जरा बाजरा सुद्धां पोहोंचवून देऊन पंतांचा निरोप घेऊन आपले घरास आले. याप्रमाणें पंत अगदीं अर्ध वचनांत होते. पंत यांचा आपलेजवळ राहणेचा फारच आग्रह पडला, मुलास तरी ठेवा म्हणों लागले, तेव्हां बळवंतरावकाका यांचे नांवची असामी करून घेतली. याप्रमाणें कथा वडिलांनीं सांगितली ती लिहिली असे[2].

---

१ हणमंतभटाचें नांव ऐ. ले. सं. नं. १८२४।१८२५ मध्यें आलें आहे. २ ही १२९ सदरामधील गोष्ट स. १७७६ च्या एप्रिलांत घडली असावी. कारण त्या वेळीं पुरंदराहून पुरुषोत्तमरावदाजी भवानरावाच्या लष्करांत आले होते, पहा ऐ. ले. सं. नं. १८३५.

१३०. पुरंदरास दाजीनीं श्रीमंतांजवळ मुखत्यारी केली. वाड्यांत दरोबस्त हुकूम पुरुषोत्तमरावदाजी यांचा. वाड्यांतील हुजूरचे कामगार यांस नाना यांनीं हें असें कां केलें म्हणोन विचारलेवर त्यांनीं सांगावें जे, दाजी यांनीं सांगितलें म्हणून केलें. मग नानानीं कांहीं बोलूं नये.

१३१. नाशकाकडे त्रिंबकचे किल्ल्याचे बंदोबस्तास दाजी गेले होते[1]. तेव्हां रघुनाथरावदादा कुरुंदवाडकर बरोबर होते. त्यांनीं वडिलांजवळ दाजींची गोष्ट सांगितली ती लिहितों. तिकडे गेले होते तेव्हां वेरुळास गेले. पूर्वी वेरूळची पाटीलकी त्रिंबकपंतआपानीं खरेदी घेतली होती. तेव्हां हे पाटील आपल्या गांवीं आले म्हणून गांवकरी यांचे भेटीस आले. तेव्हां दाजी यांनीं एक काळी घोंगडी व एक काठी आणविली आणि ती रघुनाथरावदादा यांचे खांद्यावर काळी घोंगडी व हातांत काठी देऊन त्यांस त्या गांवकऱ्यांत नेऊन उभें केलें आणि भेट आणविली ती दादांकडून आपलेपुढें ठेवविली; आणि त्या कुणब्यांत दादांस बसविलें ! ही कथा दादानीं आपले मुखें वडिलांजवळ सांगितली कीं, मला अतें जाहलें जे, या कुणबटांतून दाजी केव्हां ऊठ म्हणतील ! नंतर मग गांवकरी यांस निरोप दिला. मग दादानीं घोंगडी काठी फेंकून दिली ! याप्रमाणें विनोद, मस्करी करण्याचा सांप्रदाय दाजींपासून पटवर्धन यांचे घरीं प्रसिद्ध जाहला.

१३२. पुरंदरास असतां परशुरामभाऊची पत्नी गर्भिणी जाहली हें वर्तमान दाजींस समजलें. मग डोहाळ्याचा जिन्नस तेथून रवाना केला तो तासगांवास आला. तीं पत्र परशुरामभाऊनीं वाचून पाहिलीं त्यांत जिनसाचें पत्र व त्याबरोबर तो बस्ता कापडानें बांधिला होता. तेव्हां भाऊ म्हणाले जे, ही कांहीं मस्करी दाजीनीं केली असेल. जिन्नस तिकडे घरांत नेऊन सोडा ! असें सांगून राधाबाई[2] ताईकडे जिन्नस रवाना केला. कारकुनानीं पत्र वाचून दाखविलें आणि तो बस्ता सोडावयास लागले. प्रथम पांढरें कापड सोडलें तों आंत खारवा निघाला. त्याचे आंत गजनी; त्याचे आंत हंबरू, किनखाब वगैरे असे सात तट होते. आंत रुप्याचा डबा पाहिला. तो जों उघडतात तो आंत मोठा थोरला खेंकडा पाहिला ! तों सारे हंसूं लागले. हें वर्तमान परशुरामभाऊस समजलें. मातुश्री आईसही समजलें. सारे हंसूं लागले. याप्रमाणें विनोद करण्याचा सांप्रदाय होता.

---

१ दाजी त्रिंबकच्या किल्ल्याचा बंदोबस्त करण्याकरितां गेले ते स. १७७४ च्या एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यांत. ते गंगापुरास गोपिकाबाईजवळ राहिले असतां त्यांस भेटण्याकरितां रघुनाथराव लष्करांतून आले होते. पहा ऐ. ले. सं. नं. १३६४. २ हें वेरूळ कोणतें ? लेण्यांचें वेरूळ तर खचित नव्हे. कीं गांवाचें नांव लिहिण्यांत कांहीं चूक आहे ! त्रिंबकपंत आप्पा हे रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचे आजे. ३ पाटील कोणते हें गांवकऱ्यांस माहीत नसल्यामुळें दाजी आपण पाटील बनले व खरोखरीचे पाटील यांस गांवकऱ्यांत कुणब्याचें सोंग देऊन उभें करून त्यांजकडून आपणापुढें भेट ठेवविली ! ४ परशुरामभाऊची स्त्री. ५ भाऊची आई जानकीबाई.

१३३. दाजीनीं लष्करांत देखील मस्करी करावी. एके दिवशीं थोरले श्रीमंत माधवरावसाहेब असतां लष्करांत दाजीनीं एक घूस धरून आणिली आणि तिच्या शेंपटास पलिते गुंडाळून शेंपूट पेटवून रात्री सोडून दिली. ती गोटोगोट हिंडूं लागली. तों छापा आला ह्मणून सारे लष्करांत गलबल जाहली ! तों ती घूस पेटलेलें शेंपूट घेऊन श्रीमंतांचे लष्करांत खासा बाडाचे आंत गेली. तेव्हां तेथेंही गलबल जाहली. मग हवया पेटवून पाहतात तों घूस ह्मणून समजलें ! नंतर चौकशी केली जे, ही आली कोठून ? तों पटवर्धन यांचे गोटांतून आली असें समजलें. तेव्हां श्रीमंत बोलले कीं, तें पुरुषोत्तमराव याचें काम ! दुसरे दिवशीं श्रीमंतानीं विचारिलें आणि बोलले जे, असें करूं नका. खरें किंवा लटकें कांहींच न समजतां एखादे वेळेस तुह्मांस कठिण जाईल ! श्रीमंतांचा राग मोठा, परंतु पुरुषोत्तमराव यांजवर पूर्ण कृपा, यामुळें ती गोष्ट खपली ! याप्रमाणें मस्करी करावयाचा दाजींचा सांप्रदाय होता.

१३४. पुरंदरास असतांना हरिपंततात्यानीं येऊन सांगितलें कीं, आज दादासाहेब यांजकडील मंडळी वगैरे श्रीमंतांच्या भेटीस येणार ते आपलेकडे येणार आहेत. त्यास आह्मी गोष्ट दादासाहेब यांची काढितों. नंतर आपण मोघम त्या मंडळीस शिव्या द्याव्या ! असें सांगून ठेविलें. नंतर ती मंडळी किल्लयावर आली. येऊन दाजीकडे आले तों हरिपंततात्या व लक्ष्मणपंत देशमूख हे प्रथम येऊन बसलेच होते. त्यांनीं गोष्ट काढिली जे, दादासाहेब केवळ सांब अवतार असें असतां ही गोष्ट जाहली हें फार वाईट जाहलें ! असें बोलतांच दाजी बोलले कीं, दादासाहेब भोळे, त्यांजकडे काय ! परंतु जवळ चार लुचे होते त्यांनीं नासलें ! ती मंडळी ह्मणूं लागली जे, दाजी, मी त्यांत नाहीं. दुसरे ह्मणूं लागले जे, मी त्यांत नाहीं. ' जवळचेच ×××××! दादासाहेबांकडे कांहीं नाहीं ' असें दाजी पुनः पुनः बोलते. तेव्हां ते ह्मणूं लागले, आपण आमची पूजा केली ! कोणीं केलें तरी सर्वांवर येणार. असें बोलून नंतर ते आलेले गृहस्थ निरोप घेऊन गेले.

१३५. सरकारांतून दाजीस दौलताबादेस तोतयाचे चौकशीस पाठविलें तेव्हां ते दुसरा मातबर मनुष्य समागमें मागून घेऊन गेले. तेथें जाऊन तोतयाकडे चार वेळ गेले ते सरकारचे कारकुनाखेरीज गेले नाहींत. त्यास विचारिलें जे, भाऊसाहेब यांच्या व आमच्या बहुत वेळ गांठी पडोन बोलणीं जाहलीं आहेत. त्यांतील खुणेची गोष्ट एक सांगा. असें म्हणतांच तो बोलला त्यांतील कांहीं एक गोष्ट पटली नाहीं. तेव्हां त्याचे तोंडावर दाजी बोलले जे, तूं ××× लबाड आहेस. थोराचे नांवास बट्टा लावावयास आलास ! याप्रमाणें साफ उत्तर सांगून निघून आले.

---

१ या गोष्टींत कांहीं अतिशयोक्ति आहे. २ पुरंदरचा तह ठरल्यावर दादासाहेबांस मात्र इंग्रजांनीं सुरतेंत राहूं दिलें व बरोबर सरदार व कारकून वगैरे होते त्यांस काढून लाविलें. ते लोक हरिपंततात्याकडे आले तेव्हां त्यांस बरोबर घेऊन तात्या फौजेसह परत पुण्यास आले. त्यानंतरची ही १३४ सदरांतली गोष्ट.

१३६. पुढें तोतया मिरजेस आणून ठेविला. सखारामबापूचे वांकुडपणामुळें बुद्धचा मिरजेचे किल्ल्यांत कैदेंत ठेविला. नंतर पांडुरंगरावतात्या यांनीं वरचेवर दाजीस पत्रें पाठविलीं जे, तोतया येथून काढून आणखी कोठें ठेवावा. येथील मंडळी त्याजकडे ग्येतात संवरतात. सरकारी एकादा पेंच येईल. असें लिहिलेवर दाजीनीं सरकारांत विनंति करून कोंकणांत रत्नागिरीस किल्ला आहे तेथें पाठविला.

१३७. तो किल्ला रामचंद्र नाईक परांजपे यांजकडे होता. तेथें त्यांची स्त्री अन्नपूर्णाबाई ह्मणून होती, ती फितून तोतयानें तो किल्ला बळकावून दरोबस्त कोंकणपट्टींत ठाणीं घातलीं व कोंकणपट्टींतील किल्ले सारे घेतले. तों एके दिवशीं पुरंदरास पत्र आलें त्यांत लिहिलें होतें कीं, सुवर्णदुर्ग किल्ला तोतयानें घेतला. तो किल्ला हरिपंत फडके यांजकडे होता. तेथें हरिपंत यांचे पुतणे होते. तेव्हां लक्ष्मणपंत देशमुख दाजीकडे येऊन सांगूं लागले कीं, आज सुवर्णदुर्ग किल्ला तोतयानें घेतला अशीं सरकारांत पत्रें आलीं. तो किल्ला हरिपंत फडके यांजकडे होता. त्यास मी आज जेवतांना गोष्ट काढतों. आपण हरिपंत यांस पुष्पें समर्पण करावीं ! असें सांगून गेले. दाजी राहिले होते त्याच घरांत दप्तरचे कारकून जेवीत. माजघरांत निम्में कूड घालून निम्मेंत दप्तरचे कारकून जेवीत आणि निम्मे घरांत दाजी रहात. तों तिकडे कारकून मंडळी भोजनास बसली त्यांतच हरिपंत जेवीत. इकडेही दाजी भोजनास बसले. भोजन करतांना दाजीनीं विचारिलें जे, देशमुख, आज सरकारांत तोतयाचें वर्तमान काय आहे ? तेव्हां देशमुख बोलले जे, सुवर्णदुर्ग किल्ला तोतयानें घेतला ह्मणून पत्रें आलीं. तेव्हां दाजीनीं विचारलें जे, तो किल्ला कोणाकडे होता ? तेव्हां देशमुख बोलले कीं, हरिपंतांकडे होता. मग दाजी बोलले कीं, अहो, हे ×××असेच किल्ले गमावतील ! आम्हाकडे किल्ला कोणी देईना ! कसा तोतया घेतो पाहीन ! असें ह्मणतांच हरिपंततात्या बोलले जे, दाजी, मी समजलों. आमची पूजा आपण केली ! दाजी बोलले कीं, तात्या, आपणास मीं कांहीं ह्मटलें नाहीं. बरें, मला एखादा किल्ला देऊन पहावयाचा होता कसा तोतया घेतो तो ! तात्या बोलले कीं, त्या पोरानें दाजी, माझे तोंडास काळोखी आणिली. याप्रमाणें भोजन करतांना बोलले. भोजनें जाहलियावर हरिपंततात्या दाजींकडे आले. नंतर सारें वर्तमान सांगितलें. चार घटका बसुन इकडील तिकडील वर्तमान सांगून निघून गेले. याप्रमाणें पुरंदर मुक्कामीं दाजी यांनीं सरकार चाकरी एकनिष्ठपणें करून लौकिक संपादन केला.

१३८. आतां मूळपुरुषापासून वंशावळ लिहितों. मूळपुरुष हरभट. त्यास तीन पुत्र जाहले. प्रथम बाळंभट. दुसरे कृष्णंभट. तिसरे रघुनाथभट.

१३९. त्यांत वडील बाळंभट यांस तीन पुत्र जाहले. पहिले हरभटबावा ब्रह्मीभूत. केशवभट दुसरे. विठ्ठलभट तिसरे.

शिबंदींत यांस कसर राहती; परंतु पुरुषोत्तमरावदाजी यांस दुखणें आलें तेव्हां पुरंदरची हवा सोसेना, सबब पुण्यास गेले. तेथें नाना फडणीस समाचारास आले. त्या वेळेस दाजी बोलले कीं, नाना, मी आपले तोंडानें आपला पराक्रम काय वर्णन करूं ? परंतु माझें मनांत असें होतें जे, हा धनी थोर व्हावा आणि आमचे शत्रु मोगल वगैरे आहेत त्यांशीं युद्ध-प्रसंगास लाख फौज उभी असावी आणि भर लढाईमध्यें आमचे तुकडे होऊन जावे, असें मनांत होतें. परंतु हें दुर्मरण मला आलें असें दिसतें ! तेव्हां नाना बोलले जे, तुम्ही वांचाल आणि तसेच मराल ! दाजी बोलले जे, या दुखण्यांतून वांचावयाचें कठिण. असें म्हणून आणखी सांगितलें जे, मी येथें कुटुंबसह आलों. मला आपण तैनातेखेरीज पैसा देत नाहीं. माझें सारें कुटुंब मंगळवेढ्यास आहे तेथें खर्च सारा आहे, त्यास चारशें प्यादे आपण करून दिले, त्यास रोजमुरा सरकारांतून अकरमाही येतो, पण मी दसमाही देतों. एक महिना काटून घेतों. पुढें सरकारांत कोणी समजावून मुलांचें घर बुडवितील यास्तव विनंति केली आहे. मी खर्चासाठीं घेतों. असें म्हणून तात्याचा हात घेऊन नानाचे हातांत घातला. याप्रमाणें केलें. असें असतांही पुढें कसर समजवावी म्हणून सरकारांतून निकड लाविली. रोजमुरा देईनात, आणि ह्मणूं लागले जे, दाजीनीं कांहीं कसर समजाविली होती. त्यास तुम्हीं समजवावी असें म्हणूं लागले. तेव्हां हरिपंततात्या यांचे कानावर घातलें. तात्या म्हणों लागले जे, काय करावें ! तुमचे चुलत्यानीं तुह्मांवर शस्त्र धरिलें आहे ! बरें, आतां एक करा. एकंदर कसरीचा ऐवज अजमासेंवार जमा धरून खालीं त्यास खर्च लावा. उगेच गोळा बेरीज खर्च लिहा. पागा, भोजनखर्च, जासूद, प्यादे, शिबंदी, ढालाईत, दरबार खर्च, कापड, वगैरे खर्च लिहून खालीं दोन अडीच हजार रुपये सुमारें शिल्लक काढून अशी यादी करून आणावी, असें सांगितलेवरून त्याप्रमाणें याद केली आणि नेऊन दिली. ती हरिपंत घेऊन नानाकडे गेले आणि बोलले कीं, हरिहरराव पटवर्धन यांस कसरजमा समजवावी म्हणून आज्ञा जाहली, सबब त्यांनीं याद करून आणून दिली आहे. त्यांस पैसा देखील उरत नाहीं. त्यांचा सारा खर्चच येथें आहे. ही याद पहा. असें ह्मणून याद पुढें ठेविली. नानानीं पाहून हरिपंत यांचे अंगावर टाकिली. तेव्हां हरिपंत बोलले जे, मखलासी करितों. ही शिल्लक त्यांस बक्षीस करावी. असें ह्मणतांच नाना बोलले जे, तुमचे मनास

---

१ जो इतरांस शाप तो वीरास आशीर्वाद ! ! ! २ पायदळाच्या लोकांकडून बारमहा चाकरी घेऊन अकरा महिन्यांचा पगार देण्याचा प्रघात सार्वत्रिक होता. कोठें बारा महिने अकरा दिवसांची चाकरी घेऊन अकरमाहीचा एक महिना व 'सुरनिशीचे' ह्मणून अकरा दिवस कापून घेत. क्वचित् वर्षांतून दोन महिन्यांचा पगार कापून घेत. दाजी याचप्रमाणें दसमाही पगार देत. शिवाय चाकरीवर रुजू होते वेळीं तमातीच्या कारकुनास चेहरेपट्टी लिहिण्याबद्दल दर शिपायास एक रुपया द्यावा लागे. चेहरेपट्टींत जात, वय, वर्ण, वतन (मूळ ठिकाण), हत्यार, तैनातीची रक्कम व बटवड्याचा रिवाज हीं सर्व लिहिलेलीं असत. जसें—महमदखान वल्द नूरखान, पठाण, उमर वर्षे ३०, वर्ण गोरा, वतन पिशोर (पेशावर), बंदूक, तैनात साडेदहा रु० दीडमाही, इ०, ३ बजेटाप्रमाणें. अजमास ह्मणजे बजेट.

येईल तसें करावें ! तेव्हां हरीपंततात्यांनीं मखलासी केली आणि बोलले जे, सरकारचे मर्जी-पुढें उपाय नाहीं. हा ऐवज फुकट त्यांचे अंगावर ! त्यांनीं उगाच अजमास लिहून आणिला. कच्चा हिशेब पाहिल्यास इतकी देखील शिल्लक नाहीं. असें म्हणून मखलासी केली जे, निम्मे साडेबाराशें रुपये सरकारांत यावयाचे. बाकी साडेबाराशें रुपये हरि पुरुषोत्तम यांस बक्षिस-अशी मखलासी करून नानापुढें ठेविली. नानानीं तेरीख[1] घालून याद संपवून हरीपंत यांचे अंगावर टाकून दिली. नानाचा अंतर्यामीं लोभ, परंतु हें सरकार काम, सबब बाह्य प्रकारें बोललें जे, 'हरीपंत, तुह्मी सरकारचा ऐवज बुडविला !' असें बोलले. हरीपंत याद घेऊन खालीं आले आणि चिंतोपंत घारपुरे, पटवर्धनांकडील कारकून, याचे हवालीं याद करून बोलले जे, साडेबाराशें रुपये तुमचे[2] चुलत्यानें तुमचे अंगावर पाडिले; हे देशमुखांकडे देऊन पावती घेणें; असें सांगितलें. नंतर साडेबाराशें रुपये देशमुखांकडे देऊन पावती घेतली. त्या यादीची नक्कल आहे त्यावरून पहावें. याप्रमाणें मजकूर वडिलांनीं सांगितला तो लिहिला आहे.

१५१. पुढें बळवंतराव काका यानीं फितूर प्रकरण केलें तेव्हां त्यांस सरकारानीं कैद केलें. ते समयीं परशुरामभाऊ यानीं सोडाविलें. तळेगांवचे स्वारीस सरकारचें बोलावणें भाऊस आलें तेव्हां भाऊनीं सांगितलें जे, आमचे पायांत बेडी आहे. तेव्हां बेडी असोन घोडयावर बसावयास कसें येईल ? बेडी तोडल्यावर येऊं ! तेव्हां बळवंतराव काका यांची बेडी तोडून मिरजेस पाठवून दिलें. नंतर तळेगांवची स्वारी जाहली, तेथें इंग्रजासीं मातबर लढाई होऊन श्रीमंतांस यश आलें. याप्रमाणें परशुरामभाऊ भाऊबंदांचा अभिमान धरीत.

१५२. भाऊप्रमाणें भाऊबंदांचा अभिमानी, पूर्वस्मरणाविशीं दक्ष व उपकार जाणणारा असा दुसरा मनुष्य कोणी जाहला नाहीं. येविशीं कथा सांगतों. पंढरपूरकर बडवे यांची मुलगी पंढरपुरचे गवंडयानें ठार मारिली. तेथें लिमये[6] यांचा अंमल होता, त्यांनीं तो मजकूर मनास आणिला आणि मध्येंच दाबून टाकिला ! नंतर बडवे यांनीं येऊन अंब्यांस मातुश्री कृष्णाबाईजवळ फिर्याद केली. तेव्हां बाईनीं शिबंदी कारकून स्वार पाठवून गंवडी यास चीजबस्त सुद्धां कैद करून धरून अंब्यांस आणिलें तेव्हां त्या मुलीचे दागिने त्याचे घरीं निघाले. नंतर जबान्या वगैरे घेऊन तो खून केलेला मजकूर त्याचे अंगीं लागू जाहला.

---

१ हें उदासीनपणाचें बोलणें. २ फडणिशीकडच्या कागदावर शेवटीं तारीख घातलेली असते तीस तेरीख. ती नानाफडनवीस सर्व कागद वाचून त्यांत दुरुस्ती करून नंतर स्वतः घालीत. मग तो कागद पुरा झाला. ज्यावर फडणिसांची तेरीख नाहीं तो हिशेबी कागद सरकारांत मंजुर झाला नाहीं असें समजा. ३ दाजीच्या मुलांवर प्रेम. ४ ह्मणजे तुमचे यजमान हरिहररावतात्या यांचे. ५ हें चुकलें. 'तळेगांवच्या स्वारीस' या ऐवजीं 'जनरल गाडर्ड याशीं बोरघाटांत लढाया झाल्या तेव्हां' असें पाहिजे. ६ पंढरपुरचा परशुरामभाऊंचा अंमल होता. चिंतोपंत लिमये हे तेथें त्यानीं कमाविसदार नेमिलेले होते.

तदोत्तर कृष्णाजी महादेव यांजसमागमें *गवंडी × × ×× × × × × आडवे जाहले. जागेच होते.भोंवताली सारी मंडळी बसली होती. चिंतोपंत लिमयेही बसले होते. तों लिमये यांनीं गोष्ट काढिली जे, तुह्मी स्वारी करून गवंडी धरून आणण्याचें प्रयोजन काय ? चोरून येऊन तुम्ही गवंडी धरून नेला, असें चोरीचें कसब करणें चांगलें कीं काय ? असें म्हणतांच हरिहररावतात्या बोलले कीं, चोरीचें कसब आमच्या वडिलांनीं केलें नाहीं व आह्मांसही ठाऊक नाहीं.आतां करावयाचें जाहल्यास तुम्हांजवळ शिकावें लागेल ! असें म्हणतांच भाऊसाहेब यांनीं तोंडावरून पांघरूण काढून चिंतोपंत यांजकडे पाहून बोलले कीं, अहो चिंतोपंत, कृष्णाबाई वहिनी कोण समजतां हो ? ती प्रत्यक्ष धनी. तासगांवास कोणी अन्याय जर केला आणि त्यांस सग़जलें तर येथून मुसक्या बांधून नेतील. तेथें तुमची कथा काय ? तीं धनी आहेत. आह्मी गैर गोष्ट केली तर त्यांस चौकशी करण्यास अधिकार आहे. असें रागानें बोलतांच कृष्णाजी महादेव यांनीं तशांत विनंती केली जे, महाराज, मामलेदार यांचे स्वाधीन चीजबस्त करून पावती घेणें ह्मणून आज्ञा जाहली, परंतु आठ दिवस यांच्या पाठीस लागलों तरी स्वाधीन करून घेत नाहींत. नानाप्रकारचें बोलतात. असें सांगतांच भाऊसाहेब यांनीं आज्ञा केली कीं, गोपाळपंत सोनी यांजकडे चीजबस्त देऊन पावती घेणें, आणि तुह्मीं जाणें. कृष्णाबाई वहिनीस सांगावें जे, तुह्मी केलें ते ठीक केलें. याप्रमाणें सांगावें. असें सांगतांच चिंतोपंत लिमये मुकाट्यानीं उठून गेले. याप्रकारें भाऊसाहेब कृष्णाबाई यांस मानीत. कां जे, पुरुषोत्तमराव दाजी यांनीं आपणावर उपकार केले; सबब तोंडानें ह्मणत जे, आह्मी आपले अंगाचें कातडें काढून जोडे करून दाजींच्या मुलाचे पायांत घातले तरी दाजींचे उपकार फिटावयाचे नाहींत. याप्रमाणेंच बाळासाहेबही नारायणराव व पुरुषोत्तमराव यांचे वंशास अधिक मानीत. त्यांनीं तशींच महत्वाचीं कार्यें केलीं सबब मानीत.

१५३ बाळासाहेब यांची थोरपणाची गोष्ट सांगतों व चातुर्याची कथा सांगतों. नाना फडणीस यांची स्वारी मिरजेस आली तेव्हां नानास मेजवानी केली होती. तेथें बेत असा केला होता कीं, कोठें व्यंग अगदीं नाहीं. कोठें कोठें अगदीं न चुकतां तयारी यथास्थित केली. तेव्हां भोजनें जाहल्यानंतर कचेरींत विडे ध्यावयास बसले. भाऊ-

* येथें फुल्या दिलेल्या जागीं बखरीचा अर्धा बंद फाटून मजकूर गेला आहे, तो मजकूर–" बाईनीं तो गवंडी चीजबस्तसुद्धां कृष्णाजी महादेव व हरिहररावतात्या यांस बरोबर देऊन तासगांवास पाठविला. तों चिंतोपंत लिमये ही बाईची कागाळी घेऊन तासगांवास आले. परशुरामभाऊ व सारी मंडळी बसली होती, बोलणीं चालली होतीं तों भाऊंस झोंप येऊं लागल्यामुळें ते अमळ आडवे जाहले " याप्रमाणें असावा. वर या सदर १५२ मध्यें आलेल्या गोष्टींत बाळासाहेबांच्या थोरपणाचें वर्णन कांहीं दिसत नाहीं. एक प्रकारच्या चातुर्याचें मात्र आहे खरें. २ स. १७८६ च्या जून महिन्यांत नानाफडनवीस बदामाहून परत येत असतां कुरंदवाड, मिरज व तासगांव या तिन्ही ठिकाणीं मेजवान्या घेऊन पुण्यास आले.

साहेब तासगांवाहून मेजवानीकरितां मिरजेस आले होते. सारी मंडळी कचेरीस बसली होती. तेथें रुजाम्यावर महमुदी चादरा घातल्या होत्या. त्यास एके स्थळीं किंचित् माशीचे पंखाइतका डाग पडला होता. तों पहातां पहातां नानाची त्या डागावर नजर गेली, आणि त्याकडे पाहूं लागले. भाऊसाहेब यांसीं बोलतां बोलतां तिकडे पहात तें बाळासाहेब यांनीं लक्षांत ठेविलें. तो डाग जो होता तो बाळासाहेब यांचे लगतच होता. तों बाळासाहेबानीं अकस्मात् नानाची नजर चुकावून चुनपट्टी जवळ होती ती त्या डागास पुसली. त्यानें डाग दिसेनासा झाला. तों नाना आणखी पाहूं लागले, तों तेथें डाग नाहीं. चहूंकडे पाहिलें परंतु डाग कांहीं दिसेना. वरचेवर पहात, परंतु त्या कचेरींत डाग कांहीं कोठें नाहीं. नंतर वस्त्रें वगैरे देऊन निरोप दिला. नाना उठले ते भाऊंचा हात धरून निघाले आणि बोलले कीं, भाऊ, गंगाधरराव श्रीमंतांजवळ रहावयास योग्य आहेत! याप्रमाणें बोलले. तात्पर्य बाळासाहेबांचें चातुर्य व लक्ष असें होतें.

१५४. वंशावळीचा विस्तार लिहितां मध्यें कथा आली ती लिहिली. आतां पुरुषोत्तमरावदाजींच्या वंशाचा विस्तार लिहितों. त्यांस पुत्र दोन. हरिहरराव व विठ्ठलराव. हरिहररावास पुत्र विश्वासराव, बाळकृष्णराव[1] अण्णा, विनायकराव व भास्करराव आपा असे चार. विठ्ठलरावांस पुत्र केशवराव, पुरुषोत्तमराव, व दामोदरराव असे तीन.

१५५. कृष्णंभटजींचे तृतीय पुत्र मेघश्यामराव[2] यांस पुत्र झाले त्यांचीं नांवें—वासुदेवराव, चिंतामणराव, शिवराव, जनोबाभाऊ, जगन्नाथ, कृष्णराव, रामचंद्र, विनायक, गोविंदराव, व्यंकटराव, नरसिंगराव व धोंडोबा मिळून बारा[3].

१५६. कृष्णंभटजींचे चौथे पुत्र माधवराव यांस पुत्र दामोदरराव. तो मयत झाल्यावर दत्तक घेतला तो गोपाळराव.

१५७. कृष्णंभटजींचे पांचवे पुत्र बळवंतराव यांस पुत्र विष्णुपंत, गणपतराव, विश्वनाथ, गोपाळराव व नारायणराव असे पांच. पैकीं गोपाळराव दत्तक दिला.

याप्रमाणें हरभटजीबावा यांचे वडील पुत्र कृष्णंभट यांची संतति लिहिली.

१५८. हरभटजीबावांचे दुसरे पुत्र बाळंभट यांस पुत्र मोरोबाआबा. मोरो बल्लाळ यांस पुत्र श्रीपतराव.

---

१ बाळकृष्णरावअण्णा यांनींच ही हरिवंशाची बखर लिहिली. २ जनार्दन मेघश्याम हे धारवाड्च्या लढाईत पडले. ३ मेघश्यामरावबापू यांच्या एकीमागून एक अशा तीन स्त्रिया झाल्या. पैकीं पहिलीस एक कन्या व सहा पुत्र, दुसरीस चार पुत्र, तिसरीस पांच पुत्र व दोन कन्या. पंधरा पुत्रांपैकीं अल्पवयांत वारलेले तीन वजा करून बाकीच्या बारांचीं नांवें वर दिलीं आहेत. स. १७६३ त मेघश्यामराव यांचा व हैदरअलीचा सरदार मीरकैजुल्ला याची लढाई होऊन हे शत्रूकडे पाडाव सांपडले ते दोन वर्षांनीं तिकडून सुटून आले. स. १७८० त जनरल गाडर्ड यांच्या फौजेशीं बोरघाटाखालीं परशुरामभाऊनीं निकराच्या लढाया केल्या त्यांत एका टोळीवर हे मुख्य सरदार होते. ४ हे चतुर मुत्सद्दी होते. गोपाळरावांचे प्रथम कारभारी नारायणराव कृष्ण होते. ते स. १७६५ त वारल्यावर हे मोरोबाआबा कारभारी झाले. त्यांच्या चातुर्याबद्दल ऐ. ले. संग्रहांतील शेंकडों पत्रें साक्ष देत आहेत.

१५९. हरभटजीबावांचे तृतीय पुत्र त्रिंबकपंतआपा कुरुंदवाडकर. त्यांस पुत्र नीलकंठराव व कोन्हेरराव. नीलकंठरावांस पुत्र रघुनाथराव व शिवराव[१]. कोन्हेररावांस पुत्र गणपतराव[२].

१६०. हरभटजीबावांचे चतुर्थ पुत्र गोविंदपंतनाना मिरजकर, त्यांस गोपाळराव, वामनराव, पांडुरंगराव व गंगाधरराव असे चार पुत्र. पैकीं पहिले दोघे निपुत्रिक वारले. पांडुरंगराव यांस हरिहरराव[३], चिंतामणराव[४] व विठ्ठलराव असे तीन पुत्र. पैकीं पहिला व तिसरा यांची संतति नाहीं. गंगाधरराव यांस केशवराव, नारायणराव, माधवराव, गोविंदराव व गोपाळराव असे पांच पुत्र. नारायणराव यांस पुत्र गणपतराव. गोविंदराव यांस पुत्र कृष्णराव.

१६१. हरभटजीबावांचे पांचवे पुत्र रामचंद्रपंत. त्यांस पुत्र परशुरामभाऊ. परशुरामभाऊंस पुत्र रामचंद्रपंतआपा, हरिपंतबाबा, माधवराव, विनायकराव व गणपतराव असे पांच. रामचंद्र परशुराम यांस पुत्र गोपाळराव.

---

१ रघुनाथरावदादा हे परशुरामभाऊबरोबर प्रत्येक स्वारींत हजर होते. यांस अनेक वेळां जखमाही लागल्या होत्या. रघुनाथरावांस पुत्र त्रिंबकराव. त्रिंबकरावांस पुत्र केशवराव. केशवरावांस रघुनाथराव, हरिहरराव, विनायकराव व त्रिंबकराव असे चार पुत्र. पैकीं रघुनाथरावांच्या वांटणीस संस्थान कुरुंदवाड थोरलें घराणें व बाकी तिघांच्या वांटणीस संस्थान कुरुंदवाड धाकटें घराणें म्हणतात. २ यांस कुरुंदवाड सरंजामाची वांटणी मिळाली नाहीं. पण स. १७९१ त जुन्या सरंजामापैकीं निर्वाहापुरतीं खेडीं मिळालीं. हे कुरुंदवाड सोडून जवळच्या एका वाडींत राहूं लागले, सबब यांच्या घराण्यास वाडीकर म्हणतात. ३ गणपतरावांस बाजीरावसाहेबांनीं कुरुंदवाड सरंजामापैकीं वांटणी देवविली ती घेऊन ते शेडबाळ येथें राहूं लागले. त्यांच्या संस्थानास संस्थान शेडबाळ अथवा संस्थान कागवाड म्हणतात. तें आतां खालसा झालें आहे. ४ हरिहरराव यांस सरदारींचीं वस्त्रें मिळालीं होतीं. ते वीस बेवीस वर्षांचे होऊन वारले. त्यांस संतति नाहीं. त्यांचे धाकटे बंधु विठ्ठलराव हे अल्पवयांत वारले. ५ यांस बाजीरावसाहेबांनीं स. १८०८ त मिरज सरंजामाची वांटणी दिली ती घेऊन ते सांगली येथें राहूं लागले. यांच्या वांटणीस सं० सांगली म्हणतात. हे शूर शिपाई होते व धोंडजी वाघाशीं यांची लढाई झाली तींत यांस तोंडावर जखम लागली होती. त्या काळच्या इतर बहुतेक धामधुमींत हे प्रमुख होते. ६ स. १८२२ त ब्रिटिश सरकारानें पुनः मिरज सरंजामाच्या चार वांटण्या करून त्या गणपतराव नारायण, माधवराव गंगाधर, कृष्णराव गोविंद व गोपाळराव गंगाधर यांस दिल्या. त्यांपैकीं गणपतरावांच्या वांटणीस संस्थान मिरज व माधवरावांच्या वांटणीस संस्थान मिरज-मळा असें म्हणतात. कृष्णरावांची वांटणी संस्थान सोनी व गोपाळरावांची वांटणी संस्थान सुपारीबाग या आतां खालसा झाल्या आहेत. ७ परशुरामभाऊंच्या पुत्रांपैकीं रामचंद्रपंतआपा व हरिपंतबाबा हे त्या काळचे [illegible]बाजलेले मर्द शिपाई होते. खर्ड्याच्या लढाईत लालखानास हरिपंतबाबांनीं मारिलें तो पराक्रम प्रसिद्धच [illegible]हे. हरिपंतांनीं सरंजामाची वांटणी घेतली नाहीं. त्यांनीं पुष्कळ दानधर्म केला. त्यांनीं काशीयात्रा [illegible]ी, तेव्हां त्यांबरोबर लक्षावधि माणूस गेलें होतें असें सांगतात. ते निपुत्रिक वारले. त्यांच्या बंधूंपैकीं [illegible]नायकराव हे अल्पवयांत वारले. बाकीचे तिघे बंधु रामचंद्रपंत, गणपतराव व माधवराव यांच्या वांटण्यांस [illegible]नुकर्मे संस्थान जमखिंडी, तासगांव व चिंचणी असें म्हणतात. त्यांपैकीं तासगांव व चिंचणी हीं संस्थानें [illegible]तां खालसा झालीं आहेत.

१६२. हरभटजीबावांचे सहावे पुत्र भास्करपंतआपा यांची संतति. यांस धोंडोबादादा, विनोबा आबा, हरबा अण्णा, सदोबा भाऊ, वासुदेवराव दाजी व रामचंद्रपंत असे सहा पुत्र झाले. धोंडो भास्कर यांस विठ्ठलरावबाबा व यशवंतराव असे दोन पुत्र होते. विठ्ठल धोंडदेव हे खर्ड्याच्या लढाईंत तमंचाची गोळी लागून ठार झाले. त्यांची स्त्री रखमाबाई सती गेली. विनायकराव भास्कर यांस नारायणराव, गणपतराव, कृष्णराव, व पुरुषोत्तमराव असे चार पुत्र झाले. हरि भास्कर यांस नीलकंठराव, गोविंदराव, विश्वासराव आणि शंकरराव असे चार पुत्र झाले. सदाशिव भास्कर यांस खंडेराव, माधवराव आणि चिंतामणराव असे तीन पुत्र. वासुदेव भास्कर यांस दत्तक पुत्र माधवराव. रामचंद्र भास्कर यांस दत्तक पुत्र गोपाळराव.

याप्रमाणें हरभटबावा ब्रह्मीभूत यांचा वंश लिहिला.

१६३. आतां मूळपुरुष हरभट यांचे वडील पुत्र बाळंभट.त्याचे प्रथम पुत्र हरभट. दुसरे पुत्र केशवभट यांचा वंश लिहितों. त्यांची स्त्री गंगाबाई. प्रथम कन्या १ बयाबाई जोशी

---

१ भास्कर हरीच्या पुत्रांत धोंडोबादादा, विनोबा आबा, हरबा अण्णा व रामचंद्रपंत हे शौर्याविषयीं फार प्रसिद्ध आहेत. त्यांत विनोबा आबा व धोंडोबादादा हे माधवराव पेशव्यानीं केलेल्या सर्व मोहिमांत हजर होते व स्वारी माधवराव जन्मास आले तेव्हां तेथील बंदोबस्ताकरितां कांहीं महिने यांची नेमणूक झाली होती. हरबाअण्णानीं मोतीतलावाच्या लढाईंत मोठा पराक्रम केला. हे तोतयाकडे गेल्यामुळें कांहीं दिवस पुणें दरबारची यांवर अवकृपा होती. विनोबा आबा व हरबा अण्णा उभयतांही पटणकुडीच्या लढाईंत जखमी झाले होते. रामचंद्र भास्कर हे सन १७९१ त परशुरामभाऊनीं धारवाड काबीज करून श्रीरंगपट्टणावर चाल केली तेव्हां आघाडीच्या फौजेंत एका टोळींवर मुख्य सरदार होते. २ या सतीच्या सहगमनाची हकीकत फार चमत्कारिक आहे. ती आतांच्या काळांत कोणास खरी वाटणार नाहीं ! तथापि पूर्वीचीं माणसें ती जशी सांगत आलीं आहेत तशीच ती येथें देतों. खर्ड्याच्या लढाईंत विठ्ठलराव पडले तेव्हां ही बाई मिरजेस घरीं तुळसीला पाणी घालीत होती. पूजा करितां करितां ती अकस्मात् आक्रोश करूं लागली व घरांतील माणसांस सांगूं लागली कीं, या क्षणीं माझा भ्रतार लढाईंत पडला. त्याचें पागोटें घरांत आहे त्याबरोबर मी सती जाणार.मला परवानगी द्या व माझी तयारी करून द्या ! खर्ड्यास लढाई होत असल्याचें कोणास अर्थातच ठाऊक नव्हतें व लढाई कोणाशी कोठें झालीं हें रखमाबाईस कांहीं सांगतां येईना. मात्र तिनें सती जाण्याचा आग्रह धरिला व त्या वेळेपासून अन्नपाणी वर्ज्य केलें. त्या वेळीं तिला कोण सती जाऊं देणार ! तिला वेड लागलें असेंच लोक समजले. खर्ड्याहून पांचवे दिवशीं मिरजेस लढाईची बातमी आली तेव्हां रखमाबाईच्या अंतर्ज्ञानाविषयीं सर्वांस परम विस्मय वाटला ! नंतर ती मोठ्या समारंभानें सती गेली. ३ पटणकुडीच्या लढाईत जखमांनीं घायाळ झालेले गणपतराव समरभूमीपासून कांहीं अंतरावर येऊन मूर्च्छित होत्साते घोड्यावरून पडले ते कांहीं वेळ तसेच पडले होते. मागून त्या काळचे प्रसिद्ध शिलेदार शितोळे लढाईतून परत येत होते त्यांनीं काळोखांत यांस पाहिलें व घोड्यावरून उतरून यांचें अंग चांचपून पाहिलें तों यांचे कमरेस देवांचें संपुष्ट होतें तें खडबड वाजलें. त्यावरून हा ब्राह्मण आहे, व यास येथेंच टाकून गेलों तर फुकट मरून जाईल, असें जाणून त्यांस त्यानीं भाल्याचे झोळींत घालून मिरजेस पोंचवून दिलें. ४ हरभटजीबावा हे संन्यास घेऊन समाधिस्थ झाले होते म्हणून त्यांस 'ब्रह्मीभूत' म्हटलें आहे. ५ केशवभट श० १६८३ च्या शुद्ध पक्षांत गणेशवाडी येथें वारले. त्यांचे धाकटे पुत्र शिउबा आपाही याच सुमारास वारलेले आहेत. थोरले पुत्र विश्वनाथभट हे हरभटजीनीं इचलकरंजीकर घोरपड्यांच्या घरीं आपले तर्फेनें उपाध्येपणावर ठेविले होते ते श० १६८६ त तें काम सोडून भिलवडीस येऊन राहिले; म्हणून त्याच्या वंशजांस भिलवडीकर म्हणतात.

हिपरगीरकर, २ वेणूबाई. नंतर पुत्र १ विश्वनाथभट काका २ शंकरभट ३ शिउबा आप्पा हे धाकटे.

१६४. शिउबा आपा यांनीं पराक्रम फार केला. त्यांची किंचित् कथा वर्णन करितों. हे कुरुंदवाडास होते. सारी मंडळी एकत्र होती. ते समयीं त्रिंबकपंतआप्पा यांची पालखी होती. कोणे एके दिवशीं कृष्णास्नानास त्रिंबकपंतआप्पा यांची पत्नी पार्वतीबाई निघाली. तेव्हां बसून जावयास पालखी आणविली. तेव्हां शिउबाआपा हे बळेंच त्या पालखींत बसून भोयांस रागें भरून आपण स्नानास गेले. स्नान करून आलेवर पार्वतीबाई बोलली कीं, भावोजी, तुह्मांस आयते पालखींत बसावयास लाज कशी वाटली नाहीं ? याप्रमाणें बोलली. ती गोष्ट लागून उत्तर कांहीं न देतां तसेच उगे राहिले. नंतर मध्यरात्रीं उठून कोणास न विचारितां आपला बसावयाचा एक घोडा घेऊन त्याजवर बसून निघाले ते उजाडावयास दहा कोस गेले. दुसरे दिवशीं प्रहर दिवसास समजलें कीं, शिउबाआपा कोठें नाहींत. गांवांत वगैरे शोध केला व आसपासही कोठें कोठें शोध केला, परंतु पत्ता लागला नाहीं. तेव्हां त्रिंबकपंतआप्पा बोलले कीं, छांदस पोर ! कोठें उठून गेलें असेल ! इकडे हे जे गेले ते नागपुरास गेले. तेथें जाऊन भोंसले यांची भेट घेतली. त्यांनीं विचारलें जे, तुह्मी कोण आहां ? यांनीं सांगितलें कीं, आह्मी शिलेदार शिपाई उमेदवार आहोंत. चाकरीस रहावयास आलों. तुमचे येथें उमेदवारी असल्यास सांगा. नाहीं पेक्षां पुढें जाऊं. असें म्हणतांच त्याणीं विचारिलें कीं, तुमची तैनात काय ? यांनीं सांगितलें जे, चाकरी करून दाखवूं--जी लढाई बिघडली ती सुधरून देऊं--ते दिवशीं चाकरीवर रुजू जाहले दिवसापासून दरसाल पांच हजार रुपयेप्रमाणें तैनातीचा फडशा करून घेऊं. तोंपर्यंत घोडयाचे पोटास व आमचे पोटास व चिरगूट पांघरूण याप्रमाणें खर्चास दररोज तीन रुपयेप्रमाणें घेऊं. असें म्हणतांच भोंसले यांस आश्चर्य वाटलें व शिपाई उमेदवार चांगले दिसलेवरून कबूल करून ठेविलें. ते पांचे वर्षे याप्रमाणें होते. इकडे अगदीं पत्ता नाहीं. तों श्रीमंतांची स्वारी भोंसले यांजवर जाहली. तिकडून भोंसले फौजेसुद्धां आले. इकडून श्रीमंतांची फौज गेली. उभयतां फौजेची लढाई लागली तों शिउबाआपा हातांत तलवार घेऊन एके बाजूस घोडयावर बसून उभे होते. श्रीमंतांचे फौजेंत पटवर्धन मंडळी, त्रिंबकपंतआपा व रामचंद्रआप्पा व भास्करपं-

---

१ आपले पराक्रमावर सरकारांतून पालखीचा बहुमान मिळवावा, नंतर पालखींत बसावें. दुसऱ्यानें मिळविलेल्या पालखींत बसण्यांत काय भूषण आहे ! असा बाईच्या बोलण्याचा अभिप्राय. २ वस्तुतः फार तर दोन अडीच वर्षे असतील. भोंसल्यानीं पेशव्यांच्या फौजेचा मोड पहिले बाजीराव यांच्या कारकीर्दीत केलेला असा एकदांच, आणि तोही स० १७३९ च्या फेब्रुवारींत. पेशव्यांच्या सैन्याची अघाडीची तुकडी आवजी कवडे याच्या हाताखालीं वऱ्हाडांत लूट करीत होती तिचा. शिउबा आपा कुरुंदवाडाहून नागपुरास गेले होते व खुद्द कुरुंदवाड गांवच मुळीं पटवर्धनांस स. १७३६ त मिळाला आहे. शिवाय दफ्तरांतल्या सहाव्या सदरींत शिउबा आपास शाहुमहाराजांचें दर्शन वगैरे झाल्याचें लिहिलें आहे तीं गोष्ट १७३५ तली आहे.

तआपा होते. त्या वेळेस थोरले बाजीरावसाहेब व चिमाजीआपा होते. उभयतां बंधु खासे स्वारीस आले होते. आणि लढाई लागली तों भोंसले यांची फौज कचकरली आणि पळ काढिला. खासे भोंसले अंबारींतून उतरून घोडचावर बसले आणि घोडचाचें तोंड माघारें काढिलें. इतक्यांत शिउबाआपा यांनीं आडवें घोडें घालून कराचलीचे पाठीकडून भोंसले यांचे पाठीवर मारून बोलले जे, अरे मराठ्याच्या पोरा, आतां माझा तमाशा पहा ! पळूं नको. उभा रहा. असें म्हणतांच राजे यानीं लगामास हात घातला आणि तोंड माघारें फिरवून उभे राहिले. तों शिउबाआपा पुढें वाढून गेले आणि अघाडीचे पांच स्वार ठार केले. मग श्रीमंतांकडील फौज किंचित् हटली. तों भास्कर हरीची गांठ पडली. त्यांस शिउबाआपा यांनीं ओळखून त्यांस सोडून पुढें दुसऱ्यावर गेले. तेव्हां भास्करपंतआपा बोलले जे, अरे शिपाया, तोंड कां चुकवितोस ? समोर येणें. असें म्हणतांच शिउबाआपा बोलले जे, जा वेडचा, तुझ्यावर काय यावयाचें आहे ! तों भास्करपंतआपाजवळ गडी होता त्यानें ओळखिलें आणि आपास बोलला जे, आपा, आमच्या शिउबासारखा हा शिलेदार दिसतो. इतकें गडी बोलला. इकडे भोंसले यांची फौज पळत होती ती सारी जमून एकवट जाहली. तिकडे श्रीमंतांची फौज दूर अंतरावर पुनः जमून उभी राहिली. याप्रमाणें दोहींकडील फौजा आपले जागां उभ्या राहिल्या. भोसले यांचे फौजेचा मोड जाहला होता तों भोंसले यांस जयं येऊन शिउबाआपास अंबारींतून बसवून शहाजानें वाजवीत भोंसले आपले गोटास आले. शिउबाआपा यांस जखमा लागल्या होत्या. तेव्हां खासे भोंसले जातीनिशीं येऊन शिउबाआपा यांच्या जखमा शिववून बरदास्त करून आपले राहुटीस शिउबाअपा यांचा पराक्रम वर्णन करीत गेले जे, बोलल्याप्रमाणें यानें कर्म केलें. असें म्हणत आपले राहुटीस गेले. इकडे भास्करपंत आपा यांजबरोबर खिजमतगार होता तो ह्मणाला जे, मी शिउबाआपा ओळखला; त्यास मला आज्ञा व्हावी, मी पक्का शोध करून येतों. असें ह्मणतांच भास्करपंतआपा यांनीं आज्ञा दिली. त्या माणसानें शिउबाआपा यांस ओळखिलें होतें, म्हणून तो माणूस किडबिड्या जोश्याचें सोंग घेऊन भोंसले यांचे लष्करांत गेला. सारें लष्कर फिरला. कोण जखमी कोठें आहेत याचा शोध करीत शिउबाआपा यांचे राहुटीस आला, आणि बाहेर जोशीपणाचीं भाषणें करीत उभा राहिला तो शिऊबाआपा यांनीं पाहिला; आणि आपले माणसास सांगितलें कीं, त्या किडबिड्या जोश्यास आंत बोलावून आण-

---

१ या वर्णनावरून कांहीं मोठीशी लढाई झाल्याचें दिसत नाहीं. सामान्य प्रकारची थोडीशी झटापट झाली तींत प्रथम भोंसल्यांचा मोड झाला तों शिउबाआपाच्या पराक्रमामुळें पेशव्यांच्या फौजेची पुढची रांग क्षणभर थिजल्यासारखी झाली. इतक्यांत भोंसल्यांच्या फौजेनें सांवर खाऊन शत्रूस लढाईच्या जाग्यावरून पिटून लाविलें. जय झाला ह्मणण्यास इतकें झालें तरी पुरे. एक शिउबाआपास धरून बसल्यामळें बखरलिहिणाऱ्यानें लढाईचें बाकीचें वर्णन गाळलें असेल तर मात्र गोष्ट निराळी. तसेंही असण्याचा संभव आहे.

हिपरगीरकर, २ वेणूबाई. नंतर पुत्र १ विश्वनाथभट काका २ शंकरभट ३ शिउबा आप्पा हे धाकटे.

१६४. शिउबा आपा यांनीं पराक्रम फार केला. त्यांची किंचित् कथा वर्णन करितों. हे कुरुंदवाडास होते. सारी मंडळी एकत्र होती. ते समयीं त्रिंबकपंतआप्पा यांची पालखी होती. कोणे एके दिवशीं कृष्णास्नानास त्रिंबकपंतआप्पा यांची पत्नी पार्वतीबाई निघाली. तेव्हां बसून जावयास पालखी आणविली. तेव्हां शिउबाआपा हे बळेंच त्या पालखींत बसून भोयांस रागें भरून आपण स्नानास गेले. स्नान करून आलेवर पार्वतीबाई बोलली कीं, भावोजी, तुह्मांस आयते पालखींत बसावयास लाज कशी वाटली नाहीं ? याप्रमाणें बोलली. ती गोष्ट लागून उत्तर कांहीं न देतां तसेच उगे राहिले. नंतर मध्यरात्रीं उठून कोणास न विचारितां आपला बसावयाचा एक घोडा घेऊन त्याजवर बसून निघाले ते उजाडावयास दहा कोस गेले. दुसरे दिवशीं प्रहर दिवसास समजलें कीं, शिउबाआपा कोठें नाहींत. गांवांत वगैरे शोध केला व आसपासही कोठें कोठें शोध केला, परंतु पत्ता लागला नाहीं. तेव्हां त्रिंबकपंतआप्पा बोलले कीं, छांदस पोर ! कोठें उठून गेलें असेल ! इकडे हे जे गेले ते नागपुरास गेले. तेथें जाऊन भोंसले यांची भेट घेतली. त्यांनीं विचारलें जे, तुह्मी कोण आहां ? यांनीं सांगितलें कीं, आह्मी शिलेदार शिपाई उमेदवार आहोंत. चाकरीस रहावयास आलों. तुमचे येथें उमेदवारी असल्यास सांगा. नाहीं पेक्षां पुढें जाऊं. असें म्हणतांच त्याणीं विचारिलें कीं, तुमची तैनात काय ? यांनीं सांगितलें जे, चाकरी करून दाखवूं--जी लढाई बिघडली ती सुधरून देऊं--ते दिवशीं चाकरीवर रुजू जाहले दिवसापासून दरसाल पांच हजार रुपयेप्रमाणें तैनातीचा फडशा करून घेऊं. तोंपर्यंत घोड्याचे पोटास व आमचे पोटांस व चिरगूट पांघरूण याप्रमाणें खर्चास दररोज तीन रुपयेप्रमाणें घेऊं. असें म्हणतांच भोंसले यांस आश्चर्य वाटलें व शिपाई उमेदवार चांगले दिसलेवरून कबूल करून ठेविलें. ते पांचें वर्षे याप्रमाणें होते. इकडे अगदीं पत्ता नाहीं. तों श्रीमंतांची स्वारी भोंसले यांजवर जाहली. तिकडून भोंसले फौजेसुद्धां आले. इकडून श्रीमंतांची फौज गेली. उभयतां फौजेची लढाई लागली तों शिउबाआपा हातांत तलवार घेऊन एके बाजूस घोड्यावर बसून उभे होते. श्रीमंतांचे फौजेंत पटवर्धन मंडळी, त्रिंबकपंतआपा व रामचंद्रआप्पा व भास्करपं-

---

१ आपले पराक्रमावर सरकारांतून पालखीचा बहुमान मिळवावा, नंतर पालखींत बसावें. दुसऱ्यानें मिळविलेल्या पालखींत बसण्यांत काय भूषण आहे ? असा बाईच्या बोलण्याचा अभिप्राय. २ वस्तुतः फार नाहीं तर दोन अडीच वर्षे असतील. भोंसल्यानीं पेशव्यांच्या फौजेचा मोड पहिले बाजीराव यांच्या कारकीर्दीत केलेला असा एकदांच, आणि तोही स० १७३९ च्या फेब्रुवारींत. पेशव्यांच्या सैन्याची अघाडीची तुकडी आवजी कवडे याच्या हाताखालीं वऱ्हाडांत लूट करीत होती तिचा. शिउबा आपा कुरुंदवाडाहून नागपुरास गेले होते व खुद्द कुरुंदवाड गांवच मुळीं पटवर्धनांस स. १७३६ त मिळाला आहे. शिवाय दफ्तरांतल्या सहाव्या सदरींत शिउबा आपास शाहुमहाराजांचें दर्शन वगैरे झाल्याचें लिहिलें आहे तीं गोष्ट १७३५ तली आहे.

तआपा होते. त्या वेळेस थोरले बाजीरावसाहेब व चिमाजीआपा होते. उभयतां बंधु खासे स्वारीस आले होते. आणि लढाई लागली तों भोंसले यांची फौज कचकरली आणि पळ काढिला. खासे भोंसले अंबारींतून उतरून घोडयावर बसले आणि घोडयाचें तोंड माघारें काढिलें. इतक्यांत शिउबाआपा यांनीं आडवें घोडें घालून कराचलीचे पाठीकडून भोंसले यांचे पाठीवर मारून बोलले जे, अरे मराठ्याच्या पोरा, आतां माझा तमाशा पहा ! पळूं नको. उभा रहा. असें म्हणतांच राजे यानीं लगामास हात घातला आणि तोंड माघारें फिरवून उभे राहिले. तों शिउबाआपा पुढें वाढून गेले आणि अघाडीचे पांच स्वार ठार केले. मग श्रीमंतांकडील फौज किंचित् हटली. तों भास्कर हरीची गांठ पडली. त्यांस शिउबाआपा यांनीं ओळखून त्यांस सोडून पुढें दुसऱ्यावर गेले. तेव्हां भास्करपंतआपा बोलले जे, अरे शिपाया, तोंड कां चुकवितोस ? समोर येणें. असें म्हणतांच शिउबाआपा बोलले जे, जा वेड्या, तुझ्यावर काय यावयाचें आहे ! तों भास्करपंतआपाजवळ गडी होता त्यानें ओळखिलें आणि आपास बोलला जे, आपा, आमच्या शिउबासारखा हा शिलेदार दिसतो. इतकें गडी बोलला. इकडे भोंसले यांची फौज पळत होती ती सारी जमून एकवट जाहली. तिकडे श्रीमंतांची फौज दूर अंतरावर पुनः जमून उभी राहिली. याप्रमाणें दोहींकडील फौजा आपले जागां उभ्या राहिल्या. भोसले यांचे फौजेचा मोड जाहला होता तों भोंसले यांस जयं येऊन शिउबाआपास अंबारींतून बसवून शहाजानें वाजवीत भोंसले आपले गोटास आले. शिउबाआपा यांस जखमा लागल्या होत्या. तेव्हां खासे भोंसले जातीनिशीं येऊन शिउबाआपा यांच्या जखमा शिववून बरदास्त करून आपले राहुटीस शिउबाआपा यांचा पराक्रम वर्णन करीत गेले जे, बोलल्याप्रमाणें यानें कर्म केलें. असें म्हणत आपले राहुटीस गेले. इकडे भास्करपंत आपा यांजबरोबर खिजमतगार होता तो म्हणाला जे, मी शिउबाआपा ओळखला; त्यास मला आज्ञा व्हावी, मी पक्का शोध करून येतों. असें म्हणतांच भास्करपंतआपा यांनीं आज्ञा दिली. त्या माणसानें शिउबाआपा यांस ओळखिलें होतें, म्हणून तो माणूस किडबिड्या जोश्याचें सोंग घेऊन भोंसले यांचे लष्करांत गेला. सारें लष्कर फिरला. कोण जखमी कोठें आहेत याचा शोध करीत शिउबाआपा यांचे राहुटीस आला, आणि बाहेर जोशीपणाचीं भाषणें करीत उभा राहिला तो शिऊबाआपा यांनीं पाहिला; आणि आपले माणसास सांगितलें कीं, त्या किडबिड्या जोश्यास आंत बोलावून आणा.

---

१ या वर्णनावरून कांहीं मोठीशी लढाई झाल्याचें दिसत नाहीं. सामान्य प्रकारची थोडीशी झटापट झाली तींत प्रथम भोंसल्यांचा मोड झाला तों शिउबाआपाच्या पराक्रमामुळें पेशव्यांच्या फौजेची पुढची रांग क्षणभर थिजल्यासारखी झाली. इतक्यांत भोंसल्यांच्या फौजेनें सांवर खाऊन शत्रूस लढाईच्या जाग्यावरून पिटून लाविलें. जय झाला म्हणण्यास इतकें झालें तरी पुरे. एक शिउबाआपास धरून बसल्यामळें बखरलिहिणाऱ्यानें लढाईचें बाकीचें वर्णन गाळलें असेल तर मात्र गोष्ट निराळी. तसेंही असण्याचा संभव आहे.

वणें. असें ह्मणून त्यास आंत आणविलें. तो माणूस आंत येतांच 'अरे शिउबा' ह्मणून गळ्यास मिठी मारून रडूं लागला. तेव्हां शिउबाआपा यांचेही डोळ्यास पाणी आलें. नंतर शिउबाआपा ह्मणाले कीं, तूं आतां कोठें बोलूं नको. मी खुशाल आहें. थोडके दिवसांतच आपले देशास येईन. तूं जा. असें म्हणून त्या माणसास कांहीं खर्चास दिलें आणि लावून दिला. त्यानें येऊन त्रिवर्ग बंधु त्रिंबक हरि, रामचंद्र हरि व भास्कर हरि यांस सांगितलें. तेव्हां ते बोलले, आतां बोभाट न करणें. श्रीमंतांस कळेल. असें ह्मणून उगेच राहिले. नंतर नागपूरकरांजवळ खंडणी[1] ठरावून श्रीमंतांची स्वारी पुण्यास आली. आलेवर श्रीमंतांस वर्तमान समजलें कीं, नागपूरकरांची लढाई बिघडलेली ज्यानें सुधरली तो स्वार शिउबाआपा पटवर्धन. असें समजल्यावर श्रीमंतांनीं पटवर्धन यांस आज्ञा केली कीं, तुह्मीं आपला भाऊ आणवणें. नाहींपेक्षां तुम्हांस सरंजाम चालणार नाहीं ! नंतर यांनीं शिउबाआपास पत्रें नानाप्रकारचीं शपथा घालून "भेटावयास येणें" म्हणून पाठविलीं. नंतर शिउबाआपा यांनीं भोंसले यांजपाशीं निरोप मागितला जे, फार दिवस जाहाले. सर्वत्रांस भेटून लागलाच माघारा येतों. भोंसले म्हणाले जे, तुम्ही आपले देशास गेल्यावर पुन्हां येणार नाहीं. तुमची भाऊबंद मंडळी फार. ते तुह्मास येऊं देणार नाहींत. त्यास तुह्मीं याल याबद्दल आह्मास प्रमाण काय ? हे बोलले कीं, बेलभंडार घेणें. असें ह्मणून बेलभंडार देऊन त्यांचा निरोप घेऊन बरोबर सरंजाम हत्ती, पालखी, स्वार लवाजमा सारा घेऊन प्रथम कुरुंदवाडास येऊन पार्वतीबाईस नमस्कार करून त्यांस पालखींत बसवून कृष्णाबाईस स्नानास घेऊन गेले. नंतर श्रीमंतांस समजलें कीं, नागपुराहून शिवाजी केशव पटवर्धन आले. मग श्रीमंतांनीं बोलावणें पाठवून पुण्यास घेऊन गेले. नंतर श्रीमंतांचा मोठा आग्रह पडला जे, तुह्मीं येथें चाकरी करावी. तुमची सारी मंडळी आमचे पदरीं आणि तुह्मी तिकडे जातां ही गोष्ट काय ? असा श्रीमंतांचा व सर्व भावाबंदांचा आग्रह पडून ठेवून घेतले[2]; आणि जमखिंडी परगणा सरंजामांत दिला. याप्रमाणें शिउबाआपा यांचा पराक्रम. त्यांस संतति कन्या धोंडूबाई भावे. त्यांची पत्नी गोदूकाकी ती जमखिंडी परगण्यांत कृष्णातीरीं कंकणवाडी ह्मणून गांव आहे तेथें राहिली. तिला श्रीमंतांनीं बाराशें

---

१ वस्तुतः खंडणी वगैरे कांहीं एक ठरलें नाहीं. नादिरशहानें दिल्लीवर स्वारी केल्यामुळें पेशवे व भोंसले यांचा तंटा तितकाच राहिला. २ त्या वेळीं पटवर्धनांपैकीं कोणासच सरंजामाचे मुलूख मिळाले नव्हते, येथें 'सरंजाम' याचा अर्थ 'तैनाता' असा घेतला पाहिजे ! ३ भोसल्यांच्या संमतीनेंच ठेऊन घेतलें असा अर्थ घेतला पाहिजे. कारण शिउबानीं भोंसल्यांस आगाऊ बेलभंडार दिला होता. ४ शिवाजी केशव यांनीं जमखिंडी परगण्यांत गांव उत्पन्नें वगैरे तेथील देसायावर स्वारी करून बळजबरीनें मिळविलीं असें ऐकिवांत आहे व तेंच सयुक्तिक दिसतें. स. १७४० तं पेशव्यांचा अंमल जमखिंडी परगण्यावर होतासें वाटत नाहीं.

४३१

रुपये तैनात बाळपरवेशी म्हणून करून दिली. ती अद्यापि त्यांचे वंशास चालत आहे. शिऊबाआपाचे वडील बंधु विश्वनाथभट यांस पुत्र गणपतराव.[1]

१६५. बाळंभट यांचे तिसरे पुत्र विठ्ठलभट यांस पुत्र अंताजीपंततात्या.[2] हे शूर शिपाई असून अनेक लढायांत जखमी झाले[3]. अंताजी पंतांस बळवंतराव, जनोबा सुभेदार, विष्णुपंत, यादवराव व विठ्ठलराव असे पांच पुत्र होते.

१६६. आतां मूळपुरुष हरभट यांचे पुत्र त्रिवर्ग. त्यांत वडील पुत्र बाळंभट यांचा वंश येथपर्यंत लिहिला. दुसरे पुत्र कृष्णंभट यांस चांदूबाई[4] कन्या होती तिचा वंश जोशी सखदेवमंडळी. तिसरे पुत्र रघुनाथभट यांस पुत्र धोंडभट, धोंडभटास पुत्र बाळंभट, महादेवभट व वासुदेवपंत.

१६७. याप्रमाणें हरिवंशाचा विस्तार व कीर्तीचें वर्णन यथामति लेखन केलें असे. श्रमेंकरून वाचिल्यास मनोरथ पूर्ण होतील व वंशवृद्धि होईल. याची फलश्रुति हीच. हरिवंशाचे कीर्तीचें वर्णन करील व हरिवंश वाचील त्याचे वंशाची वृद्धि होईल. या वंशाची प्रत लिहून जो आपले गृहाचे ठायीं संरक्षण करील त्यास दुःख, दारिद्र्य प्राप्त होणार नाहीं. याप्रमाणें फलश्रुति असे. शके १७६४ शुभकृन्नामसंवत्सरे. वैशाख शु. ५ इंदुवारीं हा ग्रंथ लिहिला असे. मु० आंबेनजीक श्रीक्षेत्र पंढरपूर. श्रीभीमातीर. श्रीउत्तरेश्वरसंनिध.

---

१ गोदूबाईची तैनात बेहडयांत गणपतराव यांचे नांवें पेशव्यांनीं करून दिली ती त्यांच्या वंशाकडे अद्यापि चालत आहे. गणपतराव हे पटवर्धनांच्या फौजेंत पंचवीस स्वारांनिशीं चाकरी करीत. २ यांच्या घराण्यास यादवाडकर म्हणतात. ३ पटवर्धनांचा उदय होऊं लागल्यापासून म्हणजे सुमारें शके १६५० पासून पुढें पन्नासपंचावन वर्षेपर्यंत झालेल्या बहुतेक मोहिमांत यांचें नांव आलेलें दृष्टीस पडतें. ४ हे महापराक्रमी व स्नानसंध्याशील होते. इंग्रजांशीं तळेगांव येथें व बोरघांटाखालीं लढाया झाल्या त्यांत यांस जखमा लागल्या होत्या, व परशुरामभाऊ यांच्या हाताखालीं एका टोळीवर हे मुख्य सरदार होते. नंतर यांनीं लष्करी पेशा सोडून अग्निहोत्र घेतलें व पंचवीस हजार रुपये खर्चून काशीयात्रा केली व आसंगी हा गांव नूतन वसवून वेणुगोपाळाची तेथें स्थापना करून तो गांव देवास इनाम करून दिला. यांस 'दीक्षित' म्हणत असत. ५ नापार येथें कर्नल कीटिंग याच्या फौजेशीं झालेल्या लढाईत जनोबा सुभेदार यांस संगिनीची जखम लागली होती व इतर अनेक लढायांत यांस जखमा लागल्या होत्या. ६ विठ्ठलराव हेही मोठे शूर व अनेक लढायांत कामकाज केलेले असे होते. खड्र्याच्या लढाईत यांस भाल्याची जखम लागली होती. ७ यांच्या घराण्यास शिळकर म्हणतात. ८ ऐ. ले. संग्रहांत यांचा उल्लेख 'वासुदेवकाका' व 'वासुदेव धोंडदेव' या नांवानीं शेंकडों वेळां आलेला आहे. हे पटवर्धनांच्या प्रत्येक मोहिमेंत हजर असून सांवशीच्या लढाईत हैदरअलीकडे पाडाव सांपडले होते.

समाप्त.

४३१ (स्थळ प्रत)

वणें. असें ह्मणून त्यास आंत आणविलें. तो माणूस आंत येतांच 'अरे शिउबा' ह्मणून गळ्यास मिठी मारून रडूं लागला. तेव्हां शिउबाआपा यांचेही डोळ्यास पाणी आलें. नंतर शिउबाआपा ह्मणाले कीं, तूं आतां कोठें बोलूं नको. मी खुशाल आहें. थोडके दिवसांतच आपले देशास येईन. तूं जा. असें म्हणून त्या माणसास कांहीं खर्चास दिलें आणि लावून दिला. त्यानें येऊन त्रिवर्ग बंधु त्रिंबक हरि, रामचंद्र हरि व भास्कर हरि यांस सांगितलें. तेव्हां ते बोलले, आतां बोभाट न करणें. श्रीमंतांस कळेल. असें ह्मणून उगेच राहिले. नंतर नागपूरकरांजवळ खंडणी[1] ठरावून श्रीमंतांची स्वारी पुण्यास आली. आलेवर श्रीमंतांस वर्तमान समजलें कीं, नागपूरकरांची लढाई बिघडलेली ज्यानें सुधरली तो स्वार शिउबाआपा पटवर्धन. असें समजल्यावर श्रीमंतांनीं पटवर्धन यांस आज्ञा केली कीं, तुह्मीं आपला भाऊ आणवणें. नाहींपेक्षां तुम्हांस सरंजाम चालणार नाहीं! नंतर यांनीं शिउबाआपास पत्रें नानाप्रकारचीं शपथा घालून "भेटावयास येणें" म्हणून पाठविलीं. नंतर शिउबाआपा यांनीं भोंसले यांजपाशीं निरोप मागितला जे, फार दिवस जाहाले. सर्वत्रांस भेटून लागलाच माघारा येतों. भोंसले म्हणाले जे, तुम्ही आपले देशास गेल्यावर पुन्हा येणार नाहीं. तुमची भाऊबंद मंडळी फार. ते तुह्मास येऊं देणार नाहींत. त्यास तुह्मीं याल याबद्दल आह्मास प्रमाण काय? हे बोलले कीं, बेलभंडार घेणें. असें ह्मणून बेलभंडार देऊन त्यांचा निरोप घेऊन बरोबर सरंजाम हत्ती, पालखी, स्वार लवाजमा सारा घेऊन प्रथम कुरुंदवाडास येऊन पार्वतीबाईस नमस्कार करून त्यांस पालखींत बसवून कृष्णाबाईस स्नानास घेऊन गेले. नंतर श्रीमंतांस समजलें कीं, नागपुराहून शिवाजी केशव पटवर्धन आले. मग श्रीमंतांनीं बोलावणें पाठवून पुण्यास घेऊन गेले. नंतर श्रीमंतांचा मोठा आग्रह पडला जे, तुह्मीं येथें चाकरी करावी. तुमची सारी मंडळी आमचे पदरीं आणि तुह्मी तिकडे जातां ही गोष्ट काय? असा श्रीमंतांचा व सर्व भावाबंदांचा आग्रह पडून ठेवून घेतले[2]; आणि जमखिंडी परगणा सरंजामांत दिला. याप्रमाणें शिउबाआपा यांचा पराक्रम. त्यांस संतति कन्या धोंडूबाई भावे. त्यांची पत्नी गोदूकाकी ती जमखिंडी परगण्यांत कृष्णातीरीं कंकणवाडी ह्मणून गांव आहे तेथें राहिली. तिला श्रीमंतांनीं बाराशें

---

१ वस्तुतः खंडणी वगैरे कांहीं एक ठरलें नाहीं. नादिरशहानें दिल्लीवर स्वारी केल्यामुळें पेशवे व भोंसले यांचा तंटा तितकाच राहिला. २ त्या वेळीं पटवर्धनांपैकीं कोणासच सरंजामाचे मुलूख मिळाले नव्हते, येथें 'सरंजाम' याचा अर्थ 'तैनाता' असा घेतला पाहिजे! ३ भोसल्यांच्या संमतीनेंच ठेऊन घेतलें असा अर्थ घेतला पाहिजे. कारण शिउबानीं भोंसल्यांस आगाऊ बेलभंडार दिला होता. ४ शिवाजी केशव यांनीं जमखिंडी परगण्यांत गांव उत्पन्न वगैरे तेथील देसायावर स्वारी करून बळजबरीनें मिळविलीं असें ऐकिवांत आहे व तेंच सयुक्तिक दिसतें. स. १७४८ त पेशव्यांचा अंमल जमखिंडी परगण्यावर होतासें वाटत नाहीं.

५३१

रुपये तैनात बाळपरवेशी म्हणून करून दिली. ती अद्यापि त्यांचे वंशास चालत आहे. शिऊबाआपाचे वडील बंधु विश्वनाथभट यांस पुत्र गणपतराव.[2]

१६५. बाळंभट यांचे तिसरे पुत्र विठ्ठलभट यांस पुत्र अंताजीपंततात्या. हे शूर शिपाई असून अनेक लढायांत जखमी झाले[3]. अंताजी पंतांस बळवंतराव, जनोबा सुभेदार, विष्णुपंत, यादवराव व विठ्ठलराव असे पांच पुत्र होते.

१६६. आतां मूळपुरुष हरभट यांचे पुत्र त्रिवर्ग. त्यांत वडील पुत्र बाळंभट यांचा वंश येथपर्यंत लिहिला. दुसरे पुत्र कृष्णंभट यांस चांदूबाई[4] कन्या होती तिचा वंश जोशी सखंदेवमंडळी. तिसरे पुत्र रघुनाथभट यांस पुत्र धोंडभट, धोंडभटास पुत्र बाळंभट, महादेवभट व वासुदेवपंत.

१६७. याप्रमाणें हरिवंशाचा विस्तार व कीर्तीचें वर्णन यथामति लेखन केलें असे. श्रमेंकरून वाचिल्यास मनोरथ पूर्ण होतील व वंशवृद्धि होईल. याची फलश्रुति हीच. हरिवंशाचे कीर्तीचें वर्णन करील व हरिवंश वाचील त्याचे वंशाची वृद्धि होईल. या वंशाची प्रत लिहून जो आपले गृहाचे ठायीं संरक्षण करील त्यास दुःख, दारिद्र्य प्राप्त होणार नाहीं. याप्रमाणें फलश्रुति असे. शके १७६४ शुभकृन्नामसंवत्सरे. वैशाख शु. ५ इंदुवारीं हा ग्रंथ लिहिला असे. मु० आंबेनजीक श्रीक्षेत्र पंढरपूर. श्रीभीमातीर. श्रीउत्तरेश्वरसंनिध.

---

१ गोदूबाईची तैनात बेहडयांत गणपतराव यांचे नांवें पेशव्यांनीं करून दिली ती त्यांच्या वंशाकडे अद्यापि चालत आहे. गणपतराव हे पटवर्धनांच्या फौजेंत पंचवीस स्वारांनिशीं चाकरी करीत. २ यांच्या घराण्यास यादवाडकर ह्मणतात. ३ पटवर्धनांचा उदय होऊं लागल्यापासून ह्मणजे सुमारें शके १६५० पासून पुढें पन्नासपंचावन वर्षेपर्यंत झालेल्या बहुतेक मोहिमांत यांचें नांव आलेलें दृष्टीस पडतें. ४ हे महापराक्रमी व स्नानसंध्याशील होते. इंग्रजांशीं तळेगांव येथें व बोरघांटाखालीं लढाया झाल्या त्यांत यांस जखमा लागल्या होत्या, व परशुरामभाऊ यांच्या हाताखालीं एका टोळीवर हे मुख्य सरदार होते. नंतर यांनीं लष्करी पेशा सोडून अग्निहोत्र घेतलें व पंचवीस हजार रुपये खर्चून काशीयात्रा केली व आसंगी हा गांव नूतन वसवून वेणुगोपाळाची तेथें स्थापना करून तो गांव देवास इनाम करून दिला. यांस 'दीक्षित' ह्मणत असत. ५ नापार येथें कर्नल कीटिंग याच्या फौजेशीं झालेल्या लढाईत जनोबा सुभेदार यांस संगिनीची जखम लागली होती व इतर अनेक लढायांत यांस जखमा लागल्या होत्या. ६ विठ्ठलराव हेही मोठे शूर व अनेक लढायांत कामकाज केलेले असे होते. खर्ड्याच्या लढाईत यांस भाल्याची जखम लागली होती. ७ यांच्या घराण्यास शेळकर ह्मणतात. ८ ऐ. ले. संग्रहांत यांचा उल्लेख 'वासुदेवकाका' व 'वासुदेव धोंडदेव' या नांवानीं शेंकडों वेळां आलेला आहे. हे पटवर्धनांच्या प्रत्येक मोहिमेंत हजर असून सांवशीच्या लढाईत हैदरअलीकडे पाडाव सांपडले होते.

४३९

समाप्त.

(स्थल प्रत)

ऐतिहासिक लेखसंग्रह.

या पुस्तकांत पटवर्धन सरदारांच्या जुन्या दप्तरांतील ऐतिहासिक महत्त्वाचे अस्सल कागदपत्र प्रसिद्ध होत आहेत. हे कागदपत्र आम्ही मोठ्या श्रमानें मिळवून त्यांची साल-वारी व प्रकरणवारी लावून तारीख, महिना व सन यांच्या अनुक्रमानें छापीत आहों. प्रत्येक पत्रावर तारीख, महिना व सन घालून पत्रांतील मजकुराचें दर पृष्ठावर हेडिंग दिलें आहे व खालीं अर्थाची फोड करण्याकरितां भरपूर टिपाही दिल्या आहेत. शिवाय प्रत्येक प्रकरण छापतांना त्यांतील विषयाचें सुसंगत विवेचन करून एक एक प्रस्तावनाही जोडिली आहे. पानपतच्या युद्धापासून तों तहत बाजीरावाच्या अखेरीपर्यंतचा इतिहास या पुस्त-कांत येणार असून तो त्या त्या काळांतील पेशवे, प्रमुख मुत्सद्दी व सरदार यांच्याच शब्दांनीं वर्णिला जाणार आहे ! अधिकारयोगांत आलेल्या उताऱ्यांवरून या ऐ. ले. संग्रहांतील लेख किती महत्त्वाचे असतात हें कोणासही कळेल. मराठी इतिहासाची हौस बाळगणाऱ्या प्रत्येक गृहस्थानें व प्रत्येक लायब्ररीनें यां पुस्तकाचा अवश्य संग्रह करावा. या पुस्तकाचे पहिले तीन भाग बारा बारा सुटे अंकांचे असून चवथा व पांचवा भाग यांचीं एकत्र बांधिलेलीं निरनिराळीं पुस्तकें आहेत.

पुस्तकांतील विषयानुक्रमः—

भाग पहिलाः—स० १७६० जानेवारी ते १७६३ मेपर्यंत. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीची अखेर—माधवरावांस पेशवाईचीं वस्त्रें—मोगलांची पुण्यावर स्वारी—लढाया व तह—माधवराव व राघोबादादा यांमध्यें वितुष्ट—घोडनदीची लढाई—राघोबाची सरशी—पटवर्धन वगैरे सरदारांचा रूसवा—मिरजेचा वेढा—मोगलांशीं पुनः लढाई सुरू—पुण्याचा विध्वंस—पेशव्यांचा मोगलाईंत धुमाकूळ—डेमी अष्टपत्री पृष्ठें ४८०.

भाग दुसराः—स० १७६३ मे ते १७६४ डिसेंबरपर्यंत. राक्षसभुवनची लढाई व मो-गलांशीं तह—हैदरअल्लीचें चरित्र—पेशव्यांची हैदरअल्लीवर पहिली स्वारी—रटेहळ्ळी, अन-वटा, हावेरी येथील लढाया—सावनूरचें रक्षण—धारवाडचा वेढा. डे० अ० पृष्ठें ४८०.

भाग तिसराः—स० १७६४ डिसेंबर ते १७६९ ऑक्टोबरपर्यंत. हैदरअल्लीशीं तह—भोंसल्यावर स्वारी—राघोबादादाची उत्तरहिंदुस्थानांत स्वारी—पेशव्यांची हैदरअल्लीवर दुसरी स्वारी—पेशवे व राघोबादादा यांच्या आनंदवल्लीस भेटी—घोडपची स्वारी—बास कैद—भोंसल्यावर दुसरी स्वारी. डे० अ० पृष्ठें ४८०.

भाग चवथाः—स० १७६९ ऑक्टोबर ते १७७३ ऑगस्ट—स्वारी—रोहिलखंड प्रांतीं स्वारी—माधवराव पेशव्यांचा मृ—व खून. डे० अ० पृष्ठें ६००.

भाग पांचवाः—स० १७७३ ऑगस्ट ते १७७६—गंगाबाईची स्थापना व राघोबाचा पाठ—मोहीम—इंग्रजांशीं लढाया व पुरंदरचा—तोतयाच्या बंडास सुरूवात. डे०—

प्रत्येक भागाची किंमत ट०—

शिल्लक नाहींत. कांहीं फुटकळ अंक—सवलतीनें देण्यांत येतील.

ऐतिहासिक लेखसंग्रह.

या पुस्तकांत पटवर्धन सरदारांच्या जुन्या दप्तरांतील ऐतिहासिक महत्त्वाचे अस्सल कागदपत्र प्रसिद्ध होत आहेत. हे कागदपत्र आम्ही मोठ्या श्रमानें मिळवून त्यांची साल-वारी व प्रकरणवारी लावून तारीख, महिना व सन यांच्या अनुक्रमानें छापीत आहों. प्रत्येक पत्रावर तारीख, महिना व सन घालून पत्रांतील मजकुराचें दर पृष्ठावर हेडिंग दिलें आहे व खालीं अर्थाची फोड करण्याकरितां भरपूर टिपाही दिल्या आहेत. शिवाय प्रत्येक प्रकरण छापतांना त्यांतील विषयाचें सुसंगत विवेचन करून एक एक प्रस्तावनाही जोडिली आहे. पानपतच्या युद्धापासून तों तहत बाजीरावाच्या अखेरीपर्यंतचा इतिहास या पुस्त-कांत येणार असून तो त्या त्या काळांतील पेशवे, प्रमुख मुत्सद्दी व सरदार यांच्याच शब्दांनीं वर्णिला जाणार आहे ! अधिकारयोगांत आलेल्या उताऱ्यांवरून या ऐ. ले. संग्रहांतील लेख किती महत्त्वाचे असतात हें कोणासही कळेल. मराठी इतिहासाची हौस बाळगणाऱ्या प्रत्येक गृहस्थानें व प्रत्येक लायब्ररीनें या पुस्तकाचा अवश्य संग्रह करावा. या पुस्तकाचे पहिले तीन भाग बारा बारा सुटे अंकांचे असून चवथा व पांचवा भाग यांचीं एकत्र बांधिलेलीं निरनिराळीं पुस्तकें आहेत.

पुस्तकांतील विषयानुक्रमः—

भाग पहिलाः—स० १७६० जानेवारी ते १७६३ मेपर्यंत. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीची अखेर—माधवरावांस पेशवाईचीं वस्त्रें—मोगलांची पुण्यावर स्वारी—लढाया व तह—माधवराव व राघोबादादा यांमध्यें वितुष्ट—घोडनदीची लढाई—राघोबाची सरशी—पटवर्धन वगैरे सरदारांचा रूसवा—मिरजेचा वेढा—मोगलांशीं पुनः लढाई सुरू—पुण्याचा विध्वंस—पेशव्यांचा मोगलाईंत धुमाकूळ—डेमी अष्टपत्री पृष्ठें ४८०.

भाग दुसराः—स० १७६३ मे ते १७६४ डिसेंबरपर्यंत. राक्षसभुवनची लढाई व मो-गलांशीं तह—हैदरअल्लीचें चरित्र—पेशव्यांची हैदरअल्लीवर पहिली स्वारी—रटेहळ्ळी, अन-वटा, हावेरी येथील लढाया—सावनूरचें रक्षण—धारवाडचा वेढा. डे० अ० पृष्ठें ४८०.

भाग तिसराः—स० १७६४ डिसेंबर ते १७६९ ऑक्टोबरपर्यंत. हैदरअल्लीशीं तह—भोंसल्यावर स्वारी—राघोबादादाची उत्तरहिंदुस्थानांत स्वारी—पेशव्यांची हैदरअल्लीवर दुसरी स्वारी—पेशवे व राघोबादादा यांनी आनंदवल्लीस भेट—घोडपची स्वारी—बास कैद—भोंसल्यावर दुसरी स्वारी. डे० अ० पृष्ठें ४८०.

भाग चवथाः—स० १७६९ ऑक्टोबर ते १७७३ ऑगस्ट—स्वारी—रोहिलखंड प्रांतीं स्वारी—माधवराव पेशव्यांचा [illegible] व खून. डे० अ० पृष्ठें ६००.

भाग पांचवाः—स० १७७३ ऑगस्ट ते १७७६ [illegible]
गंगाबाईची स्थापना व राघोबाचा पाठ[illegible]
मोहीम—इंग्रजांशीं लढाया व पुरंदरचा [illegible]
तोतयाच्या बंडास सुरुवात. डे० [illegible]

प्रत्येक भागाची किंमत ८०
शिल्लक नाहींत. कांहीं फुटकळ अंक
सवलतीनें देण्यांत येतील.

अधिकारयोग

अथवा

नानास राज्याधिकार मिळाल्याचा इतिहास.

'खुब शर्तीनें राज्य राखणाऱ्या' नाना फडनविसानीं राज्य बुडविणाऱ्या एकाहून एक बलिष्ठ अशा प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यासाठीं लढविलेलीं कारस्थानें, तीं लढवितांना त्यावर आलेलीं दुर्धर संकटें, त्या संकटांतून पार पडतांना त्यांनीं प्रकट केलेली निस्सीम स्वामिभक्ति उज्ज्वल देशाभिमान, यांचें सप्रमाण वर्णन सरदार परशुरामभाऊ वगैरेच्या लेखांतून भरपूर उतारे देऊन या ग्रंथांत केलें आहे. किंमत ८१०. ट. हं. ८१.

अभिप्राय.

"सोपी व साधी पण अभियुक्त भाषापद्धति, विषयास अनुरूप अशी विचारसरणी, खंबीर भरभक्कम पुरावा, भाकडकथेचा अभाव, अतिशयोक्तिशून्यता इत्यादि या ग्रंथांत दिसून येणारे अनेक गुण शास्त्रीबोवांपासून कोणीही शिकून घ्यावे." **ज्ञानप्रकाश.**

"प्रस्तुत पुस्तकांतील कित्येक प्रसंग इतके उत्तम रीतीनें वठले आहेत कीं त्या प्रसंगांचें हुबेहूब चित्र डोळ्यांपुढें उभें राहून वाचकांची तादात्म्यवृत्ति होऊन जाते. पुस्तकांत पटवर्धनांच्या दप्तरांतील पत्रांतून महत्वाच्या प्रसंगींचे उतारे दिले आहेत ते तर फारच बहारीचे आहेत. इतिहासाच्या हजारों पृष्ठांचा वाचकांच्या मनावर जितका परिणाम होणार नाहीं तितका परिणाम या पत्रांतील उताऱ्यांनीं होऊन सहृदय वाचकांचें मन गहिंवरून येतें." **राष्ट्रमत.**

"पुस्तक फार चांगलें झालें आहे. आपली भाषा इतकी गोड आहे कीं पुस्तक कादंबरीसारखें मोहक वाटतें. अस्सल माहितीच्या आधारानें लिहिलेलें असल्यामुळें मराठी इतिहासास त्याचा चांगला उपयोग होईल."

गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.

"तुमचें अधिकार-योग पुस्तक इतकें रमणीय व माहितीनें भरलेलें आहे कीं तें सुरू केल्यावर पुरें वाचून झालें तेव्हांच खालीं ठेविलें!"

विष्णु रघुनाथ नातू, बी. ए. एल. एल. बी.

"अधिकार-योग पुस्तक समग्र वाचून फार आनंद झाला हें सांगणें नकोच. [illegible] साधा[illegible]हे व निःपक्षपात बुद्धिही चांगलीच प्रत्ययास येत."

नारायण रंगनाथ अळेकर, बी. ए. बी. एल.

[illegible] समग्र वाचून पाहिलें. आपली लेखनशैली सोपी, शुद्ध [illegible]ची हातोटी फार चांगली आहे. आजपर्यंत उपलब्ध [illegible]स्तकांत आली आहे."

काशिनाथ नारायण साने बी. ए.

[illegible]न विषयाची मांडणी चांगली जुळली [illegible]गतवार दाखविला आहे. व्यक्तींच्या [illegible]शिक्षित वाचकास हें पुस्तक तन्मय [illegible]ईल."

[illegible] आगाशे, बी. ए. एल. एल. बी.